UNIVERSAL
LIBRARY
OU_192580
UNIVERSAL
LIBRARY

विठ्ठल वामन हडप लिखित

## कादंबरीमय आंग्लशाही

१ भारतमाते ऊठ

२ भारतमातेची हांक

३ भारतमातेचा शाप

४ भारतमाता वनवासी

५ भारतमातेचें दिव्य

६ भारतमाता की जय !

वरील सर्व कादंबऱ्यांचे मराठीचे सर्वाधिकार
**ग. पां. परचुरे** यांचे स्वाधीन

पहिली आवृत्ति
१५ ऑगस्ट १९५१

: प्रकाशक :
**ग. पां. परचुरे**
ग. पां. परचुरे प्रकाशन
मन्दिर, गोरेगांवकर चाळ
क्र. २, गिरगांव, मुंबअी ४

: मुद्रक :
**वि. पु. भागवत**
मौज प्रिंटिंग ब्यूरो,
खटाववाडी, मुंबअी ४

# दोन शब्द

चार पांच महिन्यांपूर्वी श्री. हडप यांनीं 'कादंबरीमय आंग्लशाही' या आपल्या मालेला छोटी मोठी–जमेल तशी–प्रस्तावना लिहिण्याविषयीं मला सांगितलें. त्यांचें पत्र वाचून मी मोठ्या गोंधळांत पडलों. त्यांना नकार द्यावा कीं होकार द्यावा हें चटकन् मला निश्चित करतां येईना. अनेक कारणांमुळें मन नकाराकडेच प्रथम झुकलें. एक तर गेलें वर्ष दीडवर्ष माझी प्रकृति अतिशय नादुरुस्त आहे. स्वतःचें लेखन करायला सुद्धां मी असमर्थ झालों आहें. आजारांनीं पाठ पुरवल्यामुळें 'नवी स्त्री' ही स्वतःची कादंबरी अर्धवट टाकून मला स्वस्थ पडून राहावें लागलें आहे. अलीकडे साहित्यिकांपेक्षां डॉक्टरांच्याच सहवासांत माझा अधिक वेळ जातो आणि ललित वाङ्मयांतल्या विविध रसांचा आस्वाद घेण्यापेक्षां निरनिराळ्या कडू गोड औषधांची चव चाखीत बसणें हाच सध्यांचा माझा उद्योग झाला आहे, असें म्हटलें तर त्यांत फारशी अतिशयोक्ति होणार नाहीं. अशा स्थितींत मी इतरांना नाहीं म्हणतों त्याप्रमाणें हडपांनाहि नकार द्यावा असें माझ्या मनांत आलें.

या वैयक्तिक कारणाशिवाय अधिक बलवत्तर असें दुसरें एक कारण या नकाराच्या विचाराच्या मुळाशीं होतेंच. हडप व मी समकालीन लेखक असलों तरी कादंबरी-कार या नात्यानें वडीलकीचा मान त्यांचा आहे. मी १९३० सालीं भीत भीत 'हृदयाची हांक' ही कादंबरी मराठी रसिकांपुढें ठेविली त्यावेळीं हडप कादंबरीकार म्हणून चांगलेच गाजले होते. हें नातें लक्षांत घेतां आतां १९५१ सालीं मी त्यांच्या पुस्तकाला प्रस्तावना लिहिणें हें एखाद्या प्रौढ स्त्रीची पाटराखीण म्हणून तिच्या मैत्रिणीनें तिच्या सासरीं जाण्याइतकेंच हास्यास्पद होईल अशी शंका माझ्या मनांत उभी राहिली.

पण थोडा विचार केल्यानंतर त्यांना नाहीं म्हणणें मला जड वाटूं लागलें. ज्या सद्भावानें दोन प्रास्ताविक शब्द लिहिण्याविषयीं त्यांनीं मला सांगितलें, तो साहित्याच्या क्षेत्रांत नेहमींच अनुभवाला येतो असें नाहीं. प्रसंगीं व्यापारी जगांतहि स्पर्धेचें जें हीन स्वरूप आढळणार नाहीं तें साहित्याच्या आणि इतर कलांच्या क्षेत्रांत अनेकदां स्पष्टपणें दृष्टोत्पत्तीला येतें. स्वतःला मुक्त मानणारा कलावंत पुष्कळ वेळां क्षुद्र अहंकाराचे पाश तोडूं शकत नाहीं ! कलावंताची आत्मनिष्ठा

याचा कदाचित् हा आधुनिक अर्थ असूं शकेल. दुसऱ्याच्या लहानपणावरच आपला मोठेपणा अवलंबून आहे, अशी एकदां माणसाची समजूत झाली म्हणजे त्याची रसिकता डागळते, वाङ्मयीन मूल्यें संकुचित होतात, हातांतला न्यायाचा कांटा कसाहि झुकूं लागतो. ही जाणीव असल्यामुळें हडपांसारख्या दोन अडीच तपें सतत साहित्यसेवा करणाऱ्या एका लेखकानें दुसऱ्या लेखकाकडे प्रस्तावना मागणें ही गोष्ट मला मोठी सौजन्याची आणि अपूर्वाईची वाटली. या सौजन्याला नकार देणें माझ्या जिवावर आलें. तापानें गळून गेलेल्या स्थितींत अंथरुणावर पडल्या पडल्या मी आज हे दोन शब्द सांगत आहें ते अधिकारी टीकाकार किंवा हडपांच्या वाङ्मयाचा चोखंदळ अभ्यासक या नात्यानें नाहीं, तर त्यांच्या वाङ्मयसेवेचा एक चाहता म्हणून.

हडपांचें सर्व वाङ्मय मीं काळजीपूर्वक वाचलें आहे असें म्हणतां येणार नाहीं. मात्र त्यांच्या दीर्घकालीन साहित्यसेवेविषयीं मला नेहमींच कौतुक वाटत आलेलें आहे. विपुल लेखन करणाऱ्या सर्व लहानथोर लेखकांविषयीं माझ्या मनांत एक अर्धसुप्त, अर्धजागृत अशी आदराची भावना वावरत असते. मला वारंवार वाटतें, एकनिष्ठेनें तपेंच्या तपें लिहीत राहणाऱ्या लेखकाच्या ठिकाणीं विशिष्ट प्रकारची भावनेची उत्कटता असली पाहिजे. त्या उत्कटतेला भक्ति हेंच नांव मी देईन. अशी उत्कटता अंगीं असल्याशिवाय कीर्तीचा आणि चरितार्थाला आवश्यक असणाऱ्या द्रव्याचा लाभ ज्या क्षेत्रांत कर्तृत्वाच्या मानानें अतिशय कमी प्रमाणांत होतो, त्याला चांगलीं चांगलीं बुद्धिवान माणसें कशीं चिकटून राहिलीं असतीं? गडकरी-खाडिलकरांसारखे नाटककार, आपटे-फडक्यांसारखे कादंबरीकार, आणि जोशी-अत्र्यांसारखे विनोदकार इंग्लंड-अमेरिकेंत जन्माला आले असते तर मॉम, गॅल्सवर्दी, हार्डी, प्रिस्टली, लीकॉक, आणि वुडहाउस, यांचें यश—द्रव्य व कीर्ति या दोन्ही दृष्टींनीं—त्यांना असाध्य होतें असें मला वाटत नाहीं! पण मॉमला एखाद्या नाटकावर जितके पैसे मिळाले असतील तितके गडकऱ्यांना आपल्या उभ्या आयुष्यांत मिळाले असतील कीं नाहीं याची शंकाच आहे! वुडहाउसच्या अनेक पुस्तकांच्या आवृत्त्यांवर आवृत्त्या निघत असतांना आमच्या चिंतामणरावांचीं विनोदी पुस्तकें दुसऱ्या तिसऱ्या आवृत्तीपलीकडे फारशी मजल मारूं शकत नाहींत. अशा प्रतिकूल परिस्थितींत जे साहित्यसेवक अंतरींच्या प्रेरणेनें, सेवेच्या

भावनेनें किंवा कर्तव्याच्या जाणिवेनें अखंड लेखन करीत राहतात, ते मला आदरणीय वाटतात. हरिभाऊ आपटे, गुर्जर, नाथमाधव, वरेरकर, डॉ. केतकर, फडके, सानेगुरुजी, हडप या लेखकांचे वाङ्मयीन गुणावगुण कितीहि भिन्न असोत, शारदेच्या दरबारांत त्यांच्यापैकीं कुणाला पुढल्या रांगेंत स्थान मिळो, कुणाची जागा मागच्या रांगेंत येवो, या सर्वांमध्यें एक मोठा गुण समान आहे. तो म्हणजे साहित्य हें आत्माविष्काराचें, आनंदाचें, सेवेचें आणि संस्काराचें एक सुंदर साधन आपल्यापाशीं आहे, त्याचा आपण निष्ठेनें अखंड उपयोग केला पाहिजे, ही श्रद्धा हा होय.

हडपांच्या आतांपर्यंतच्या लेखनांत ही श्रद्धा प्रकट झाली आहे. त्यांच्या प्रारंभींच्या सामाजिक कादंबऱ्या समाजांतल्या लहानमोठ्या दोषांवर प्रहार करण्याच्या उद्देशानेंच लिहिल्या गेल्या. त्यांत कलेची अपरिपक्वता असेल; पण तळमळीचा अभाव होता असें अत्यंत कठोर टीकाकारहि म्हणूं शकणार नाहीं. त्यांच्या लेखनाचा दुसरा कालखंड पेशवाईवरल्या कादंबऱ्यांनीं व्यापला आहे. ऐतिहासिक कादंबऱ्यांचें एक नवें दालन त्यामुळें उघडलें गेलें असें म्हणायला हरकत नाहीं. साधुदासांशिवाय दुसरा कुणीहि लेखक मराठ्यांच्या इतिहासांतल्या या नाट्यपूर्ण कालखंडाकडे अद्यापि कसोशीनें वळलेला नाहीं. तिसऱ्या कालखंडात हडपांची सामाजिक दृष्टि अधिक व्यापक आणि मूलगामी झालेली दिसते. 'अन्नदाता उपाशी' सारख्या अनेक स्वतंत्र कादंबऱ्या आणि 'बापलेक', 'झोंपी गेलेला देश' इत्यादि अनुवादित कादंबऱ्या त्यांनीं या काळांत लिहिल्या. या सर्व कादंबऱ्यांतली सामाजिक जाणीव व तिच्यांतून व्यक्त होणारा लेखकाचा विकास स्पृहणीय आहे.

त्यांच्या या विविध व विपुल लेखनाची टीकाकारांनीं जेवढी कदर करायला हवी होती तेवढी केली नाहीं असें मला वाटतें. उगवत्या सूर्याची पूजा करण्यांत जग नेहमींच निमग्न असतें हें कदाचित् या उपेक्षेचें एक कारण असूं शकेल. मला वाटतें तें दुसरें महत्त्वाचें कारण इथें नमूद करतों. आपल्याकडे वाङ्मयचर्चा करण्याची शक्ति व शक्यता असणारी मंडळी मर्यादित असतात. या टीकाकारांचे पूर्वग्रहहि कांहीं थोडे नसतात! ऐतिहासिक दृष्टीनें किंवा तुलनात्मक पद्धतीनें विद्यमान वाङ्मयाकडे पाहण्याची इच्छा त्यांच्यापैकीं एखाद्याला क्वचितच होते. हरघडी निर्माण होणाऱ्या वाङ्मयाची दखल घेणें, त्याच्यांतल्या विविध प्रवृत्तींचा परामर्श घेणें आणि जें जें सुंदर अथवा प्रगतिपर वाटेल त्याच्या त्याच्याकडे लोकांचें

लक्ष वेधून घेणें हें टीकाकाराचें एक प्रमुख कर्तव्य आहे याची आमच्यांतल्या पंडितांना सहसा आठवण होत नाहीं. कुठल्यातरी प्रचलित वादविवादांत रंगून जाण्यांत किंवा अभिनिवेशानें एखाद्या आवडत्या गोष्टीचा पुरस्कार किंवा नावडत्या गोष्टीचा तिरस्कार करण्यांत त्यांची पुष्कळशी शक्ति खर्ची पडते. जुने लेखकहि नवे प्रयोग करीत असतात, सर्वच जुन्या लेखकांचें लेखन सांठलेल्या पाण्यासारखें असत नाहीं, त्यांतले कित्येक आपापल्या परीनें—अडखळत का होईना—प्रगति करण्याचा प्रयत्न करीत असतात, या वस्तुस्थितीकडे लक्ष देणारे टीकाकार तर अगदींच विरळ असतात. श्री. हडप यांनीं ‘ कादंबरीमय आंग्लशाही ’ या मालेंत आपल्या शक्तीप्रमाणें एक नवीन प्रयोग करून पाहिला आहे. त्याच्या मूल्य-मापनाकडे टीकाकारांचें दुर्लक्ष होऊं नये म्हणून हें लिहिलें. या प्रयोगाचें प्रामाणिक मूल्यमापन मराठी कादंबरीला उपकारक होईल असा मला भरंवसा वाटतो.

या कादंबरीमालेच्या सहा पुष्पांत हडपांनीं १९१८ ते १९४८ या कालखंडां-तला भारताचा स्वातंत्र्यप्राप्तीचा इतिहास सांगण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळें एका दृष्टीनें या कादंबऱ्या राजकीय आहेत, दुसऱ्या दृष्टीनें सामाजिक आहेत, आणि तसेंच पाहिलें तर त्यांचें स्वरूप थोडें फार ऐतिहासिकहि आहे. तीस वर्षांच्या या कालखंडांत या विशाल परतंत्र देशांत ज्या राजकीय चळवळी झाल्या, जीं तत्त्वज्ञानें उदयाला आलीं, जे अभूतपूर्व संघर्ष दृष्टीला पडले त्यांची सुसंगत मांडणी करायची, सर्व घडामोडींचा सामाजिक जीवनावर झालेला परिणाम हळुवार हातानें कल्पित कथानकाच्या द्वारें चित्रित करायचा, तीस वर्षांचा कालप्रवाह पार करतांना आपण पोहलों किती, आणि वाहत गेलों किती, आपण आतां कुठें येऊन पोहो-चलों आहों हें कलात्मक रीतीनें सूचित करायचें, ही गोष्ट कांहीं सामान्य नाहीं. हडपांनीं या मालेंत तो प्रयत्न यथाशक्ति केला आहे.

त्यांच्या पहिल्या कादंबरींत १९१८ ते १९२२ या कालखंडाचें चित्रण आहे. दुसरीची पार्श्वभूमि १९३० ची मिठाच्या कायदेभंगाची चळवळ ही आहे. उरलेल्या चार कादंबऱ्या दुसरें महायुद्ध सुरू झाल्यापासून भारताला स्वातंत्र्य मिळेपर्यंत ज्या विविध घटना घडल्या त्यातल्या वेंचक संघर्षांच्या आधारावर उभारलेल्या आहेत. या शेवटच्या चार कादंबऱ्यांत एक प्रकारचा अखंडपणा आहे, धावतें कथासूत्र आहे. त्यांतलीं पात्रें आपणांला पुनःपुन्हा भेटतात,

त्यामुळें या कालखंडांतल्या विविध पेशांच्या, प्रकृतींच्या आणि प्रवृत्तींच्या माणसांचें जीवन त्यांत चांगल्या रीतीनें प्रतिबिंबित झालें आहे. विशिष्ट जीवनाचा इतिहास चित्रित करणाऱ्या कादंबरीची (Saga) कल्पना मराठीला अगदींच अपरिचित आहे असें नाहीं. आपले सर्वश्रेष्ठ कादंबरीकार हरिभाऊ आपटे यांना तिचें आकर्षण वाटत होतें हें निश्चित आहे. त्यांच्या एका कादंबरींतलीं कांहीं पात्रें दुसऱ्या कादंबरींत वावरतांना आढळतात. एक पिढी संपून दुसरी सुरू झाली म्हणजे समाजांत जें स्थित्यंतर होतें त्याचें चित्रण करण्याची त्यांची प्रबळ इच्छाहि कांहीं कादंबऱ्यांतून सूचित झाली आहे. 'उपकारी माणसें' या आपल्या कादंबरीमालेंत रघुवीर सामंतांनीं थोडाफार अशाच प्रकारचा प्रयत्न केला आहे. हडपांनीं स्वातंत्र्य-संपादनाच्या पार्श्वभूमीवर सहा कादंबऱ्या लिहून या लेखनपद्धतीचें अधिक विकसित स्वरूप कसें होऊं शकेल हें दिग्दर्शित केलें आहे.

कादंबरीलेखनाची ही पद्धति एका विशिष्ट दृष्टीनें मला स्वागतार्ह वाटते. तरुण मराठी कादंबरीकारांचें तिच्याकडे लक्ष जाणें अवश्य आहे. आपल्या कथानकप्रधान कादंबऱ्या बहुधा फार लहान अशा कालमर्यादेवर आधारलेल्या असतात. त्यामुळें त्यांत विविध प्रसंगांची विपुलता असली तरी त्यांतून दिग्दर्शित होणारें जीवन एकाच सांच्याचें भासतें. जीवनाची गति किंवा गतीमुळें होणारे फेरफार त्यांतून क्वचितच सूचित होतात. इतकेंच नव्हे तर कैलासलेण्यांत जाऊन उभें राहिल्यावर ज्या विशालतेचा आणि उदात्ततेचा आपल्याला अनुभव येतो तसा जीवनाच्या विशालतेचा आणि उदात्ततेचा प्रत्ययहि अशा कलाकृतींत बहुधा येत नाहीं. भाव-दर्शन, मनोविश्लेषण, एकाच सामाजिक समस्येचें चित्रण इत्यादि दृष्टींनीं लहान कालखंडावर आधारलेल्या कादंबऱ्या सुंदर होऊं शकतात. पण जीवनाचें वास्तव दर्शन करून देण्याच्या कामीं त्या थोड्याशा थिट्या पडतात असें मला वाटतें. त्यांत जीवनाची उत्कटता असते; पण त्याची भव्यता आढळत नाहीं.

दीर्घ कालखंडाच्या चित्रणांत किंवा दोनतीन पिढ्यांच्या जीवनदर्शनांत या विशालतेचा अनुभव कसा येतो व तो आपला वैचारिक आनंद कसा वृद्धिंगत करतो हें प्रो. फडके यांच्या 'दौलत' व 'अखेरचें बंड' या दोन कादंबऱ्यांच्या तुलनेनें सहज कळूं शकेल. त्यांच्या कादंबरीवाङ्मयांत या दोन्ही वरिष्ठ प्रतीच्या गणल्या जातील अशाच आहेत. पण पहिल्या कादंबरींत दोन पिढ्यांमधला संघर्ष

असूनहि मर्यादित कालखंडामुळें आपलें लक्ष तिच्यांतल्या घटनांवर अधिक खिळून राहतें. फार फार तर आपण स्वभावचित्रणांतल्या कलाकुसरीकडे लक्ष देतों. पण 'अखेरचें बंड' या कादंबरींत नायिकेच्या पित्याचें चरित्र सांगण्याच्या निमित्तानें फडक्यांनीं दोन पिढ्यांचें जीवन रेखाटलें आहे. त्यामुळें ही कादंबरी वाचतांना आपण कळत न कळत अनुभूतीचा वरचा थर सोडून खालच्या थराकडे वळतों. आपलीं धाकटीं भावंडें सुखी व्हावींत आणि मार्गाला लागावींत म्हणून धडपड करणारी रोहिणी आणि तिची प्रेमळ सदिच्छा धुडकावून लावून स्वच्छंद वागणारीं रेवा व भास्कर हीं भावंडें यांचीं चित्रें डोळ्यांपुढें उभी राहिलीं म्हणजे आपल्याला वाटूं लागतें, चंद्रकांताच्या रक्तांतला अवगुण रेवा आणि भास्कर यांच्यामध्येंहि प्रकट झाला काय? निसर्गाला रोहिणीच्या त्यागाची कदर करण्याचें काय कारण? का मनुष्याचें जीवन हा लहरी दैवाचा एक क्रूर खेळ आहे? शिक्षणानें आणि प्रेमानें मनुष्यप्राणी सुधारणें शक्य आहे कीं नाहीं? कीं पतंगाची सारी हालचाल तो उडविणाराच्या इच्छेनुरूप व्हावी, तशीच माणसाच्या जीवनाची स्थिति आहे? तो स्वामी तरी जन्मजात आंधळ्या आंतरिक प्रेरणेचा गुलाम आहे कीं स्वतःचा कुठल्या आहे? चांगलें काय आणि वाईट काय हें कळल्यावर अनुकूल परिस्थितींतहि सन्मार्गाचा अवलंब करणें त्याला अशक्य कां व्हावें?

जीवनदर्शनाची ही सूक्ष्मता 'यशवंतराव खरे', 'सुशिलेचा देव' किंवा अगदीं अलीकडचें उदाहरण द्यायचें झालें तर 'हद्दपार' या कादंबऱ्यांत निराळ्या रीतीनें आपल्या प्रत्ययाला येते. नाहीं असें नाहीं. अशा कादंबऱ्यांत एकाच जीवनांतले विविध चढउतार सामाजिक परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर सूक्ष्मपणें चित्रित केलेले असतात. विशिष्ट सामाजिक जीवनांचा इतिहास चित्रित करणाऱ्या कादंबरीची कल्पना ही याच्या पुढची पायरी आहे. अशा प्रकारच्या कादंबऱ्यांत अनेक व्यक्तींचीं परिस्थितीमुळें एकत्र येणारीं, संघर्षामुळें बदलणारीं, निरनिराळ्या कालखंडांतून वाहणारीं, विविध प्रसंगाच्या प्रतिक्रिया दर्शविणारीं जीवनें कुशलतेनें गुंफलेलीं असतात. हडपांच्या या मालेंतल्या तिसऱ्या कादंबरीपासून अशा प्रकारच्या रचनेला प्राधान्य मिळालें आहे. शकुंतला, जाई, जयंत, सोपाना, शेख मिरा, फकिरा वगैरे त्यांचीं अनेक पात्रें निरनिराळ्या परिस्थितींतून कशीं जातात, कशीं बदलतात, कशीं विकास पावतात, हें पाहण्याजोगें आहे. या कादंबऱ्यांत मधल्या एका दशकांतल्या ऐतिहासिक घटना व संघर्ष असले, गांधीवाद व कम्युनिझम यांची

चर्चा व चिकित्सा असली, स्वातंत्र्यप्राप्तीच्या धडपडीबरोबर देशामध्यें निर्माण झालेल्या अनेक नव्या समस्यांचें सूचन असलें, तरी या सर्व गोष्टींपेक्षां आपल्या जीवनाचें जें धावतें, बदलतें दर्शन त्यांतून होतें, तें अधिक आकर्षक वाटतें. चांगल्या कादंबरीकाराला या विशिष्ट दृष्टीची जोड अवश्य हवी असें मला वाटतें. क्षणाचें चित्रण करण्यांत जसें कौशल्य आहे तसें युगाचें चित्रण करण्यांतहि चातुर्य आहे. जीवनाचें वास्तव व सांगोपांग दर्शन व्हायला चित्रणाच्या या दोन्ही पद्धति आवश्यक आहेत. त्या एकमेकींना पूरक आहेत.

१९०२ सालीं कादंबरी या वाङ्मयप्रकाराचें तात्त्विक विवेचन करतांना इतिहासाचार्य राजवाडे यांनीं खालील उद्गार काढले होते—'या देशांतील दारिद्र्यानें गांजलेल्या, रोगानें पीडिलेल्या, व विघ्नेनें मागासलेल्या सामान्य जनसमूहाचा कैवार सहृदयतेचे मूर्तिमंत पुतळे जे कादंबरीकार त्यांनीं घेतला नाहीं तर दुसरा कोण घेईल ? लोकांची खरी स्थिति लोकांच्या मनांत यथास्थित बिंबविण्याला कादंबरीसारखें दुसरें साधन नाहीं. त्या साधनाचा योग्य व पूर्ण उपयोग करणें ही महाराष्ट्रांतील कादंबरीकारांवर मोठी जबाबदारी येऊन पडलेली आहे. दोनशें वर्षांपूर्वीच्या ग्रंथकारानें अद्‌भुत कादंबरीच्या द्वारानें व प्रासादिक कवितेच्या मार्गानें सामान्य जनसमूहाला आत्मबोध करून दिला. प्रस्तुत कालीं तेंच कार्य बहुधा वास्तविक कादंबऱ्यांच्या व कदाचित् अद्‌भुत गोष्टींच्या द्वारें व्हावें, असा अदमास दिसतो. रा. रा. आपटे यांची रामजी ही गोष्ट ह्या अदमासाचें प्रत्यक्ष उदाहरण आहे.'

राजवाड्यांनीं उल्लेखिलेली 'रामजी' ही गोष्ट म्हणजे हरिभाऊ आपट्यांची 'काळ तर मोठा कठिण आला' ही दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्याच्या जीवनाचें चित्रण करणारी सुप्रसिद्ध करुण गोष्ट होय. त्या गोष्टींत हरिभाऊंनीं तत्कालीन परिस्थितीचें वास्तव व विदारक चित्र काढलें होतें. हडपांनीं या कादंबरीमालेंत एका दीर्घ कालखंडांतल्या संघर्षाचें, उलाढालींचें आणि उलथापालथीचें चित्रण तसेंच केलें आहे. त्यांच्या या कादंबऱ्यांत मनाला चटका लावणारे अनेक प्रसंग आहेत, त्याला आकृष्ट करणाऱ्या विविध स्वभावरेखा आहेत. विचाराला चालना देणाऱ्या गोष्टीहि त्यांच्या कथानकात कांहीं कमी नाहींत. त्यामुळें ही माला वाचकांकडून मोठ्या आत्मीयतेनें वाचली जाईल.

वाङ्मयीन गुणावगुणांच्या दृष्टीनें या मालेंतल्या प्रत्येक कादंबरीविषयीं लिहिणें

माझ्या पंगुत्वामुळें मला शक्य नाहीं. पण ' भारतमातेची हांक ' या मालेंतल्या त्यांच्या दुसऱ्या कादंबरीविषयीं थोडेंसें लिहितों. सर्व कादंबऱ्या वाचल्यावर वाचकांना ह्या अनुरोधानें विचार करतां येईल. ' कोंकणांतील शिरोडें मीठ-सत्याग्रह हा मध्यबिंदु कल्पून त्याच्या सभोंवारच्या कोंकणांतील खेडुत जीवनावर ही कादंबरी आधारलेली आहे. ' असें या कादंबरीच्या प्रस्तावनेंत हडप म्हणतात. कोंकणच्या खेड्यांत आढळणाऱ्या सर्व बऱ्यावाईट गोष्टी—स्वतःची जमीन नसल्यामुळें होणारी शेत-कऱ्याची दुर्दशा, धर्मभोळेपणा, भाविणीचा प्रश्न, सर्पदंश इत्यादि—या कादंबरींत आपल्याला दिसतात. त्यांतल्या कित्येकांचा हडपांनीं कथानक गुंफण्याच्या कामीं चातुर्यानें उपयोग केला आहे यात शंका नाहीं. कादंबरींतल्या घटना घाईघाईनें घडत असल्या तरी असंभाव्य आहेत असेंहि नाहीं. पण संपूर्ण कादंबरी वाचून झाल्यावर मनावर एकच एक तीव्र व स्पष्ट संस्कार होत नाहीं हें तिचें प्रमुख वैगुण्य आहे. अनेक अंधुक संमिश्र चित्रें डोळ्यापुढून नाचत जावींत तसा भास होतो. शिरोड्याचा मीठ-सत्याग्रह हा हडपांनीं कादंबरीचा मध्यबिंदु मानला असला तरी वाचकाला तो तसा वाटत नाहीं. अधूनमधून त्याच्याविषयींचे उल्लेख कादंबरींत येतात हें खरें आहे. पण कथानक कुठेंहि त्याच्या रोखानें धावत आहे असें वाटत नाहीं. कादंबरीच्या आरंभींच तिचा नायक सदानंद प्रवेश करतो. कादंबरीकारानें केलेल्या त्याच्या वर्णनावरून तो शिरोड्याच्या सत्याग्रहाची पूर्वतयारी करण्याकरितां आपल्या गांवीं आलेला आहे असें दिसतें. अज्ञान, दारिद्र्य, धर्म-भोळेपणा आणि भित्रेपणा यांच्या राखेखालीं गुदमरून गेलेलीं तिथलीं मनें तो कसा जागृत करणार याविषयीं कुतूहल वाटूं लागतें. त्याला होणारे विविध अडथळे आणि त्यानें यशस्वी रीतीनें सर्व विरोधाना दिलेली टक्कर, हा या कादंबरीच्या कथानकाचा कणा असावा अशी कल्पना मनांत मूळ धरते. पण ' दांडीयात्रेचे पडसाद ' या पहिल्या भागाच्या शेवटीं सदानंदाला साप चावतो. अशा रीतीनें तो अंथरुणाला खिळल्यानंतर लेखक दुसऱ्या अनेक पात्रांकडे वळतो व उपकथांचे धागे विणतो. अगदीं शेवटीं शेवटीं तो सदानंदाकडे पुन्हा परत येतो. या रचना-पद्धतीमुळें सदानंद निर्जीव, निष्क्रिय व पोपटपंची करणारा एक स्वप्नाळु तरुण वाटतो. एवढेंच नव्हे तर कथेचा मुख्य संघर्ष कुठें केंद्रित झाला आहे हें वाचकाला न कळल्यामुळें कादंबरीच्या रसास्वादांत वैगुण्य येतें. कादंबरीच्या एकेका भागांत निरनिराळ्या पात्रांना प्राधान्य मिळाल्यामुळें उत्कटतेचा अभाव जाणवतो

तो निराळाच! प्यादीं आणि मोहरीं घेऊन आपण बुद्धिबळें खेळतों. पण त्या प्याद्यांना किंवा मोहऱ्यांना डावांत एका मर्यादेपेक्षां अधिक महत्त्व आपण देत नाहीं. विरुद्ध पक्षाच्या राजाला शह देणें व आपल्या राजाला शह मिळणार नाहीं असा प्रयत्न करणें हाच प्रत्येक प्याद्याच्या किंवा मोहऱ्याच्या हालचालीच्या मुळाशीं आपला हेतु असतो. कादंबरीच्या रचनेंतली अशा प्रकारची सूत्रबद्धता रसपरिपोषाला उपकारक होते असें मला वाटतें. पण विविध सामाजिक संघर्ष सूत्ररूपानें चित्रित करण्याच्या गडबडींत हडपांचें या गोष्टीकडे दुर्लक्ष झालेलें दिसतें.

अनेक पात्रें व विविध प्रसंग लहानशा कादंबरींत चित्रित करणें कौशल्याचें काम आहे. पण असें करतांना रसपूर्ण प्रसंगांचा निष्कारण संकोच होणें इष्ट नाहीं. या संकोचामुळें अशा प्रसंगांतली काव्यमयता किंवा नाट्यमयता वाचकापर्यंत पूर्णपणें पोंचूं शकत नाहीं. उदाहरणार्थ या कादंबरींतला पृ. ६४ वरला प्रसंग पाहावा. शिवनाक महाराच्या औषधी उपायांमुळें सदानंदाला जीवदान मिळालें आहे. सदानंद वाड्यांत झोपला आहे. त्याच्या प्रकृतींत चलबिचल झाली तर आपण जवळपास असावें म्हणून शिवनाक महार बाहेर बसला आहे. त्याचें वर्णन हडपांनीं असें केलें आहे—‘ शिवनाक महार वैद्य देखील वाड्याबाहेर खळ्याच्या कोपऱ्यांत महारापोरांनीं उभें राहण्याच्या कट्ट्यावर जिवाच्या जनतेनें धन्यांच्या जिवावर जागता पहारा करीत बसला होता. नाना आल्याखेरीज जाऊं नकोस असें त्याला देसाईण बाईचें सांगणें होतें. याच कट्ट्यावर त्यानें नानांकडून भर उन्हांत तिष्ठत त्यांच्या पायांतल्या पायतणाचा मरेमरेतों मार खाल्ला होता, व आपल्या आईबापांचा उद्धार त्याच्या तोंडून ऐकला होता. त्या गोष्टीला कांहीं पुरे पंधरा दिवस लोटले नव्हते. ’ एवढें वर्णन करून लेखक झटकन् कथानकांतल्या पुढल्या प्रसंगाकडे वळतो. त्यानें सूचित केलेल्या दोन गोष्टींतल्या विरोधामुळें शिवनाकच्या मनांत यावेळीं जें वादळ निर्माण झालें असेल तें चित्रित करण्याकरितां तो थांबत नाहीं. पण या घाईमुळें कथानकाची रंगत थोडी फिकी पडते.

हडपांची भाषा सरळ व कथनपद्धति प्रवाही आहे. पण अनेकदां ती अनावश्यक अलंकारांचा आश्रय करते व अकारण बोजड बनते. काव्यपूर्ण कथानकांत किंवा काव्यात्म वृत्तीनें लिहिलेल्या कथेंत अलंकारांची वर्दळ सुशोभित दिसते, निदान सुसह्य होते. पण हडपांच्या कादंबऱ्यांचें स्वरूप तसें नाहीं. त्यांतलीं बहुतेक पात्रें समाजाच्या खालच्या थरांतलीं व काव्याकडे लक्ष द्यायला फुरसद नसलेलीं अशीं

आहेत. त्यामुळें केवळ बुद्धिगम्य अशी कल्पना किंवा उपमा आणि वर्णनाचा किंवा भावनेचा ओघ यांचा अनेक ठिकाणीं जसा मेळ बसावा तसा बसत नाहीं. साहजिकच वाचकाला कांहींतरी खटकल्यासारखें वाटतें. ‘भारतमातेची हांक’ या कादंबरींतलीं अशीं दोनतीन वाक्यें खालीं उद्धृत करतों. त्यांवरून माझें म्हणणें वाचकांच्या लक्षांत येईल. ‘पिकलेल्या शेतांत चरण्यासाठीं भरारत आलेल्या पक्ष्यांनीं शेतांतील बुजगावण्यावर नजरेची पाळत राखून सावधपणानें भाताच्या कणसांतील दाणे टिपावेत तसा भास्कर महाराच्या पोराला शिवल्याबद्दल, मोटारींतील आजोबांना भीत भीत पाहत उत्तरला ‘होय’!’ (पृष्ठ १२). ‘अशी विपण्ण विचारांची पृथ्वीप्रदक्षिणा शिवनाकच्या अंतरांत ध्वनिलहरीपेक्षांहि अथवा वाऱ्यापेक्षांहि अधिक वेगानें सुरू होती.’ (पृष्ठ ९६). ‘जमनाच्या झोंपडींतली कटकटीची आग अधिक अधिक धुमसूं लागलेली त्याला जाणवूं लागली होती. पण अग्निकुंडांत आपलें शरीर जळत असतांना आनंदी राहणाऱ्या विदेही जनकाच्या स्थितप्रज्ञतेनें तो सारा मनस्ताप धीरानें सहन करीत चालला होता. (पृष्ठ ९७).

वाङ्मय या नात्यानें कुठल्याहि कृतीचा आस्वाद घेतांना असल्या गोष्टी आपल्या सौंदर्यदृष्टीला खटकतात. म्हणून त्यांचा उल्लेख करायचा. हडपांच्या या कादंबरीमालेचें वैशिष्ट्य खास त्यांच्या अशा कांहीं वाङ्मयगुणांत नाहीं. तें कल्पनेची मोठी झेंप घेऊन केलेल्या एका विशाल कालखंडाच्या चित्रणांत आहे. अनेक दोप असूनहि एखादी कृति आपल्याला आवडते आणि निर्दोष असलेली कृतीहि कित्येकदां वाचकांना मोहवूं शकत नाहीं, अशा अर्थाचे गोल्डस्मिथनें जे उद्गार काढले आहेत त्यांत फार मोठा सत्यांश आहे. एखादी कथा किंवा कविता आवडली कीं माधवराव पटवर्धन तिचें वर्णन करतांना आपला एक लाडका शब्द वारंवार वापरीत. ‘हॉंटिंग्’ (Haunting) हा तो त्यांचा आवडता शब्द. एखाद्या घराला भुताटकीनें पछाडावें, त्याप्रमाणें त्या कृतींतल्या कुठल्या तरी उत्कट वैशिष्ट्यानें आपल्या मनाची अशी पकड घेतलेली असते कीं विसरूं म्हटलें तरी आपल्याला तिचा विसर पडत नाहीं. हा माधवरावांच्या त्या शब्द योजनेचा भावार्थ. हडपांची ही माला वाचून झाल्यावर अनेक वाचकांना हा अनुभव येईल असें मला वाटतें. ते त्यांतले प्रसंग विसरतील, सुंदर वाक्यें विसरतील; पण विस्तीर्ण अशा कालपटावर आपल्या या जितक्या भाग्यवान तितक्याच अभागी असलेल्या मातृभूमीचें गेल्या

तीन तपांतलें जें जीवनदर्शन हडपांनीं चित्रित केलें आहे, त्याची विस्मृति त्यांना होणार नाहीं. निसर्गाचा वरदहस्त मस्तकावर असूनहि अन्नान्न करीत दुसऱ्यांच्या दारांत आज जिला उभें रहावें लागत आहे, अशी ही आपली दुर्दैवी आई— पिढ्यान् पिढ्या जिचीं संतानें आपल्या संस्कृतीचीं आणि धर्मश्रद्धेचीं स्तोत्रें गात आलीं आहेत पण ज्यांनीं मानवधर्माचा दैनंदिन जीवनाशीं संबंध पूर्णपणें तोडून टाकला आहे, अशी ही आपली अभागी माता—हिचें भविष्य उज्ज्वल व्हायचें असेल तर भूतकालांतल्या साऱ्या परंपरांचा व घटनांचा आणि प्रचलित असलेल्या साऱ्या राजकीय पक्षांचा आणि तत्त्वज्ञानांचा स्वच्छ मनानें, पूर्णपणें पूर्वग्रहविरहित अशा दृष्टीनें विचार करूनच सामान्य जनतेनें आतां पुढें पावलें टाकलीं पाहिजेत, असा विचार हडपांनीं केलेलें जीवनदर्शन त्यांच्या मनांत निश्चित निर्माण करील. तळमळीनें लिहिणाऱ्या लेखकाला तरी यापेक्षां दुसरें काय हवें असतें ?

९–८–५१
कोल्हापूर

**वि. स. खांडेकर**

# लेखकाचें निवेदन

मी व्यक्तिपूजक अथवा विभूतिपूजक नाहीं. तरी माझ्या आयुष्यांत आज-वर अशा कांहीं अगदीं थोड्या व्यक्तींशीं माझा संबंध आला कीं, त्यांच्यापुढें अथवा त्यांच्या महनीयतेपुढें विनम्र भावानें मस्तक नम्र करतांना मला धन्यता वाटावी.

अशा अगदीं थोड्या–एका हाताच्या बोटावरही मोजायला पुरणार नाहींत इतक्या



महनीय व वडीलधाऱ्या व्यक्तींपैकीं कै. **बळवंत विष्णु परचुरे** ऊर्फ नाना हे एक होते. ते ज्या परचुरे, पुराणिक आणि मंडळी या ग्रंथविक्रय-प्रकाशन संस्थेचे प्रधान संस्थापक व संवर्धक होते, त्या मंडळीशीं लेखक-प्रकाशक या नात्याचा माझा संबंध केवळ नानांमुळें आला. आज महाराष्ट्र साहित्यांत ‘ कादंबरीमय पेशवाई ’ मालेला एक प्रकारें मानाचें स्थान आहे; व लोकमताचा विचार करतां सुबुद्ध महाराष्ट्र पूर्वीच्या कादंबऱ्यांपैकीं त्याच कादंबऱ्यांवरून मला थोड्या फार आपुलकीनें ओळखतो. त्या मालेचें व त्या लेखनाचें श्रेय हें सर्वस्वीं नानांचें आहे. ते ‘ परचुरे, पुराणिक आणि मंडळी ’ची–कादंबरीमय पेशवाईच्या प्रकाशन संस्थेची–प्राणज्योत होते. ते योगायोगानें तिच्यांतून वजा झाले, व त्याबरोबरच कादंबरीमय पेशवाईही वजा झाल्यांत जमा झाली.

लेखक या नात्यानें माझा प्रकाशकांशीं जरी पुष्कळ संबंध आला, तरी पुष्कळ थोड्या प्रकाशकांशीं संबंध आला. आणि त्यांतही थोड्यांशीं चांगला टिकला, चालला. माझ्या अथवा अन्य कोणत्याही प्रकाशकाला कोणत्याही प्रकारें दोष मी देत नाहीं. प्रकाशकांच्या दारीं लाचारपणें जाण्याचा व प्रकाशकांकडून हेटाळणीची वागणूक घेण्याचा प्रसंग आजपावेतों मजवर कधीं आला नाहीं. तथापि लेखकाच्या ग्रंथांची किंमत टोपल्यांच्या भावानें करणारे ग्रंथ-विक्रेते व प्रकाशक मला माहीत आहेत. सौजन्य व व्यावसायिक नीतिमत्ता यांना सर्वतोपरी जागणारे जे प्रकाशक मला भेटले, आणि माझ्याप्रमाणेंच इतर अनेक लेखकांनाहि भेटले असतील, त्यांत मला तरी नानांच्या वेळच्या ‘ परचुरे, पुराणिक आणि मंडळी ’चेंच नांव प्रथम घ्यावें लागेल. आणि माझी खात्री आहे कीं त्या प्रकाशनसंस्थेशीं संबंध आलेला प्रत्येक सुजाण ग्रंथकार माझ्याशीं पूर्ण सहमत होईल.

तो सुमारें पाव शतकापूर्वीचा, कादंबरीलेखक या नात्यानें मी महाराष्ट्र सारस्वताच्या

क्षितिजावर ब्ऱ्या-वाईट तेजानें प्रकाशूं लागलें, तेव्हांचा काळ. तेव्हां मी लिहीन तें छापणारे प्रकाशक मला इतर सारे भेटले. पण प्रकाशक या नात्यानें स्वतःच्या व लेखकाच्या मर्यादा सांभाळून, वडीलपणाच्या नात्यानें, सर्वांगीण संयमाच्या सीमा ओळखून लेखन करण्याची आवश्यकता मला नानांनींच पटवून दिली. तशा प्रकारचा संयम मी आतां तितक्या दक्षतेनें पाळीत नसेन. अनेक कारणांमुळें तशा प्रकारच्या संयमाचें कुंपण माझ्या विचारांना व लेखनाला असणें आतां आवश्यकही नसेल. पण त्या काळीं तरी मला तशा मार्गदर्शनाची आवश्यकता होतीच होती, असें मी आतां कार्यकारणभावानें म्हणूं शकतों.

**कादंबरीमय पेशवाई** मालेच्या निमित्तानें माझा व नानांच्यामुळें ' परचुरे, पुराणिक आणि मंडळी 'चा लेखक व प्रकाशक या नात्याचा जो संबंध आला, तो तेव्हां त्या मालेपुरता असला, तरी मालेनंतरही नाना तिथें असते तर तो पुढेंही निश्चित टिकला असता व वाढला असता. पण तसा योगायोग नव्हता. महाराष्ट्राच्या व स्थूलतः भारताच्या इतिहासावर—शिवछत्रपतींच्या कालापासून अगदीं आजतागायतच्या इतिहासावर शिवशाही, पेशवाई व आंग्लशाही अशी त्रिदलात्मक ऐतिहासिक कादंबरीमाला सुमारें चाळीस कादंबऱ्यांत पूर्ण करावी, हा माझा संकल्प नानांना माहीतही होता व मान्यही होता. तो पूर्ण झाला असता, तर त्यांच्याच कळकळीनें व विशुद्ध प्रोत्साहनानें पूर्ण झाला असता. पण नाना गेले, आणि त्या माझ्या संकल्पित त्रिदलात्मक कादंबरीमालेतील जीवनांश बहुशः निघून गेला. तें अपूर्ण कार्य, त्या त्रिदलापैकीं एका दलापुरतें कां होईना, आज पुरें होत आहे.

प्रस्तुत कादंबरीमय आंग्लशाही मालेतील सहा कादंबऱ्यांतून गांधीयुगांतील भारताच्या स्वातंत्र्याच्या चळवळीचा सन १९५० सालापावेतोंचा अद्ययावत् इतिहास कथारूपानें कथन करण्याचा माझा पूर्वसंकल्प होता. परंतु मीं शेवटच्या या कादंबरींत ता. १५ ऑगस्ट १९४७ लाच पूर्णविराम घेतला आहे. याचें कारण, त्यानंतरचा भारत आज एकतर सर्वतोपरी दोलायमान अवस्थेंत आहे. दुसरें, सत्य परंतु अप्रिय कटुता टाळून मूलभूत महत्त्वाचे अनेक विवाद्य प्रश्न मला त्यानंतरच्या कथानिवेदनांत टाळताही आले नसते, व निःपक्षपातीपणानें स्वतःच स्वतःला घालून घेतलेल्या विशिष्ट मर्यादांच्या परिसरांत त्रयस्थ वृत्तीनें समतोलपणें हाताळतांही आले नसते.

स्वतःच्या कादंबऱ्यांना अन्यांच्या प्रस्तावना घेण्याचा माझा परिपाठ नाहीं. तथापि विद्यमान मराठी कादंबरीकारांतील सर्वश्रेष्ठ व सर्वोदात्त अशा कादंबरीकाराचें

महाराष्ट्र सारस्वतांतील अग्रस्थान–प्रामाणिक मतभेद काय असतील ते वास्तव दृष्टीनें जोपासूनही मान्य करण्याइतकी तरी माणुसकी विद्यमान मराठी कादंबरीकारांत माझ्यापुरती तरी मला आहे, हें आमच्या वाचकवर्गाला दाखवून देण्याची संधि मला घ्यायची होती. या हेतूनें–नुसत्याच नव्हे तर अतिरेकी हेतूनें–प्रेरित होऊन मीं श्री. वि. स. खांडेकर यांना चार ओळींची कां होईना, पण प्रस्तावना लिहिण्याची विनंति केली. त्यांच्या आजारीपणाकडेही मीं निष्ठुरपणें पण सद्भावानें दुर्लक्ष केलें. आणि त्यांनींही आपल्या प्रकृतीला अन्याय करून देखील माझ्या विनंतीला मान दिला. प्रश्न लहान अथवा मोठ्या, अनुकूल अथवा प्रतिकूल प्रस्तावनेचा सुतराम् नव्हता. प्रश्न मीं बळेंच आपुलकीनें त्यांच्याजवळ जाण्याचा व आम्ही जवळ जवळ येऊं लागण्याचा होता.

इतिहास व ऐतिहासिक कादंबरी यांच्यांतील अंतर ध्यानीं घेऊन वाचक या कादंबऱ्या वाचतीलच. कथानकाच्या ओघांत आलेल्या खऱ्या ऐतिहासिक व्यक्तींच्या उल्लेखांखेरीज बाकीच्या व्यक्ती व त्या अनुषंगानें आलेले स्थल-काल-घटनानिर्देश वास्तवतापूर्ण परंतु पूर्ण काल्पनिक आहेत व त्यांचा कोणत्याहि विद्यमान अथवा दिवंगत व्यक्तीशीं कसलाही संबंध आणण्याचा लेखकाचा मुळींच हेतु नाहीं, हेंही वाचकांनीं कृपापूर्वक ध्यानीं ठेवावें.

‘कादंबरीमय आंग्लशाही’च्या सर्व सहाही कादंबऱ्यांचें स्वरूप अगदीं एकसारखें नाहीं. पहिली व दुसरी कादंबऱ्यांचीं कथानकें कालानुक्रमें परंतु स्वतंत्र आहेत. पहिलींत उत्तर भारतांतील वातावरण आहे. दुसरीपासून पुढील कथानकांतील नियोजित कार्यक्षेत्र मुख्यतः मुंबई व महाराष्ट्र हें आहे दुसऱ्या कादंबरींत मिठाच्या सत्याग्रहाच्या पार्श्वभूमीवर मध्यमवर्गीय महाराष्ट्राचें संक्रमणकालीन जीवन स्थूलतः चित्रित केलें आहे. तिसरी, चौथी, पांचवी व सहावी या कादंबऱ्यांत कालानुक्रमानें कथानकसूत्र तत्त्वतः एकच, भारतांतील क्रमप्राप्त तत्कालीन विशाल जीवनगति चित्रित करणारें, कांहींसें इंग्रजींतील ‘सागा’च्या धाटणीचें आहे. शेवटची सहावी कादंबरी त्या कथासूत्रांतीलच खरी; परंतु प्रथमपुरुषी अथवा आत्मचरित्रपर आहे. शेवटच्या चार कादंबऱ्या क्रमानें वाचल्यानें त्यांतील कथासंगति अधिक स्पष्ट व सुगम होते, एवढेंच येथें मला वाचकांच्या नजरेला आणून द्यावेंसें वाटतें.

वकीलवाडी, नाशिक,<br>
ता. १५ ऑगस्ट १९५१

**विठ्ठल वामन हडप**

# भारतमाता की जय !

## १ : देव कीं पाषाण ?

• • •

माझ्या सावरगांवच्या आश्रमांत माझें वास्तव्य होतें.

त्या दिवशीं पहांटेच्या साखरझोंपेंतून मला गांवकऱ्यांनीं येऊन हांका मारून जागें केलें.

नाहीं तरी मी आणखी जराशा वेळानें उठणारच होत्यें. रोज पांच वाजतां आम्ही उठून रोजच्या उद्योगाला लागत असूं. आज जाग आली तेव्हां साडेचार वाजले होते.

"आम्हीं एक अतिशय गोड कामासाटीं तुमची झोंपमोड केली बाई!" आमचा 'गांवमामा' मला जागेपणीं कांहीं बोलायचा अवसर मिळण्यापूर्वीच म्हणाला, "आज कोल्हापूरला आमच्या गांवच्या वतीनें तुम्हांला जायला हवें हा आमचा हार घेऊन."

"हार ? हा हार कसला रे गांवमामा ?" मी पाणी घेऊन ओल्या हातानें डोळे पुसून ताजे करीत विचारलें.

"हार आमच्या धन्यांना घालायचा आमच्या गांवाच्या वतीनें. आपले कॉंग्रेसचे लोक कायदेमंडळांत निवडून आले, त्यांच्या सत्काराची मोठी थोरली सभा आहे ना आज कोल्हापुरांत ? आम्हीं काल ऐकलें, आमचे निवडून आलेले धनी त्या सभेंत बोलणार आहेत. आपले भारती स्वामी आम्हाला म्हणाले. धन्यांना हार घालायचा मनांत आहे आम्हां गांवकरी मंडळींच्या." गांवमामा म्हणाला.

"मग अरे, स्वामींनाच सांगायचें कीं नाहीं हें काम. स्वामी थोर, तुमचे धनी थोर, तें चांगलें शोभलें असतें." मी म्हणाल्यें.

"स्वामी गेले आणि मग ही कल्पना सुचली आमच्या लोकांना. आणि नाहीं तरी स्वामीदेखील तुमचेंच नांव सांगते असते, माझी खात्री आहे. असें पाहा बाई! स्वामी तर थोर आहेतच. ते थोरांचे थोर आहेत. पण असें त्यांना सांगायचें, हा लहान तोंडीं मोटा घांस आम्हीं कसा घ्यावा ? आणि असें पाहा, आमच्या गांवचा तुमच्यावर जेवढा हक्क आहे, तेवढा स्वामींवर नाहीं आमचा हक्क. ह्या गांवाला उपजडाला तुम्हीं आणलें—"

गांवमामा बोलला, तें कांहीं अगदीं खोटें नव्हतें. पांच हजार वस्तीचें तें गांव. कृष्णानदीच्या कांटचें. कोल्हापुरांतील जगदाळे जहागिरींतलें तें गांव. पण खालसांत मात्र. कोल्हापूर तिथून जवळ. असेल फार तर बावीस पंचवीस मैलांवर. आमची ती वडिलार्जित जन्मभूमि; म्हणून मीं तें गांव पत्करलें होतें एवढेंच. एरव्हीं गांव मोठें जागृत खरें; पण भांडखोर. पिसें सावरगांव त्याला पूर्वी म्हणत. गांवगुंड पिसाटांसारखे वागायचे. भल्याभल्यांना वेड लागायची पाळी आणायचे. पण स्वामींच्या धीरावर मी तिथें गेल्यें. आणि त्यांच्या नेतृत्वाखालींच गांवसेवा सुरू केली. स्वामींचा आश्रम माझ्या आश्रमापासून जवळच तपोवनांत दोन मैलांवर होता. तपोवन हें त्या खेड्याचें नांव. स्वामीजींच्या छत्राखालीं गांधीजींच्या शिकवणुकीनुसार साऱ्या महाराष्ट्रांत कॉंग्रेसच्या विधायक कार्याची पेरणी आम्ही तिथून करीत होतों.

शेत चांगलें पिकत होतें. लोक चांगले सुधारत होते. गांवांत मुसलमानांची देखील हजारभर वस्ती होती. पूर्वी मुसलमान लोक त्रास देत असत म्हणतात. पण मी तिथें गेल्यापासून आम्ही सारे हिंदु-मुसलमान अगदीं गुण्यागोविंदानें राहत होतों.

कम्युनिस्टांचा तो साताऱ्याच्या दक्षिण भागांतील बालेकिल्ला समजला जाई. पण कारणें कांहीं कां असेनात, कम्युनिस्ट देखील आमच्याशीं भलेपणानें वागायचे. कॉंग्रेसचे लोक कम्युनिस्टांविषयीं कांहीं का म्हणेनात ! ते गोरगरीब शेतकऱ्यांचे खरे कैवारी होते, आणि त्यांचें आमचें सख्य टिकायला तेवढें पुरे होतें. असें सर्वांच्या सदिच्छेनें आमचें सावरगांवचें ग्रामराज्य चाललें होतें.

पण मला माझ्या स्तुतीचें पुराण असें जेव्हां तेव्हां ऐकायला आवडत नसे. आणि तें त्या गांवमामाच्या तोंडून तर मुळींच ऐकायला नको होतें. जयवंतराव

निर्वाणांचा तो उजवा हात, जवळ जवळ मुखत्यारीनें त्यांच्या शेतवाडीची व्यवस्था पाहणारा. आणि आतां अलीकडे बेचाळीसच्या चळवळीपासून जयवंतरावांच्या ओढ्यानें काँग्रेसकडे ओढला गेलेला, गांवचा एक पुढारी. म्हणून तो आम्हांला जवळचा इतकेंच.

सारा गांव त्याला गांवमामा म्हणायचा, म्हणून मीही म्हणायची.

पण सहा वर्षांपूर्वी मी प्रथमच त्या गांवीं येऊन माझ्या अल्प समजुतीप्रमाणें ग्रामोद्धाराचें कार्य करूं लागल्यें, तेव्हां सरकारी अधिकाऱ्यांच्या चिथावणीनें माझी धिंड काढायला निघालेला तो हाच सरकारजमा गांवमामा.

तो विसरला असेल. पण मी विसरल्यें नव्हत्यें.

आमचाच माणूस, म्हणून त्याला गांवगुंड म्हणायचें नाहीं इतकेंच. नाहींपेक्षां गांवगुंडांना यापेक्षां निराळीं आणखी काय शिंगें असतात !

त्या गांवीं पाऊल टाकतांच हिंदु स्त्री म्हणजे काय याची खरी जाणीव मला झाली. मी थोरामोठ्यांची सून आहें,—छत्रपूरच्या दिवाणांची, माजी काँग्रेस उपमंत्र्यांची मी पत्नी आहें, कपाळाला कुंकूं आहे, वयानें तरुण आणि एकटी—अशी मला पाहून जगांतील असतील नसतील त्या शंका गांवमामासारख्यांच्या घरीं पाहुणचाराला यायच्या. 'थोरामोठ्यांची लेक, थोरामोठ्यांची सून आणि थोरामोठ्यांची बायको ही असून अशी एकटी एकटी कां?'

त्यांत माझी आणि सोपानाची जुनी जिव्हाळ्याची ओळख होती हें कळलें, आणि मला सवत आहे हें कळलें, कीं लोक रावणासारखे दहा तोंडांनीं चांभारचौकशा करूं लागायचे.

त्या कसोटीला मी टिकल्यें, लोकांच्या मनांत संशय आले तसे मनांतून गेले, हें निराळें.

मी त्या गांवीं प्रथम आल्यें तेव्हांचा जमाना निराळा होता; आणि आजचा जमाना निराळा होता. तेव्हां इंग्रज सरकारची चलती होती; आज काँग्रेस सरकार अधिकारावर येऊं घातलें होतें. गांवमामांसारखे लोक नेहमीं उगवत्या सूर्याला भजणारे. मला कांहीं तसा फारसा अनुभव नव्हता. थोडाच होता. पण लोक सांगत त्यावरून मला माहीत. चोरट्या सरकारजमा बातमीदारापासून तों खून-दरोडेखोरीसारखीं करूं नयेत तीं कामें ह्या गांवमामानें केलीं.

कोणी कोणी म्हणत कीं गांवाचा धनी सुधारला म्हणून गांव सुधारला. पण

त्यावर मी मात्र विश्वास ठेवायला तयार नाहीं. गांवाचा पहिला धनी खासेराव निर्वाण तर—मीच नको म्हणायला; सारे लोक, सारी रयत म्हणे कीं तो गोरगरीब शेतकरी कुळांच्या रक्तावर पोसलेला कावेबाज गलेलठ्ठ लांडगा आहे. म्हणून तर—तो त्या तालुक्याच्या गांवीं प्रथम वकिली करूं लागला तेव्हां सारी वीस रुपये सालीना सरकारसाऱ्याची वडिलार्जित वतनवाडी होती. तिथें पुढच्या वीस वर्षांत तो वकील साऱ्या गांवचा मालक झाला.

अर्थात् ही सावरगांवच्या इनामदारीची गोष्ट. खासेराव निर्वाण हे इनामदार खरे. पण सावरगांवचे इनामदार मात्र नव्हत. त्यांचीं दोन इनाम गांवें तिथून जवळच पांच कोसांवर होतीं. पण तीं त्यांच्या आजोबांच्या रंगेल तरुणपणांत कर्जा-खालीं इतकीं कुजलीं सडलीं होतीं कीं सांगायची सोय नाहीं. त्यांतलें एक गांव खासेरावांनीं आपाल्या ऐन उमेदींत सत्यशोधक चळवळीच्या वाहत्या गंगेत हात धुवून घेऊन सोडवलें होतें. दुसरें गांव मात्र अजून सावकारांकडे गहाण होतें.

जयवंतरावानीं अगदीं लहानपणीं—ते मराठी शाळेंत शिकत होते तेव्हां, आणि त्यानंतर काँग्रेसच्या चळवळीच्या निमित्तानें अधून मधून पांच चार वेळां त्या गांवीं पायधूळ झाडली होती तेवढीच. बाकी गांवाचा सारा कारभार गांवमामा—त्यांच्या वडिलांच्या वेळेपासूनचा त्या घराण्याच्या गळ्यांतला ताईत पाहायचा.

स्वतः जयवंतराव देखील कारभार पाहीत. पण तो जगदाळे जहागिरदारांच्या जहागिरीचा. कोल्हापूर राज्यांतील ती जहागीर. सत्यशोधक चळवळीचें आगर. सालीना पंचवीस हजार रुपये उत्पन्नाची जहागीर होती ती. नवा जहागिरदार अगदीं तरुणपणींच धनी झाला होता; ऐन पंचविशींत. जयवंतराव त्याचे वर्गबंधु. त्याच्या अगदीं मर्जीतले. आणि पुढें तर ते जहागिरदारांचे साडू झाले. त्यांच्या एकुलत्या एका धाकट्या मेहुणीचे यजमान. जहागिरदार ऐषआरामांत लोळणारे. त्यामुळें जहागिरीची सारी व्यवस्था जयवंतरावाकडेच आली होती. खानदानी सरदार घराणीं तीं. त्यांत अधिक खोलांत कशाला जा!

कायदेमंडळाच्या निवडणुकींत मीं जयवंतरावांच्या वतीनें पुष्कळ प्रचार केला होता खरा. पण तो त्यांच्यासाठीं नव्हे, काँग्रेससाठीं. चाळीस सालच्या लढ्यापासून ते हळुहळू काँग्रेसकडे ओढ घेऊं लागले. बेचाळीसच्या चळवळींत तर आमच्या प्रतिसरकारच्या भूमिगत चळवळींत त्यांचा प्रामुख्यानें हात होता. ते तेव्हां कागदो-पत्रीं दाखवायला आणि लोकांना सांगायला कोल्हापुरांत असायचे आपल्या मेहु-

ण्यांच्या सासुरवाडीला श्रीमान शेठ साखरगांवकरांच्या बंगल्यांत. पण त्यांचा संचार चालायचा साऱ्या साताऱ्याभर डोंगर दरडींतून 'पत्री सरकार'च्या राजवटींतून.

पण अशा देशभक्ताला हार घालायला माझें मन कांहीं खरोखर धजत नव्हतें. मला ती कल्पना ऐकून वाटलें कीं फुलांना वाचा नाहीं म्हणून त्यांचा आम्ही बेदरकारपणें असा अपमान करतों इतकेंच.

हां! —त्या गांवकऱ्यांनीं हार घालायची गोष्ट काढली, म्हणून माझ्या मनांत तरी ती कल्पना आली. एरव्हीं काय केलें आहे जयवंतरावांनीं गांवासाठीं, म्हणून त्यांना गांवकऱ्यांनीं हार घालायचा तो? कुळांच्या तक्रारी कांहीं थोड्याथोडक्या नव्हत्या. पण त्या आम्हीच पुढें मांडीत नव्हतों इतके दिवस.

आणि कुळांनींही कधीं हट्ट धरला नाहीं माझ्यापाशीं किंवा गांवमामापाशीं आजवर, कीं धन्यांवर आमच्याकडे दुष्काळांत थकलेल्या थकबाकीची सूटसांड द्यायला सांगा; किंवा जमिनीचा खंड पिकाच्या मानानें झेपत नाहीं तो कमी करायला सांगा म्हणून.

पण गांवाचें काय. मला गांवाच्या इच्छेप्रमाणेंच करायला पाहिजे होतें.

• •

"बरें साऱ्या गांवचा म्हणून समजायचा का हा हार? कीं तुम्हां लोकांचा?" मीं विचारलें.

"नाहीं—नाहीं. साऱ्या गांवचा समजायचा. गांवाला सोडून वागणारा गांवांत कोण आहे?" गांवमामानें बरोबरच्या दहा पांच गांवकरी मंडळीकडे वळून पाहात विचारलें, "कोण आहे का रे?"

एकदम कळसूत्री बाहुल्यांसारख्या सर्वांच्या माना नकारार्थी डोलल्या.

"बरें आहे. जाऊं आपण." मी म्हणाल्यें. "आणि तुमच्या धन्यांना गांवीं बोलावूं ना?"

"वा:! हें काय विचारतां? बोलावूं कीं आपण!" गांवमामा सर्वांच्या वतीनें म्हणाला.

"आणि धन्यांकडेच उतरणार ना तुम्ही?" गांवमामा म्हणाला.

" कां ? आमची जागा आहे कीं तिथें." मी म्हणाल्यें.

" मग आम्ही कोणी कधीं आलों तर टेकायला जागा आहे सत्तेची म्हणायची." एकजण गांवकरी शेतकरी म्हणाला, " किती दिवस राहाणार तुम्ही तिकडे ?"

" कां रे ?"

" नाहीं; उगीच विचारलें."

" राहीन थोडे दिवस."

" बळिराम विचारीत होते सकाळीं."

बळिरामचें नांव कानीं पडतांच एका क्षणांत किती तरी कल्पना मनांत येऊन गेल्या माझ्या. माझें आणि बळिरामांचें कांहीं तसें पाहूं गेल्या सख्य नव्हतें. त्यांचें कार्यक्षेत्र निराळें, माझें निराळें. त्यांनीं घेतलें होतें आपलें जीवन 'हिंदु'पणाला वाहून. हिंदुत्वाचा अभिमान पुष्कळांना असतो. मलाही तसा अभिमान आहे. पण बळिरामांचा अभिमान कांहीं निराळाच. धड हिंदु महासभा नव्हे, धड संघ नव्हे, धड वर्णाश्रमधर्म नव्हे, यांचें सारेंच कांहीं निराळें.

मला ते चुकून देखील कधीं माझ्याकडे यायला नको होते.

म्हणून मी मुद्दामच खोटें बोलल्यें. " कदाचित् मी उद्यां परवां सातान्याकडे जाईन म्हणत्यें."

हाराची तयारी करायला मंडळी गेली. बाहेर अजून थोडा काळोखच होता. दिशा फांकत होत्या. तोंच—

" आपणाला गांवची नवी सडक करायची आहे ना बाई !" मध्येंच मला कोणींतरी बाहेरून प्रश्न विचारला.

तो आवाज कांहीं मला ओळखीचा वाटला नाहीं. मीं वळून पाहत विचारलें, " होय. पण कोण विचारतें आहे ?"

" मी !" असें उत्तर देत अकरा बारा वर्षांचा एक मुलगा समोर येऊन उभा राहिला.

" अविनाश कोल्हापुरे माझें नांव." तो उत्तरला.

मला त्या मुलाचें मोठें कौतुक वाटलें. पण मी आज प्रथमच त्याला त्या गांवांत पाहत होत्यें.

" मीं तुला आजवर कधीं इथें पाहिला नाहीं रे अविनाश !" मी म्हणाल्यें.

" मी इथें नव्हतोंच. परवां आलों मी इथें माझ्या मावशीकडे."

"तुझी मावशी—म्हणजे कोण रे?"

"तुम्ही पुन्हा आलां म्हणजे मी तिला घेऊन येईन तुमच्याकडे. मावशीच मला सांगत होती, आपणाला गावची नवी सडक करायची आहे म्हणून."

याची मावशी कोण हें मला कळेना. पण मनांत एक शंका आली, आणि एकदम प्रकाश पडल्यासारखा झाला. तरी मी अधिक बोलल्यें नाहीं.

"होय ना? खरें तें अविनाश! आपणाला सडक करायची आहे, शाळा बांधायची आहे, किती किती गोष्टी करायच्या आहेत." मी म्हणाल्यें.

"मला आवडतात त्या गोष्टी करायला. मी नेहमीं तुमच्याबरोबर राहीन. मग आपण खूप खूप कामें करूं."

"तुला अशीं कामें करायला आवडतात?"

"हो! आवडतात तर! मी आश्रमांत होतों कीं—!"

तो बोलतां बोलतां एकदम चपापला. एकदम जीभ चावली त्यानें, आणि घोटाळल्यासारखा माझ्याकडे पाहूं लागला.

मी मनांत म्हणाल्यें, हा असें कां करतो?

"कुटच्या आश्रमांत होतास रे तूं?" मीं विचारलें.

पुन्हा अधिकच गोंधळल्यासारखा होऊन अविनाश म्हणाला, "माझी मावशी सांगेल तुम्हांला सारें."

पुन्हा तेंच! ही याची मावशी कोण?

"मला तुझ्या मावशीला एकदां भेटायचें आहे रे! सांगशील तिला?" मी म्हणाल्यें.

"हो! सांगेन." अविनाश गालांतल्या गालांत हंसत उत्तरला. किती निर्व्याज! किती पवित्र आनंदाच्या त्या ओझरत्या छटा! पण उषःकालीन रविकिरणांच्या कोंवळ्या पालवीसारख्या शोभिवंत आणि मंगल छटा होत्या त्या, तेव्हां त्याच्या मुद्रेवर उमटलेल्या!

"नाहीं तर असें बघ, मीच येईन एकदां तुझ्या मावशीला भेटायला." मी पुन्हा म्हणाल्यें. माझी आणि जिची ओळखदेखही नाहीं, अशी ती अविनाशची मावशी खरी. पण वासावरून कस्तूरीची ओळख पटत होती. आमच्या ग्रामोद्धाराच्या नव्या नव्या योजना इतक्या आस्थेनें जाणून घेणारी आणि अविनाशसारख्या आपल्या पुढच्या पिढीला त्याच पवित्र मुशींत ओतून त्यांचें जीवन

आरंभापासून सत्प्रवृत्त-मंगल करणारी ती अविनाशची मावशी मला अगदीं जिव्हाळयाची वाटूं लागली.

किती आनंद झाला त्याला मी त्याच्या झोंपडींत जाणार हें ऐकून! उगवत्या सूर्याकडे पाहात सूर्यकमल फुलावें तसा तो माझ्याकडे पाहून म्हणाला, "तुम्ही याल आमच्या झोंपडींत?"

"येईन कीं! मी आतां आज कोल्हापूरला जाईन कीं नाहीं, तीं एक दोन दिवसांत परत येईन बघ. फार तर एखाददुसरा दिवस जास्त लागेल. मी आल्यें, कीं तूं माझ्याकडे ये. मग आपण दोघें मिळून मावशीकडे जाऊं."

"मी येईन." अविनाश एकदम मनांत कांहींतरी विचारांत गुंतल्यासारखा मला दिसला.

"कां रे? कसला विचार करतोस?" मीं विचारलें.

"नाहीं; आणखी एक उपकार कराल माझ्यावर?" तो फूल कुस्करल्यासारखी दोन्ही हातांची चाळवाचाळव करीत म्हणाला, "भारती स्वामींचें दर्शन मला घडवाल का?"

"हो! हो! तूं स्वामींना अजून पाहिलें नाहींस?"

"नाहीं."

त्यानें कावऱ्या बावऱ्या नजरेनें सभोंवार पाहात, भीत भीत चांचरत चांचरत मला विचारलें, "पण आम्ही इथें आहों हें महाराजांना सांगूं नका. एवढी कृपा करा. मी जातों."

आणि तो मुलगा काळोखांतूनच पांखरासारखा कुठें भुर्रकन् उडाला.

'महाराज' हा शब्द कानीं पडतांच माझ्या मनांत विजेच्या झोतासारखा प्रकाश पडला.

एक अक्राळ विक्राळ कर्दनकाळ,—शरिरानें नव्हे, पण कृतीनें कर्दनकाळ असा पुरुष माझ्या मनापुढें उभा राहिला. हाच तर त्याचा महाराज नसेल?

आमच्या गांवापासून पांच सहा मैलांवर 'रामनगर' या नव्या वसाहतींत एक रामदास महाराजांचा स्नातकाश्रम होता खरा. आश्रम कांहीं मीं पाहिला नव्हता. पण आश्रमाची कथा ऐकली होती. ती देखील ओझरती; एके दिवशीं एका अनाथ गरीब भिक्षेकरीण बाईच्या तोंडून. बेचाळीसच्या चळवळींत सरकारच्या दडपणामुळें तो आश्रम मोडल्यासारखा झाला होता. महाराज कुठें अंतर्धान पावले होते.

अलीकडे पुन्हा आश्रमाची स्थिरस्थावर होते आहे, महाराज पुन्हा स्वस्थानीं

आले आहेत, असें मीं ऐकलें होतें.

'महाराज' म्हणतांच तें भयंकर दृश्य माझ्या डोळ्यांपुढें उभें राहिलें—त्या भिक्षेकरीण बाईनें वर्णन केलेलें आश्रमांतील मानवी जीवनाच्या विटंबनेचें. आणि त्यासरसा मनाचा निर्धार झाला कीं, असल्या राक्षसांना—असल्या समाजकंटकांना समाजांत थारा मिळतां कामा नये. अर्थात् ते मी ऐकत होत्यें तसे समाजकंटक असले तर !

उजाडलें. तों लोक हारतुरे व मोटार घेऊन आले. मी मोटारींत बसून निघाल्यें. तरी मोटारींत देखील ते महाराज कांहीं माझ्या नजरेपासून फार दूर ढळले नव्हते.

● ●

समोर दृष्टि पोंचत नाहीं इतक्या दूरवरपावेतों लोकगंगा महासागरासारखी पसरली होती. गांधीचौक जणूं त्या महासागरात बुडून बेपत्ता झाला होता.

जिकडे पाहावें तिकडे तिरंगी झेंडे हवेंत उंच मान करून फडकत आहेत. कापसाचें शेत फुलावें, अथवा एखाद्या विशाल सरोवरांत पांढरीं शुभ्र कमलेंच कमलें फुलून सरोवराचा पृष्ठभाग त्या कमलाच्या शुभ्रतेनें झांकून गेलेला दिसावा, तसा पांढऱ्या शुभ्र खादी टोप्यांचा तो जणूं क्षितिजाला गवसणी घालणारा भव्य उदात्त देखावा मला दिसला. आणि डोळ्यांचें पारणें फिटलेंसें वाटलें. मधून मधून कांहीं भगव्या आणि काळ्या टोप्याही चमकत होत्या. पण फार तुरळक.

सावरगांवाहून इकडे यायला निघण्यापूर्वी मनाला जयवंतांविषयीं वाटणारा उदासवाणेपणा आतां तितका वाटेनासा झाला.

"बिंदूबिंदूंचा सिंधु होतो. जयवंतांकडे आपण 'व्यक्ति' या भावनेनें पाहतां कामा नये. देशाच्या उद्धारासाठीं झटणारे एक घटक या भावनेनें पाहिलें पाहिजे. समष्टीनें सिद्ध होणाऱ्या विराट देशव्यापी कार्यांत आपण यष्टीसभोंवार वाजवीपेक्षां जास्त घोटाळत राहतां कामा नये." माझ्या मनाला शहाणपणा सुचला.

मी सभास्थानीं गेल्यें. माझाही जयजयकार झाला.

जयवंत आले. जयंतांखेरीज बाकीचे कॉंग्रेसच्या तेवढ्या परिसरांत निवडणुकींत विजयी झालेले सारे देशभक्त पुढारी आले. प्रत्येकाचा लोकांनीं उत्साहानें जयजयकार केला.

भारती स्वामी आले. त्यांचाही जयजयकार झाला.

एरव्हीं कधींही काँग्रेसच्या चळवळींत आघाडीला न दिसणारे कितीतरी शुभ्र खादीवेषधारी सद्‌गृहस्थ व व्यापारी शेट सावकार त्या सभेला आले होते. आम्ही ज्यांना जातीयवादी व काँग्रेसचे विरोधक समजत असूं, असे अनेक ब्राह्मण व ब्राह्मणेतरही आले होते.

कारण आतां ते निर्भय होते. इंग्रज आतां प्रयाणाची बांधाबांध करूं लागले होते. काँग्रेस राज्यसिंहासनाच्या रत्नजडित पायरीवर एक पाऊल ठेवून दुसरें पाऊल उचलण्याच्या पवित्र्यांत उभी होती.

त्या दिवशींच्या त्या विराट सभेचें अध्यक्षस्थान सर्वानुमतें स्वामींना देण्यांत आलें.

आम्हीं आरंभींच आमच्या देशभक्ताचा हारतुरे घालून फुलें उधळून गौरव केला. कधीं आजवर काँग्रेसच्या वाऱ्याला उभे न राहणारे जमीनदार, सरदार, व्यापारी, कारखानदारही त्यांत होते. गांवचे होते आणि परगांवचेही होते. कुंदन-मलशेटसारखे कोट्याधीश उद्योगपतीही त्यांत होते. अनेक सुवासिनींनींही त्यांना ओवाळलें. ओवाळलें सर्वांनाच; पण कुणा वरवर पहाणारालाही तेव्हां कळलें असतें कीं त्या गजान्त लक्ष्मीच्या वैभवानें नटलेल्या बहुमोल वस्त्रालंकारधारी सुवासिनींचा देखील खरा ओढा जयवंतांकडे होता.

माझ्या मनांत तेव्हांच आलें, असें कां ?

जयवंत धनवान व्यापारी जमातीचे प्रतिनिधि आहेत, म्हणून ? कीं त्यांच्या देशभक्तीवर आणि कर्तृत्वावर या मंडळीचा विशेष भरंवसा आहे म्हणून ?

गांधीजी आणि काँग्रेस यांनीं देशांत होऊं घातलेला सर्वोदय इतका जवळ आला आहे एकूण ?

सर्वांत नवलाची गोष्ट मला वाटली ती ही कीं रामनगरच्या स्नातकाश्रमामार्फत देखील त्यांना हारतुरे अर्पण करण्यांत आले. मला इतका आनंद वाटला तें एकंदर सर्वमंगल भव्य दृश्य पाहून, कीं मी जणूं तें आमच्या आशाआकांक्षा चिरंजीव करून दाखविणारें दिवास्वप्नच पाहत होत्यें.

पण त्या मांगल्याला एक गालबोट लागलें. तें मात्र लागायला नको होतें. दोन मुसलमान विद्यार्थी काँग्रेसच्या पुढाऱ्यांना हार घालायला गर्दीतून पुढें जाऊं लागले, तेव्हां भगवी खादीटोपीधारी विद्यार्थ्यांनीं आणि स्वयंसेवकांनीं त्यांना वाट करून द्यायला हवी होती. पण ती वाट कांहीं त्यांना मिळाली नाहीं. इतके सारे जण

सभेच्या रंगांत रंगून गेले होते.

माझें तेवढ्यांत तिकडे लक्ष गेलें. ते विद्यार्थी तरी माझ्या चांगले ओळखीचे मला दिसले. साताऱ्यांतील 'पत्री सरकार'चे छुपे सच्चे शिपाई ते होते. आणि शिवाय सावरगांवचे रहिवासी होते.

उमर आणि उस्मान.

"उस्मान ! आण तुझा हार इकडे. मी घालत्यें." मीं माझ्या जागेवरून उठून गर्दीतून पुढें जाऊन हात पुढें केला.

तों बसलेल्या मंडळीपैकीं कुणाच्या तरी हातांतील छत्रीच्या दांड्याला अडकून हार तुटला.

स्वामी तें पाहत होते.

जयवंतही पाहत होते.

जयवंत त्या विद्यार्थ्यांना व्यासपीटावरूनच हंसतमुखानें नम्रपणानें दोन्ही हात जोडून म्हणाले, "मित्रांनो, तुमचा हार मला पावला. मी तुमचा फार आभारी आहें."

मला मात्र तें त्या समारंभाला गालबोटसें वाटलें. उस्मानच्या हातांतील हार कुणालाही नकळत ओढाताणींत तुटला असें मला वाटलें नाहीं. आमच्या शेजारचा गोरटेलासा विद्यार्थी सावजावर टपून बसलेल्या बोक्यासारखा माझ्याकडे पाहत होता.

मुसलमान आमच्या नऊ ऑगस्ट चळवळींत आमच्या खांद्याला खांदा भिडवून धारातीर्थावर उतरले नसतील. पण म्हणून काय आम्हीं त्यांना असें बहिष्कृत मानायचें ?

आणि उमर व उस्मान तर चळवळींत आमच्या खांद्याला खांदा भिडवून लढले होते.

मला तें आवडलें नाहीं.

आणि स्वामींना तर तें आवडलें नाहींच. त्यांनीं आपल्या भाषणांत धोक्याचा अति सौम्य पण अति स्पष्ट इशारा दिला कीं असली कुढी, कोती, जातीय वृत्ति आपल्या अखंड भारताच्या ठिकऱ्या ठिकऱ्या करील.

जयवंतांनीं तर आमच्या साऱ्या आशांवर विरजण घातलें. नऊ ऑगस्ट चळवळींत काँग्रेसनें केलेल्या महान् क्रांतिकार्याची तोंडभर स्तुति त्यांनीं केली,

आणि सारा यशाचा वांटा पर्यायानें आपल्यासारख्या कॉंग्रेसनिष्ठांच्या पानांत ओढून घेतला, याबद्दल मला कांहीं वाटलें नाहीं. त्याच वेळीं शेतकऱ्यांची एक मिरवणूक लाल झेंडा घेऊन शेतकरी-कामगारांच्या राज्याची मागणी मागणाऱ्या घोषणा देत जवळून चाललेली दिसली. नेमकी ती वेळ साधून त्यांनीं कम्युनिस्टांवर प्रखर टीकेची आग पाखडली, ती मला चमत्कारिक वाटली.

कम्युनिस्ट कॉंग्रेसचे विरोधक असतील. रशियाधार्जिणेपणा त्यांच्या ठायीं असेल. ऐन चळवळींत त्यांनीं सरकारला युद्धसाह्य करून आमच्या मताप्रमाणें जनताद्रोह केला असेल. पण म्हणून कांहीं ते देशांतील शेतकरी-कामगारांचे शत्रु तर नव्हते ? त्यांच्या पुढाकाराखालीं कांहीं शेतकरी आपल्या गाऱ्हाण्यांची दाद मागूं लागले, तर त्यांना काय आम्हीं कम्युनिस्ट ठरवून सुक्याबरोबर ओलें जाळीत सुटायचें ?

मला त्यांत फार वाईट हेंच वाटलें कीं, ज्या आमच्या गांवच्या शेतकऱ्यांनीं मुद्दाम मला हार घेऊन आज सकाळींच सभेला पाठविलें होतें, त्यांतले एकदोन शेतकरी देखील त्यांत होते.

असें जें बोलूं नये तें जयवंत त्या सभेंत बोलले. आणि खरोखर बोलायला हवें होतें तें बोलले नाहींत.

त्यांना, त्यांच्या सातारा जिल्ह्याला, चळवळींत एवढा मोठेपणा कुणीं मिळवून दिला ? नुसत्या साताऱ्यांतच नव्हे, तर इतर ठिकाणीं देखील... ?

होय. आम्हीं साताऱ्यांत प्रतिसरकार चालवून ऐन चळवळींत मोठी बहाद्दुरी केली. पण आम्ही वरवरचीं कर्तीं बोलतीं माणसें हा समुद्रावरचा नुसता फेस होता. समुद्र घुसळला नसता, तर फेंस कुठून आला असता ? आम्हांला जाग्या झालेल्या लाखमाप खेडूत जनतेचें जिव्हाळ्याचें पाठबळ नसतें, तर आम्हांला चळवळ काय करतां आली असती ?

मी तर म्हणत्यें, जयवंतरावांनीं साताऱ्यांतील आमच्या बहादुर चळवळ्या जनतेची बाजू आपल्या भाषणांत खंबीरपणें उचलून धरायला हवी होती.

तसें कांहींच त्यांनीं केलें नाहीं. उलट चळवळींत कॉंग्रेसला सढळ हातानें सर्वतोपरी गुप्त दान केल्याबद्दल राष्ट्रीय बाण्याचे जमीनदार, शेटसावकार यांचे मनमुराद पोवाडे गातांना मात्र त्यांना जणूं पोपटासारखा नवा कंठ फुटला होता !

कां म्हणूं नये मग कॉंग्रेसला आणि आम्हां कॉंग्रेसच्या पाइकांना कम्युनिस्टांनीं जमीनदार-भांडवलदार-धार्जिणे ?

मला मनांतून जयवंतांचा फार राग आला. उगाच आल्ये मी हार घेऊन इतकी धांवपळ करीत असें वाटूं लागलें.

विचार पडला, मीं आमच्या शेतकऱ्यांच्या श्रद्धेचा, आदराचा जो हार इतक्या दूरवर धांवत येऊन वाहिला, तो देवांवर, कीं पाषाणांवर ?

# २ : ही मुलगी कोण ?

• • •

'नऊ ऑगस्ट' आंदोलनाच्या सुरुवातीला साऱ्या देशभर खांडववन पेटूं लागलें. त्या वनाला आग लावण्यासाठीं या कोल्हापुरांत या गांधी चौकांत अशीच मोठी सभा झाली होती,—लोक बोलत होते. त्यानंतर त्या सभेहूनही अधिक जिवंत अशी आजची विराट सभा होय, असें व्यासपीटावरचे पुढारीही आपसांत कुजबुजतांना मीं ऐकलें.

पण मला मात्र तें तितकेंसें पटलें नाहीं. सभा विराट असेल. पण विराट म्हणजे काय ? कोळ्याचें जाळें देखील विराट असतें. पण कशासाठीं ? माशा पकडण्यासाठीं. मीं मनांत म्हटलें, "कोळ्यासारखें जाळें पसरीत आहों हें आम्ही."

माझ्या शेजारीं आपलें व्याख्यान आटोपून खुर्चीवर बसलेल्या जयवंत निर्वाणांच्या कानांत मीं हळूच म्हटलें देखील, "माणसानें काढलेलें सिंहाचें चित्र तुम्हीं पाहिलें आहे जयवंत ? कसें भव्य दिसतें नाहीं तें ?"

माझ्या बोलण्याकडे जयवंतांचें लक्ष गेलें नाहीं. त्यांनीं लक्ष दिलें नाहीं, असें मी कसें म्हणूं ? चळवळीच्या प्रत्येक गोष्टींत बारकाव्यानें पाहण्याचा त्यांचा स्वभाव होता. लोकमताचा अचूक अंदाज घेऊन त्याला अनुसरून चळवळीची बिनतोड व्यूहरचना करण्याबद्दल त्यांची खात्री होती.

पण, त्या वेळीं जयवंत लोकप्रियतेच्या शिखरावरून अश्वारूढ होऊन भरधांव दौडत चालले होते. त्या दिवशींच्या सभेची उत्सवमूर्ति तेच होते म्हटलें तरी चालेल. साऱ्या सातारा जिल्ह्यांत इतर साऱ्या कॉंग्रेस उमेदवारांना मिळालेल्या मतांच्या गोळाबेरजेपेक्षां अधिक मतें मिळवून मुंबई लेजिस्लेटिव्ह असेंब्लींत निवडून आलेले तरुण, तेजस्वी लोकनायक ते. पत्रीसरकारचा मेंदू. जनता त्यांना प्राणाहून प्यार मानी आणि तळहाताच्या फोडासारखी जपे. अशा माणसाला एवढा विराट जनसमूह उत्साहाच्या भरांत आपला जयघोष करतांना ऐकून आकाशाला हात पोंचल्यासारखें क्षणभर वाटणें साहजिक होतें.

माझा प्रश्न माफक हंसण्यावारी लीलेनें हळुवारपणें डावलीत जयवंत गर्दींतून

मोटारीकडे चार पावलें पुढें गेल्यावर मला मुद्दाम वळून पाहत म्हणाले, " उद्यां रात्रीं भेटूं आपण शकुंतलाबाई ! मग बोलूं सावकाश. आमच्याकडे या तुम्ही उद्यां रात्रौ नऊ वाजतां. पुष्कळ बोलतां येईल. "

" बरें आहे." मी म्हणाल्यें.

आतां ते पुन्हां भेटले कीं त्यांना मी विचारीन, असें म्हणत मी सभेंतून घराकडे जाऊं लागल्यें. तेव्हां लोकमताचे त्या सभेविषयींचे पडसाद माझ्या कानीं येऊं लागले.

" आजची सभा गाजली..."

" काँग्रेसचा जलसा होता हा! सभा कसली? निवडणुकींतील यशानें धुंद होऊन तारवटल्यासारखे बोलले जयवंत निर्वाण..."

" कां ?—काय चुकलें त्यांचें ?..."

" या काँग्रेसच्या लोकांना काय वाटतें? आपल्याच कोंबड्यानें उजाडलें म्हणून? घवघवीत यशाची पुष्पमाला आज त्याना कंठीं मिरवायला मिळाली आहे खरी. पण ह्या मालेंतील फुलें फुलवण्यासाठीं कोणीं कसें आपलें रक्त सांडलें आहे, कशीं हाडें झिजविलीं आहेत, याचा इतक्या लौकर काँग्रेसवाल्यांना विसर पडायला नको होता. इतकी त्यांच्या डोळयांवर धुंदी यायला नको आंबलेल्या नीरेची."

" कां ? कोणीं रक्त सांडलें आहे आणि हाडें झिजविलीं आहेत ? सांगा पाहूं ! एकटी काँग्रेस आज पाव तपाहून जास्त काळ आपल्या भारताला स्वतंत्र करण्यासाठीं झटते आहे. आज पदरीं पडूं पाहात असलेल्या साऱ्या यशाची धनीण काँग्रेस आहे. हिंदुत्वाची धुंदी ज्यांच्या डोळ्यांवर आली आहे, त्यांना तें दिसत नसेल..."

" माझें ऐक. पाव शतकापूर्वी काँग्रेस नव्हतीच का? लोकमान्य टिळकांची पुण्याई तुम्ही इतक्या लवकर विसरूं शकतां? देशासाठीं आपलें उभें आयुष्य ज्यांनीं चंदनासारखें झिजवलें, भारतांतील तरुणांच्या हातीं क्रांतीचा ध्वज देऊन ज्यांनीं सारा भारत खडबडून जागा केला, त्या स्वातंत्र्यवीर सावरकरांचा ह्या यशांत कांहींच वाटा नाहीं का?... "

" अहो ! काँग्रेस आज यशाच्या धुंदींत अशा महान देशभक्तांना विसरेल. पण देश त्यांना विसरायचा नाहीं..."

मीं हे कोण बोलत आहेत तें सहज जरा पुढें सरून पाहिलें. तों ते दोघेही

भगवी खादीटोपीवारी तरुण माझ्या थोडेफार ओळखीचे विद्यार्थी होते. मी अलीकडे कांहीं महिने कोल्हापुरांत जाऊन येऊन ज्या वाड्यांत राहत असें, त्याच वाड्यांत दोघेही खोली घेऊन राहात असत. त्या दोघांनींच जयवंतांना स्नातकाश्रमातर्फे आज हार घातला होता. त्यांना पाहिल्यावर तर काय, प्रश्नच उरला नाहीं. कॉंग्रेसचे कांहींसे विरोधभक्त कां असेनात, पण ते दोघेही फार कळकळीचे कॉलेज तरुण होते. दोघेही पंचविशीच्या आंतबाहेर असतील. ते राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सभासद होते कीं नाहीं मला नक्की माहीत नव्हतें. पण संघाविषयीं काय आणि हिंदु महासभेविषयीं काय, त्यांना अभिमान मात्र दांडगा होता खरा. तितकीच गांधीजी आणि कॉंग्रेस यांच्याविषयीं विरोधभक्ति होती. त्यांतल्या एकाचें नांव होतें मदन करकरे आणि दुसऱ्याचें होतें अशोक आपटे.

राजाराम कॉलेजपावेतों आम्ही गेलों. तिथून ती मित्रमंडळी बोलत जुन्या राजवाड्याच्या आवारांतून दुसरीकडे गेली, आणि मी उजवीकडे चालल्यें. राजाराम कॉलेज त्या जुन्या राजवाड्याच्या एका भागांतच आहे.

" किती राग—किती सात्त्विक संताप वसतो आहे या तेजस्वी तरुणांच्या मनांत कॉंग्रेसविषयीं हा !" असें मनाला विचारीत मी गर्दीतून पुढें चालूं लागल्यें. तोंच त्या सभेंत झालेल्या भारती स्वामींच्या भाषणाची चर्चा चाललेली माझ्या कानीं आली.

मीं नुक्तीच कॉंग्रेसवर टीका त्या दोन भगवी टोपीवाल्या तरुणांची ऐकली होती. आतां पाहल्यें तर स्वामींच्या भाषणावर चर्चा पांढऱ्याशुभ्र खादी टोपीधारी तरुणांत चालली होती.

मी कान देऊन ऐकूं लागल्यें.

सेवादलाचे सैनिक होते ते. तेही कॉलेजचे विद्यार्थीच होते. नऊ ऑगस्टच्या चळवळींत कितीतरी साहसाचीं कामें करून आणि तुरुंगाचीदेखील वारी करून आलेले. चळवळीच्या ऐन भरांत पडलेला जेजुरीच्या देवस्थानावरचा प्रसिद्ध दरोडा खेळलेला त्यांतला एक मल्लाप्पा दोशी तर माझ्या चांगला ओळखीचा होता. पोलिसांची गिधाडी नजर चुकविण्यासाठीं आम्हीं दोन दिवस एका अंधाऱ्या डोंगरदरींत अन्नपाण्याखेरीज काढले होते. मल्लाप्पा तें विसरल्यासारखें मला दाखवी. किंवा विसरलाही असेल. मींही त्याला कधीं आठवण दिली नाहीं.

मलाही त्या मंडळीशीं आतां फारस संबंध ठेवावासा वाटत नसे. कारण मला वाटे

कीं आम्ही सारींच माणसें कॉंग्रेसनिष्ठ खरीं; पण त्यांतही डावे-उजवेपणा आहे. मला आमचे लोक आजकाल उजवी म्हणजे 'मवाळ' समजूं लागले होते. —आजकालच कां, चव्वेचाळीस सालीं गांधीजी आणि कॉंग्रेस कार्यकारिणी यांची तुरुंगांतून सुटका झाली आणि गांधीजींनीं लक्षणेनें चळवळ मागें घेतली तेव्हांपासून.

त्याचें कारण असें कीं गांधीजींनीं चळवळींत झालेल्या अत्याचारांना आणि हिंसेला स्पष्ट शब्दात नापसंती दाखविली. पण आम्हांला तसली चळवळ तावडतोब थांबवायला नको होती !

सर्व भूमिगत कार्यकर्त्यांनीं प्रकट व्हावें अशी आज्ञा गांधीजींनीं केली. तेव्हां आम्हीं सर्वांनीं प्रकट व्हायला नको होतं ?

माझे स्नेहीसोबती सहकारी कार्यकर्ते कांहीं केल्या प्रकट होईनात. स्वामींनीं देखील गांधीजींचा आदेश आपल्या मुखानें तेव्हां आम्हांला समजावून सांगितला. पण पुष्कळांना तो नीटसा मानवला नाहीं.

मी मात्र तेव्हां स्वामीजींची आज्ञा शिरसामान्य मानून प्रकट झाल्यें. आणि माझ्या सर्व सहकाऱ्यांना सांगून टाकलें, "चळवळ संपली. आतां विध्वंसक कार्य नको. आपण आतां चळवळींत उध्वस्त झालेल्या आपल्या भारतमातेला 'सुजला सुफला मलयजशीतला सस्यश्यामला' शोभवण्यासाटीं गांधीजींच्या आज्ञेनुसार विधायक–रचनात्मक कार्याला वाहून घेऊं या. गेलें तें उदक व राहिली ती गंगा मानूं या."

त्याच दिवशीं मी माघारी माझ्या सावरगांवच्या आश्रमांत गेल्यें. मनाशीं टरविलें, आतां आपणाला आपल्या खेड्यांत ग्रामराज्य–रामराज्य स्थापन करायचें. गांधीजींचे आणि कॉंग्रेसचे हात भारतमातेच्या दास्यविमोचनासाठीं बळकट करायचे.

तिथेंच तर आमचे अनेकाचे आपसांत प्रामाणिक मतभेद होते.

सभेहून आज परत येतांना मल्लाप्पा रागीट स्वरांत बोलत होता, "दुधाच्या हंड्यांत मिटाचा खडा टाकला स्वामींनीं आज..."

हे शब्द माझ्या कानीं पडले मात्र, आणि चित्त हिंपुटी झालें. ज्या महात्म्यानें सर्वस्वी निःस्वार्थ बुद्धीनें, देशहिताच्या कळकळीनें अहोरात्र लोकजागृति करावी, त्याच्याविषयीं देखील असे अनुदार उद्गार लोकांच्या तोंडून निघालेले मला कधीं ऐकावेसे देखील वाटत नसत. ते उद्गार ऐकून प्रथम वाटलें कीं आपण आपले कान असे अपवित्र करण्यापेक्षां इथून पुढें सटकून निघून जावें हें बरें. पण

दुसऱ्याच क्षणा ग माझें मन मला सांगूं लागलें, "जातेस कुठें शकुंतला ! थांब. एका डोळ्यानें आंधळा असलेल्या उंटासारखें सार्वजनिक कार्यकर्त्यांचें जीवन एकांगी असतां उपयोगी नाहीं. माणसाच्या पाठीलाही डोळे असले पाहिजेत. लोक आपणांविषयीं उघड काय बोलतात तें साऱ्यांनाच ऐकूं येतें. परंतु लोक उघड काय बोलत नाहींत, मनांत कोणते किंतु लपवून ठेवतात, तें पाहातांना माणसानें पाठीचे डोळे उघडले पाहिजेत."

मुद्दाम माझ्याकडे पुन्हा पुन्हा पाहून तो बोलत होता.

स्वामींविषयीं त्या क्षणीं माझ्या मनात जो प्रश्न आला, तोच प्रश्न नेमका कुणीं-तरी त्या स्वामींच्या त्या टीकाकाराला तेवढ्यांत विचारलेला मीं ऐकला.

"कां ? स्वामींचें काय चुकलें ? दुधाच्या हंड्यांत मिठाचा खडा कसा टाकला स्वामींनीं ?"

"अरे ! प्रसंग कोणता आणि आपण बोलतों काय एवढेंदेखील भान असूं नये या माणसाला ? आणि लोकांचा पुढारी म्हणवतो ! लोकांना काय पाहिजे, काय नको तें ओळखून ज्याला लोकजागृतीची नौका निर्धास्तपणें वल्हवतां येत नाहीं, तो त्या नौकेचा कर्णधार कसला ? पुढारी कसला तो ?"

तें ऐकून मला फार विस्मय वाटला. मनांत म्हटलें, पुढाऱ्याचा चांगला आदर्श समोर ठेवला आहे या तरुणानें. अशीच जर आपली सुविद्य भावी कर्ती पिढी पुढारीपणाचे आदर्श आपणासमोर ठेवूं लागेल, तर देशाला पुढारी लाभतील तेही तसेच. मग देशाचें पाऊल पुढें कसें पडणार ?

माझ्या मनांत देखील आलें कीं मल्लापाला हांक मारून सांगावें, किंवा त्याला खोलीवर बोलवावें, आणि त्याच्याशीं थोडा वेळ मनमोकळेपणानें बोलावें. पण मीं मन आवरलें.

मला आणखी कसलें भय वाटलें नाहीं. पण भय एवढेंच वाटलें कीं आम्ही तरुण पिढी अशी धंदेवाईक दृष्टीनें जर पुढारीपणाकडे पाहूं लागलों, सवंग लोक-प्रियतेच्या आहारीं जाऊन लोकानुरंजन करूं लागलों, मागणीप्रमाणें पुरवठा हें आम्हीं आमच्या पुढारीपणाचें धोरण ठेवलें, तर काय अनर्थ होईल ?

तोंच मल्लापाचा कोणी कॉलेजमित्र मागाहून येऊन त्याच्या खांद्यावर हात टाकून चालतां चालतां विचारूं लागला, "पण काय रे ! आमच्या भावी गृहमंत्र्यांचें भाषण तुला कसें काय आवडलें ?"

" सांगतां काय तर ? जयवंतरावांचें भाषण खरोखरच उत्तम झालें. अतिशय परिणामकारक, अगदीं ऐकणाराच्या हृदयाला जाऊन भिडणारें झालें..."

" नंबर एकचें संधिसाधुपणाचें झालें. फड कसा मारून न्यावा आणि लोकांना कसें झुलवावें हें जयवंतरावांना चांगलें कळतें..."

" त्यांनीं पाहिलें कीं काँग्रेस प्रांतिक कायदेमंडळांत बहुतेक प्रांतांत निवडून आली आहे. जे कोणी काँग्रेसला धरून राहतील, ते ऐषआरामात राहतील. एम्. एल्. ए. होतील, बडे सरकारी नोकर होतील, पार्लमेंटरी सेक्रेटरी होतील, दिवाण होतील, सर्व कांहीं होतील..."

" पण काँग्रेसला पत्रीसरकारचें वावडें आहे कीं काय ?..."

" कशावरून ?..."

" नाहीं; जयवंतराव निर्वाण हे पत्रीसरकारचा मेंदू ना ? नामानिराळे राहून पत्रीसरकारचा कारभार चालवीत असत ते."

" ते !—ते कारभार चालवीत होते ?..."

" असें लोक म्हणतात..."

" पण मग आजच्या व्याख्यानांत त्यांनीं पत्रीसरकारच्या नांवानें वाचाविटाळ देखील नाहीं केला ?..."

" अगदीं गांधीवादाचा रस करून मुशींत ओतावा तसे मूर्तिमंत सत्य-अहिंसेच्या पुतळ्यासारखे बोलले..."

अशी टीका त्या मंडळींत जातां जातां चालली होती. तेवढ्यात मी माझ्या बिऱ्हाडच्या रस्त्याला वळल्यें. ते विद्यार्थी रंकाळ्याच्या रस्त्याला वळले.

जयवंतांवर त्या लोकांनीं टीका केली, तरी त्याचें मला कांहीं वाटलें नाहीं. कुणालाही टीका करावीशी वाटेल असेंच त्यांचें आजचें भाषण होतें. भारतमातेच्या स्वातंत्र्यासाठीं तळहातावर शिरें घेऊन जे तापलेल्या तव्यावर उभे राहिल्यासारखे लढले, लढतां लढतां आपलीं घरेंदारें, शेतवाडी, बायकोपोरें, अशी आयुष्याची प्राणांच्या मोलाची फूलपत्री ज्यांनीं कशाची म्हणजे कशाची देखील पर्वा न करतां भारतमातेच्या चरणीं उधळली, त्यांचीं नांवें देखील विजयोत्साह साजरे करतांना आम्हांला आठवूं नयेत ?

जयवंतरावांविषयींच्या टीकेंत मी देखील मनानें सहमत होत्यें. पण स्वामीं-वरची टीका मात्र मला कानांनीं ऐकवली देखील नाहीं. दुधाच्या हंड्यांत मिठाचा

खडा काय त्यांनीं टाकला? अधिकाराच्या अबलख वारूवर स्वार होण्यासाठीं गुढग्याला बाशिंगें बांधून नाचणाऱ्या उतावळ्या कॉंग्रेसपाइकांना त्यांनीं धोक्याची सूचना दिली, हा त्यांचा अपराध का?

आणि म्हणून का सभेला आलेल्या साऱ्या लोकांनीं स्वामींची उपेक्षा केली? नेहमीं स्वामींचा प्रत्येक शब्द फुलासारखा झेलून आदरानें शिरीं धारण करायला उत्सुक असलेल्या आम्हीं त्याच कॉंग्रेसच्या पाइकांनीं त्याच स्वामींचे तेच बहुमोल शब्द सभेंतल्या सभेंत वरच्यावर कापसाच्या म्हाताऱ्यांसारखे वरच्यावर उडू द्यावे?

काय याला म्हणायचें तरी काय?

मला कांहीं ती सभा एकंदरींत शुभलक्षणी वाटली नाहीं. तसें पाहतां सभा खरोखरच अगदीं टोलेजंग झाली. लोकांचा उत्साह अगदीं उफाळून येत होता. विजयी वीरांच्या पवित्र्यांत आम्ही काय बोलूं तें ऐकून घ्यायला जनता तयार होती. 'कॉंग्रेस ना? बस्स! कॉंग्रेसनें कांहींही केलें तरी आम्हाला चालेल. कॉंग्रेस आमची, आम्ही कॉंग्रेसचे. कॉंग्रेसला सात खून माफ!' असा बहुजनसमाजाच्या निष्पाप भोळ्या भावाचा परिमल आसेतुहिमाचल दरवळत होता.

पण सारी जनता इतकी जागरूक कुठें असते? सारासार विचार करून दूध-पाण्यांतून दूध तेवढें हंसासारखें पारखून अलग करून घ्यावें आणि पाणी फेंकून द्यावें, इतका हंसक्षीरन्याय जाणण्याइतकी जनता जर जागृत असती, तर कशाला हवें होतें?

● ●

तो सारा दिवस व ती सारी रात्र मी अगदीं अस्वस्थ होत्यें. इतकी कीं मदन करकरे आणि अशोक आपटे हे दोघेही माझे शेजारी विद्यार्थी ताजीं वर्तमान-पत्रें पाहण्यासाठीं माझ्या खोलींत येऊन गेले, त्या सभेविषयीं कांहीं तरी बोलायची त्यांची इच्छा दिसली, बोलायचें मलाही होतें, पण मी बोलल्यें नाहीं.

मी त्यांना म्हणाल्यें, "पुन्हा बोलूं आपण. मीं कांहीं इतक्यांत जात नाहीं."

पण मनांत अस्वस्थतेची अशी कांहीं भगभग सुटली होती,—मला अचानक मागच्या वर्षी एकदां चळवळीच्या निमित्तानें मुंबईहून बोटीनें गोव्याकडे जातांनाची

आठवण झाली. कांहीं कांहीं आठवणी अशा धूमकेतूसारख्या मनांत अकस्मात् कां बरें उगवतात ?

आमच्या बंडाला शस्त्रास्त्रें आम्हांला गोव्यांत जाऊन खरेदी करणें सोपें जाई. वाडी–बेळगांव–कोल्हापूरच्या वाटेनें आम्ही तीं साताऱ्याकडे आणीत असू.

अशींच एकदां आम्ही बोटींतून गोव्याकडे चाललों होतों ख्रिश्चन गोवेकरांचा वेश घेऊन. मी आणि शेख मिरा. आणि अर्ध्या समुद्रांत बोट असतांना वादळ झालें. बोट असे जोराचे हेलकावे खाऊ लागली, लाटा अशा डोंगराएवढ्या जोराजोरानें उसळूं लागल्या आणि बोटीवर धडाधड आदळूं लागल्या, कीं मला वाटलें, आतां इथेंच आम्हांला जलसमाधि मिळणार.

तेव्हां जशी मनाची जोराची धागधूग खवळलेल्या समुद्रांत माझ्या मनांत सुरू होती, तशीच धागधूग आजही सुरू झाली होती. मी शेख मिराच्या गळ्याला मिठी मारून अगतिकतेनें कशीबशी उभी होत्यें. पण आज मात्र शेख मिरा जवळ नव्हता. आज मी एकटीच होत्यें.

खरेंच, कुठं असेल बरें शेख ? त्या दिवशीं जी गोव्याच्या हद्दींत त्याची आणि माझी ताटातूट झाली, तो आजवर त्याचा पत्ता नाहीं. कुठं असेल बरें तो ?

त्या वादळांत सापडलेल्या बोटीसारखी मला माझ्या देशाची कठीण अवस्था अलीकडे दिवसेंदिवस दिसूं लागली होती.

पण इतके दिवस वाटत होतें तें परदुःख शीतल होतें. आज तसें नव्हतें. आम्ही नऊ ऑगस्टच्या आंदोलनांत देशाच्या आणि काँग्रेसच्या–गांधीजींच्या आज्ञेनुसार रणांत उडी घेतली, आणि खडतर वनवास भोगून, वेळीं प्रसंगीं स्वामींचें मन दुखवूनही आमच्या देशाच्या स्वातंत्र्याचा पाया घातला. त्या पायावर भिंती उभारल्या. इमारत उभी केली. त्या इमारतींत राहायला मात्र आम्ही चोर काय ?

निवडणुकींच्या ऐन रंगांत एकदां स्वामी मला म्हणाले होते, "शकुंतला ! काँग्रेसचा वनवास आतां संपल्यासारखा आहे. काँग्रेस आतां राज्यकर्ती होणार आहे. आतां हें वनवासाचें वाण कुणाच्या वांट्याला यायचें आहे सांग बरें ?"

मी सहज पण वस्तुस्थितीच्या प्रकाशांत अगदीं ढळढळीत सत्य दिसत होतें तें बोलून गेल्यें, "कम्युनिस्टांच्या."

कारण लढ्याला विरोध कम्युनिस्टांना होता. शेख मिरासारखे कांहीं अपवाद होते त्यांत. पक्षाचें आज्ञापत्र मोडून लढ्यांत कांहींनीं उडी घेतली आणि सातारा-

कोल्हापूरच्या टापूत प्रतिसरकारच्या चळवळींत अधिक जिवंतपणा ओतायला मदत केली तें निराळें. पण एकंदरींत पक्ष म्हणून कम्युनिस्ट लढ्याच्या विरुद्धच होते. त्यांना त्याच्या उदासीनतेचीं फळें भोगावीं लागणार, कॉंग्रेस अधिकारावर आल्यावर त्यांची मुळींच गय करणार नाहीं, हें सांगायला कोणी ज्योतिषी नको होता.

म्हणून स्वामींनीं पुढील वनवासाची पाळी कोणावर असें विचारलें तेव्हां मीं कम्युनिस्टांचें नांव घेतलें.

पण स्वामी तेव्हां म्हणाले, "नाहीं."

"तर कोणावर ?" मला तेव्हां प्रश्न पडला. मीं विचारलें.

"गांधीजींवर." स्वामी उत्तरले.

"म्हणजे ?" मीं प्रश्न केला. मला कांहीं कळेनाच.

"म्हणजे, जे कोणी गांधीजींच्या सत्य-अहिंसेच्या शिकवणुकीला निष्ठेनें चिकटून राहतील त्यांच्यावर." स्वामी पुढें म्हणाले.

दुसरा कोणी तेव्हां बोलला असता, तर मीं त्याला अगदीं वेड्यांत काढला असता. स्वामीच बोलले, म्हणून ऐकून घेतलें.

तरी देखील स्वामींचा शब्द एरव्हीं जसा मला ब्रह्मवाक्य वाटे, तसा तेव्हां कांहीं तो वाटला नाहीं.

मी कधीं स्वामींच्या शब्दावर उलट बोलणारी नव्हे. पण तेव्हां विचारलें, "तें कसें काय ?"

"योग्य वेळीं काळ याचें उत्तर देईल तुला शकू !" एवढेंच स्वामी तेव्हां म्हणाले.

ते स्वामींचे उद्गार आज मला आठवले.

आणि दुसऱ्या दिवशीं उजाडतांच पाहातें तों देवानें पाठवल्यासारखे स्वामी माझ्या दारीं दत्त करून उभे.

स्वामींना पाहून मी एकदम चकितच झालें. मनांत म्हटलें, कधीं नव्हते ते आज स्वामी माझ्या दारीं कसे आले ? ते मला आपल्या मुलीसारखे मानीत आणि मी देखील त्यांच्यावर त्यांच्या उदरीं आलेल्या कन्येसारखी प्रेम करीं. इतकीं आम्हां

दोघांचीं अंतःकरणें एकमेकांना साक्ष होतीं. पण आजवरचा माझा परिपाठ असा, कीं स्वामींना भेटण्यासाठीं स्वामींच्या दारीं जायचा मान माझा. त्यांना मी आजवर कधींच माझ्या दारीं येऊं देऊन मला लाजवायची संधि मिळूं दिली नव्हती.

मी स्वामींना पाहून क्षणभर अगदीं गोंधळल्यासारखी झाल्यें. पाहत्यें तों स्वामी एकटे नव्हते. गोरी गोरी पान आणि वेलीसारखी नाजुक अशी बावीस तेवीस वर्षांची एक सुंदर तरुणी त्यांच्याबरोबर होती. मला पाहतांच त्या तरुणीनें लाजाळूच्या पानांसारखा डोकीवरचा पदर आपल्या तोंडावर ओढून घेतला आणि तोंड लपवण्याचा प्रयत्न केला.

पण तिच्या ओझरत्या दर्शनावरूनच चट्कन मला चार वर्षांपूर्वी महिपतवाडीला गेल्या वेळची फार जुनी आठवण आठवली. नऊ ऑगस्टचा लढा तेव्हां पुकारला गेला नव्हता. लढ्याचे चौघडे झडूं लागले होते. लढ्याची पूर्व तयारी म्हणून जनतेंत खेडोपाडीं जाऊन आम्ही आगामी लढ्याचें स्वरूप जनतेला समजावून देत होतों. जणूं काय मारुतीच्या आवेशानें भारतांत इंग्रजी सत्तेचें लंकादहन चालविलें होतें आम्हीं तेव्हां. वनमाळी आणि मीं त्या नगरांत प्रवेश केला मात्र, आणि तेथील जनतेच्या उत्साहाचा महासागर हजारों खेडुतांच्या मुखांतून आणि मुद्रेवर आम्हांला खळाळून उफाळतांना दिसला. जरासंधाच्या राज्याप्रमाणेंच त्या कोल्हापूरच्या टापूंत मनानें बंदिवान असलेल्या जनतेची ती धडाडी पाहून आम्हां दोघांनाही वाटलें, कीं संस्थानी जनता देखील कांहीं अगदींच मेलेल्या मायेचें दूध प्यालेली नसते.

त्या विराट सभेंत मीं त्या तरुणीला प्रथम पाहिलें होतें. नखशिखान्त बहुमोल अलंकारांनीं उत्सवांतील देवीसारखी ती तेव्हां नटलेली होती. आजच्यासारखीं अजून कोमेजूं न लागलेलीं पण लौकरच कोमेजूं लागतील अशा पूर्णतेनें लावण्याचीं फुलें तिच्या सर्वांगावर तेव्हां अजून पूर्ण फुललेलीं नव्हतीं. पहांटल्या यौवनांतील दहिवराची संजीवनी पिऊन विकासाच्या वाटेकडे आतुरतेनें डोळे लावून बसलेल्या उमलत्या कळ्याच तिचें अठरा वर्षांचें यौवन शोभवीत होत्या.

सभेंत आरंभीं कांहीं आमचें तिच्याकडे लक्ष गेलें नाहीं. माझें आणि वनमाळींचें देखील.

उलट सभेच्या मर्यादा साभाळून, कस्तूरी वांटावी तशा मोजक्या शब्दांत आणि मोजक्या गनिमी नेत्रविक्षेपांत आम्हीं दोघांनीं तिचा आमच्या आमच्यांत

उपहासच केला.

सभा मोठी परिणामकारक झाली. सभेंत मीही बोलल्यें; वनमाळीही बोलले. ते एवढे प्रभावी वक्ते आहेत, जनतेचीं अंतःकरणें त्यांना इतकीं लीलेनें जिंकून आपलींशीं करतां येतात, हें मला तोंपावेतों माहीत नव्हतें.

त्यांनीं आपल्या भाषणांत भारताच्या अखेरच्या स्वातंत्र्ययुद्धासाठीं साऱ्यांना पाचारण केलें. गरीब, श्रीमंत, विद्वान, अशिक्षित, स्त्रिया, पुरुष, म्हातारे, तरुण— साऱ्यांना त्यांनीं आपल्या प्रभावी भाषेंत पाचारण केलें.

त्या भाषणाचा लोकांवर मांत्रिकानें मंत्र घातल्यासारखा परिणाम झाला. त्या सभेंत आपले हजारों रुपये मोलाचे बहुमोल अलंकार देशोद्धाराच्या सत्कार्यांत वेंचण्या-साठीं आपल्या श्रीमंतींतील फूल ना फुलाची पाकळी म्हणून वनमाळींच्या चरणीं वाहणारी तेजस्वी कनकलक्ष्मी मुलगी ती हीच.—मला ओळख पटायला वेळ लागला नाहीं.

आम्हांला तेव्हां त्या मुलीची ती धैर्यशीलता, ती देशभक्तिपर उज्ज्वलता पाहून मोठें नवल वाटलें.

" आपण ह्या तेजस्वी मुलीला लढ्यांत ओढणार. " वनमाळी त्याच दिवशीं सभा आटोपून जातां जातां माझ्यापाशीं म्हणाले होते.

मला कांहीं ती कुणाची कोण हें तेव्हांपावेतों माहीत नव्हतें. पण तेव्हां वनमाळींच्याच मुखानें कळलें कीं ती महिपतवाडीची एक अतिसंपन्न व सुशिक्षित पण स्वच्छंदी तरुणी आहे. कोल्हापूरच्या महात्मा साखर कारखान्यांत तिचा बराच मोठा भाग आहे. कोल्हापूर-साताऱ्यांत तिची पुष्कळशी शेतवाडीही आहे. पण बाप तिच्या जन्मापूर्वींच संसार सोडून परागंदा झाला. आणि आई देव देव करीत बऱ्याच वर्षांपासून साधुसंतांच्या भजनीं लागली आहे. त्यामुळें साऱ्या दौलतीची व्यवस्था आतां हीच पाहते.

मला तें ऐकून आनंद वाटला. मनांत आलें, अशीं देशांतील सारीं धनवंतांचीं, जमीनदारांचीं, शेटसावकारांचीं, कारखानदारांचीं बायकामुलें—कुटुंबेंचीं कुटुंबें देशाच्या स्वातंत्र्याच्या लढ्यांत स्वयंस्फूर्तीनें सामील होतील, तर देशाचा उद्धार नक्की जवळ आला म्हणायला हरकत नाहीं.

आमच्या आगामी चळवळींतील यशाचे कवडसे मला दिसूं लागले. आनंद वाटला.

"तुम्ही हिला लढ्यांत ओढणार ?" मीं तेव्हां वनमाळींना विचारलें.

"होय. आपण तिला लढ्यांत ओढणार. कां ? ती स्वच्छंदी आहे, तिचें जीवन ढगाळलेलें आहे, म्हणून तुम्ही शंका घेतां ? तुम्हीं टिळकांची 'बोंबाबोंब' कविता वाचली आहे ?"

त्या नादांत त्यांनीं गुलाबाच्या गळलेल्या दोन पाकळ्या गोळा करून त्यांचा सुवास घ्यावा तसे त्या कवितेंतील कुठचे तरी दोन चरण गुणगुणून ध्वनित केले, "चिखल फांसला, कलश घांसला, अधिकाधिक तो उज्वल झाला। पतनावांचुन नच उत्थापन, कां मग बोंबाबोंब ?"

तेव्हांपासून आज पांच वर्षांनीं मी त्या मुलीला पाहत होत्यें.

"तीच ही मुलगी अहिल्या" मीं त्या मुलीला पाहून मनांत म्हटलें. "पण ही इतकी ओशाळल्यासारखी कां वागते ? मला तिनें ओळखलें नाहीं का ?"

स्वामी दरवाजांतून आंत येतां येतां त्यांना मीं आदरपूर्वक वंदन करून म्हटलें, "आपण आलांत माझ्या दारीं स्वामी ? मीच आपली भेट घ्यायला येणार होत्यें. कालच्या सभेंत गर्दी होती म्हणून मला भेटतां आलें नाहीं."

स्वामींनीं त्या बरोबरच्या मुलीला आंत बोलावून माझ्या शेजारीं, माझ्या खाटेवर बसवलें आणि मग माझ्या उद्‌गारांचें सूत्र घेऊन ते म्हणाले, "कशी काय झाली कालची सभा, शकू ?"

आणि बोलतां बोलतां त्यांच्या चर्येवर नेहमींचें निरागस हास्य फुललें.

मला त्या सभेविषयीं स्वामींपाशीं बोलायचें पुष्कळ होतें. पण समोरासमोर बोलायचा धीर मात्र होईना. अनोळखी नदी-पात्रांतून, महापुराच्या लोंढ्यांतून पावलें सांभाळीत चालूं लागावें, आणि महापुराच्या गढूळ पाण्यांत पात्राचा तळठाव दिसतो का उगीचच पाहावा, तशी भांबावल्यासारखी माझी अवस्था झाली होती. खरें म्हणजे, कालच्या सभेनें माझ्या मनाला एवढा जोराचा धक्का दिला होता कीं त्याहून धरणीकंपाचाच धक्का देखील पुरवला.

"मागें आपण निवडणुकीच्या प्रचारासाठीं कुलाबा जिल्ह्यांत हिंडत होतों जयंत जोशींकरितां. तेव्हां आपल्या स्वातंत्र्याच्या चळवळीच्या संभाव्य भवितव्याविषयीं मी एकदां काय बोललों होतों, तुला आठवतें शकू ?" स्वामींनीं विचारलें.

मी आश्चर्यचकित झालें. वाटलें, माझ्या मनांत घोळणारी ती आठवण स्वामींनीं त्रिकालज्ञान्याप्रमाणें अचूक कशी शोधून काढली ?

मी स्तब्ध राहिलेली पाहून स्वामींनीं पुन्हा विचारलें, "आठवतें का ?"

"आठवतें स्वामी !" मी उद्गारल्यें.

"तें नवें पर्व आपल्या चळवळींत आतां सुरू होत आहे शकू ! अधिकार-ग्रहणापूर्वीची काँग्रेस, आणि आतां अधिकारग्रहणानंतरची काँग्रेस या काँग्रेसच्या दोन अवस्थांमधील अंतर आतां असेंच तुला दिवसेंदिवस जमीनअस्मानासारखें अधिकाधिक रुंदावलेलें दिसून येईल."

अत्यंत विशाल, हिमालयाहूनही विशाल आणि जगबुडीच्या कल्पनेहूनही गंभीर असा प्रश्न स्वामींच्या त्या उद्गारांनीं माझ्यापुढें उभा केला.

त्या प्रश्नावर स्वामींकडून मी कांहीं मार्गदर्शनाची अपेक्षा करणार, तोंच स्वामी म्हणाले, "तें राहूं द्या. तशा वेळा आपण आतां दिवसेंदिवस अधिकाधिक आपल्या राजकीय क्षितिजावर उगवलेल्या पाहणार आहों. पण आज मी तुझ्याकडे एका निराळ्या महत्त्वाच्या कामासाठीं आलों आहें." स्वामी त्या मुलीकडे ओझरता दृष्टिक्षेप करीत पुन्हा माझ्याकडे वळून म्हणाले, "आज तुझ्यासाठीं मी ही नवी मैत्रीण आणली आहे. माझी आश्रमकन्या आहे ही शकू ! हिला मी पुन्हा माघारा येईपावेतों तूं तुझ्याबरोबर तुझ्या धाकट्या बहिणीसारखा आसरा दिला पाहिजेस. देशील ? वचन दे मला."

चक्रव्यूहांत सांपडल्यासारखें मला झालें. स्वामी मला हिची मैत्रीण म्हणतात आणि मग आसरा कसला मागतात ? अशी परकेपणाची, सावधपणाची भाषा कां ?

"आपण सांगाल ती आज्ञा मी शिरसामान्य करीन स्वामी ! हें घ्या वचन." मी दोन्ही हात जोडून म्हणाल्यें आणि त्यांच्या हातावर हात दिला.

"ये तर जरा आंत ये." असें म्हणत स्वामी उठले आणि माझ्या पुढें आंत चालूं लागले.

"हें काय चाललें आहे ?" अशा तीव्र जिज्ञासामय आणि विस्मयाच्या अंधारांतून चाचपडत मी स्वामींमागोमाग आंत गेल्यें.

मला हेंच कळेना, कीं स्वामी ह्या मुलीविषयीं असें कोणतें गूढ रहस्य मला सांगणार आहेत, कीं ज्याचा परिस्फोट ह्या मुलीसमोर होणें त्यांना इष्ट वाटत नाहीं ?

## ३ : सवती-सवती ?

स्वामींनीं सांगितलें आणि मीं ऐकून घेतलें. स्वामींच्या शब्दावर माझा पूर्ण भरंवसा होता. पण वनमाळींविषयीं ते इतक्या सहानुभूतीनें बोलले, तें मला आवडलें नाहीं.

त्या मुलीचा खरोखर, वनमाळींनीं केंसानें गळा कापला होता. मी म्हणत्यें तिच्या तोंडावरची व एकदर देहावरची कांतीच चहाडी करीत होती, कीं तिला कांहीं दिवस गेले असावे. कुणीं ओढलें तिला या संकटांत ? वनमाळींनींच ना ?

मला कळतें, कीं मनुष्य आहे तिथें वासना आहेत. माणसानें कितीही संयम करायचें ठरविलें तरी सान्यांनाच संयम साधतो असें नाहीं. कुणाला पुरता साधतो, कुणाला कमी साधतो, आणि कुणाला साधतही नाहीं. आमच्या देशांतील असे कांहीं महान क्रांतिकारक मला ऐकून माहीत झाले आहेत कीं ह्या संयमाच्या कसोटीवर जर मी त्यांच्या चारित्र्याची आणि जीवितकार्याची कसोटी ठरवूं लागल्यें तर ते अगदीं हिणकस, अगदीं टाकाऊ ठरतील. पण हा जीवनकलह आहे. ह्या जीवनकलहांत इतक्या काटेकोरपणानें रूढ नीतिनियम धर्मशास्त्रांतून आणि कादंबरी, कथा, काव्य यांतूनच फक्त पाळलेले आढळून येतील. म्हणून तेवढ्या-साठीं त्या महान क्रांतिकारकांच्या कार्याची किंमत आपणाला अगदीं कमी कशी लेखतां येईल ?

स्वामींच्या तोंडून मीं जें ऐकलें त्याबद्दल वनमाळींना दोष द्यायला मी तयार नव्हत्यें. चंद्रावर देखील डाग असतातच ना ? तसाच देशभक्तांच्या चारित्र्यावरील त्या डागांचा सोज्वळ अर्थ आपण कां ध्यानीं घेऊं नये ?

पण मी वनमाळींना अपराधी समजत होत्यें ती एवढ्याचसाठीं, कीं आतां चळवळ संपली आणि आपण राज्यकर्तेपणाच्या उद्योगाला लागलों. फरारी क्रांति-कारक आतां प्रकट झाले तरी त्यांना फांशी देण्याची किंवा तुरुंगांत लोटण्याचीही आपल्या सरकारची आतां छाती नव्हती. महात्मा गांधींनीं तुरुंगांतून मुक्त होतांच सान्या घातपाती अत्याचारी क्रांतिकारकांना सरकारी जाचाला न भितां प्रकट व्हायला सांगितलें. शिंगें मोडून वासरांत शिरल्यासारखे वनमाळी, गांधीवाद त्यांना

पटलेला असो वा नसो, गांधीवादी म्हणून जर ते जनतेचें नेतृत्व करीत होते, तर गांधींच्या आज्ञेनुसार त्यांनीं त्या वेळीं प्रकट व्हायला नको होतें का ?

पण ते नाहीं प्रगट झाले. तरी त्याबद्दलही त्यांना मीं दोष दिला नसता. पण कोणत्या तरी योगायोगानें ही अहिल्या जी त्यांना जीवनसाथी लाभली तिच्या मेल्याजिल्याची देखील चौकशी त्यांनीं गेल्या सहा महिन्यांत करू नये ?

स्वामींना वनमाळींचा हा अपराधसा वाटला असला, तरी कदाचित् कुणाविषयींही कांहींही मुखानें वाईट बोलायचें नाहीं हा त्याचा स्वभाव. त्या स्वभावानुसार तें बोलले नसतील. पण म्हणून कांहीं वनमाळींच्या अपराधाची तीव्रता कमी होत नव्हती.

स्वामींनीं जरी अधिक स्पष्ट सांगितलें नाहीं, तरी जें कांहीं सांगितलें त्यावरून त्यांच्या मनांत काय सांगायचें संकोचून राहिलें होतें तें मीं ओळखलें. मीं त्याबद्दल अहिल्येला मनांतून मुळींच दोष दिला नाहीं. स्वामींनीं तिला जवळ ठेवून घ्यायला मला सांगितलें आणि मी मनमोकळेपणानें हो म्हटलें.

" पण वनमाळी केव्हां प्रगट होतील स्वामी ? " स्वामी जायला निघाले तेव्हां त्यांना मीं विचारलें.

" भगवान जाणे ! " स्वामी आकाशाकडे पाहत दोन्ही हात पसरून उद्गारले, " वनमाळी या जगांत तरी आहे कीं त्याच्या जीवनाचें देशाच्या सेवेपायीं सार्थकसोनें झालें आहे, हें मी कसें सांगू ? तो प्रकट झाला तर आपला, नाहींतर भगवंताचा. "

जातां जातां स्वामींनीं अहिल्येच्या पाठीवरून प्रेमानें हात फिरवून सांगितलें, " अहिल्या ! तूं इथें अगदीं निर्धास्तपणें राहा. कुणी कसलाही त्रास देणार नाहीं इथें तुला यापुढें. कुणी हंसणार नाहीं. शकुंतला तुझी थोरली बहीण आहे असें समज. आणि पुन्हा एकदां तुला सांगतों, देशावरची निष्ठा सोडूं नको. देशभक्त तरुणांविषयीं मनांत अविश्वासाला थारा देऊं नको. वेळ येतांच तुरुंगांत जायची—आत्मयज्ञाची तयारी ठेव. त्यापूर्वी तुझी आणि वनमाळींची भेट व्हावी असें मलाही वाटतें. पण—ईश्वराची मर्जी ! "

स्वामी गेले. अहिल्येचे डोळे अश्रूंनीं डबडबून आले. मी तिला हृदयाशीं घट्ट धरून तिचें शांतवन करूं लागल्यें. तोंच बाहेर मल्लाप्पानें हांक मारली, " ताई ! "

• •

यावेळीं दुसऱ्या कोणालाही भेटायची माझी इच्छा नव्हती. पण मल्लाप्पानें हांक मारून वळचणीला साप फिरतो आहे असें सांगितलें, तेव्हां मी दचकून उठून बाहेर गेल्यें.

"कुठें आहे साप ?—" मीं विचारलें.

"तो पाहा ! तो पाहा—पळतो आहे" मल्लाप्पा वळचणींतून वळवळत सरपटत दिसेनासा होणाऱ्या सापाकडे बोट दाखवून म्हणाला.

"जाऊं दे त्याला. आपणाला तो सापडणार थोडाच आहे ?" मीं म्हटलें. आणि माघारीं खोलींत आल्यें. अहिल्याही सापाचें नांव ऐकून दचकून बाहेर आली होती. तीही माझ्या मागोमाग आंत आली.

ती आपणहून मल्लाप्पाशीं कांहींच बोलली नाहीं. पण त्यानेंच आगंतुकपणानें तिला हांक मारून विचारलें, "अहिल्यादेवी ! तुम्ही केव्हां आलांत ?"

मल्लाप्पाचा तो प्रश्न मीं ऐकला. पण त्या प्रश्नाला अहिल्येच्या तोंडून उत्तर मिळालेलें मात्र ऐकलें नाहीं. मला तें कसेंसेंच चमत्कारिक वाटलें. पण एखाद्या गोष्टीविषयीं उतावळेपणानें अकारण मनांत विकल्पाला थारा न देण्याची दक्षता मी अधिक कटाक्षानें बाळगीत असें. मात्र असा अनुभव होता, कीं ह्या चळवळीच्या वाहत्या गंगेंत अनेकांनीं अनेक परीनीं आपले हात धुवून घेतले होते व अनेक जण धुवून घेतही होते. परस्परांविषयींच्या प्रवादांचें पीक अगदीं बेफाट येत असे. अशा वेळीं नुसत्या वरवरच्या पाहिलेल्या अथवा ऐकलेल्या परिस्थितीवर विसंबून माणूस जर निष्कर्ष काढील तर नेमका फसायचा.

मीं मनांत म्हटलें, कीं अहिल्या आपल्याच चिंतेंत चूर असेल. म्हणून तिनें मल्लाप्पाला कांहीं उत्तर दिलें नसेल.

"ताई ! मला वाटलें होतें, कीं ही जागा तरी निर्भय असेल. स्वामींच्या आश्रमाच्या वळचणीला कोल्हे, कुत्रे, साप उपद्रव द्यायला वळवळत असतात तसे इथें नसतील. पण इथें तुमच्या घराच्या वळचणीलाही साप आहेतच."

अहिल्या बोलली तें कोणत्या अर्थानें बोलली याचा अधिक खोल आणि नागमोडा विचार तेव्हां मला करावासाच वाटला नाहीं.

"तुम्ही यायला आणि साप निघायला एक गांठ पडली खरी. पण म्हणून कांहीं तुम्हांला इतकें भ्यायला नको. मायदेशाच्या मंगलासाठीं सर्वस्वावर उदक सोडून बाहेर पडलेल्या मुली आम्ही. इतकें जिवाला जपून कसें चालेल ?" मीं म्हटलें.

अहिल्या पदरानें गालावरचे अश्रूंचे ओघळ पुशीत म्हणाली, "तशी जिवाला भीत नाहीं मी ताई ! पण माणसानें सत्कार्यासाठीं झगडतांना धारातीर्थी मृत्यूच्या मांडीवर शय्या करणें वेगळें, आणि वेडकीसारखें उगीच फुकाफुकीं एखाद्या सापाच्या भक्ष्यस्थानीं पडून मरणें वेगळें."

तिच्या डोक्यांत वनमाळींविषयींच्या विचारानें कांहींतरी भयंकर काहूर माजविलें आहे एवढाच त्याचा अर्थ मीं ध्यानीं घेतला. मग त्या वेळीं मी तिच्याशीं अधिक कांहीं बोलल्यें नाहीं. बोलायची ती वेळच नव्हती.

पण मन मात्र एकसारखें विचारीत सुटलें होतें, अशी एखाद्या चोरासारखी दबकत, अडखळत टवकारलेल्या कानानीं ही का वागते? ही भूमिगत निराधार बेशुद्ध जखमी स्थितींत महिन्यापूर्वी आपणाला आढळली, हिच्यावर पोलिसांचा वहीम आहे हें माहीत असतांही हिला बरें वाटेपावेतों आपण एका खेडेगांवांत ओळखीच्या घरीं हिला आसरा पाहून दिला, एवढेंच स्वामी ओझरतें बोलले. पण वनमाळींची आणि हिची गांठ कशी पुन्हा त्या महिपतवाडीच्या पहिल्या भेटीनंतर पडली, त्यांची मैत्री कशी वाढत गेली, त्यापूर्वीचे तिचे लागेबांधे, त्यानंतरचे लागेबांधे, कसला म्हणजे कसलाच थांगपत्ता नव्हता मला.

आणि तिची ती श्रीमंती? पांच वर्षांपूर्वी ती मला प्रथम भेटली तेव्हां कुबेरकन्येसारखी वैभवसंपन्न होती. आणि आज पाहल्यें तों ती लंकेची पार्वती शोभत होती.

चार वर्षांत एवढा बदल! ह्या पांच वर्षांत कुठें होती ही? मी तर चार वर्षांत तिचें नांव देखील विसरून गेल्यें होत्यें. तिच्याशीं अधिक कांहीं बोलल्यें नाहीं. तिचें मन जरा शांत होईतों थांबणेंच मला इष्ट वाटलें.

आमचा अनोळखीपणा आणि त्या अनोळखीपणाच्या ओलाव्याच्या आधारानें अहिल्याच्या मनोवृत्तीवर दाटलेली शेवाळी हिरवळ रात्रीपावेतों हळूहळू वाळून गेली. तोंपावेतों आम्ही दोघी अनेक अवांतर गोष्टी बोललों. तिच्या आग्रहावरून भाड्याची मोटारगाडी करून त्या गाडींतून शहरांत ठिकठिकाणीं हिंडलों देखील.

सहल करतांना आम्हीं किती तरी प्रसंगप्राप्त मुद्दे विहंगम दृष्टीनें बोलून उलथेपालथे केले. त्या प्रत्येक वेळीं बहुधा तिचें वनमाळींचें पालुपद असे. मला वाटतें, दहा बारा वेळां तरी तेवढ्यांतल्या तेवढ्यांत तिनें वनमाळींचा नामनिर्देश केला असेल.

पण तो निर्देश असा हातचे राखून तिनें करावा कीं त्या दोघांचा इतका जिव्हाळ्याचा संबंध असेल हें माझ्या ध्यानींही येऊं नये.

● ●

आमची मोटार शाहुपुरींतून स्टेशनच्या बाजूनें चालली होती.

पन्हाळकरांच्या वखारीसमोर मोटार आली. तों समोर पन्हाळकरांची मोटार थांबलेली दिसली.

सहज माझ्या मनांत आलें, भानुमती मोटारींत असेल का ? म्हणून मीं अंमळ वांकून पाहिलें.

मीं पाहायला आणि भानुमतीनें हांक मारायला एक गांठ पडली.

" फार दिवसांनीं भेटलां. येतां वर ? " भानुमती मोटारीचें दार उघडून बाहेर आमच्या मोटारीपाशीं येऊन म्हणाली.

" आल्यें असत्यें, पण पाहुण्या आहेत बरोबर. " माझ्या तोंडून ओघासरसा शब्द निघून गेला. आणि मागाहून दुसऱ्याच क्षणाला चुटपुट लागली कीं मीं हें बोलायला नको होतें. अहिल्या बरोबर असतांना थांबायलाही नको होतें वास्तविक त्या बंगल्यासमोर.

पण आतां त्या विचाराचा काय उपयोग होता !

बाण सुटून गेला होता. तो माघारा थोडाच घेतां येतो !

" पाहुण्या असेनात कां ? आमचें घर म्हणजे कोणा पोलिस अधिकाऱ्याचें घर नव्हे, कीं कुणा सरकारजमा माणसाचें घर नव्हे. " भानुमती हंसत हंसत उद्गारली. ती आमच्या मोटारीचा दरवाजा उघडून म्हणाली, " चला. या कीं वर ! "

आतां नाहीं म्हणायची सोयच नव्हती. पण पोटांत मात्र भीतीचा गोळा उठला होता. ह्या दोघी समोरासमोर आल्या, आणि एकमेकींची ओळख त्या दोघींना पटली, तर काय परिणाम होईल ?

...कीं त्या दोघी अगोदरपासूनच एकमेकींना ओळखीत असतील ?...मी तसल्या शंकित मनानें दोघींच्याही चर्या न्याहाळून पाहिल्या. पण तसा कांहींही मागमूस मला आढळला नाहीं दोघींच्याही चर्यांवर.

पण मला नको होतें तें संकट कांहीं फार वेळ दूर ठेवतां आलें नाहीं.

"कोण पाहुण्या या ?" भानुमतीनें जिना चढून जातां जातां अहिल्येकडे वळून पाहत विचारलें.

"आहेत एकजण." मी टाळाटाळीच्या भाषेंत उत्तरल्यें. काय उत्तर द्यावें हेंच मला सुचेना.

"तरी पण ?"

"सांगेन मग."

"बरें." असें म्हणत भानुमतीनें एकवार सभोंवार चौफेर नजर टाकली.

वर दिवाणखान्यांत जाऊन बसेपावेतों ती कांहीं बोलली नाहीं.

"कोणी भूमिगत कार्यकर्त्या आहेत ?" माझ्या शेजारीं अहिल्येला बसायला खुर्ची पुढें सरकवून स्वतः माझ्यासमोर खुर्चीवर बसत ती म्हणाली, "तसें असलें तर नांव सांगूं नये."

"तसेंच आहे." मीं पडत्या फळाची आज्ञा घेऊन पिडाटाळ केली.

"बरें, कांहीं थांगपत्ता?"

"थांगपत्ता कांहीं नाहीं, पण एवढा तुम्ही विश्वास बाळगा भानुमतीबाई! कीं—"

तें माझ्या तोंडचें वाक्य पूर्ण होण्यापूर्वीच अहिल्या समोर थाडकन् शिंकली.

असल्या शकुनअपशकुनांवर माझा काहीं भरंवसा नाहीं. पण मला माहीत होतें, भानुमती बरीच शकुनभोळी होती.

तिची शिंकेची शकुनवंती मला माहीत होती. 'डावी तारी, उजवी मारी, समोर करी घात; पाटीं उभा जगन्नाथ."

आमच्या—विशेषतः या पाहुणीच्या मनाला लागेल म्हणून भानुमती बोलली नाहीं इतकेंच. पण तिची चिंतातुर चर्या तिचें मन बोलून दाखवीत होती.

टचकन डोळयांत पाणी आणून ती म्हणाली, "मला त्यांच्या सुरक्षितपणाबद्दल शंका येते शकुंतलाबाई!"

"कां? शंका कां येते तुम्हांला एवढी; कळूं दे मला!" मी तिला धीर देण्यासाटीं म्हणाल्यें.

अहिल्येकडे पाहिलें, तो तिचीही चर्या भानुमतीच्या उद्गारांसरशी एकदम गोरीमोरी झाली.

"तुम्हाला सांगत्यें. पण कुणाला सांगूं नका हं!" असें सांगत भानुमती आंत गेली.

मला पेंच पडला, आतां ही आणखी कोणत्या नव्या अरिष्टाची सावली पडूं लागली आहे!

भानुमती एक पत्र घेऊन बाहेर आली.

"या आपल्यांतल्याच आहेत." अहिल्येकडे पाहून उद्गारत तिनें तें पत्र माझ्या हातीं दिलें.

"सात दिवस झाले हें पत्र येऊन. आजचा आठवा दिवस." डोळ्यांत पाणी आणून तिनें सांगितलें.

पत्र कसलें? चिठी होती ती. पाहिली तों ती वनमाळींच्या नांवची होती. टावठिकाणा त्यावर नव्हता. शेवटीं पाहिलें तों सही होती, "फकिरा".

ती सही वाचतांच माझ्या छातींत धस् झालें.

फ्रँकेन्स्टाइनची भीषण मूर्ति फकिराच्या रूपानें माझ्या मनासमोर उभी राहिली. एवढ्या थोर मनाच्या माणसाचा एवढा भीषण अधःपात झाल्याचें एवढें ठळक उदाहरण दुसरें मला माहीत नव्हतें.

फकिरा नऊ ऑगस्टच्या चळवळींत माझ्याबरोबर, माझ्या खांद्याला खांदा भिडवून हनुमानाच्या धडाडीनें काम करणारा. आणि तोच आतां सातारा-कोल्हापूरच्या टापूंतील अट्टल दरोडेखोर म्हणून गाजत होता.

गेल्या दोन वर्षांत—विशेषतः असेंब्लीच्या निवडणुकींचे नगारे वाजूं लागल्यापासून सातारा जिल्ह्यांत आणि कोल्हापूरच्या टापूंतही अनेक कार्यकर्त्यांचे खून आणि खुनाला खून असे चार पांच अत्याचार झाले होते. कांहीं मोठे दरोडे पडले होते. लोक बोलत कीं फकिरा बंदसोडे हा साताऱ्यांतील पत्रीसरकारचा हस्तक कुप्रसिद्ध दरोडेखोर या सर्व अत्याचारांच्या मुळाशीं आहे.

अगदीं तुटक मोजक्या तोकड्या शब्दांत ती चिठी लिहिली होती:

**वनमाळी, अखेरची संधी देतों. एक लाख रुपये ही चिठी पोंचल्यापासून सात दिवसांच्या आंत आपल्या नेहमींच्या खुणेच्या जागीं आणून ठेव. जर चुकलास, तर माझ्या पत्रीसरकारच्या कायद्यानें तुला ठार करण्याची सजा सुनावण्यांत येत आहे. तूंच एकटा आमच्या पत्रीसरकारचा गुन्हेगार आहेस असें नाहीं. तुझ्या बायका देखील गुन्हेगार आहेत. कारण त्या तुला लपवतात. त्यांनाही बजावून ठेवतों कीं जर वरील मुदतींत**

**रकमेची भरपाई झाली नाहीं, तर त्यांच्यावर देखील पत्री-सरकारची धाड येईल. फकिरा**

• •

ती चिठी वाचून मीं भीतीनें एक उसासा सोडीत तिची पुन्हा घडी केली; आणि ती भानुमतीपुढें केली.

तों अहिल्या माझ्या हातांतून ती चिठी घेण्यासाटीं हात पुढें करीत म्हणाली, "पाहूं!"

माझ्या मनांतून तिला ती चिठी दाखवायची नव्हती. उगीच कशाला! पण आतां तिनें ती मागितलीच; मग नाहीं थोडेंच म्हणतां येतें!

तिनेंही चिठी वाचून एक दीर्घ उसासा सोडीत खुर्चीच्या पाठीवर मान टाकल्यासारखें केलें.

"असल्या राक्षसांचें आहे तुमचें पत्रीसरकार शकुंतलाबाई?" केविलवाणी चर्या करून मला विचारलें.

मला तशा स्थितींतही भानुमतीचा तो प्रश्न अपमानकारक वाटला.

"असल्या म्हणजे कसल्या राक्षसांचें?" मीं विचारलें.

"ह्या असल्या राक्षसांचें. खुनीदरोडेखोरांचें." ती म्हणाली.

मला फारच चीड आली.

"सोडून द्या तो विषय. आपण दुसरें कांहीं तरी बोलूं." मी बळेंच हंसत म्हणाल्यें, "पोशाखी जगाबरोबर वाहात चाललां आहां तुम्ही. सावकारी वळणावर. सोडून द्या तो विषय."

"सोडून द्या कसा? गळफांस गळ्याला येऊन भिडला तरी सोडून द्या? तें कांहीं नाहीं. मी पोलिसांत वर्दी देणार या गोष्टीची."

"पोलिसांचें भय मला घालतां का तुम्ही हें?" आतां मात्र मी खरोखरीच्या रागीट स्वरांत विचारलें. पोलिसांना दे माय धरणी ठाय करून थैथया रात्रंदिवस नाचवणाऱ्या क्रांतिकारकाची बायको ही, आणि हिनें आम्हांला पोलिसांचें भय घालावें!

भानुमतीनें तें नीट ऐकून न ऐकल्यासारखें केलें.

"आणि त्या चिटींत काय हो लिहिलें आहे तें? 'तुझ्या बायका' तो दरोडेखोर लिहितो, त्या बायका कोणत्या आणखी?" तिनें विचारलें.

तें ऐकून अहिल्येची चर्या एकदम पांढरी फटक पडली.

पण भानुमतीच्या प्रश्नाचा तो अर्थ नव्हता. मला तिची कोती वृत्ति माहीत होती. तिलाच तिच्या स्वतःच्या नवऱ्याविषयीं विश्वास नव्हता. कुणींही कांहींही सांगावें, व तिनें तें खरें मानावें.

"तुमचा पत्रीसरकारवर एकूण फार राग आहे भानुमतीबाई!" मीं म्हटलें.

माझ्या बोलण्याकडे दुर्लक्ष करीत ती पुन्हा म्हणाली, "ह्या पत्रीसरकारच्या लोकांच्या बायका कोण कोण आहेत आणखी तें तरी कळूं द्या!"

बोलतांना तिनें माझ्याकडे आणि अहिल्येकडे अशा कांहीं चमत्कारिक संशय-ग्रस्त नजरेनें पाहिलें कीं तसली नजर नजरेला भिडण्यापेक्षां कुणीं बुबुळांत सुई भोंसकली असती तरी मला तितक्या वेदना झाल्या नसत्या.

मीं पाहिलें, आतां या वेळीं तिथें बसण्यांत अर्थ नाहीं. शब्दावरून शब्द वाढून अधिक घर्षण होणार आणि ठिणग्या पडणार.

"बरें, भानुमतीबाई! येतों आम्ही." असा मींच आपण होऊन निरोप घेतला आणि निघाल्यें.

"माझ्यावर त्यांचा राग होता का?" मोटारींत चढतां चढतां अहिल्येनें विचारलें.

"नाहीं. तुमच्यावर असा तिचा राग नव्हता. त्यांचा राग साऱ्या चळवळीवरच आहे. यांचें जग वेगळें आहे आणि आपलें जग वेगळें आहे अहिल्याबाई!" मी म्हणाल्यें.

"तें कसें काय?" तिनें पुन्हा विचारलें.

तेवढ्यांत मोटार चालू झाली.

"आपण घरीं गेल्यावर फुरसतीनें बोलूं त्याविषयीं. अशा चवाठ्यावर बोलण्या-जोग्या गोष्टी नव्हेत त्या." मी म्हणाल्यें. ही मी तिची मुस्कटदाबी करत्यें आहे असें माझें मलाच वाटलें.

पण भानुमतीच्या विषारी वाग्बाणांनीं माझें मस्तक भणभणलें होतें. त्याला थोडी शांतता मिळावी म्हणून मी याहीपेक्षां जबर किंमत द्यायला तयार झाल्यें असतें.

माझ्या कठोर शब्दांचा अहिल्येच्या मनाला चांगलाच धक्का बसला असावा. आम्ही बिऱ्हाडीं जाऊन पोहोंचेपावेतों ती खट्टू मनानें मोटारींत गप्प बसली होती.

मोटारींतून आम्ही उतरतों न उतरतों, तों साखरगांवकरांचा शिपाई माझी वाट पाहत गच्चींतच उभा होता.

"काय रे सदाशिव ?" मीं त्याला हांक मारून विचारलें, "केव्हांसा आलास ?"

सदाशिवनें हातांतील कागद माझ्यापुढें करून म्हटलें, "आमंत्रण आहे तुम्हांला."

"कसलें आमंत्रण घेऊन आलास ?" असें विचारीत ती आमंत्रणचिठी हातीं घेतली.

मनांत तर्क केला कीं हें बहुधा निवडणुकींत यशस्वी झालेल्या काँग्रेस एम्. एल्. ए. च्या सत्काराचें आमंत्रण असावें.

माझा तर्क खरा ठरला.

कोल्हापूर प्रजा परिषदेचे मुंबई लेजिस्लेटिव्ह असेंब्लीच्या निवडणुकींत यशस्वी झालेले अध्यक्ष दे. भ. वनमाळी यांच्या सत्काराचें आमंत्रण होतें तें.

"किती वाजतां ?" असें विचारीत मीं त्या आमंत्रणपत्रिकेवर सही करीत सत्काराची वेळ पाहिली.

तों वेळ उद्यां सकाळची आटांची होती.

"इतक्या तांतडीनें सत्कार ?" मी म्हणाल्यें.

सदाशिव हुकुमाचा बंदा चाकर. तो गालांतल्या गालांत माफक हंसत दुसरीकडे आमंत्रण देण्यासाठीं निघाला.

मला पेंच पडला, आतां कसें करावें ? उद्यां सत्काराला एकटीनें जावें कीं बरोबर अहिल्येला घेऊन जावें ? तिला नांवनिशीवार आमंत्रणचिठी नव्हती खरी.

तसेंच त्या सुबक छापलेल्या पत्रिकेवर खालीं 'कृपा करून प्रवेशद्वारावर पत्रिका दाखवावी' अशी सूचनाही छापलेली होती.

● ●

मला तेव्हांच कल्पना आली कीं हा सत्कारसमारंभ कांहीं केवळ साधा मामुली नसणार. शेठ साखरगांवकर म्हणजे—कोणी त्यांना महादेव गोविंद रानडे म्हणत, तर कोणी म्हणत पुण्याच्या चित्रशाळेचे वासूकाका जोशी. महाराष्ट्रांतील त्या टापूंतील राजकारणाचें तें एक आजकालचें महत्त्वाचें मध्यवर्ती केंद्र होतें. सारे

रस्ते दिल्लीला जाऊन मिळतात म्हणतात तसे महाराष्ट्रांतील राजकारणाचे सारे रस्ते एके ठिकाणीं मिळण्याचें तें एक ठिकाण होतें.

आज देखील त्या ठिकाणीं बहुधा देशाच्या राजकारणाचा निदान महाराष्ट्रापुरता सखोल खल होणार अशी माझी खात्री होती.

अशा महत्त्वाच्या ठिकाणीं मीं अहिल्येसारख्या पाहुण्या मुलीला आमंत्रणाखेरीज कसें न्यावें? मला विचार पडला.

आम्ही वर पाहून बसतों तोंच अहिल्येनें माझ्या हातची आमंत्रणचिठी आपल्या हातीं घेत मला विचारलें, "कसलें आमंत्रण?"

"तुम्ही येणार का?" मीं तिला म्हटलें.

"नाहीं." तिनें अंगावर चढलेला पंगूळ झटकून टाकावा तसा एका झटक्यासरसा मानेनें आणि तोंडानें एकदम नकार दिला.

मला नवल वाटलें. वनमाळी भेटायची आयती सोन्याची संधि चालून आली असतांना ही पोरगी ती आततायीपणानें गमावते याचा अर्थ काय?

"कां? वनमाळींना तुला भेटायचें नाहीं?" मीं विचारलें.

"नाहीं भेटायचें. आतां अशा स्थितींत त्यांना मला नाहीं भेटायचें."

"अशा स्थितींत म्हणजे?" मीं पुन्हा विचारलें. मला तिच्या उत्तरानें बुचकळ्यांत पडल्यासारखें झालें.

"सुंदर हरणाचें मायावी रूप घेऊन कावेबाज दुष्ट राक्षस पुढें आला, त्याच्या रूपाला भाळून सीता फसली." ती ओठ चावीत उद्गारली. तिच्या रोमरोमांतून संताप उफाळत असल्याचा भास मला झाला.

"पण सीता सत्ययुगांतली कोंवळ्या मनाची स्त्री होती. आजच्या कलियुगांतील सीता त्या सीतेसारख्या दुबळ्या नाहींत, भित्र्या नाहींत. त्या हरणावर भाळतात, तशीच राक्षसाची शिकार देखील करतात." रसरसलेल्या निखाऱ्यासारखी संतापानें लाल होऊन अहिल्या बोलत होती. आवेशानें तिचे ओठ थरथरां कांपत होते.

वशिष्ठाच्या आश्रमांतून कामधेनूला विश्वामित्राचे गण बळेंच ओढून नेत असतां ती संतापली आणि संतापाच्या ज्वाळांतून भराभर सशस्त्र सैनिक पेरूं लागली, त्या पौराणिक गोष्टींतील कामधेनूसारखी ती मला तेव्हां वाटली.

"फार चिडलां आहां तुम्ही आज. जरा तुमचा राग शांत झाला कीं बोलूं आपण सावकाश." मी म्हणाल्यें.

" बोलायचें असेल तर हा विषय सोडून बोला. हा विषय पुन्हा इथें काढायचा नाहीं. नाहींतर मी अशीच्या अशी चालती होईन. मग माझें कांहींही होवो." घाव घातल्यासारखे शब्द तिच्या मुखांतून बाहेर पडले.

मीं ओळखलें कीं हें आपण समजतों तितकें कांहीं उथळ पाणी नाहीं. या पाण्याला पुष्कळ खोली आहे.

इतक्या खोल पाण्यांत तळाशीं आणखी काय काय असेल नकळे!—असा अहिल्येविषयींचा नवाच धाक मला त्या क्षणापासून वाटूं लागला. मीं तिला अधिक डिवचलें नाहीं. शांतपणानें एवढेंच म्हणाल्यें, " असें पाहा अहिल्यादेवी! एवींतेवीं राजकारणांत तुम्हीं उडी घेतलीच आहे—"

पण मला पुरतें बोलूं न देतां ती म्हणाली, " होय. उडी घेतली आहे. पण ती बुडण्यासाठींही नव्हे आणि इतरांना—ज्यांना पोहतां येत नाहीं त्यांना बुडवण्यासाठींही नव्हे. स्वतः तरायचें आणि इतरांना आपणांबरोबर तारायचें, म्हणून मीं उडी घेतली आहे राजकारणांत ताई!" ती क्षणभर थांबून पुन्हा म्हणाली, " मात्र पहिल्याच उडींत मी बुडत्यें कीं बुडतां बुडतां पोहायला शिकत्यें हेंच माझें मला अजून कळायचें आहे."

मनाला एकामागून एक धक्के देणारे अहिल्येचे ते बोल ऐकतांना एखाद्या अनोळखी, प्रकाशमय पण आरपार विस्तारलेल्या विशाल क्षेत्रांत ही मला घेऊन चालली आहे असें वाटलें.

" चला. आपणाला सैंपाक करायचा आहे ना?" असें म्हणत ती उठली. नेसलेलें लुगडें बदलायला आंतल्या खोलींत गेली.

" तुम्हांला करतां येतो सैंपाक?" मीं तिला कांहीं तरी विचारायचें म्हणून विचारलें.

आणि तिनेंही कांहीं तरी उत्तर द्यायचें म्हणून दिलें, " येतो तर! आज करून दाखवत्यें मी तुम्हांला."

पण तें तेवढेंच. तिनें सैंपाक केला नाहीं. माझा सैंपाक आटोपेपावेतों ती आंत आली देखील नाहीं. जी कपडे बदलण्यासाठीं म्हणून एकदां त्या खोलींत गेली ती दाराला कडी लावून आंतच बसली होती.

अर्धा तास झाला. पानें घेऊन झालीं. तरी अहिल्या बाहेर येईना. अखेर मींच जाऊन तिला हांक मारली. " अहिल्याबाई! झालें कीं नाहीं तुमचें लुगडें बदलून? कीं द्रौपदीवस्त्रहरणाची पूर्व खबरदारी चालविली आहे तुम्हीं ही?"

तिला जरा विरंगुळा व्हावा म्हणून मी तोंडाला आलें तें बोलून गेल्यें खरी. पण लगेच दुसऱ्या क्षणाला मला वाटलें, असें वाह्यातपणानें मी बोलायला नको होतें.

" खबरदारी घ्यायची वेळ आल्यावर खबरदारी घ्यायला नको का ? " असें विचारीत तिनें खोलीचा दरवाजा उघडला. पाहिलें तों तिच्या अंगावर पूर्वीचें तेंच लुगडें होतें. आणि खोलींतील बैठकीवर मात्र कांहीं कागदपत्रें अस्ताव्यस्त पडलीं होतीं.

" काय चाललें होतें ? पत्र लिहीत होतां ? " मीं तिला विचारलें. सुतानें स्वर्गाला जाण्याचा माणसाचा स्वभाव चांगला नाहीं खरा. पण माझा कांहींसा तसा स्वभाव होता. असे सुतानें स्वर्गाला जाऊन लावलेले शोध पुष्कळदां चुकीचे आणि धोक्याचेही ठरतात. अशा ठेंचा अनेकवार मलाही लागल्या होत्या. तरी देखील त्या खोलींतील तो पत्रांचा पसारा पाहून मला वाटलें, कीं ही वनमाळींना पत्र लिहीत असावी.

जखमेवरील खपली काढावी तसा प्रकार थोड्या वेळापूर्वी भानुमतीच्या घरीं झाला होता. तेव्हांच मीं अहिल्येच्या चर्येवरून अजमावलें होतें, कीं हा प्रसंग वादळाच्या पूर्वचिन्हांसारखा ठरणें अगदींच अशक्य नाहीं.

" नाहीं हो ! जुनीं फार दिवसांचीं पत्रें चाळून पाहात होत्यें. उगीच कशाला हवींत जवळ तीं ? दुसऱ्यांच्या मानेला बांधलेल्या दोऱ्या माझ्या हातीं कशाला ? जाळून टाकावीं झालें. " अंधारांत डोळे मिटून बेछूट नेम मारल्यासारखी अहिल्या बोलली. बोलता बोलतां चटकन तिनें चतुराईनें विषय बदलला आणि म्हटलें, " झाली जेवायची तयारी ? "

" झाली कीं ! चला ना ! " मी म्हणाल्यें. बोलतां बोलतां तिच्या मुद्रेकडे माझी नजर गेली. तेव्हां ती एखाद्या चक्रव्यूहासारखी खोल खोल विचारांत गुरफटलेली मला दिसली.

पण मीं तिला त्याविषयीं कांहीं विचारलें नाहीं. माणसाच्या मनांत कधीं कधीं अशीं कांहीं व्यक्तिगत विवंचनांचीं शल्यें रुतलेलीं असतात, कीं तीं दूर करण्याच्या सद्भावानें कोणीं त्यांना हात घातला तरी माणसाला तें नकोसें वाटतें. माझें स्वतःचें पुष्कळदां तसेंच होई.

मनांत म्हटलें, आपणावरून जग पारखावें. अहिल्येशीं मला अजून पुष्कळ बोलायचें होतें. स्वामींनीं तिला माझ्याकडे आणून सोडली खरी. वडील वहिणीच्या नात्यानें तिचा पाठीराखेपणा मीं पत्करला खरा. पण तिच्या असल्या गुंतागुंतीच्या

अंतर्जीवनाची ओळख तरी झाल्याखेरीज मी तिच्या बाबतींत काय करूं शकणार होत्यें ? सुप्त ज्वालामुखीसारखें तिचें ज़ीवन मला आतां भयंकर वाटूं लागलें होतें.

मग आम्ही दोघीजणी जेवायला बसलों.

तों पहिला घांस तोंडाशीं नेलेला तसाच खोळबून अहिल्येनें मला विचारलें, "खरेंच का हो वनमाळींचें लग्न झालें आहे ताई ? भानुमती ही लग्नाची बायको का त्यांची ?"

मला माझ्या शंकेची पुरी खूणगांठ पटली. भानुमतीची भेट झाल्या क्षणापासून हिचें मन वनमाळींविषयींच्या खोल विचारांनीं भारावलें आहे याविषयीं मला आतां शंका उरली नाहीं.

मात्र मला पेंच पडला, कीं हिला काय उत्तर द्यावें आतां ! पण या थरापावेतों गोष्टी आल्यावर मला खोटें बोलतां येणें शक्यच नव्हतें.

"होय. खरेंच तुम्हांला माहीत नाहीं? कीं तुम्ही माझी परीक्षा पहात आहां ?" मी म्हणाल्यें.

"मला माहीत नाहीं आणि माहीत आहे." अहिल्या हंसत हंसत उद्गारली. हें तिचें हंसें पेटल्या निखाऱ्यावरील राखाडीसारखें अंतरींच्या दाहाचें द्योतक होतें हें मात्र मला तेव्हांच ओळखतां आलें.

एक दोन मिनिटेंपावेतों ती अगदीं स्तब्ध होती. ती बोलली नाहीं म्हणून मीही कांहीं बोलल्यें नाहीं. मधून मधून एकेक घांस उचलून ती जगूं स्वतःला भरवीत होती. पण ती भरवीत होती. स्वतः जेवत होती असें कांहीं मला वाटलें नाहीं.

"हं! एकूण तुम्ही उद्यां आमच्या नव्या एम्. एल्. ए. मंडळींच्या सत्कार-समारंभाला जाणार म्हणायच्या तर? तुम्हांला अजून त्या मंडळींत बाजारभाव आहे म्हणायचा ?" अहिल्या मध्येंच एकदम उद्गारली.

तिच्या तोंडचा 'बाजारभाव' हा शब्द माझ्या कानाला कसासाच असंस्कृत लागला.

"आमच्या देशाच्या राजकारणाचा केंद्रबिंदु आतां शेतकरी-कामगार जनतेपासून ढळून काळ्या बाजारवाल्या भांडवलदारांच्या हवेल्यांत स्थिरावूं लागला आहे म्हणायचा !" असें उद्गारत तिनें एक उसासा सोडला.

ते शब्द माझ्या मनावर जोराचा आघात करून गेले. अहिल्या म्हणाली तें अगदींच खोटें नव्हतें. तिच्या टीकेचा सारा रोख शेठ माखरगांवकरांवर होता. त्यांच्याविषयीं असे प्रवाद अनेक होते. आणि ते अगदींच खोटे होते असेंही कुणाला

प्रामाणिकपणानें म्हणतां आलें नसतें. पण, तरी देखील इतक्या निष्ठुर, सडेतोड-पणानें कोणीं आमच्या काँग्रेसच्या आधारस्तंभावर अशी टीका केलेली मला आवडत नसे.

मीं अहिल्येला म्हटलें, " तुम्ही अगदीं अतिरेकी स्वभावाच्या आहां, अहिल्या-बाई ! जेवायचें तर तुपाशीं नाहीं तर उपाशीं असा एकांगी हेकेखोर स्वभाव दिसतो तुमचा. गांधीवादी माणसाला असला हेकेखोरपणा शोभत नाहीं. तडजोड हा गांधीवादाचा आत्मा आहे ना ? त्या आत्म्याला टार करायला निघालां आहां तुम्ही ! "

" पण गाईला आत्मा नसतो म्हणतात. " ती म्हणाली.

मीं तिला विचारलें, " गांधीवाद तुम्हांला गाईसारखा वाटतो का ? "

" तुम्हीं लोकांनीं गांधींना गरीब गाय बनविलें आहे. आज सकाळच्या सभेंत त्या गाईच्या मानेवर सुरी ठेवायला निघालेले कसाई तुम्हीं नाहीं पाहिलेत ? "

" तुम्ही त्या सभेला आलां होतां ? "

" नाहीं. मी नव्हतें आल्यें. पण लोकांना बोलतांना ऐकलें मीं. आतांच गांधीवादी भारती स्वामी गांधींच्या नांवावर विकणाऱ्या तुम्हां काँग्रेसवाल्यांना अडगळसे वाटूं लागले काय ? आपण आतां निवडणुकींत विजयी झाल्यापासून कुणीकडे बरें झुकूं लागलों आहोंत ताई ? देशाच्या स्वातंत्र्यासाटीं लढे देण्याचा काळ आतां संपत आला; आतां आपण राज्यकर्ते होणार आहोंत, अशी डोळ्यांवर धुंदी चढल्यासारखे या लोकांचे डोळे तारवटलेले दिसतात मला. राजकारणाचा खल करायला यांना शेटसावकारांच्या आणि भांडवलदारांच्या हवेल्याच सोयीच्या वाटायच्या !... "

# ४ : मुखवटे

● ● ●

मी अधिकच बुचकळ्यांत पडल्यें; कोण माझ्याशीं बोलते आहे ही? सत्ता काबीज करण्याच्या मार्गावर असलेल्या आमच्या कॉंग्रेसच्या गंगाजमनी दुटप्पी धोरणाची प्रतिक्रिया बोलते आहे? कीं भारताच्या राशीला येऊं पहाणारा कम्युनिझम बोलतो आहे? गांधीवादाचें निष्ठेनें पालन करतां करतां अहिल्या कम्युनिस्ट झाली कीं काय?

"काय—याचा अर्थ तरी काय हो बाई! लाखों लोकांनीं आपलें रक्त आणि अश्रू यांचे पाट वाहून मिळविलेलें यश कसें पदरीं पाडून घ्यावें, याच्या योजना ठरवतांना आम्ही आमच्या जामदारखान्याच्या किल्ल्या चोरांच्या हातीं देत आहों, याचा अर्थ काय?" अहिल्येनें पुन्हा प्रश्न केला.

"कोण चोर? आणि कोणत्या चोरांच्या हातीं जामदारखान्याच्या किल्ल्या जात आहेत आपल्या?" मीं विचारलें.

"तें सांगायला पाहिजे मीं? हातचीं कांकणें पाहायला आरसा पाहिजे बाई? देशाच्या स्वातंत्र्यासाठीं रक्त कुणीं सांडलें? आणि पुण्याहवाचनांत आयते पाटावर बसायला निवडून कोण आले आमच्या कायदेमंडळांत? तुम्हांआम्हांला पिळणारे जमीनदार, शेटसावकार, कारखानदार आणि त्यांचे बगलबच्चेच निवडून आले कीं नाहीं? आणि ते देखील तुम्हीं निवडून आणले."

मला अहिल्येच्या भाषणाचा रोख कळला. ती बोलत होती तें पुष्कळसें कटुसत्य बोलत होती. आम्ही रोज पाहतच होतों. जयवंतरावासारखे अनेक जयवंतराव आज देशाच्या कारभाराची धुरा वाहायला देशांत ठिकठिकाणीं प्रांतांप्रांतांतून निवडून आले होते. आम्हीं त्यांना निवडून आणलें होतें. अगदीं खरें.

ही कॉंग्रेसची पुण्यायी, आणि जगदाळे जहागीरदार, शेठ साखरगांवकर, यांचे दक्षिण साताऱ्याभर खोल पसरलेले जमीनदारी-सावकारीचे धागेदोरे. कितीतरी शेतवाडीवाले शेतकरी नशिबानें त्या धाग्यादोऱ्यांत गुरफटलेले होते. कोणी ऋणको म्हणून तर कोणी कुळ म्हणून, पण गुरफटलेले होते. निवडणुकीच्या वेळीं खेडूत मतदारांच्या मताची रीघ कॉंग्रेसकडे लागली, याला कॉंग्रेसच्या पुण्यायीपेक्षांही ह्या जमीनदार-

कारखानदार धन्यांना कॉंग्रेसविषयीं वाटणारी सहानुभूति कारण होती हें कांहीं खोटें नाहीं. त्यांनीं जरा जोरांत खेडुत शेतकऱ्यांना सांगितलें, त्यांनीं ऐकलें.

पण मला तेव्हां वाटे, त्यांत काय बिघडलें? देशांतला धनिक वर्ग जर आपसुखानें असा कॉंग्रेसच्या मागें आला, राष्ट्रीय बाण्यानें वागूं लागला, तर काय हरकत आहे? आपली सारी वैभवसंपदा ही आपल्या कष्टाळू शेतकरी-कामकरी जनतेच्या निढळाच्या घामांतून निर्माण झाली आहे व तिचा जनतेच्या हितासाटींच आपण विश्वस्त म्हणून विनियोग केला पाहिजे हा गांधीजींचा मंत्रोपदेश जर त्यांना पटला असला, तर त्यांच्या मदतीवर निवडणुकींत कॉंग्रेसचे उमेदवार निवडून आले म्हणून काय बिघडलें? किंवा त्यांचे सगेसोयरे निवडून आले म्हणून तरी काय बिघडलें?

मी तर म्हणत्यें, ती आमच्या गांधीवादाची मंगल विजयपताकाच भारतांतील मानवजातीच्या मस्तकावर फडकूं लागली होती. आतां त्यांत डावेंउजवें असायचेंच. एवढ्या विराट देशाच्या दास्यविमोचनाच्या आंदोलनांत असा हातीं सदानकदा धर्मकांटा घेऊन आपला पल्ला कसा येणार? आणि एका हाताचीं पांचही बोटें सारखींच असावीं असला खुळा दुराग्रह तरी आम्हीं कां धरावा?

इतकेंही करून अहिल्या केवळ अतिरेकी स्वभावानें बोलत होती असें कांहीं तेव्हां मला वाटलें नाहीं. परंतु हिच्या खोल विचारांची धांव कुठवर आहे तें पाहावें तरी, म्हणून मीं तिला तिच्याच सडेतोड सुराला सूर भिडवून उत्तर दिलें, "त्यांना तुम्हीं निवडून आणलें. तुम्हीं जनतेनें त्यांना मतें दिलीं आणि निवडून आणलें."

"होय. आम्हीं निवडून आणलें. खरें आहे तुम्ही बोलतां बाई! त्यांना आम्हीं निवडून आणलें. आमची मान कापायला तरवार आम्हीं आणून तुमच्या हातीं दिली."

असली हिंसावृत्तीनें डागळलेली उग्र भाषा माझ्या कानांना कशीशीच लागे. मी अहिल्येला म्हणाल्यें, "असले रक्तांत भिजलेले, हिंसेनें रंगलेले कठोर शब्द बोलूं नये आपण."

"तेंच आतां शिकायचें आहे. तरवार टाकून लोकांचा केंसानें गळा कसा कापावा हेंच आतां शिकायचें आहे तुमच्यापासून आम्हांला." असें उद्गारत तिनें तिटकारा आल्यासारखी बाजूला मान वळवली.

मी तिच्या वाणींतून इतस्ततः पडणाऱ्या शब्दांच्या ठिणग्यांवर ठिणग्या पाहून अधिकाधिक चिंतेंत पडल्यें, ह्या मुलीच्या मनांत आहे तरी काय आणि हिच्याशीं वागायचें तरी कसें?

“ मी एक विचारूं तुम्हांला ? ” मी तिला म्हणाल्यें.

“ काय ? ” तिनें वर मान करून किंचित् भुंवया झुकवून माझ्याकडे पाहत विचारलें.

“ हें पाहा, मला तुमची फारशी माहिती नाहीं हो अहिल्याबाई ! तुम्ही दुःखी आहां एवढें कळतें मला. पण—राग नाहीं ना येणार तुम्हांला विचारलें तर ? ”

“ राग तुमचा कां म्हणून येईल मला बाई ! ” ती जरा शांत होऊन म्हणाली.

“ तर मग तुमच्या साऱ्या आयुष्याची नीट ओळख करून घ्यायची आहे मला. बोलाल तुम्ही माझ्याशीं अगदीं मोकळ्या मनानें ? ” मी म्हणाल्यें.

ती कांहींच बोलेना.

“ थांबा. आपण जरा आंतल्या बाजूला शांतपणें जाऊन बसूं. म्हणजे मध्येंच कोणी यायला नको. ” असें म्हणत मीं दार लावून घेतलें. आणि दोघीजणी आंतल्या खोलींत गेलों.

“ हं ! सांगा आतां मला. अगदीं मनमोकळेपणानें सांगा. ” मी म्हणाल्यें, “ आज सकाळपासून पाहत्यें आहें, तुम्ही तुसड्यासारख्या—भडकलेल्या आगीच्या ज्वालेसारख्या दिसतां मला. असें कां ? तुमची वडील बहीण आहें मी असें समजा. आणि सांगा मला. ”

“ काय सांगूं तुम्हांला ताई !... ”

एकदम तिला अंतरींचा दुःखावेग असह्य होऊन भडभडून आलें. माझ्या कुशींत लेकरासारिखें डोकें खुपसून ती ओक्साबोक्शी रडूं लागली.

● ●

चांगल्या अर्धा पाऊण तास आम्ही बोलत होतों.

इतर सारें मला खरें वाटलें. पण जगदाळे जहागिरदारांची तिच्यावर पापी नजर असावी, आणि ती वश होईना म्हणून तिला सरकारांत चुगली करून पकडून द्यायचा दुष्ट डाव त्यांनीं खेळूं पाहावा, यावर विश्वास ठेवतांना मला फारच त्रास पडला.

नखशिखान्त खादी धारण करणारा, चरख्यावर कधीं कधीं सूतही काढणारा, कॉंग्रेसचा मोटा कैवारी, सढळ हातानें देणग्या देणारा, आणि बेचाळीसच्या चळ-

वळींत आमच्या लोकांना निर्भय थारा देणारा हा वरून विशुद्ध मनाचा दिसणारा गोरापान माणूस अंतःकरणानें इतका काळा असेल, यावर मीं विश्वास तरी कसा ठेवावा ?

आणि—तिनें जरी तसें स्पष्ट सांगितलें नाहीं, तरी तिच्या आईला जीव द्यायला कारण तो रामदास महाराजच असला पाहिजे हेंही मला अंदाजानें ओळखतां आलें. महाराजाच्या शाक्त पंथाला शोभणाऱ्या अघोर लीलांविषयीं लोकाना पुष्कळ बोलतांना मीं ऐकलें होतें. भाऊ एकीकडे, आई दुसरीकडे, मुलगी तिसरीकडे, असा त्याच्या संसाराचा उजाड मांडव करून सोडणारा, अशा अनेकांच्या संसाराचें वाटोळें करणारा हा महाराज रामदासांचा आव आणून स्वधर्मस्थापनेचें आणि प्रसाराचें अवडंबर माजवीत होता. मल्लाप्पा, शंकर, अशा तेजस्वी हुषार मुलांचा मेंदू बिघडवून त्यांना निकामी बनवून सोडीत होता.

"एकूण स्वामी तुम्हांला देवच भेटले म्हणायचे ?" मी अहिल्येला म्हणाल्यें.

"तर! स्वामी माझ्या मावशीचा आणि माझ्या धाकट्या भावाचा शोध लागला तर पाहणार आहेत. लागेल का हो शोध? मला भेटतील का तीं ?"

"भेटतील कीं!" मीं तिला धीर दिला. तेव्हां उगीचच मनांत कल्पना येऊन गेली.—पण म्हटलें, गांवीं गेल्यावर नीट चौकशी केल्याखेरीज बोलूं नये. उगीच बिचारीला आशा लावून ठेवूं नये."

शेवटीं मीं अहिल्येची माझ्या परीनें समजूत घालण्याचा प्रयत्न केला, "बरें पण एक एक सांगूं तुम्हांला मी ? ह्या झाल्या गेल्या गोष्टी आपण साऱ्या विसरून जायच्या. गेलें तें उदक म्हणायचें आणि राहिली ती गंगा म्हणायची. तुम्हीं होरपळून निघालां, तुमचें सारें कुटुंब होरपळून निघालें—"

"निघालें नाहीं; होरपळून जळून खाक झालें." मला बोलतां बोलतां अडवून अहिल्या म्हणाली, "बरें; जळून खाक झालें. पण अहिल्याबाई ! तुमच्या साऱ्या कुटुंबाचा बळी पडला तो देशाकारणें पडला ना ? विचार करा तुम्ही; अशीं हजारों लाखों कुटुंबें आजवर देशासाठीं बळी पडलीं नाहींत का ? आपण असें समजायचें कीं आपल्या स्वतंत्र होऊं घातलेल्या भारतमातेच्या मंदिराची पायाभरणी करणाऱ्या दगडांचा मान आपणाला मिळाला. एवढी एकच गोष्ट इतिहासांत राहूं दे. बाकीचीं तुमच्या-माझ्यासारख्या असंख्य व्यक्तींच्या खडतर जीवनयातनांनीं भरलेलीं इतिहासाचीं पानें फाडून टाकूं आपण."

" अशानें साराच खरा इतिहास फाडून टाकावा लागेल आपणाला. आणि इंग्रजांनीं आपल्या भारतांतील राजवटीचा इतिहास रचला आहे तसा खरोखर न घडलेला इतिहास कल्पनेनें घडवून आपणाला लिहावा लागेल." ती म्हणाली.

मला त्यावर कांहींच बोलायला सुचेना. शक्य तेवढ्या संयमानें, टाळतां न येणाऱ्या संकोचानें ती माझ्याशीं इतका वेळ अगदीं मोघम—अगदीं त्रोटक बोलली होती खरी. पण तेवढ्या निवेदनानेंच मला लाजवलें होतें. निरुत्तर केलें होतें.

आणि शिवाय मीही आतां बोलण्याच्या मनःस्थितींत नव्हत्यें. सावरगांवचा काल सकाळचा तो अविनाश, त्याची मावशी, वनमाळी, मल्लाप्पा, फकिरा, ते जहागिरदार, अहिल्येची वनवासी आई, वैतागून सर्व धनदौलतीवर पाणी सोडून तिच्या जन्मापूर्वीच परागंदा झालेले चंद्रशेखर—तिचे वडील, खुळ्या भोळ्या लोकांना माणसासारखा दिसणारा तो महाराज,—अहिल्येच्या जीवनाचा तिच्याच शब्दांत माझ्यापुढें मांडला गेलेला हा प्रसंगपट आणि त्या पटांत गोंवलीं गेलेलीं हीं मोहरीं,—कलंकी अवतारासारखें विचित्र, भीषण, विस्मयकारक कांहींतरी माझ्या मनाच्या डोळ्यांपुढें तरळूं लागलें होतें.

मला तें पाहायला तर नको होतें. पण पाहणें तर टळत नव्हतें. जनांतील सृष्टि आपण वेळीं दृष्टीआड करूं शकूं. पण मनांतील सृष्टि अशी दृष्टीआड थोडीच करतां येते!

बराच वेळ गप्प होती अहिल्या; मीही गप्प होत्यें. अशा आम्ही आणखी किती वेळ गप्प बसलों असतों नकळे.

तेवढ्यांत मल्लाप्पानें येऊन खिडकींतून वांकून पाहत सांगितलें, " आज शिवाजी चौकांत पोवाडेगायन आहे. लाल कलापथकाचा 'आम्ही असें राज्य करणार!' हा तमाशाही आहे. तुम्ही येणार का त्या कार्यक्रमाला?"

सकाळचा त्या दोघांच्या ओझरत्या भेटीचा प्रसंग आठवून मात्र वाटलें, कीं अहिल्या याला आतां ताडकन कांहींतरी बोलणार. पण तसें ती कांहींच बोलली नाहीं. उलट ती प्रफुल्ल चर्या करून म्हणाली, " पोवाडेगायन आहे? आणि तमाशा आहे लाल कलापथकाचा? तर मग आपणाला जरूर जायला हवें."

" ताई! तुम्ही येणार का?" मल्लाप्पानें मला विचारलें.

मला जायचें नव्हतें. कारण संध्याकाळींच मला जयवंताचा पुन्हा निरोप आला होता, कीं काल ठरल्याप्रमाणें रात्रीं नऊ वाजतां आमच्याकडे गप्पा मारायला या.

तिकडे मला जायचें होतें. अहिल्या एकटीच घरांत राहायची, त्यापेक्षां ती पोवाड्यांना गेली तर बरें असें मलाही वाटलें. मीं तिला म्हटलें, "तूं जा. मी नाहीं येत. मला एका ठिकाणीं जायचें आहे."

तिनेंही मला आपणाबरोबर येण्याचा जास्त आग्रह केला नाहीं. ती आंचवायला उठतां उठतां मल्लाप्पाला म्हणाली, "चला. मी येत्यें."

मला तें ऐकून मात्र कमालीचें आश्चर्य वाटलें. सकाळीं या दोघांचा स्वभाव छत्तिसाच्या आंकड्यासारखा वळणें घेतांना मला दिसला. तो आतां एकदम त्रेसष्टा-सारखीं वळणें घेऊं लागला याचा अर्थ काय? अहिल्या त्या सापाला भारून खेळवणारी मांत्रिक आहे का? कीं गारुडी आहे?

तेव्हां माझ्या मनांत आलें देखील, कीं तिला जातां जातां बाजूला घेऊन सावध करावें, "अहिल्या! साप म्हणालीस ना तूं त्याला सकाळीं? त्या सापाशीं खेळशील, आणि मग साप डसला कीं मग तडफडून विव्हळूं लागशील."

मीं विचारलें असतें तर कदाचित् तिनें तें कबूलही केलें नसतें. पण वनमाळीच्या बाबतींत साप डसल्यासारखीच तिची अवस्था झाली नव्हती का? त्यानें जर तिला आपलें पूर्वी लग्न झालेलें न सांगतां कांहीं तरी वचनें देऊन फसवलें असलें, तर—

साप सुद्धां नाहीं म्हणतां येणार अशा धोकेबाज माणसांना. साप देखील उगीच कोणी त्याच्या वाटेला गेल्याखेरीज मनांत दावा धरीत नाहीं. धक्का लागल्याखेरीज कुणाला चावत नाहीं. नकळत कां असेना; पण धक्का लागल्याखेरीज कुणाला कधीं साप डसला आहे?

पण आम्ही माणसें...?

अहिल्या वनमाळीच्या वाटेला गेलेली मला तरी माहीत नाहीं. तरी देखील जर तिला त्यानें दगा दिला असला, तर तो सापाहून साप नव्हे का?

● ●

कपडे बदलून अहिल्या मल्लाप्पाबरोबर पोवाडे ऐकायला जाण्यापूर्वी सर्व कांहीं करीत होती. तिनें लुगडें पालटलें. केंस विंचरले. नव्या हातरुमालावर सुवासिक सेंटचे चार थेंब टाकायलाही ती विसरली नाहीं. सायंकाळीं फिरायला जातेवेळीं देखील हा षोक तिला आवडला नव्हता.

पण ह्या तिच्या साऱ्या हालचाली मला साध्या व स्वाभाविक दिसल्या नाहींत.

" ही असें कां करते ? " मी मनांत म्हणत होत्यें.

तोंच मल्लाप्पा कपडे करून आला.

" चला. " तो अहिल्येला म्हणाला. माझ्याकडे पाहून त्यानें विचारलें, " तुम्हांला बहुतेक ह्या कम्युनिस्टांच्या कलापथकाचें वावडें असेल, नाहीं ताई ? "

त्याचा प्रश्न ऐकून अहिल्या कावरीबावरी होऊन माझ्याकडे पाहूं लागली.

मी गांधीवादी होत्यें. आणि पुष्कळसे कार्यकर्ते मला गांधीवादी म्हणूनच ओळखीत. सातारा–कोल्हापूर–सांगलींत संचार करणाऱ्या 'पत्री' सरकारांतील कांहीं लोकांशीं माझे अगदीं जिव्हाळ्याचे संबंध होते खरे. पण ते कांहीं काळ. चळवळीच्या ऐन भरापुरते. भारतांतून इंग्रजांची सत्ता समूळ नष्ट व्हायला आम्हांला हवी होती. त्यासाठीं चळवळीचें रान पेटवून द्यायचें, अराजक झालें तरी देखील निर्माण करायचें, म्हणून जागृति करतां करता प्रतिसरकारची उभारणी जनतेच्या अगदीं खालच्या थरातून होतांना मला आढळली; आणि मींही त्या उभारणीला वाहून घेतलें.

पण माझा आत्मा त्या प्रतिसरकारात नव्हता. आत्मा कॉंग्रेसच्या झेंड्याखालीं भारतांत गांधीजींच्या शिकवणुकीनुसार रामराज्य स्थापन करण्यांत होता.

कम्युनिस्टांची अत्याचारप्रवण चळवळ आणि चळवळीच्या ऐन वेळेची सरकार-धार्जिणी वृत्ति मला मान्य नाहीं हें ज्या अनेकांना माहीत होतें, त्यांपैकीं मल्लाप्पा हा एक होता.

आणि 'पत्री' सरकारच्या चळवळीशीं माझे लागेबांधे असलेले ज्यांना वरवर ऐकून माहीत होते, त्यापैकीं अहिल्या ही एक होती.

मी कांहीं बोलत नाहीं असें पाहून मल्लाप्पा पुढें म्हणाला, " हें पाहा ताई ! कम्युनिस्ट नुसते वाईट म्हणून त्यांच्याकडे पाठ करून बसायचा काळ आतां गेला. कम्युनिस्ट हें आपल्या देशावरचें–मी म्हणतों, देशावरचेंच कां ? साऱ्या जगावरचें मोठें संकट आहे. याला वेळींच आपण आळा घातला नाहीं, तर इतकीं वर्षें अविश्रांत कष्ट करून कॉंग्रेसनें मिळविलेलें सारें विशुद्ध यश व्यर्थ होईल. म्हणून म्हणतों, कम्युनिस्ट काय करतात, देशांत कॉंग्रेसच्या महान कार्याला कुठें अशीं भगदाडें पाडतात, यासाठीं आम्हीं डोळ्यांत तेल घालून जपलें पाहिजे. "

" म्हणजे काय रे ? " मीं त्याला म्हटलें, " तुम्हां लोकांना गांधीवाद मान्य नाहीं; समाजवादही मान्य नाहीं—"

" गांधीवाद मान्य आहे. गांधीवाद मान्य नाहीं का ?..."

" एक अक्षर देखील बोलूं नकोस पुढें. काल सकाळीं स्वामींच्या भाषणावर काय बोलत होतां तुम्ही तावातावानें सभेंतून परत येतांना ? "

मीं सडेतोड विचारलें. मला राहवलें नाहीं.

" स्वामींना देखील आमचा तसा विरोध नाहीं. पण त्यांनीं तरी एकदम काँग्रेसच्या चळवळीचे असे मखमाली वाभाडे काढायला नको होते. "

" वाभाडे काढले स्वामींनीं ? काय वाभाडे काढले त्यांनीं ? जें गांधीजी बोलतात, तेंच स्वामी बोलले ना ? कीं गांधीजींच्या शिकवणुकीला सोडून कांहीं बोलले, मला सांग ? धोक्याच्या जागा काँग्रेसच्या मार्गांत कोणकोणत्या आहेत तें बोलायचें देखील नाहीं कुणीं ? ज्या जनतेसाटीं काँग्रेस आजवर झगडली, त्या जनतेपासून तिला आम्ही लोक दूर दूर ओढून नेत आहों, असें स्वामींना वाटलें. म्हणून ते बोलले. काँग्रेसच्या हिताचेंच बोलले. "

" पण कांहीं म्हणा तुम्ही ताई ! स्वामीजींचें कालचें भाषण कुणाला म्हणजे कुणालाच आवडलें नाहीं. त्याचा मुसल्मानधार्जिणेपणा ऐकून घ्यायला हिंदुमहासभा, संघ, कोणी–कोणी राजी नाहींत आतां.—"

" आणि राजी केव्हां होते ? "

" काँग्रेसच्या पुष्कळ लोकांना देखील तें आवडलें नाहीं ना ! तुम्हीं पाहिलें का ? जयवंतरावांना जशा टाळ्या पडल्या, तशा काल स्वामींना एकदां तरी पडल्या ? "

" याचा अर्थ हाच ना; कीं स्वामी आतां कुणाला नकोत. काँग्रेसला नकोत, हिंदुमहासभेला नकोत, संघाला नकोत, कम्युनिस्टांना नकोत,......"

माझें वाक्य तसेंच अर्धवट उचलून मल्लाप्पानें पुरें केलें, " अस्पृश्यांना नकोत, शीखांना नकोत, आणि मुसलमानांना अगदीं मूळपासून ते नकोच आहेत. स्वामी म्हणजे गांधीजी म्हणतों मी. कारण स्वामीजी तरी गांधीजींचेंच मन बोलून दाखवतात ना ! "

तोंच अहिल्या नीटनेटका पेहराव करून तयारीनें बाहेर आली.

" झालें तुमचें ? " मल्लाप्पानें तिला विचारलें.

" झालें. " ती उत्तरली.

" चला तर. " असें सांगून मल्लाप्पा जिना उतरूं लागला. मीं ओळखलें, तो तिची तयारी होईपावेतों कसातरी वेळ काढीत होता.

दारापावेतों गेलेली अहिल्या पुन्हा मागें आली. जाळण्यासाठीं खोलींत बाजूला काढलेल्या पत्रांच्या ढिगांतून एक पुडकें तिनें हुडकून बाहेर काढलें, आणि तें माझ्यापुढें टाकीत म्हटलें, " ताई! वडील बहीण ना तुम्ही माझी? या देशभक्ताची गाठ तुम्हीं मला घालून दिली. त्या देशभक्तीच्या खाचखळग्यांत मी कशी पडल्यें, कशी ठेंचाळल्यें, कशी फसल्यें, त्या माझ्या चुका मीं तुमच्यापासून कां म्हणून लपवाव्या? स्वामींनीं तुम्हांला माझ्याविषयीं कांहीं सांगितलें असेल."

"नाहीं. कांहीं सांगितलें नाहीं स्वामींनीं." मीं एकदम कानांवर हात ठेवले.

"तर मग वाचून पाहाच तीं पत्रें. आणि–तेवढेंच तरी कशाला चोरून ठेवूं मी?" असें म्हणत ती आपल्या कातडी बॅगेपाशीं गेली. बॅगेंतून तिनें एक घडी केलेला कागद काढला, आणि तो माझ्यापुढें टाकून बाहेर निघून गेली.

मीं तो कागद एवढा महत्त्वाचा आहे तरी कसला, म्हणून मुद्दाम प्रथम उघडला.

तों तें फकिराचें पत्र! जसें भानुमतीकडे वनमाळींना आलेलें, अगदीं थेट त्याच मजकुराचें पत्र होतें तें.

मीं तें नजरेखालीं घातलें, आणि बाजूला ठेवलें. त्या पत्राचा काय उपयोग होता? वनमाळींचा पत्ता कुठें होता? त्या दोघींच्या मानेवर मात्र ती उगीचच्या उगीच टांगती तरवार लटकत होती.

एकदां मनाला वाटलें, वाचूंच नये तीं पत्रें. वाचावीं कीं न वाचावीं असें म्हणत मीं त्यांतलीं एक दोन पत्रें ओझरतीं न्याहाळलीं. आणि शितावरून भाताची पारख मला करतां आली.

वनमाळींचीं अहिल्येला आलेलीं प्रेमपत्रें होतीं तीं. तशींच आणखीही अनेकांचीं होतीं. त्यांत मल्लाप्पाचींही पत्रें होतीं.

प्रेमपत्रें अजाणपणींच्या तरुण वयांत मीं देखील लिहिलीं होतीं. प्रेम हा माणसाला माणुसकीपासून दूर ओढून नेणारा एक उन्माद आहे असें माझ्या अनुभवानें मला शिकवलें आहे. प्रेमावर माझा विश्वास नाहीं. मुळींच विश्वास नाहीं. स्त्री-पुरुषांच्या नात्यांत गुरफटलेल्या प्रेमावर म्हणत्यें मी.

मला खरोखर कुणाचीं प्रेमपत्रें वाचायला नको असतात. कुणाला लिहायलाही नको असतात. कुणाचीं यायलाही नको असतात. कुणी म्हणेल कीं तिशीच्या उमरीला आलेली बाई ही! हिच्या आयुष्यांत आतां प्रेमाच्या शिळ्या कढीला ऊत कसा येणार?

तें जाऊं द्या.

मीं तीं पत्रें एरव्हीं देखील वाचलीं नसतीं. पण अहिल्येनें जातां जातां मखमाली शब्दांत कां होईना परंतु स्वतःच्या आयुष्यांतील अपयशाचें खापर माझ्या माथ्यावर फोडलें, तें कां हें पाहण्यासाठीं म्हटलें, काय आहे पाहावें तरी !

● ●

" देशभक्ति, स्वदेशाभिमान हा एखादा उन्मादक रोग आहे का ? " या अर्थाचें विशाल प्रश्नचिन्ह, मीं तीं पत्रें वाचून खालीं ठेवलीं आणि माझ्यापुढें उभें राहिलें. मीं सारीं पत्रें वाचलीं नाहींत. वनमाळींचीं अहिल्येला आलेलीं तेवढीं वाचलीं.

एका बाजूला माझ्यापुढें वनमाळींची ज्वलज्जहाल देशभक्ति, त्या देशभक्तीपायीं त्यांनीं केलेलीं अचाट साहसें, आज सतत भोगलेला अज्ञातवास, यांची मालिका उभी होती. माणसाला शंभरनंबरी देशभक्त ठरायला आणखी काय लागतें ?

पण दुसऱ्या बाजूला अहिल्येच्या निवेदनांत प्रकाशांत आलेलें त्यांचें काळेंकुट्ट चारित्र्य उभें होतें. अज्ञातवासांत अथवा अशाच कांहीं अकल्पित कारणानें दोघांची भेट घडली, वासना उफाळून आल्या, प्रीति जडली, जीवनाशीं जीवनाची सांगड जुळली, तर त्याला कांहीं तरी सहानुभूतिपर अर्थ तरी आहे. पण प्रेमाच्या फंदांत पडून माणूस माणसाला फसवील ? मग तें कसलें प्रेम आणि तीं कसलीं माणसें ?

आपलें लग्न झालेलें नाहीं असें त्या भाबड्या मुलीला भासवून तिचें मन आकर्षण करणें, आणि देशसेवेपुढें जन्म, जीवन, धर्म, नीति सारें सारें अगदीं तुच्छ आहे असें तिच्या मनावर मायावी भाषेंत बिंबवून तिला आपल्या जीवनाच्या कोळ्याच्या जाळ्यांत गुरफटवून घेणें, ही काय देशसेवा करायची रीत ?

खरोखर, जिवावर उदार होऊन माणसानें देशाच्या स्वातंत्र्यासाठीं झटणें हा एक रोगच आहे. मोटमोठे देशभक्त म्हणून गाजलेले जे लोक ह्या रोगानेंच पछाडलेले असतात, त्यांच्याच जीवनाची दुसरी बाजू अशी काळीकुट्ट असते.

अहिल्येचें चारित्र्य, तिची संपत्ति साऱ्या-साऱ्याचा होम झालेला दिसत होता मला वनमाळींच्या जीवनाच्या वेदीवर.

अशा देशभक्तांना क्षमा करणारे खुशाल करोत. मी कधींच क्षमा करायची नाहीं.

आणि या चाळीस कोटी लोकांचें भवितव्य जर अशांच्या हातीं काँग्रेसनें दिलें तर...अंधार! अंधार!...

तो माझ्या मनाच्या हळवेपणाचा व दुबळेपणाचा परिणामही कदाचित् असेल. पण सभोंवार असा सारा अंधार दिसूं लागला.

आमच्या त्यागाचें जनता कोडकौतुक करीत होती. आम्हांला फुलांत घालून जतन करीत होती. आमच्यावरून आपल्या पंचप्राणांची कुरवंडी करायला म्हटल्या क्षणाला तयार होती.

पण जनतेला जर आमचें खरें स्वरूप कळलें, आमचें जें सोज्वळ जीवनस्वरूप त्यागानें आणि कष्टांनीं भरघोस मोहरलेलें दिसतें हें आमचें खरें स्वरूप नसून आम्हीं ते केवळ मुखवटे धारण केलेले आहेत हें जनतेनें ओळखलें,...मला पुढें विचारही करवेना त्या भीषण भवितव्याचा.

इतके दिवस मी म्हणें, माझ्या देशाचें भवितव्य घडवणें मुख्यतः आम्हां बुद्धिवंतांच्या मार्गदर्शनावर अवलंबून आहे. आपली जनता अजून अजाण आहे. निरक्षर आहे. जनतेला सुजाण करून, बरोबर घेऊन आपणाला भारतमातेच्या दास्यविमोचनाचें युद्ध अखेरपावेतों खेळून विजयी व्हायचें आहे. आणि या अभिमानाला साजेसा आम्हीं नऊ ऑगस्टच्या चळवळींत आमचा वांटा उचलला होता कीं ! चळवळ जनतेची खरी; पण ब्रिनीचें निशाण तर आमच्या हातीं होतें !

या वनमाळींच्याच उदाहरणावरून शेख मिराचा आणि माझा एकदां कडाक्याचा वादविवाद झाला होता. इतक्या कडाक्याचा, कीं तेव्हांपासून तो मला भेटला नव्हता. रागावून निघून गेला होता.

जातांना त्यानें मला तावातावानें बजावून सांगून ऐकवलेले उद्गार आतां अचानक आठवले.

"...कोंकरांच्या कळपांत शिकारी कुत्र्यांचीं पिलें आणून पोशीत आहां तुम्ही, तुमचीं कोंकरें कापून खाणाऱ्या निर्दय पुंजीपतींच्या शेतांतील आणि कारखान्यांतील राखणदारीवरून. पण तुम्हांला उद्यां आढळून येईल कीं हीं तुमच्या कळपांतील गरीब कष्टाळू कोंकरें नसून पुंजीपतींचे राखणदार कुत्रे आहेत..."

अजूनही शेख मिराचे ते जळजळीत उद्गार मला पूर्णपणें पटत नव्हते. पण वनमाळींसारखीं उदाहरणें पाहून मात्र मला वाटूं लागलें कीं माझ्या पायाखालील

वाळू हळू हळू सरकत आहे. असहाय प्रवाहपतितेसारखी मी कुणीकडे तरी इच्छे-विरुद्ध वहात चालल्यें आहें...

तोंच शेजारच्या बंगल्यांतील घड्याळांत नवाचे टोके पडले.

एकदम मला आठवण झाली कीं मला आज नऊ वाजतां जयवंतांनीं बोलावलें आहें.

तीं पत्रें तशींच टाकून मी घाईघाईनें निघाल्यें. मस्तकांत तें विचारचक्र गरगर फिरतच होतें.

# ५ : माझी कर्मकथा

● ● ●

"या तुमची वाट पहात बसलों आहें मी शकुंतलाबाई! तुमच्या सिंहानें काढलेलें माणसाचें चित्र मला एकदां पाहायचें आहे."

जयवंतरावांनीं आपल्या नेहमींच्या अवखळपणाला जागून मला अंगणांत आलेली पाहतांच्र हंसत हंसत माझें खोडकर स्वागत केलें. ते माझी वाट पाहातच अंगणांत उभे होते.

मी त्यावर कांहीं बोलल्यें नाहीं. ते जिना चढूं लागले, त्यांच्या मागोमाग मी जिना चढूं लागल्यें.

"एका गोष्टीबद्दल मी तुमची अगोदरच क्षमा मागतों शकुंतलाबाई! तुमची आगाऊ परवानगी न घेतां मी एका सद्गृहस्थांची भेट तुम्हांला करून देणार आहें." दिवाणखान्याच्या दरवाजाजवळ जातां जातां ते मला हळूच म्हणाले, "मित्रकार्य मी करीत आहें. माझा हेतु चांगला आहे, हें ध्यानीं घेऊन तुम्ही मला क्षमा कराल अशी आशा आहे."

इतकी लांबलचक प्रस्तावना हे कसली म्हणून करीत आहेत?—असें मनाशीं म्हणत मी जयवंतरावांबरोबर दिवाणखान्याच्या दरवाजांत जाऊन पोंचल्यें. तों आंत दिवाणखान्यांत...

तें स्वागत मला मानवलें नाहीं.

आंत दिवाणखान्यांत जयंत जोशी बसलेले मला आढळले. मी मनांतून पाण्यांत पडलेल्या ढेकळासारखी विरघळूं लागल्यें. एकामागून एक प्रश्न माझ्या पुढें उभे राहूं लागले. ते देखील अनेक पूर्वस्मृतींचे भडक साजशिणगार लेवून.

...जयंत आज इथें कशाला आले?

...माझ्याविषयींची त्यांची अभिलाषा अजून शमली नाहीं का?

...हिंदु लग्न ही जन्मठेपेची शिक्षा आहे का? एकदां आम्हीं एकमेकांचीं संसारांत कोणी नव्हे असें ठरल्यावर पुन्हा जयतांनीं, तसल्या विचारांना मनांत थारा तरी कां द्यावा?

...दयाला हें माहीत असेल ? मला भेटायला जयंत आज आले आहेत हें ? तिला जर माहीत नसलें, आणि मागाहून कळलें, तर काय म्हणेल मनांत ती मला आणि त्यांना ?

असे प्रश्नांमागून प्रश्न तर मला भेडसावीत होते. आणि माझा मलाच राग येऊं लागला होता, कीं मी इतकी मनदुबळी कां ?

जयंत आणि मी एका काळीं पति-पत्नी होतों. त्या आठवणींचा तो परिणाम होता का ?

पण तें आमचें नातें तर मागेंच तुटलें होतें. आणि तें नातें तुटूनही आमच्यांत कडूपणा मुळींच उत्पन्न झाला नव्हता. त्यांच्याही मनांत माझ्याविषयीं कांहीं विकल्प राहिला नव्हता. त्यांनींच मनमोकळेपणानें मला तसें मागेंच बोलूनही दाखविलें होतें.

आपली माझ्याशीं लग्न करण्यांत झालेली चूकही त्यांनीं कबूल केली होती. मींही माझी झालेली चूक त्यांच्यापाशीं कबूल केली होती. त्यानंतर आम्ही समाजांतील दोन भलीं माणसें म्हणून आजवर दिवस कंठीत आलों होतों. ते कॉंग्रेसचे, मी कॉंग्रेसची. ते असेंब्लीला उभे राहिले तेव्हां कॉंग्रेससाठीं त्यांना निवडून आणण्याकरितां मीं माझ्या जिवाचें रान केलें होतें. लोक म्हणत, आणि लोक म्हणत तेंही कांहीं खोटें नाहीं, कीं—मूळचेच जयंत लोकांच्या विश्वासांतील कॉंग्रेस कार्यकर्ते; कॉंग्रेस मंत्रिमंडळांत उपमंत्री असतांनाही बाणेदारपणानें वागलेले. त्यांना निवडून यायला फारशी अडचण नव्हती खरी. पण जी थोडीशी अडचण प्रतिपक्षाकडून राजकारणी द्वेषबुद्धीनें पुढें आणली गेली, तिचा निरास मीं केला नसता तर झाला नसता. आणि जयंत पुणें जिल्ह्यांत सर्वांत जास्त मतें मिळवून तरी खास निवडून आले नसते.

एक बायको लग्नाची असतांना दुसरी करणारे हे पुरुष. हा काय उघेपणा म्हणून प्रकाशांत आणावा त्यांच्या प्रतिस्पर्धी उमेदवारांनीं ? असल्या वैयक्तिक गोष्टींना सार्वजनिक आयुष्यांत कां म्हणून ओढून आणलें जावें ?

खरें, पाहिलें तर हा अपराध जयंतांचा तरी थोडाच होता ! अपराधच असेल तर तो माझा होता.

आणि त्या अपराधाबद्दल—होय, मी म्हणत्यें, त्या काल्पनिक अपराधाबद्दल जर कुणाचे वाभाडेच निघायला हवे होते, तर ते माझे निघायला हवे होते. जयंतांची आणि माझी ताटातूट झाली होती, ती त्यांनीं केली नव्हती, मीं केली होती. पण

आमच्या लोकांचें स्त्रीदाक्षिण्य जबरदस्त. माझ्या वाटेला कोणी गेलें नाहीं. निषेधाच्या जाहीर महिला सभा, पत्रकें, जी काय झोड उडाली, ती एकट्या जयंतांविरुद्ध.

आणि तो हल्ला देखील कसा, अगदीं चौफेर.

पुण्यांतील महिलांची जाहीर सभा तुळशीबागेंत झाली. साऱ्या बायका पांढरपेशा—ब्राह्मणांच्या म्हणाल्यें मी, तर कुणाला राग येईल का ?

आणि त्या देखील गांधीवादविरोधी माजी कॉंग्रेसभक्तांच्या अथवा आजच्या कॉंग्रेसविरोधकांच्या बायका.

ज्या गांवच्या बोरी त्याच गांवच्या बाभळी. मी देखील अशीच एक ब्राह्मणकन्या आहें. पुण्यांतच माझीं बरींचशीं वर्षे गेलीं आहेत. आम्हां महिलांच्या पुण्यामुंबईतल्या अथवा इतर ठिकाणच्या असल्या चळवळी आणि निषेधसभा म्हणजे काय हें मला चांगलें माहीत आहे.

केवळ कळसूत्री बाहुल्या असतों आम्ही पांढरपेशा स्त्रिया; आमच्या पुरुषवर्गाच्या हातच्या. ते सांगतील तसें बोलायचें. ते सांगतील तसें नाचायचें. पहिली बायको असतांना दुसरी केल्याबद्दल निवडणुकींच्या ऐन दंगलींत जी पुण्यांतील स्त्रियांनीं जयंतांविरुद्ध निषेधाची झोड उठवली होती, ती त्यांच्या चुकीमुळें. मी गरीब गाय चिखलांत रुतल्यें होत्यें म्हणून मुळींच नव्हे. कॉंग्रेसच्या एका उमेदवाराचे पाय मागें ओढायला हें छान निमित्त सांपडलें म्हणून.

पण मी स्वतःच कॉंग्रेसच्या नांवानें जयंतांसाठीं मतें मिळवायला खेडोपाडीं पायपिटी करूं लागल्यावर विरोधकांच्या त्या विरोधावर आपोआपच विरजण पडलें.

आणि जयंत पहिल्या नंबरानें निवडून आले.

मला माहीत होतें, आणि जयंतांनाही माहीत होतें कीं ते निवडून आले ते कांहीं सदाशिवपेठी पांढरपेशांच्या मतांवर निवडून आले नाहींत. ते गोरगरीब खेडुतांच्या, कष्टाळू शेतकऱ्यांच्या, तेल्यातांबोळ्यांहूनही तेल्यातांबोळ्यांच्या मतांवर निवडून आले. आणि ते देखील मी त्यांची पत्नी, मी त्या आमच्या खालच्या थरांतील बहुजन समाजांत खेडोपाडीं कार्य करणारी, माझ्यावर लोकांचा पुष्कळसा विश्वास, म्हणून निवडून आले.

पण नवल माझें मलादेखील वाटतें तें हें कीं नऊ ऑगस्टच्या चळवळीची, नंतरच्या निवडणुकांची, एवढी सृष्टि फिरतां फिरतां आम्ही दोघें कांहीं कुठें एकत्र आलों नाहीं. आम्हीं एकमेकांना टाळलें.

ती वेळ नेमकी आज जुळून आली.

आम्ही समोरासमोर आलों तेव्हां जयंत माझ्याकडे पाहूं लागले आणि मी त्यांच्याकडे पाहूं लागल्यें. पण आम्हांला एकमेकांशीं बोलवेना.

• •

जयवंतराव मिनिटभर थांबल्यासारखें करून खादीचा कोट आणि खादीची टोपी चढवून बाहेर निघाले.

"शिवाजी चौकांत पोवाडेगायनाचा कार्यक्रम आहे, तिकडे जरा जाऊन येतों. नाहींतर आमचेच लोक आम्हाला नांवें ठेवायचे, कार्यक्रमाला देखील हजर राहिलों नाहीं म्हणून."

बोलतां बोलतां ते जयंतांकडे आणि माझ्याकडे पाहून मोरपिसानें वारा घातल्यासारखें हंसले.

मीं खोडकरपणानें पण सहेतुक अवखळपणाच्या पवित्र्यांत म्हटलें, "तुम्ही केशवकुमारांची 'चांफा' कविता वाचली आहे?"

"हो! वाचली आहे ना! तसा हा चांफा उसना साजशिणगार चढवून निघाला आहे, असेंच तुम्हांला म्हणायचें असेल; मीं ओळखलें." ते स्मित हास्य करीत मला म्हणाले.

मी त्यावर कांहीं बोलल्यें नाहीं. नुसतें मला ओझरतें हंसूं मात्र आलें.

"ठीक आहे. बचावाच्या भाषणाचा माझा हक्क राखून ठेवून मी बाहेर जाऊन येतों." असें उद्गारत जयवंतराव बाहेर निघून गेले.

ते जिना उतरून जातात न जातात, तोंच जयंत मला म्हणाले, "मींच जयवंतांना पत्र लिहून तुमची आणि माझी भेट घडवून आणायला सुचविलें होतें. तुम्हांला माहीत नसेल शकुंतला!"

मी कांहींच बोलल्यें नाहीं.

जयंत मानसशास्त्रवेत्ते होते. ते संशोधकाच्या सूक्ष्म दृष्टीनें कांहीं वेळ माझ्याकडे टक लावून पाहत होते.

"फार दिवसांनीं आज आपण भेटतों आहों, नाहीं?" जयंत म्हाणले.

"होय." मी उद्गारल्यें. माझा कंठ दाटून येऊं लागला होता. कांहीं सुचेनासें

झालें होतें. शस्त्रक्रियेपूर्वी रोग्याला भूल देतात ना ? त्या भुलीचा अंमल आपणा-वर बसूं लागला म्हणजे कसें वाटतें ? तसें शब्दांनीं वर्णन करतां न येण्याजोगें कांहीं तरी मला त्या दिवाणखान्यांत पाऊल टाकल्यापासून वाटूं लागलें होतें.

आल्येंच कशाला गी या ठिकाणीं ?...

" दयाची फार इच्छा होती. तुम्ही आणि ती—"

तें तोंडचें वाक्य पूर्ण होण्यापूर्वीच जयंतानीं एक उसासा सोडला. त्यांचें तोंडचें वाक्य अपुरेंच राहिलें.

त्या उसाशासरशीं मी एकदम खडबडून जागी झाल्यें. तीक्ष्ण धारेचें शस्त्र काळीज कापीत जात आहे असें मला वाटलें. मन असें बधिर झालें, कीं त्या वेदनाही मनाला जाणवेनात.

" माझें वैर साधणारी अत्यंत अशुभ वार्ता हे मला सांगणार आहेत का ?" असें केविलवाणेपणानें स्वतःलाच विचारीत मी अगतिकतेनें त्यांच्याकडे पाहूं लागल्यें.

" दया कुठें आहे ? " मीं भीत भीत विचारलें. काय ऐकायचें आपल्या कपाळीं येणार आहे नकळे, या भयानें माझ्या अंतःकरणाला कांपरें भरलें होतें.

" दया देवाच्या घरीं गेली ! "

" केव्हां ? "

" झाला–त्याला एक महिना होऊन गेला. बाळंतपणांत तिचा शेवट झाला. तुम्हांला मीं कळवलें नाहीं. मनांत म्हटलें, आयुष्यांत मी माझ्या सुखाची भागी-दारीण तुम्हांला करूं शकलों नाहीं, तर तुम्हाला दुःखाचा तेवढाच वांटा कां उचलायला लावूं मी ? "

चटकन माझे डोळे अश्रूंनीं डबडबून आले. असले लागेबांधे जनांत तोडून टाकणें जितकें सोपें असतें, तितकें मनांत तोडून टाकणें सोपें नसतें.

दया म्हणजे एक देवता होती. जयंतांवर तिचें केव्हांपासूनचें प्रेम. पण आमचें लग्न झाल्यावर तिनें जयंतांना कधीं त्या प्रेमाची ओळखही दिली नाहीं. अखेर मीं त्यांचेंही तिच्यावर प्रेम आहे हें पाहिलें, आणि मला देखील माझ्या वाटेनें जायचें होतें.—मींच तिला विनवून विनवून जयंतांशीं लग्न करायला तयार केली. म्हणून ती तयार झाली.

खरोखर, माझी आई वारली तेव्हां देखील जितकें दुःख झालें नसेल, तितकें दुःख दयाच्या निधनाची ती दुष्ट बातमी ऐकून मला झालें.

"तीन महिन्यांचा अशोकचा धाकटा तान्हा भाऊ आईविणें पोरका झाला आहे." जयंत म्हणाले.

"देव त्याचें रक्षण करील." मी मनांतून दयाच्या लेकराला तरी सुखी ठेव अशी मनांतून देवाची प्रार्थना करीत म्हटलें, "प्रकृतीनें बरा आहे ना बाळ?"

"आहे. पण तान्हें लेंकरूंच तें.—"

"काय नांव ठेवलें आहे त्याचें?"

"भरत. तुझें आवडतें नांव होतें ना हें? दयाच मला म्हणाली होती." जयंत चाचरत उद्गारले.

ते कां चांचरले हें तेव्हांच माझ्या ध्यानीं आलें. पण तिकडे लक्ष जाऊनही मीं लक्ष न दिल्यासारखें केलें. माझ्याशीं बोलतांना ते 'तुम्ही' या बहुवचनावरून 'तूं' या एकवचनाइतके माझ्या अधिक जवळ बिचकत बिचकत येत होते.

"तुझ्या दुसऱ्या मुलाचें नांव तूं भरत ठेवणार होतीस ना?" त्यांनीं पुन्हा विचारलें.

त्यावर माझ्या तोंडून शब्द उमटेना.

"दया तुझ्या अशोकची आई होती." अशोकला चार वर्षांची एक बहीणही आहे. करुणा."

"अशोक कुठें आहे?"

मीं त्या भ्रमिष्टपणांतून अंग झाडीत जागी होत स्वतःला विचारलें. मनाला त्या संसारी जगाच्या पाशांतून अलिप्त ठेवण्याचा मीं आटोकाट प्रयत्न केला. पण मला तें शक्य झालें नाहीं. पण निदान माझ्या अशोकपुरती तरी मी त्या पाशांत गुरफटल्यें आहें याची खंत मला मुळींच वाटली नाहीं. खंत कसली त्यांत? मातृपदाची खंत स्त्रीला कधींतरी वाटली आहे? मी आई आहें याचा मला अभिमान वाटूं लागला.

"अशोक कुठें आहे?" मीं जयंतांना विचारलें.

"अशोक आपल्या घरीं आहे आपल्या आजोबांपाशीं."

"काय शिकतो तो?"

"पांचव्या इयत्तेंत आहे. तुला माहीत आहे? दया आणि मी दोघेंही नऊ ऑगस्टच्या आवर्तात येरवड्याच्या स्वराज्यमंदिरांत होतों. तेव्हांपासून अशोक तिकडेच आहे."

" कां ? तिकडे कां टेवलात त्याला ? "

माझ्या मुखावाटे ओघासरसे शब्द निघून गेले; आणि मीं जीभ चावली. भलतेंच बोलून गेल्यें असें मनाला वाटलें.

" तर कुठें ठेवायचा त्याला शकू ? तूं त्याची त्याच्या जन्मदात्या आईपासून ताटातूट केली होतीस."

जळते निखारे काळजावर फेंकल्यासारखे जयंतांचे ते शब्द माझ्या अगदीं जिव्हारीं झोंबले. मनाला वाटलें, अपत्याचा त्याग करण्यापुरती स्त्रीजातीला लांछनास्पद गोष्ट कोणती ? जी स्त्री आपल्या उदरीं जन्माला आलेल्या अपत्याला विसरते,—आई म्हणायचें तिला ? कीं लांवसट ?

पण मी लांवसट नव्हत्यें. मी तेव्हां जयंतांना गृहदेवतेप्रमाणें परमादरणीय वाटणारी पत्नी नसेन. सासूसासऱ्यांना आवडणारी सून नसेन. आर्य संस्कृतीचा कडवा अभिमान बाळगणाऱ्या समाजांत आपल्या आवतींभोंवतीं वावरणाऱ्या संस्कृतिसंरक्षक समाजबांधवांना अभिमान वाटण्याजोगी खरी आर्यकन्या मी नसेन. उमलत्या तारुण्याच्या ऐन भरांत कीर्तिमान झालेल्या सुविद्य, संपन्न, देशप्रेमी पतीला सोडून एका कंगाल भिकारड्या मवाल्याच्या नादानें घरांतून निघून जाणारी उनाड स्त्री मी, असेंच माझा समाज मला तेव्हां म्हणाला असेल. पण मी लांवसट नव्हत्यें. सुखानें केला का मीं तेव्हां माझ्या सोन्यासारख्या अपत्याचा त्याग ?... माझ्या अशोकचा, आणि त्याबरोबर घरादाराचा–आप्तेष्टांचा–समाजाचा त्याग सुखानें केला मीं ? आई म्हणूनच ना त्याग केला ?

जयंतांनीं माझा पत्नी म्हणून त्या माझ्या ऋणानुबंधी साथीदाराच्या संशयानें उपहास केला, तो मीं मुकाटपणें सहन केला होता; मूग गिळून स्वस्थ बसल्यें होत्यें. सोपाना माझा साथीदार. मीं त्याचा केंसानें गळा कापला म्हणून तो माझ्या नांवानें मनांतल्या मनांत तळतळत होता, तेंही मीं शांतपणें सहन केलें. त्याचें त्यांत कांहीं चुकलें नव्हतें; आणि माझेंही चुकलें नव्हतें. पण आई म्हणून मला जयंतांनीं संशयानें आडपडद्यानें धिक्कारायला सुरुवात केली, माझ्या अशोकच्या आईला व्यभिचारी मानण्यापावेतों त्यांची मजल गेली, म्हणून तर मला संसारांतील सर्वस्वाची राख करून कपाळाला फांसून गोसावीण बनून खऱ्या अर्थानें घराबाहेर पडावें लागलें.

...माझ्या अशोकसाठीं–जयंतांसाठीं नव्हे, दया संसारसुखाला अंतरत होती म्हणून तिच्यासाठींही नव्हे, माझ्याकारणें सोपानाच्या उभ्या कष्टाळू आयुष्याचा

रखरखीत उजाड सहारा बनला होता म्हणून अनुकंपा वाटूनही नव्हे,–उमलत्या तारुण्यातील पहिल्या वहिल्या प्रामाणिक पण स्वैरगामी प्रेमासाठींही नव्हे,– एकट्या माझ्या अशोकासाठीं, त्याचें जीवन काळवंडूं नये म्हणून मीं घरदार–संसार सारें सारें सोडलें होतें. दयाला मीं सवतीमत्सराची कल्पनाही मनात न आणतां माझ्या संसारावर माझ्या हातानें अभिषेक केला तो देखील ती माझ्या अशोकाची माझ्याहूनही प्रेमळ आई होती म्हणून.

मी आई होत्यें, म्हणूनच हें एवढें दिव्य तेव्हां करूं शकल्यें ना ? कीं लांवसट म्हणून ?

... आणि तरीही आज जयंतांनीं मला म्हणावें, तूं त्याची त्याच्या जन्मदात्या आईपासून तातातूट केली होतीस !

" नाहीं ! नाहीं ! जयंत !..." तळमळून मी उत्तरल्यें.

मला त्या क्षणीं जीवन असह्य वाटूं लागलें. मी खुर्चीवरून उठल्यें, आणि बाजूच्या कोचावर जाऊन टेकून अंग टाकलें. मला बसवेना. कांहीं बोलवेना.

माझ्या टायींची ' आई ' त्या दोन लेंकरांवरून पंचप्राणांच्या कुरवंड्या ओवाळून टाकायला सतीचा वसा घेऊन पुढें पुढें झेपावत होती.

माझ्या टायींची मानिनी स्त्री स्वतःच्या आणि स्वतःसारख्याच आमच्या प्रबुद्ध समजल्या जाणाऱ्या समाजांतील प्रत्येक स्त्रीच्या परवशतेबद्दल अधिकाधिक बंडखोर बनूं पाहत होती...माणसानें जिभेला हाड नाहीं म्हणून उचलली जीभ कीं लावली टाळ्याला असें बेजबाबदारपणें वाटेल तें बोलावें याचा अर्थ काय ? माझा आणि सोपानाचा पूर्वी–आमच्या लग्नापूर्वी कितीही लोभ असेल. पण म्हणून लग्नानंतर तो लोभ शिवनिर्माल्य मानून समाजाचीं बंधनें न पाळण्याइतकी का मी माणुसकी कोळून प्याल्यें होत्यें ? खुषीनें असो कीं प्राप्त प्रसंगानें असो. पण ' धर्मे च, अर्थे च, कामे च, मोक्षे च ' सहजीवनानें एकमेकांशीं विश्वासानें वागण्याची आम्हीं लग्नांत शपथ घेतली होती. आणि तरी देखील अशोक सोपानासारखा दिसतो असें म्हणून जयंत माझी–स्त्रीची कठोरपणानें हकनाहक विटंबना करतात ! बस्स ! प्राण गेला तरी अशा पुरुषाशीं पुन्हा सहवास नको.

...प्रेमळ आईचे पाय मानी स्त्री आवेशानें मागें ओढीत होती. आणि आई आपल्या अपत्यासाठीं आपल्या आत्मयज्ञाच्या सांगतेकरितां स्त्रीचे पाय धरून तिला आपणाबरोबर हाताशीं धरून ओढतांना सांगत होती, ' तूं स्त्री आहेस !... तूं आई आहेस !..."

• •

आपण सूत तुटेपावेतों ताणीत आलों असें जयंतांना वाटलें कीं काय न कळे. त्यांनीं आपल्या बोलण्याचा ओघ बदलला.

" आज आपण भेटतों आहों, हा तरी एक योगायोग आहे. असें मला वाटतें. तुला वाटतें का ? " त्यांनीं विचारलें.

मी अंग सावरून बसल्यें. पण त्यावर कांहीं बोलल्यें नाहीं. काय बोलावें हेंच मला सुचेना. मनाला मात्र रुखरुख जाळूं लागली, कीं जीवनाचें जें दालन नकोसें झालें म्हणून अथवा अपुरें वाटूं लागलें म्हणून ओलांडून मी ह्या विशाल जीवनाच्या दालनांत आल्यें, त्या मला नको असलेल्या दालनात जयंत मला पुन्हा ओढून नेऊं पाहत आहेत. योगायोगाची भाषा त्यांनीं काढली, त्या भाषेला देखील आमच्या जीवनांत आतां कांहीं अर्थ उरला नव्हता. पण तितक्या निःस्पृहपणानें तें बोलायचा धीर मात्र मला झाला नाहीं.

माझ्याकडून थोडा वेळ प्रतिसादाची अपेक्षा करून मग जयंत म्हणाले, " मीं योगायोगाची गोष्ट काढली म्हणून तूं कोणताही गैरसमज करून घेऊं नकोस शकू ! आज मीं मुद्दाम तुझी भेट घेण्याचा योग साधला. या भेटीला अर्थ आहे. पण तो जळमटलेला जुना अर्थ नव्हे. शुद्ध, सरळ असा नवा अर्थ आहे. "

बोलतां बोलतां त्यांनीं आपली नजर पुन्हा पुन्हा माझ्या नजरेला भिडवून माझ्या अंतरंगाचें संशोधन चालविलें होतें.

थोडा वेळ थांबून त्यांनीं माझ्या मनोगताचा थांगपत्ता लागतो का अशी वाट पाहिली. मी कांहींच बोलत नाहीं असें पाहून ते मला म्हणाले, " शकू ! आपण बाकीच्या साऱ्या गोष्टी विसरलों, तरी आज मी जो समाजांत काँग्रेसचा एक यशस्वी कायदेमंडळसभासद म्हणून उभा आहें तो तुझ्या पुण्याईच्या बळावर, ही गोष्ट मला विसरतां येणार नाहीं. "

पुण्य आणि पाप ह्या कल्पना आतां माझ्या जीवनांत अगदीं शिळ्या, अगदीं टाकाऊ झाल्या होत्या. मीं जयंतांना म्हटलें, " माणसानें आपलें कर्तव्य केलें तर त्यांत पुण्य कसलें ? काँग्रेसची एकनिष्ठ पाईक मी, गांधीजींच्या काँग्रेसचा झेंडा साऱ्या देशभर विजयानें फडकावा आणि जिकडे तिकडे काँग्रेसचें रामराज्य नांदूं

लागून सर्वत्र शांति-सौख्य-समृद्धीचे, अमृताचे पाट वाहूं लागावे, म्हणून आपण सारीं जीवापाड झटलों. श्रम आपले, यश अल्म चाळीस कोटी जनतेचें."

"होय. तूं म्हणतेस तें खरें आहे, शकू! पण त्या पदरीं पडलेल्या यशाला तरी स्थिरता आणि समृद्धि प्राप्त व्हायला नको का?"

मी जयंतांचा तो प्रश्न ऐकून गोंधळल्यासारखी झाल्यें. ते एक नाणावलेले वाद-विवादकुशल व समयसूचक वकील होते. न्यायालयांत समोरच्या प्रतिपक्ष्याला बोलतां बोलतां शब्दांचा असा बेमालूम पेंच ते टाकीत, कीं तो प्रतिपक्षी त्या शब्दांच्या चक्रव्यूहांत पुरा गुरफटून जाई. आणि मग यांनीं त्याला खिंडींत गांठून काय पाहिजे तीं उत्तरें आपल्या प्रश्नांना त्याच्या तोंडून वदवून घ्यावीं.

यशाच्या स्थिरतेची आणि समृद्धीची भाषा त्यांनीं काढली, ती देखील मला तशाच प्रकारची वाटली. पण तसें वाटलें तरी त्या वाटण्यांतून बाहेर पडायला पळवाट मात्र सांपडेना.

"मनुष्य हा सहवासप्रिय प्राणी आहे. खरें ना शकू?" त्यांनीं कांहीं क्षण थांबून मला विचारलें.

"होय, मग?" मीं प्रश्न केला. मी एका वादविवादकुशल वकिलाशीं बोलत्यें आहें हें तेव्हां मी विसरूं शकत नव्हत्यें.

"माणसानें आत्मनिष्ठ–व्यक्तिनिष्ठ असावें, कीं वस्तुनिष्ठ असावें? काय वाटतें तुला?" त्यांनीं पुढचा प्रश्न केला.

आपली ही भाषा ठोकळेबजा झाली याची जाणीव झाल्यामुळें कीं काय, ते लगेच पुढं म्हणाले, "परस्पर सहकारिता आपल्या जीवनाला समृद्ध करायला अवश्य आहे, असें तुला वाटत नाहीं का, शकू?"

"कोण म्हणतें नाहीं वाटत? परस्पर सहकारितेच्या व्यापक भूमिकेवरून तर आपण आज ह्या विराट समाजांत वागतों आहों..."

माझ्या ओठांवर शब्द आले होते, कीं 'नाहींतर आतां आपण कुणाचीं कोण? देशोद्धाराच्या एका उदात्त सूत्रांत आपलीं जीवनें गुंफलीं गेलीं आहेत म्हणून तर आपल्या देशांतील चळवळींचा हा विराट पसारा सुसूत्रपणें चाललेला आहे...' पण तें जयंताच्या मनाला लागेल, म्हणून मीं जीभ आवरली.

थोडा वेळ मग मीही कांहीं बोलल्यें नाहीं.

अंमळशानें पुन्हां ते म्हणाले, "शकू! पायांनीं गांठी मारीत सुतानें स्वर्ग

गांठण्याचा माझा स्वभाव आहे, असा तुझा माझ्यावर आरोप होता. पण माणसाचा स्वभाव परिस्थितीप्रमाणें बनतो आणि परिस्थितीनुसार पालटतो. आपण दोघेंही आज जीवनाच्या अगदीं वेगळ्या परिस्थितींत आहोंत. आपणां दोघांचेंही जीवन शंभरनंबरी सोन्यासारखें मुशींतून वितळून गाळून शुद्ध होऊन निघालें आहे, असें आपण समजूं. अशा दोन विशुद्ध संवादी जीवनांचे प्रवाह आतां तरी पुन्हा गंगायमुनांसारखे एकरूपानें संगम पावूं शकणार नाहींत का ?"

बोलतां बोलतां जयंत आपल्या नजरेंत अंगची होती नव्हती तेवढी बुद्धिमत्ता, कळकळ व सामर्थ्य एकवटून माझ्याकडे पाहात आहेत, असें मला वाटलें.

माझें मन तेव्हां एकदम उसळून बंड करण्यासाठीं उतावळें होत होतें. तसें पाहिलें तर आतां जयंत माझे कोण आणि मी जयंतांची कोण ? सार्वजनिक जीवनांत अनेक स्त्रीपुरुषें एखाद्या उदात्त ध्येयानें आकर्षिलीं जाऊन एकत्र येतात, एकत्र कार्य करतात. तसें कार्य मीं केलें. त्याचा असा विपरीत स्वार्थी अर्थ त्यांनीं तरी कां लावावा ?

कां लावावा ?...

... प्रश्न अगदीं ओटांवर आला. पण तो ओटांबाहेर उमटेना. मी बंडखोर मनाला आवरलें. 'नको नको' असें मनाला वाटत असतां मी स्वतःला नकळत प्रवाहपतितासारखी त्या विचारप्रवाहाबरोबर दूरदूर वाहात चालल्यें होत्यें. माझ्या पायांतळचा भूमीचा आधार सुटला होता. मी चालत नव्हत्यें, तरंगत होत्यें. वाहत होत्यें. 'नको ! नको !' असें आग्रहानें स्वतःला सावध करतां करतां नको त्या वाटेनेंच मी चालल्यें होत्यें.

"शकू! जगात नवरा-बायको एकमेकांना विसरतील. बापलेक एकमेकांना विसरतील. पण मायलेकरें एकमेकांना विसरूं शकतात का?" जयंतांनीं मला जराशानें पुन्हा विचारलें.

नाणावलेल्या वकिलाला शोभण्याजोगा तो प्रश्न होता. ते पुन्हा पूर्वपदावर येत होते.

मी गोंधळांत पडल्यासारखी झाल्यें. कोणत्या तोंडानें त्यांना उत्तर द्यावें हेंच मला कळेना. मला त्यांच्या प्रश्नाचा आशय कळला. माझ्या ठायींचें उदात्त मातृत्व पुन्हा जागृत करून लेकराला पुढें करून त्यांच्या मनांतून मला स्वतःपाशीं अधिक ओढून न्यायचें होतें.

"तूं निष्ठुर माता आहेस असें तुला मी मुळींच म्हणत नाहीं शकू! तूं माता निष्ठुर नाहींस. पत्नी निष्ठुर नाहींस. कन्या निष्ठुर नाहींस. मैत्रीण निष्ठुर नाहींस. आजवर तूं त्याग केलास, व्यक्तिगत जीवन मारून विशाल जीवन जगलीस, या त्यागाचा अर्थ मला कळतो. पण कोणत्याही त्यागाला अधिष्ठानही तसेंच उदात्त लागत असतें नाहीं?"

मीं ओळखलें; जयंत आपल्या वकिली बाण्यानें हळुहळू कमलाच्या तंतूसारखा शब्दाचा एकेक धागा माझ्या अंतःकरणासभोंवार आंवळीत आहेत.

त्या मायाजालांत गुरफटून जातां कामा नये अशी आपल्या परीनें खबरदारी घेत मी म्हणाल्यें, "जीवन हाच मुळीं महान यज्ञ आहे जयंत! जीवन हेंच मुळीं त्यागाचें अधिष्ठान आहे. त्यागाला आणखी याहून निराळें कोणतें अधिष्ठान लागतें, मला सांगा ?"

"होय. जीवन हाच मूर्तिमंत यज्ञ आहे खरा शकू! पण यज्ञ म्हणजे चिता नव्हे. या जीवनाची खांडववनासारखी जाळून राख करायची का आपण? यज्ञांतून चिरंजीव जीवन ज्वालांच्या प्रकाशाबरोबर उफाळतें. पण चिता नाशवंत वस्तूची रक्षा करते. तुझें माझें जीवन ही अशी नाशवंत वस्तु नाहीं, कीं ज्याची तूं आणि मीं अशी जाळून जाळून रक्षा करावी."

"काय ? तुमचें जीवन मी जाळत्यें आहें? जयंत! आपल्या अंतरसाक्षी परमेश्वराला स्मरून खरें बोला. तुमचें जीवन मी जाळत्यें आहें?" असा रोखठोक प्रश्न माझ्या ओठांवर नाचूं लागला. मला तो आरोप सहन झाला नाहीं. असला आरोप आपणावर येऊं नये म्हणून तर मी आरंभापासून अतिशय जपून, मनाचा तोल अतिशय सांभाळून वागत होत्यें.

पण मींविचारायच्या अगोदरच जयंतांनीं माझ्या अंतःकरणाला बसणारे हादरे ओळखले. आपल्या तोंडून जाऊं नये तो शब्द चुकून गेला याची त्यांना जाणीव झाली.

त्यांनीं आपल्या भाषणाचा ओघ बदलून घेतला. "तूं माझ्या जीवनाची जाळून रक्षा केली नाहींस शकू! तूं तुझ्या परीनें माझें जीवन समृद्ध केलेंस. पण—"

तोंच खालून त्यांना कोणीं तरी मोठ्यानें हांक मारलेली ऐकूं आली, "जयंत! जयंत!"

● ●

माझें तिकडे मुळींच लक्ष नव्हतें. रेशमासारखें मऊ पण तोडून तोडतां न तुटणारें असून ऋणानुबंधाचें जाळें माझ्यासभोवार विणलें जात होतें. त्या जाळ्यां-तून मी कशी मुक्त होईनसें मला झालें होतें.

तसें पाहिलें तर मला कुणीं तिथें बांधून ठेवलें नव्हतें. ज्या नको असलेल्या जीवनांतून मी सहा वर्षांपूर्वी कटाक्षानें मुक्त झाल्यें होत्यें, त्या जीवनाची आठवण करून देणाऱ्या त्या जागीं मीं थांबावेंच कां? मी निघून गेल्यें असत्यें, तर कोण मला नको म्हणणार होतें?

पण ही सारी अनेक प्रश्नचिन्हांची सेना मात्र जी सरहद्दीचें संरक्षण करणाऱ्या दक्ष शिपायांसारखी माझ्यापुढें उभी राहिली, ती बाजूला हटेचना. तीं प्रश्नचिन्हें पुसून कांहीं मला पुढें जातां येईना.

कां?... कां?... कां?...

उत्तर कांहीं मिळेना.

तेव्हां आणि आतां. सहा वर्षांपूर्वी डहाणूला जहांगीरशेट बोटवालांच्या बागेंत अशीच जयंतांची आणि माझी गांठ पडली होती. तेव्हां त्यांनीं हाच प्रश्न काढला होता.

● ●

सहा वर्षांपूर्वीची त्या बागेंतील आमची भेट मला आठवली. त्या भेटींत आमचें झालेलें संसारी जीवनाच्या सीमेवरचें संभाषणही अंतर्निनादानें माझ्या कर्णरंध्रांत घुमूं लागलें:

"होय शकू! नातीं जडतात; नातीं तुटतात देखील."

"पण नातीं तुटल्यावर तरी समुद्रांत खडकावर आदळून फुटलेल्या जहाजांतील न पोहतां येणाऱ्या उतारूंसारखी आपली गत होतां कामा नये जयंत! फुटकी तुटकी मोडकी फळी काय हातीं लागेल त्याचा आधार घेऊन आपणाला किनारा गांठता आला पाहिजे. खरें ना?"

"मग फुटक्या नावेंतील पोहूं न येणाऱ्या ह्या उतारूला कोणती फुटकी मोडकी फळी तूं देणार आहेस?"

"आपण दोघेंही एकाच फुटक्या नावेंतून समुद्रांत कोसळून पडलेलीं नाहीं का?"

" होय. पण—"

" का ? असे चाचरतां कां ? आपणाला मिळालेलें आयुष्य फार तोकडें आहे. त्या मानानें कामाचे आपणासमोर पडलेले डोंगर फार प्रचंड आहेत —फार प्रचंड आहेत. नुसत्या विचारांत—नुसत्या शब्दच्छलांत आयुष्य वाया दवडून कसें चालेल ?"

" म्हणून तूं दोन वर्षांपूर्वी कुणाला न सांगतां घर सोडलेंस काय ?"

" आपण उगीचच्या उगीच खोल पाण्यांत शिरत आहोंत असें नाहीं तुम्हांला वाटत ? त्या शिळ्या कढीला ऊत आणण्यांत आतां अर्थ काय ? झाल्या गेल्या गोष्टी होऊन गेल्या."

" गोष्टी होऊन गेल्या. पण त्यांचे परिणाम घडलेले दूर झालेले नाहींत. अंतःकरणाला त्या परिणामांमुळें झालेल्या जखमा—"

" त्या जखमा आपोआप आज ना उद्यां भरून येतील. काल हें त्यावर फार दिव्य औषध आहे."

" नाहीं. त्या जखमा तशा भरून येणार नाहींत शकू ! हें पाहा, आपण ही आडवळणांची भाषा सोडून देऊं, आणि बोलूं. तूं गांधीवादी आहेस. मीही गांधीजींचा अनुयायी आहें. भारतमातेच्या सेवेकारणें देह झिजवायची सदिच्छा आपणां दोघांच्याही मनांत वसते आहे."

" दोघांच्याही जीवनातील संसारी सहवासांत ही सदिच्छा दोघांच्याही अंतःकरणांत खुरटून वाया जात आहे असें नाहीं वाटत तुम्हांला जयंत ? नाहीं वाटत ? अगदीं आपल्या मनाला साक्ष ठेवून खरेंखरें सांगा. जर ती सदिच्छा खुरटत नसती तर तिला असे डेळेफांटे फुटले असते का ?"

" हें तुझ्या जीवनांतलें वस्तुस्थितीच्या जलाशयांत उमटलेलें प्रतिबिंब जर तूं मला शब्दांनीं चित्रित करून सांगत असशील तर गोष्ट निराळी आहे."

" माझ्या शब्दांत तुमच्या अंतःकरणाचें प्रतिबिंब उमटलेलें दिसत नाहीं तुम्हांला ? नाहीं दिसत ? नाहीं दिसत ?...हें पाहा जयंत ! आपण आपल्या आयुष्यांत घडलेला अपघात—पतिपत्नींचें कांहीं काळ जोडलेलें नातें—जरा विसरूं. आणि योगायोगानें या जीवनांत जवळ आलेलीं प्रामाणिक माणसें या नात्यानें एकमेकांच्या मनाला साक्षी ठेवून बोलूं. अगदीं खरेंखरें बोलूं."

"आजवर आपण एकमेकांशीं खरें बोललोंच नाहीं का? खरें वागलोंच नाहीं एकमेकांशीं?"

"नाहीं."

"नाहीं ?"

"नाहीं. आपण पोहलों; पण मृगजळांत."

"आपला आजवर झालेला संसार हें मृगजळच होतें का?"

"नव्हतें ?"

"मृगजळ होतें तें? आणि आपला अशोक—"

"तें तर मृगजळांत फुललेलें कमळ !—चिखलांत उगवलेलें कमळ तुम्हींच ठरवलें आहे ना त्याला ?"

"माणूस चुकत नाहीं शकू?"

"चुकतात. माणसें चुकतात. पण एकदां झालेली चूक सुधारून त्यापासून जरूर तो बोध घेऊन वागण्यांतच माणसाची माणुसकी दिसून येते."

"मला माझी चूक सुधारून माणूस व्हायची संधि तूं देणार नाहींस का शकू ?"

"मला माझी चूक सुधारून साधतां आलेली माणुसकी टिकवून धरायची संधि तुम्ही मला देणार नाहीं का ?"

"आजवर तुझें जीवन दुःखी होईल अशा चुका माझ्या हातून झाल्या."

"त्या चुका पुन्हा हातून होऊं द्यायच्या नाहींत."

"नाहींत."

"त्यांत जीवन वनवासी तुमचेंही होईल आणि माझेंही होईल."

"होय. म्हणूनच आपण आपला वनवास संपवूं या."

"संपवूं या. कां म्हणून राहावें आपण हट्टानें सदोदित तापल्या तव्यावर उभें? तुमच्या सदिच्छेचें मी स्वागत करत्यें."

## ६ : प्रकाश !....पण सूर्याचा कीं चितेचा ?

● ● ●

मी तेव्हां जागी होत्यें कीं झोपीं गेल्यें होत्यें याचें माझें मलाच भान नव्हतें. इतकी मी त्या गतकाळच्या विस्मयजनक स्मृतिवचनांच्या चक्रव्यूहांत स्वतःला हरवून बसल्यें होत्यें. तेवढ्या वेळांत कोण आलें, कोण गेलें, काय बोललें, कसलें कसलेंही भान मला नव्हतें.

जयवंत तेवढ्यांत बाहेरून माघारे आले.

"फार वेळ लागला मला बाहेरून यायला, नाहीं शकुंतलाबाई !" ते मनगटावरील घड्याळाकडे नजर वळवून पाहत म्हणाले, "बारा वाजून गेले."

मी सभोंवार पाहत्यें तों जयंत तिथें नव्हते.

"हें काय ? जयंत कुठें गेले ?" मीं विचारलें.

"म्हणजे ? मला माहीत नाहीं. ते तुम्हांला सांगून नाहीं गेले ?"

"नाहीं !"

"गेले असतील तर मग पोवाड्यांच्या कार्यक्रमाला. येतील थोड्या वेळानें." जयवंत म्हणाले.

आपल्या अनुपस्थितींतील आम्हां दोघांमधील एकंदर परिस्थितीचा कसा आराखडा त्यांनीं आपल्या मनांत रेखाटला असेल तो त्यांचा त्यांना माहीत.

"तुम्हांला भेटले ?" मीं विचारलें, "तुम्ही गेलां होतां ना पोवाडे ऐकायला ?"

तेवढ्यांत इंदिरादेवी आंतल्या जिन्यानें वर आल्या. त्यांनीं दरवाजावरचा सरकपडदा बाजूला सारला, सुवास देऊन श्रमलेल्या उमलत्या फुलासारख्या त्या जयवंतरावांकडे पाहून गालांतल्या गालांत गूढार्थानें हंसतांना मला दिसल्या. मीही स्वतःचीं दुःखें विसरून खेळीमेळीनें वागूं लागल्यें. लोकांसमोर आपल्या दुःखाचें प्रदर्शन करून लोक तें थोडेंच हलकें करणार आहेत !

"मी गेलों नाहीं पोवाडे ऐकायला. खालींच आम्ही गप्पा मारीत बसलों होतों." जयवंत म्हणाले.

मीं त्याचा अर्थ काय ओळखायचा तो ओळखला. आणि नुसती शिष्टाचाराला शोभेसें हंसल्यें.

मी कां हंसल्यें, हें त्या दोघांनींही मनोमन ओळखलें.

" बसणार का मग तुम्ही जयंत माघारे येईपावेतों ? " जयवंत म्हणाले.

" बसा ना ! शकुंतलाबाई ! मी देखील तुम्ही आलेल्या ऐकून तुमच्यासारखीच यांच्याशीं वाद घालायला आल्यें आहें. यांच्या कालच्या भाषणाबद्दल तुमचें माझें अगदीं एकमत आहे. " असा नव्या वादविनोदाचा पूर्वपक्ष करीत इंदिरादेवी कोचावर माझ्या शेजारीं बसल्या.

" बाकी, यांच्या तोंडापुरतें म्हणून मी बोलत नाहीं; पण—जयवंत ! कालचें तुमचें भाषण मला मुळींच नाहीं आवडलें. "

" नाहीं आवडलें ? तुम्हां दोघींनाही नाहीं आवडलें तर ? मग आश्चर्य आहे म्हणायचें ! इतर साऱ्या लोकांना आवडलें. " जयंत आम्हां दोघींकडे पाहतां पाहतां म्हणाले.

" लोकांना आवडलें असेल. कारण लोकाच्या पथ्यावर पडणारें होतें तें. पण आम्हां घरच्या माणसांना नाहीं आवडलें. " इंदिरादेवी म्हणाल्या.

पण जयवंतांनीं तिकडे लक्ष दिलें न दिलेंसें केलें. मला त्यांत कांहीं नवल वाटलें नाहीं. त्यांची ती नेहमींचीच संवय होती. इंदिरादेवी राजकारणांत अथवा समाजकारणांत सराईतपणें पोहणाऱ्या नव्हत्या हें एक. आणि शिवाय साऱ्याच स्त्रीवर्गाविषयींच्या जयवंतरावांच्या कल्पना बहुतांशीं मध्ययुगीन होत्या. स्त्रियांच्या कैवाराची पोपटपंची ते पुष्कळदां करीत. आणि स्त्रियांचे कैवारी ते होतेही. पण स्त्रीसमाजाकडे अतिरिक्त मध्ययुगीन सरंजामशाही अहंगंडानें पछाडलेल्या पुरुषी दृष्टीनें पाहणारे ते होते.

इंदिरादेवींना आपल्या पतिराजांचा स्वभाव चांगला माहीत होता. त्या जयवंतांच्या एकंदर रागरंग पाहून श्वासाच्या धक्क्यानें देखील पातें मिटून घेणाऱ्या लाजाळू-सारख्या ओशाळून निमूट बसल्या.

मला मनांतून जयवंतांचा राग आला. पण मीं त्या नवराबायकोच्या नाजूक प्रश्नांत मन घालणें शोभलें नसतें. उगाच कांट्याचा नायटाही झाला असता एखाद वेळीं. अनेकदां असे कडू अनुभव मीं घेतले होते.

" सांगा ना ! शकुंतलाबाई ! कालच्या माझ्या भाषणांत तुम्हांला वावगें काय

वाटलें ?" जयवंतांनीं पुन्हा आस्थापूर्वक विचारलें.

"वावगें कांहींच वाटलें नाहीं. जनता कॉंग्रेसपासून ज्या अपेक्षा करीत आहे त्या वावग्या आहेत एवढें मला वाटलें. गांधीजींच्या नांवाचा उपयोग करून आपण निवडणुका जिंकल्या. पण आमचीं—कॉंग्रेसचीं जीं पावलें दिवसेंदिवस पडत आहेत, तीं आपल्या देशांत रामराज्य आणणार नसून रावणराज्य आणणार अशीं अशुभ लक्षणें लोकांना स्पष्ट दिसत आहेत." मी म्हणाल्यें.

माझे शब्द मनाला झोंबण्यासारखेच होते. पण त्याला माझा इलाज नव्हता.

जयवंतांच्या मनाला ते शब्द झोंबले असले पाहिजेत. पण तसें चेहऱ्यावर न दाखवतां वर देखल्या शांत गंभीर वृत्तीनें ते म्हणाले, "तुमची ही टीका इतकी जहरी आहे आणि इतकी व्यापक आहे—"

"जहर पेरलें कीं जहरच पिकायचें, नाहीं का ?"

"जहर पेरलें ? कोणीं जहर पेरलें ?"

"तुमचें कदाचित् तें अमृत असेल. पण राबणाऱ्या जनतेला हैराण करणारें तें जहर आहे."

"हें पहा शकुंतलाबाई ! अशा लक्षणेनें आणि उपरोधानें बोलूं नका. स्पष्ट बोला. अशी गगनाला गवसणी घालूं नका. मुद्द्यावर येऊन माझ्याशीं बोला. काय चुकलें माझें ?"

"केवळ एकट्या तुमच्याविषयींच मी नाहीं बोलत."

"साऱ्या कॉंग्रेसविषयीं बोलतां ? बोला. कॉंग्रेसविषयीं बोला. काय चुकलें कॉंग्रेसचें ?"

"कॉंग्रेस चुकत नाहीं. तुम्ही आमचे नेते—"

"बरें; नेते. आम्हांला नेते म्हणा, अनुयायी म्हणा, कार्यकर्ते म्हणा, कांहींही म्हणा. काय चुकत आहे आमचें ? सांगा."

"मला सांगा जयवंत ! कॉंग्रेस आजवर कुणाच्या जिवावर इंग्रजांशीं झगडली ? आपल्या कोटमाप गोरगरीब कष्टाळू रयतेच्या जिवावरच ना ?"

"तुम्हांला आतां कम्युनिस्टांचें वारें लागूं लागलेलें दिसतें शकुंतलाबाई ! तुम्ही बोलतां ही भाषा सत्य-अहिंसेच्या सात्त्विक बळावर वर्गसमन्वय साधणारी गांधीवाद्यांची सर्वोदयकारक भाषा नव्हे. ही वर्गसंघर्षाची आग चेतवणारी कम्युनिस्टांची भाषा आहे."

मला अत्यंत चीड आली जयवंतांचे ते उद्गार ऐकून. मी कम्युनिस्ट मुळींच नव्हत्यें. त्यांनाही तें माहीत होतें. कम्युनिस्ट हे कोणी देशद्रोही पंचमदळे आहेत, ते राक्षस आहेत, भयंकर हिंसक आहेत, असें मी मुळींच समजत नव्हत्यें. इतकेंच काय पण गांधीवाद आणि कम्युनिझम यांत फारसें अंतर आहे असेंही मला मुळींच वाटत नसे. अलीकडे तर पुष्कळदां मला वाटे देखील, कीं कम्युनिस्टांसारखी ज्वलंत जनतानिष्ठा आणि स्वतःच्या मतप्रणालीविषयीं जाज्वल्य अभिमान आम्हां गांधीनिष्ठांच्या ठायीं कां नाहीं येत ?...पण मला जयवंतांची चीड आली, ती कम्युनिस्ट हा शब्द शिवीच्या अमंगळ अर्थानें उच्चारायची खोड त्यांना आजकाल जडली होती त्याची.

"कालपरवांपावेतोंचे निष्ठावंत कॉंग्रेसभक्त आज तुम्हांला कम्युनिस्ट वाटूं लागले, म्हणून त्यांना अनुल्लेखानें मारायचा विडा उचलला आहे वाटतें तुम्हीं ? नऊ ऑगस्ट चळवळींत खरा प्राण कोणीं ओतला ? जनतेनेंच ना ? त्या जनतेला अत्याचारी, हिंसक म्हणून नरकांत लोटायला आज तुम्ही तयार आहां. आपले लोक ते, असें म्हणून त्यांचें फुकटचें कौतुकदेखील करवत नाहीं तुम्हांला. आणि खादीचा पायघोळ अभ्रा पांघरून त्या पांघरुणाखालीं शेतकरी कुळांना पिळणारे जमीनदार, कामगारांना परोपरीनें नाडणारे कारखानदार, राजरोस काळा बाजार करून जनतेचें रक्तशोषण करणारे व्यापारी शेटसावकार मात्र तुम्हांला खरे देशभक्तसे वाटतात !"

"बोला ! बोला ! आज बोलून घ्यायचे तुमचे दिवस आले आहेत." मला जयवंत हंसतमुखानें बोलून बोळवूं लागले.

"नाहींतरी नुसतें बोलण्यापेक्षां आणखी काय हातीं ठेवलें आहे आतां तुम्हीं आमच्या ? आम्हीं तुम्हांला निवडून दिलें; आमच्या मानेला दोरी बांधून मान विश्वासानें तुमच्या हातीं दिली. आतां तुम्ही दरवेशी आणि आम्ही जनता तुमच्या हुकमतीला भिऊन तुमच्या मर्जीप्रमाणें नाचणारीं अस्वलें !" मी म्हणाल्यें.

"तुम्ही फार संतापलां आहां आज शकुंतलाबाई ! तुमच्याशीं बोलण्याची सोयच नाहीं आज. मला तुमची फार भीति वाटते." पुन्हा त्यांची पूर्वीचीच बोळवणीची भाषा सुरू झाली.

"असें हंशावारी नेऊं नका जयवंत ! मी म्हणत्यें तें कांहींतरी बडबडत्यें असें समजूं नका. आमच्या अडचणी ध्यानीं घ्या. उद्यां तुम्ही जमणार आहां ना तुमच्या देशभक्त शेट-सावकारांच्या घरीं ? कॉंग्रेसच्या चळवळीचा—नव्हे, चुकल्यें

मी. चळवळ आतां संपली–आम्हां रयतेवर काँग्रेसनें राज्य कसें करावें हें ठरवायला तुम्ही उद्यां जमणार आहां ना?"

"अं? ही बातमी तुम्हांला कशी कळली?" जयवंत म्हणाले.

जयवंतांना मोठें नवल वाटलें. कारण आजकाल मी त्या मंडळाच्या पूर्वीइतकी विश्वासांत नव्हत्यें. भरपूर पाणी–तें सुद्धां दुधांत पाणी नाहीं, तर पाण्यांत दूध मिसळून–विकायला ठेवावें तसला बहुतेक दरोबस्त काँग्रेसश्रेष्ठींचा आणि जयंत, जयवंत यांसारख्या त्यांच्या चेल्यांचा बनावट गांधीवाद मला मुळींच पटत नव्हता.

जयवंत आणि असेच बरेचसे काँग्रेस पुढारी यांच्याशीं या बाबतींत अनेकवार माझा खारट तुरट सडेतोड वादविवादही झाला होता. मी आणि स्वामी–आम्ही दोघें एका बाजूला, आणि बाकीची सारी मंडळी दुसऱ्या बाजूला, अशा मतभेदाच्या उघड उघड दोन फळ्या दिसून यायचे प्रसंग अलीकडे तर वरच्यावर येऊं लागले होते. त्याचाच दृश्य परिणाम म्हणजे काँग्रेसच्या गोटांतील अशा आपुलकीच्या कार्यक्रमांत मला कधीं सहसा आमंत्रण नसे.

आणि स्वामी तर काय, स्वतः आपण होऊनच काँग्रेसच्या क्रियाशील राज्यकारभारापासून दूर असत.

"कशी कळली ! पण कळली खरी. राजकारणाची चर्चा करायला जमणार असें माझ्यापाशीं तुम्ही कबूल करूं नका पाहिजे तर. पण जे कोणी काँग्रेसश्रेष्ठी उद्यां भेट देतील तिथें तुम्हाला कानमंत्र द्यायला, त्यांना सांगा..."

"काय सांगूं ?"

"त्यांना सांगा कीं काँग्रेस ज्या शिडीनें गांधीजींच्या हाताचा आधार घेऊन इतकी वर चढली, सिंहासनापावेतों जाऊन पोहोंचते आहे, ते हात आणि ती शिडी बेदरकारपणानें धुडकावूं नका. नाहींतर पाहाल तुम्ही, पस्तावायची पाळी येईल."

"नाहीं. तसें नाहीं होणार."

"काय ? काय नाहीं होणार ? पस्तावायची पाळी येणार नाहीं ? तुम्हांला काय वाटतें जयवंत ! जनता इतकी मेलेली आहे ? मेलेल्या मायेचें दूध प्यालेले आहेत सारे चाळीस कोटी लोक ?—"

"हा भावनेच्या आहारीं जाऊन अर्थाचा अनर्थ करीत आहां तुम्ही शकुंतलाबाई ! माझें ऐका—"

" काय ऐका ? आजवर पुष्कळदां ऐकलें आहे. आणि तुम्हीं माझेंही ऐकलें आहे. तुम्हांला काय वाटतें? हे तुमचे नवे सहकारी तुम्हांला तुमचें बूड अधिकारावर स्थिरावूं देतील ? "

" कोणते सहकारी ? कोणते नवे सहकारी आमचे ? "

" हिंदु-मुसलमानांच्या एकीवर विश्वास न ठेवणारे. गांधीजींना आणि काँग्रेसला मुसलमानधार्जिणेपणाचा कांटेरी मुकुट अर्पण करणारे. देशांतील जमीनदार-भांडवलदारांनीं ज्यांना पाठीशीं—"

" ही तुमची नेहमींचीच तक्रार ऐकतों आहें मी आजकाल शकुंतलाबाई ! म्हणूनच मी मघां म्हणालों तेंच पुन्हा म्हणतों कीं तुम्हांला दिवसेंदिवस कम्युनिस्टांचें वारें लागूं लागलें आहे. खऱ्या प्रामाणिक गांधीवाद्याच्या तोंडून असे शब्द कधींच निघणार नाहींत. गांधीजी देखील देशांतील काटेमाप दरिद्रीनारायणांचा कैवार घेताना देशांतील जमीनदारांचें आणि भांडवलदारांचें अशुभ कधीं चिंतीत नाहींत. मला सांगा तुम्ही, काँग्रेसला आजवर भरल्या मुठींनीं कोट्यावधि रुपयांचें गुप्तदान कुणीं केलें ? या धनवान वर्गानेंच ना ? ते सारे लोक जर तुम्ही म्हणतां तसे टाकाऊ –अराष्ट्रीय असते, देशद्रोही असते, तर ते कधीं आमच्या भूमिगत चळवळीला मदत करते असते का ? तुम्हांला कधीं आसरा आणि अन्नपाणी देते असते का ? "

तें ऐकून मीं मनांत म्हटलें, उगीच या गृहस्थाशीं मी एवढी डोकेफोड केली. जयवंतांचा पवित्रा इतका बदलला असेल, सार्वजनिक जीवनांत या बोटावरची थुंकी त्या बोटावर करून दाखविणारे ते इतके निर्ढावलेले बहुरूपी संधिसाधु असतील या थरापावेतों याची मला कल्पना नव्हती.

जरा थांबून ते पुढें म्हणाले, "आपणाला देशांत गरीबही सुखानें राह्यला हवे आहेत, तसेच श्रीमंतही. एकाचें जीवन प्रकाशमान आणि एकाचें अंधारें, एक हंसतो आहे आणि एक रडतो आहे, असली मानवतेच्या तोंडाला काळिमा लावणारी विषमता घातपाती उग्र कम्युनिझमला मानवते; पण गांधीवादाचें तें ध्येय नाहीं. हां ! ह्या धनिकांनीं गरिबांची पिळवणूक मात्र करतां कामा नये. आपण गरिबांच्या निढळाच्या घामांतून निर्माण झालेल्या संपदेचे विश्वस्त आहों. ती संपदा गरिबांकारणेंच खर्च करण्याचें नैतिक बंधन आपणांवर आहे..."

• •

अगदीं नकोनकोशी होऊन गेली मला ती कटकट. संधिसाधु अप्रामाणिक माणसें अशीं उदात्त तत्त्वज्ञानाच्या उंच उंच मानभावी भराऱ्या मारूं लागलीं कीं सरोवराच्या कांठीं मासे पकडायला टपून बसलेल्या बकध्यानासारखीं मला तीं भयंकर दिसतात. त्यांच्या अंतःकरणाचा काबेबाज काळेपणा त्यांच्या गोऱ्या पंखांखालीं झांकलेला स्पष्ट दिसूं लागतो. पाताळाचा थाग लागेल पण यांच्या अंतःकरणाचा थांग लागायचा नाहीं असा नेहमींचाच जयवंतांचा सावध, खोल, पाताळयंत्री स्वभाव. हाच माणूस काल बेचाळीसच्या चळवळींत जमीनदार-शेटसावकारांविरुद्ध पत्रीसरकारचा रांगडा कठोर हल्ला पडद्यामागून चालविणारा एक सूत्रधार. मतलबाला साधेल तेव्हां श्रीमंतांविरुद्ध गरिबांचा कैवार घ्यायचा. मतलबाला साधेल तेव्हां जमीनदारांविरुद्ध उठाव करायला कुळांना चिथवायचा. गुजर-मारवाडी शेटसावकारांविरुद्ध ऋणको कुळाच्या कानांत कॉंग्रेसच्या नांवानें विष ओतायचा. मतलबाला साधेल तेव्हां ब्राह्मणांविरुद्ध ब्राह्मणेतरांचा कैवार घ्यायचा. आणि वरून पुन्हा शुद्ध खादीधारी. कुणाच्या अध्यांत नाहीं कीं मध्यांत नाहीं असा सोज्वळ दिसायचा. वकील म्हणून कुळांचे खटले चालवायचीही तयारी, आणि कुळांविरुद्ध खटले चालवायलाही तयारी.

मनांतून अशी चीड आली,—अशी चीड आली मला त्याच्या त्या तांत्रिक-पणाची, तिथें बसूं देखील नयेसें वाटूं लागलें. असले समाजाचे गुन्हेगार पाहिले, त्यांचे गुन्हे कानांना, डोळ्यांना आणि मनाला सहन होईनासे झाले, कीं वाटूं लागतें, यांना शासन होईल तितकें थोडें. पण यांना शासन करायला आपण असमर्थ आहों अशी आपल्याच दुबळेपणाची जाणीव आपणाला होते, तेव्हां मनाला फार यातना होतात. त्या ज्यानें भोगल्या असतील त्याला कळतील.

मी बळेंच विषयांतर करीत म्हणाल्यें, “ बरें तें राहूं दे. मी गरीब माणूस. दर्याला पल्याण घालायचा आव कशाला आणावा मीं ! पण एक मला सांगा, तुमच्या मोठेपणाचा लाभ तुमच्या आणि तुमच्या मेहुण्यांच्या शेतीवाडीवर हाडें झिजवून जगणाऱ्या तुमच्या शेतकऱ्यांना मिळणार कीं नाहीं ? ”

“ कां नाहीं मिळणार ? अवश्य मिळेल. मात्र एक ध्यानीं ठेवायला हवें त्यांनीं. भलत्याच लोकांच्या नादानें संप करूं म्हणतील, मोर्चे काढूं म्हणतील, अडवणुकीचें धोरण जेव्हां तेव्हां पत्करतील, तर मात्र मी त्यांचा नव्हे. माझ्या कानीं अशा कांहीं गोष्टी आल्या आहेत कीं—फकिरासारखा अट्टल दरोडेखोर खुनी गुंड पोलिसांच्या

हातीं कांहीं केल्या सांपडत नाहीं. याला कारण आमचे हे लोक आहेत. कम्युनिस्टांचा बालेकिल्ला आमच्या शेजारींच आहे हें मला माहीत आहे. शेख,मिरा व त्याचे लाल हस्तक त्या टापूंत फकिराला हाताशीं धरून भुरटेगिरीनें आगलावेपणा करीत बसले आहेत.

"हा मात्र तुमचा वृथा आरोप आहे जयवंत! कम्युनिस्टांची ती लपायची जागा असेल. पण माणसानें कम्युनिस्ट असणें हा कांहीं आज तरी आपल्या कायद्यानें गुन्हा ठरलेला नाहीं. आणि ते आगलावेपणा करतात हें देखील खरें नाहीं. उगीच साप साप म्हणून दोरी धोपटीत आहां तुम्ही ही..."

मला रहावेना म्हणून मी बोलल्यें. पण लगेच जीभ आवरली. मनांत आलें होतें सांगायचें, कीं चळवळींत हाच फकिरा आणि शेख मिरा खेडोपाडींच्या शेतकऱ्यांचीं माथीं भडकवण्यासाठीं तुम्हांला हवा होता. तेव्हां ते देशभक्त होते. आणि आज मात्र ते गुंड झाले!...

"तर मग आजवर कालपरवांपावेतों कधींच धन्यांविरुद्ध कसलीच कुरकूर न करणारा आमचा भोळा सांब शेतकरी आतांच कसा हो खळखळ करूं लागला? तेल मिळेना, न्या मोर्चा. कापड मिळेना, न्या मोर्चा. साखर मिळेना, न्या मोर्चा. पीक पडलें, न्या मोर्चा. जमीनदारांना मी केवळ सज्जन समजतों असें नाहीं. पण—"

"म्हणून का तुम्ही त्या शेतकऱ्यांना बारगळलेले कम्युनिस्ट म्हणणार?"

"आणि तुम्ही नाहीं म्हणणार?"

"वा: ! हा खासा न्याय! माणसानें पोटासाठीं धड अन्न मिळेना म्हणून अन्न मागितलें कीं तो झाला कम्युनिस्ट. नेसायला वस्त्र मिळेना म्हणून वस्त्रें मागितलें कीं तो झाला कम्युनिस्ट. शेत पिकलें नाहीं म्हणून खंडांत सूटसांड मागायला आला धन्यापाशीं कीं तो झाला कम्युनिस्ट, याला जर तुम्ही कम्युनिझम म्हणूं लागलां, माणसानें मरमर कष्ट करून तरी सुखानें जगायला मिळावें म्हणून धडपड करणें हा देखील जर तुमच्या मतानें कम्युनिझम असेल, एवढी विश्वग्रासी भयंकर सांथ जर ही असेल, तर या सांथीपासून तुम्हां आम्हांला कोण हो वांचवणार जयवंत?"

बोलतां बोलतां मीं घड्याळाकडे पाहिलें.

"अकरा वाजून गेले. जयंत कांहीं अजून आले नाहींत." जयवंत जसें कांहीं इतका वेळ आम्ही बोललों त्या गांवचेच आपण नाहीं अशा त्रयस्थ वृत्तीनें संथपणें उद्गारले.

" ते नसतील येणार आतां. पण मी आतां जात्यें..."

' अहिल्या खोलीवर येईल. आणि दरवाजाची किल्ली तर माझ्यापाशीं आहे ' हे शब्द जिभेवर आलेले मीं आळेंबळें गिळून टाकले. मला आतां जयवंतांचा विश्वास वाटेनासा झाला होता. न जाणो ! आतां ' सरकार ' झाल्यांत जमा होते ते. जळीं, स्थळीं, काष्ठीं, पाषाणीं त्यांना जिकडे तिकडे कम्युनिस्टांच्या लाल छाया भेडसावूं लागल्या होत्या.

फकिराला तर त्यांनीं कम्युनिस्ट टरवलेंच होतें. त्यांच्या कम्युनिस्टांच्या व्याख्ये-नुसार अहिल्या तर तेव्हांच कम्युनिस्ट टरली असती. कारण ती दलितांची कैवारी होती. तिचा टावठिकाणा यांना कळणें मला सुरक्षित वाटलें नाहीं.

मी बाहेर पडणार, तोंच मल्लाप्पा धापा टाकीत घाईघाईनें जिना चढून वर येतांना मला आढळला. मीं त्याला पाहिलें. पण त्याचें माझ्याकडे लक्ष गेलें नसावें.

" ताई ! शकुंतलाताई इथें आहेत का ? " जिन्याच्या तोंडीं उभा राहून तो विचारूं लागला.

" काय हो ? " मीं पुढें जाऊन विचारलें.

जयवंतही बाहेर आले.

" डॉक्टरांनीं तुम्हांला आतांच्या आतां सरकारी इस्पितळांत बोलावलें आहे. "

" कां ? " मीं एकदम दचकून विचारलें.

" जयंत जोशींची तुम्हांला भेटायची इच्छा आहे. उशीर करूं नका. "

" म्हणजे ? जयंत इस्पितळांत आहेत ? " जयवंतांनीं विचारलें, " कां ? "

" पोवाड्यांचा शिवाजी चौकांतील कार्यक्रम भयंकर मारामारी होऊन उधळला गेला. जयंत जोशी कम्युनिस्टांच्या कॉंग्रेसविरोधी प्रलापांनीं चिडून उभे राहिले आणि विरोधी भाषण करूं लागले, आणि लोक खवळूं लागले. त्यांच्या मागून अहिल्या-देवींनीं त्यांच्यावर आणि कॉंग्रेसवर भयंकर आग पाखडली. त्यामुळें तर आगींत तेल ओतल्यासारखें झालें. लोक फारच भडकले. तेवढ्यांत अहिल्यादेवींना पकडायला पोलीस आले. लोक तर त्या कार्यक्रमाच्या बैटकीवर धरपकड होऊं द्यायला तयार नव्हते. "

" आणि मग ? "

" जयंत जोशी सरकारी कामांत लोकांनीं अडथळा करूं नये म्हणून लोकांची समजूत करूं लागले. पोलिसांनाही शांत राहायला सांगूं लागले. आणि अहिल्या-

देवींना शांतपणें पोलिसांच्या स्वाधीन होण्याची विनंति करूं लागले.—"

"जयंतांचें हें चुकलें. शुद्ध पंचमदळ्यासारखे वागले जयंत इथें." माझ्या तोंडून ओघासरसे शब्द बाहेर पडले.

बोलतां बोलतां माझी नजर जयवंतांकडे गेली. त्यांना माझ्या शब्दांचा राग आलासें मला त्यांच्या चर्येवरून दिसलें. पण ते कांहीं बोलले नाहींत.

"आणि अहिल्यादेवी पकडल्या गेल्या ?" मीं विचारलें.

"नाहीं. लोक जयंतांवर आणि पोलिसांवर इतके चिडले कीं एकदम चोहीं-कडून आरडाओरड आणि दगडफेक, मारामारी सुरू झाली. पोलिसांनीं लाठीमार केला. तेवढ्यांत कसे नकळे, एकदम त्या भागांतील सारे विजेचे दिवे मालवले गेले. लोकांची पांगापांग झाली. थोड्या वेळानें दिवे आले. तों अहिल्यादेवी कुठें दिसेनाशा झाल्या होत्या. पोलीस त्यांचा माग काढीत आहेत. जयंत मात्र पोलिसांची लाठी लागून कीं कुणाचा दगड लागून नकळे, पण बेशुद्ध स्थितींत रक्तबंबाळ होऊन पडलेले आम्हांला आढळले. आम्हीं आणि पोलिसांनीं लगेच मोटारींतून त्यांना सरकारी इस्पितळांत नेऊन पोंचविलें. मग ते जरा शुद्धीवर आले. पण डॉक्टरांना त्यांच्या प्रकृतीविषयीं फार चिंता वाटते."

"मला कुणीं डॉक्टरांनीं बोलावलें ?" मीं विचारलें.

"होय. पण जयंतांनीं बोलवायला डॉक्टरांना सांगितलें."

माणसाचें मन हें एक अजब गहन गूढ आहे. वादळांत सांपडलेल्या नौके-सारखें तें माझ्या व जयंतांच्या दरम्यानच्या व्यक्तिगत स्मृतींच्या उसळल्या सागरांत हेलकावूं लागलें होतें. मला जयंतांनीं न बोलावतां डॉक्टरांनीं बोलावलें असतें, तर म्हणजे मी गेल्यें नसतें, अशांतली गोष्ट नाहीं.

मध्यरात्र उलटून गेली होती. पण ती वार्ता ऐकून माझी झोंप पार उडाली.

त्याच पावलीं मी इस्पितळाकडे जायला निघाल्यें. जयवंतही माझ्याबरोबर निघाले.

"तुम्ही पुढें चला. मी बिऱ्हाडीं जाऊन याच पावलीं तिकडे येत्यें. अहिल्या-देवी जर आल्या असल्या..."

ते शब्द कानीं पडतांच चमत्कारिक भेदक नजरेनें त्यांनीं माझ्याकडे पाहिलें.

त्यांनीं तसें कां पाहिलें तें माझ्या ध्यानीं आलें. पण मीं तिकडे लक्ष दिलें नाहीं. लक्ष देण्याच्या मनःस्थितींत मी नव्हत्येंच. आपण कुठें चाललों आहों, कां चाललों आहों, याचा विचार करण्याइतकी स्थिरता माझ्या मनाला मुळींच नव्हती.

मन चिंती तें वैरी न चिंती म्हणतात तें खोटें नव्हे. निकटच्या भविष्यकाळाच्या उदरांतील एकाहून एक भयाण देखावे मनांत आभाळासारखे तरळूं लागले होते. मी तशीच कशीतरी कुठेंतरी चालल्यें होत्यें.

"कुठें चालली आहेस तूं? ज्या भयाण अरण्यांतून, तिथें माणुसकीचा ओलावा सांपडेना म्हणून तूं माणसांना शोधीत वणवण करीत एकटीच बाहेर पडलीस, त्याच अरण्याकडे तूं पुन्हा चालली आहेस शकू! मागें फीर! मागें फीर!..."

ही हांक मला अंतराळांतून कुठून तरी ऐकूं येऊं लागली. भांबावल्यासारखी मी अर्ध्या वाटेंत उभी राहून मागें पुढें पाहूं लागल्यें. पण मला कांहीं सुचेना. अंधार! अंधार! सभोंवारचें जग मला अगदीं भकास—अगदीं उजाड अंधाराहून काळें दिसूं लागलें. माझें मलाच कांहीं कळेना. 'कुठें चालल्यें आहें मी?' मी मलाच विचारीत त्या अंधारांतून चांचपडत चालल्यें होत्यें.

सभोंवार, खालीं, वर, सगळीकडे अंधार दिसत होता. त्या अंधारांतून अंतराळांतून मला पुन्हा पुन्हा ती हांक मात्र आकाशवाणीसारखी दाही दिशा घुमवीत ऐकूं येत होती. "मागें फीर! मागें फीर! कुठें चालली आहेस तूं? मागें फीर!"

## ७ : माझा पुनर्जन्म

• • •

आणि जागी होत्यें, तों माझ्या कानीं शब्द पडले, "कुठें चालली आहेस तूं? मागें फीर! मागें फीर!"

मी एकदम भांबावल्यासारखी कान वासून ऐकूं लागल्यें. डोळे वासून पाहूं लागल्यें. तों माझ्या कधीं ध्यानीं मनीं नसलेल्या पण ओळखीच्या नव्याच जगांत मी येऊन पडल्यें होत्यें.

ती शृंगारलेली खोली, त्या भिंतीवरच्या सुंदर सुंदर तसबिरी, तीं कोचें, त्या खुर्च्या...नव्या नव्हे, जुन्या जगांत मी येऊन पडल्यें होत्यें. माणुसकीचा शोध करीत जें जग सात वर्षांपूर्वी सोडलें, त्या जुन्या जगांत मी येऊन पडल्यें होत्यें.

माझें मलाच कळेना, असें कसें झालें ?

तोंच पुन्हा तेच शब्द : "कुठें चालली आहेस तूं ? मागें फीर ! मागें फीर !"

खोलीच्या खिडकीबाहेरून ते शब्द कानीं पडत होते; मी ऐकूं लागल्यें तेव्हां मला भास झाला.

मी झटकन उठून खिडकीपाशीं गेल्यें. तों बागेंत मुलें खेळत होतीं.

"ए वेड्या ! काय सांगतों ऐकलें नाहींस ? मागें फीर अगोदर !" एका आठ नऊ वर्षांच्या मुलानें त्या लहानग्या दुडुदुडु रांगत्या लेकराला दुरून दटावलें.

पण त्या नेणत्या लेकराला त्याचें काय ? तो तसाच दुडुदुडु रांगत बागेंतल्या हिरवळीवर बागडूं लागला.

"वेडाच आहे भरत! अगदीं अक्कलशून्य जडभरत आहे."

"काय ? भरत?"

ओघासरसे शब्द माझ्या मुखावाटे निघाले. नजर तिकडे वळली. मी खोलींत खिडकींत उभी होत्यें. पण नजर आणि नजरेच्या वारूवर आरूढ होऊन मन तिकडे ओढ घेऊं लागलें. धावतां धावतां एकसारखें आसुसून विचारूं लागलें, "भरत? भरत हा? दयाचा भरत हा?..."

"हें रे काय दादा? त्याला रे काय कळतें? लहान बाळांना कांहीं कळतें का?

मी येऊं का खेळायला वेडीवेडीचा खेळ ?" हे बाळमुखांतील कोमल, काशीसे बोबडे शब्द तेवढ्यांत माझ्या कानीं पडले. त्या उरशी नजर तिकडे वळली.

" ये ना ! " त्या गोजिऱ्या नऊ वर्षांच्या मुलानें त्या मुलीच्या हाताला धरून तिला आपणाबरोबर चालवीत म्हटलें, " पण ए करुणा ! जरा कुठें हात लावला कीं कालच्यासारखें रडायचें नाहीं बरें का ? नाहींतर देईन ठेवून अशी एक..."

" करुणा ? "

कान ऐकत होते आणि डोळे पाहत होते. बालावतार घेतल्यासारखी मूर्तिमंत दयाच दिसली ती मला.

" असें रे काय दादा ? मी तुझी आई ना ? आईला असें मारायचें ? "

" अग ! पण आई असलीस तरी माझी वेडी आई आहेस तूं ! आणि शिवाय वेड्यांच्या इस्पितळांत आहेस तूं ! ए आई !... " तो मुलगा म्हणाला.

" अशोक का हा माझा ? "

मी जिवाच्या ओढीनें पाहूं लागल्यें. आईला लेकराची ओळख पटली नाहीं असें कधीं झालें आहे ?

पण मला त्या लेकरांच्या खेळाचा अर्थच कळेना. ही कोण वेडी आई याची ? हा कसला खेळ खेळत आहेत हीं मुलें ?

त्या पांखरांची किलबिल सुरूच होती.

" पण आतां मी वेड्यांच्या इस्पितळांत नाहीं बरें का ? आपल्या बंगल्यांत आहें मी आतां पलंगावर झोंपलेली. आतां वेडी आई नाहीं म्हणायचें मला. शहाणी आई आहें मी आतां तुझी."

" मग शहाणी आई असलीस तर पलंगावरून उठून नीट चालत ये पाहूं माझ्याबरोबर ! चल ! "

मी खिडकींत उभी होत्यें. माझ्याच्यानें राहावेना. मी हांक मारली, " अशोक ! "

त्या हांकेसरसें त्या लेकरांनीं किलकिल्या बाळनजरेनें एकदां खिडकीकडे पाहिलें मात्र, आणि घारीला भिऊन पळणाऱ्या पक्षिणीच्या पिलांसारखीं भयभीत होऊन दूर पळालीं.

मला या मुलांनीं इतकें कां भ्यावें ?

अर्थच कळेना मला त्याचा.

अधिकच बुचकळ्यांत पडल्यासारखी होऊन मी सभोंवतीं पाहूं लागल्यें.

"अहो! कां अशीं पळतां कां?" असें त्या लेकरांशीं बोलत एक म्हातारा बागेंतून पळत पळत रस्त्याकडे जातांना मला खिडकींतून दिसला.

"सोमनाथ हा?" माझ्या मनांत नवी आठवण अंकुरली.

दुडुदुडु रांगत रस्त्यावर गेलेल्या भरताला उचलून कडेवर घेऊन तो म्हातारा माघारा आला. तों त्या दोघां लेकरांनीं कावऱ्याबावऱ्या नजरेनें फिरून फिरून मी उभी होत्यें त्या खिडकीकडे पाहत न पाहत त्याला हळू हळू सांगितलें, "अरे सोमा! वेडी आई उठून बाहेर चालली कीं! ती बघ!"

"वेडी आहें? वेडी आहें मी?"

माझा मलाच प्रश्न पडला.

"अँ!" म्हातारा आश्चर्यचकित मुद्रेनें शोध घेतल्यासारखा पाहत पाहत खिडकीपाशीं आला. टक लावून माझ्याकडे पाहूं लागला.

"सोमनाथ!" मीं हांक मारली. मीं त्याला नीट ओळखलें.

हंसतमुखानें सोमनाथानें विचारलें, "मला तुम्हीं ओळखलें बाईसाहेब?"

"ओळखलें." मी उत्तरल्यें.

"मग कोण कुठचा मी सांगा?"

"परीक्षा पाहतो आहेस तूं माझी?"

"सांगा तर खरें मी कोण कुठचा तो?" असें विचारीत सोमनाथ माझ्या खोलीच्या दरवाजापाशीं येऊन बसला.

मुलें चोरासारखीं भीत भीत त्याच्या पाठीशीं येऊन बिलगलीं. अशोकला काय वाटलें न कळे. तो हंसत टाळ्या पिटीत फुलपांखरासारखा बाहेर पळाला.

अशोक पळत गेला तसा पळत आला. खोलीच्या दरवाजापाशीं हंसरे बाळओठ मुडपून हरणाच्या पाडसासारखा किलकिल्या नजरेनें पाहूं लागला. क्षणांत माझ्याकडे पाही; क्षणांत बागेकडे पाही.

"बाळ! इकडे ये ना! असें भिऊं नये आपल्या आईला बाळ! ये ना!" मीं माझ्या लेकराला हाक मारली.

पण तो आला नाहीं. अधिकच बिचकला.

"असें काय बरें करावें बाळ! तुझी आई नको तुला?" त्या फुलपांखराला आईच्या हातांनीं धरण्यासाठीं मी पुढें गेल्यें.

तों हांक ऐकली, "शकुंतलाताई!"

कानांना हांकेची ओळख पटल्यासारखी वाटली. पण हांक मारणारी व्यक्ति चटकन् ध्यानीं येईना. स्थलांतराच्या आणि कालांतराच्या घडामोडींत अगदीं परिचयाच्या आठवणी आणि ओळखी यांची मनांत अडगळीसारखी उलथापालथ झाली होती.

पण डोळ्यांनीं व्यक्ति पाहिल्यावर ओळख पटली. तो मल्लाप्पा होता. आणि त्याच्याबरोबर मदन करकरे होता.

"या!" मी म्हणाल्यें.

"ओळखलें तुम्हीं आम्हांला!" मल्लाप्पानें विचारलें.

"ओळखलें कीं!" मी म्हणाल्यें. पण मनांत मात्र विचार करीत होत्यें, हे कोल्हापूर सोडून इकडे कशाला आले?

"मग सांगा पाहूं आमचीं नांवें?" मदन करकरे म्हणाला.

माझ्या ध्यानीं आलें, मी खरोखरच शुद्धीवर आल्यें आहें कीं वेडाच्या भरांतच हें सारें चाललें आहे, याची त्यांना खात्री करून घ्यायची होती.

मला त्यांच्या विचारण्याचा राग आला नाहीं. मीं त्यांचीं नांवें सांगितलीं. आणि वर शांतपणानें म्हणाल्यें, "आणखी काय सांगूं?"

मल्लाप्पा हातांतील वर्तमानपत्र वाचण्यांत रंगला होता.

"कुठें आहां तुम्ही? सांगा." मदन मला म्हणाला.

"पुण्यांत सदाशिव पेठेंत. रावसाहेब जोशींच्या बंगल्यांत. आणखी कांहीं?" मीं पूर्ववत् हंसत हंसत विचारलें.

तोंच पांखरांच्या किलबिलीसारखी लेकरांची किलबिल आंतल्या दिवाणखान्यांतून कानीं येऊं लागली.

"कोण बोललें सांग! आई! आई बोलली. कोण बोललें?"

"आऽऽईऽऽ!"

"अरे गुलामा! तुला आई कळते कीं!"

किती प्रसन्न वाटलें ते बाळबोल ऐकून मनाला! मी तशीच त्याच पावलीं उठून आंत गेल्यें, आणि भरताला उचलून कडेवर घेतलें. क्षणभर अशोक आणि करुणा यांनीं घाबरल्यासारखें केलें. नोकरमाणसेंही बुजल्यासारखीं आवतींभोंवतीं रेंगाळत होतीं. मुलांना, मोठ्या माणसांना, सर्वांना माझ्याकडे पाहून पहिल्या क्षणीं भय वाटलें असेल, वेडाच्या भरांत बाई मुलाला कुठें फेंकून बिकून देतात कीं काय? कीं त्याचा गळा दाबतात? कीं काय करतात?...

पण मौज अशी कीं सारी भय-भीति मोठ्या मुलांना आणि मोठ्या माणसांना. चिमुरड्या भरताला त्यांतलें कांहीं नाहीं. मीं त्याला हातीं घेतलें, झेललें, त्याचे पापे घेतले, तरी तो आपला हंसत खिदळत होता.

वाटलें, आतां तरी मला पाहून माझी परीक्षा करायला आलेल्या माझ्या मित्रांची, ही आतां वेडी नाहीं, पूर्ण शुद्धीवर आली आहे अशी, खात्री पटेल. म्हणून तशीच भरताला घेऊन बाहेर गेल्यें.

मल्लाप्पा वर्तमानपत्रांतील मजकूर आपल्या मित्राला वाचून दाखवीत होता.

> ...महात्मा गांधी देखील भारताची अशी चिरफाड करून आपल्या पूज्य भारतमातेचें शीर धडावेगळें झालेलें पाहायला अगदीं विरुद्ध होते. हरिजनच्या ता. १ जूनच्या अंकांत त्यांनीं याबद्दल तीव्र व स्पष्ट शब्दांत आपली पाकिस्तानच्या अशुभ व अनर्थकारक योजनेला निर्धारपूर्वक नापसंती दाखविली आहे. ते म्हणतात, 'प्रांतांप्रांतांची विभागणी करून मागणें म्हणजे पाकिस्तानच्या मागणीसमोर मान नमविणेंच होय. नाहींपेक्षां पाकिस्तान वेगळें अस्तित्वांत येणार असेल तर बंगाल व पंजाब यांची ही विभागणी त्याच मापानें झाली पाहिजे अशी मागणी करण्याऐवजीं निर्धारानें घोषित करायला पाहिजे होतें कीं **नाहीं. माझा भारत अखंड आहे आणि अखंडच राहील. या जगांतील कोणतीही शक्ति भारताचीं शकलें करूं शकणार नाहीं.**'

तोंच अमान्यतादर्शक मान हेलावीत मदन करकरे म्हणाला, "तरी देखील तूं म्हणतोस त्यावर मी विश्वास ठेवायला तयार नाहीं. कारण एक जूनच्या आपल्या उद्गारांचे ध्वनि प्रतिध्वनि हवेंत हेलकावे खात असतांनाच काँग्रेसनें पाकिस्तानचा भस्मासुर निर्माण होण्यासाठीं संमतीचा शुभाशीर्वाद दिला; व महात्मा गांधींनीं आमच्या भारतमातेचा असा दिवसाढवळ्या जाहीरपणें खून करणाऱ्या खुनींना खुनाच्या घोर पातकाबद्दल मौनसंमतीनें अभय दिलें. भारतमातेचा आतां परवां पंधरा ऑगस्टच्या दिवशीं काँग्रेस आणि मुसलमान असे दोन क्रूरकर्मे मारेकरी समारंभानें खून करणार आहेत, तिचें शीर धडावेगळें करणार आहेत, म्हणून

दुःखातिरेकानें आपलें नेहमींचें आवडतें प्राणांतिक उपोषणाचें शस्त्र गांधींनीं बरें उगारलें नाहीं! तें कांहीं नाहीं. मी तर म्हणेन कीं माझ्या पूज्य भारतमातेचा असा निर्दयपणें खून करणाऱ्या खुनी अपराध्यांत गांधी हा पहिल्या क्रमांकाचा अपराधी आहे. हें ओळखून परमेश्वरानें त्या अपराध्याला प्रथम व कठोरांत कठोर शासन केलें पाहिजे..."

पूज्य गांधीजींविषयीं इतकें जळजळीत बोलणें ऐकून माझ्या अंतःकरणाला वेदना होऊं लागल्या. पण मला त्याचा अर्थच कळेना! पाकिस्तानची मागणी पुढें केव्हां आली? मान्य केव्हां झाली? आणि कॉंग्रेस मंत्रिमंडळें तरी केव्हां अस्तित्वांत आलीं?..."

मी आज आहें तरी कोणत्या काळांत हें अजमावून पाहण्यासाठीं मीं बाजूला मेजावर पडलेल्या वृत्तपत्राचा तारीख वार पाहिला—तों **तारीख एक ऑगस्ट एकोणीसशें सत्तेचाळीस!**

आणि मुंबई सरकारचे मंत्री नामदार जयवंत निर्वाण व नामदार जयंत जोशी यांचीं शनवारवाड्यापुढील भव्य पटांगणांत टिळक पुण्यतिथीनिमित्त 'आज लोकमान्य टिळक आपले नेते असते तर...' या विषयावर जाहीर भाषणें होणार होतीं.

केवढा दीर्घ काल जगांत जिवंत असून मेल्यासारखी होत्यें मी ही!

"ह्या दीड दोन वर्षांत काळ खूप पालटला आहे नाहीं?" मी त्या माझ्या दोघां मित्रांना म्हणाल्यें.

"पालटला आहे तर! मायभूमीचीं शकलें करणारे, अखंड भारताचा द्विखंड भारत करणारे निगरगट्ट धुवट देशद्रोही आज राज्यकर्ते म्हणून देशाच्या बोकांडीं बसले आहेत. आणि अखंड भारताचे—आपल्या पूज्य राष्ट्राचे—पूज्य भारती हिंदु-धर्माचे आणि पूज्य भारतीय संस्कृतीचे कट्टे कैवारी आज देशांतल्या देशांत वनवासी आहेत. सिंह झोंपीं गेला आहे असें पाहून कोल्ह्यांनीं कोल्हेकुई चालविली आहे."

आम्ही आंत याप्रमाणें बोलत बसलों आहों, तों बाहेर हर्षभरित झालेल्या सोमनाथाची आणि इतर नोकरांची साहेबांना फोन करा, पेढे आणवा, अशी मारे तारांबळ चालली होती.

"बरें आम्ही घेतों रजा आतां शकुंतलाबाई! आज प्रथमच तुम्ही या नव्या जगांत येत आहां, म्हणून अधिक बोलून तुम्हांला त्रास देत नाहीं. क्षमा करा हं!

अशोकनें धावत येऊन सांगितलें म्हणून आनंदानें पाहायला आलों. गैरसमज करून घेऊं नका."

असा त्या भेटीचा समारोप करून ते दोघेही बाहेर पडले. मी एकटीच.

आणि तेवढ्यांत नामदार जयंत जोशी यांची मोटार येऊन रस्त्यावर उभी राहिली.

कशी भेटूं आतां यांना मी ?

काय बोलूं ?

कोणत्या नात्यानें बोलूं ?

पतीची पत्नी म्हणून ?

मुलांची आई म्हणून ?

—ह्या स्वतःच्या प्रश्नांना स्वतःकडून उत्तरें मिळण्यापूर्वीच जयंत मोटारींतून उतरले ते माझा कुशल समाचार घेत हंसतमुखानें आंत आले.

कोणत्या नात्यानें नकळे; पण मींही स्वाभाविकपणेंच हंसतमुखानें त्यांचें स्वागत केलें.

• •

दिवसांमागून दिवस जाऊं लागले. वेडी आई मुलांना आवडूं लागली; व आईलाहि मुलांचें नवें वेड लागलें. मुलांचा सहवास आणि फुलांचा सहवास कुणाला नकोसा असेल ! तो जितका व्हावा त्याहून अधिक हवासा वाटतो.

आणि तशांतून एक परीनें वाऱ्यावर पडल्यासारखीं आईविणें पोरकीं मुलें. तीं माझ्यांत रंगलीं होतीं; मी त्यांच्यात रंगल्यें होत्यें.

वेडाच्या प्राणसंकटांतून मी चांगली बरी झाल्यें असें माझें मला पहिल्याच दिवसापासून वाटत होतें. पण जयंतांची आणि इतरांची खात्री पटत नव्हती. सर्व वैद्यकीय तपासण्या झाल्या. डॉक्टरांनीं वेडाचें अथवा आजाराचें मूळ हरळीच्या मुळीसारखें शरीरांत कुठें खोल रुतून बसलें आहे का आपल्या शास्त्रीय ज्ञानाच्या दिव्यावातींनीं शोधून पाहिलें.

दहा बारा दिवस ही चिकित्सा चालली होती.

अखेर त्या दिवशीं सर्व डॉक्टरांनीं मिळून एकमतानें निर्णय जाहीर केला.

माझी प्रकृति अगदीं निर्दोष आहे असा निर्णय ज्या दिवशीं लागला, त्या दिवशीं

ती आनंदाची वार्ता मला कळवून आपल्या कचेरीकडे जातां जातां जयंत मला म्हणाले, "शकू! मातृपदाला शोभण्याइतकी तुझी प्रकृति आतां निर्दोष झाली."

ते शब्द ऐकून मी मनांतल्या मनांत ओशाळल्यें. अशिष्ट असें कांहीं जयंत बोलले नाहींत खरें. पण तें त्यांच्या जगांतील शिष्टपणाला शोभणारें असलें तरी माझ्या जगांतील शिष्टपणाला शोभेना. स्त्री-पुरुषांनीं एकमेकांकडे केवळ नर आणि मादी याच दृष्टीनें पाहावें का? आपल्या जीवनाला याहून उजळ, याहून निर्मळ असें दुसरें अंगच नाहीं का?

माझी अपेक्षा होती कीं जयंतांनींच काय पण साऱ्याच लोकांनीं माझ्याकडे निराळ्या विशाल दृष्टीनें पाहावें. स्त्री असो कीं पुरुष असो, माणसानें माणसाला माणूस म्हणून ओळखावें. आदर माणसानें माणसाविषयीं बाळगावा. नाहीं तरी पति-पत्नी आम्ही एकदां होतोंच. तो पाश तरी मीं केवळ माणुसकीच्या लोभानेंच तोडला होता ना?

जयंतांच्या तें ध्यानींमनींही नसेल, आणि मीही तें कधीं कुणाला सांगत नसें. सांगण्याची इच्छाही नसे माझी. पण मी जयंतांबरोबरचें संसारी जीवन कांहींशा निष्ठुरपणानें खंडित करून घराबाहेर गेल्यें, सोपानाच्या संगतींत राहिल्यें, ती सोपाना केवळ प्रियकर म्हणून नव्हे, केवळ पुरुष म्हणून नव्हे, आणि केवळ नर म्हणून तर नव्हेच नव्हे. माणुसकीचा ठेवा मला त्याच्या ठायीं गवसला होता, म्हणून मीं त्याच्यासाठीं एवढा जीव सांडला होता.

जयंतांनींही जर थोर मनानें मला सहकारी माणूस म्हणून आपल्या जीवनांत आसरा देऊं केला असता, तर त्यांत भूषण त्यांनाही होतें; मलाही होतें.

आमच्यापुढें कार्यांचे विशाल पर्वत पडले होते. हे पर्वत आतां पूर्वींच्याहून प्रचंड वाढले होते. इतकेंच नव्हे तर त्यांवर आणि सभोंवार निबिड अरण्यें वाढलीं होतीं. त्या अरण्यांतून परोपरीच्या हिंस्र पशूंसारख्या उग्र प्रवृत्ति आपल्या पाशवी शक्तीचें हिंसामय अधिराज्य स्थापूं पहात होत्या.

आपण एकमनानें एकजिवानें भारतमातेच्या भाग्याचे शिल्पकार होऊं या, तिच्या प्रगतीचा कांट्याखुंट्यांनीं ओरबाडलेला अवघड मार्ग बेणा करूं या, असें कां नये येऊं त्यांच्या मनांत? गांधीजींच्या सत्याग्रही सैनिकांतले सैनिक आम्ही ना? आम्हांला सत्याचा आग्रह सोडतां येतो?

बाकी, तो स्वयंसैनिकी बाणा आणि ती निष्ठा आतां आमच्यांत फारशी कुठें

दिसेनाशी झाली होती. ज्याला त्याला वाटूं लागलें होतें कीं आपलें युद्ध संपलें. भारतमाता आतां स्वतंत्र झाल्यासारखीच आहे. सरकार आतां आपलेंच आहे.

परवां पंधरा ऑगस्ट १९४७ उजाडणार !

भारतमाता स्वतंत्र होणार !

आपण भारतमातेचा जयजयकार करणार !

" छे ! अशी आपण आपली आणि आपणाबरोबर जयंतांची फसवणूक करतां कामा नये. शक्य तितक्या लवकर आपण या कोंडवाड्यांतून बाहेर पडावें; आणि आपल्या सावरगांवाला निघून जावें. आपली कर्मभूमि ती. " त्या दिवशीं मीं मनाचा निश्चय केला.

विचार केला, कीं माझा तो निश्चय अगदीं प्रथम मीं जिव्हाळ्यानें सोमनाथपाशीं बोलून दाखवावा. माणसाला आपल्या मनांतील गोष्टी कुणातरी विश्वासांतल्या, जवळच्या माणसापाशीं बोलून हृदयावरचा भार हलका करतां आला तर करायला हवा असतो.

सोमनाथ हा एवढाच एक मला वडिलांहूनही पूज्य आणि प्रेमळ असा जिव्हाळ्याचा माणूस तिथें होता. ह्या गेल्या अकरा बारा दिवसांत मी कुणापाशीं सुखदुःखाच्या गोष्टी बोलाव्याशा वाटल्याच तर त्याच्यापाशीं काय त्या बोलाव्या. पण तो मात्र माझ्याशीं फार बोलत नसे. माझ्या आयुष्यांतील सारे काळेगोरे टप्पे त्याला चांगले माहीत होते. मला त्याच्यापाशीं मनांतलें कांहींही बोलायला संकोच वाटत नसे.

पण त्याला मात्र माझ्याशीं बोलायला संकोच वाटायचा.

मी गेल्या दहा अकरा दिवसांत कितीतरी परींनीं त्याला बोलता करायचा प्रयत्न करीं. पण तोच बोलायचा नाहीं.

● ●

त्या दिवशीं बंगल्यांत मी आणि सोमनाथ यांच्याखेरीज कोणीही नव्हतें. मुलेंही पलीकडच्या बंगल्यांत खेळायला गेलीं होतीं.

अशोक शाळेंत गेला होता.

सोमनाथ बागेंतील हातानें शेवंतीचा वाफा साफ करीत तोंडानें आपल्या त्या कोणा इष्टमित्राशीं गोष्टी करीत होता.

सहज माझें तिकडे लक्ष गेलें. मनाची नजर घारीसारखी असते. जगदाळे जहागीरदारांचें नांव त्या माणसाच्या तोंडून निघालेलें ऐकूं आलें, त्याबरोबर मला न विचारतांच माझे कान टवकारून ऐकूं लागले.

"लोक म्हणतात कीं महाराज हा रामदास आणि जहागीरदार हा शिवाजी."

"खरेंच असें म्हणतात लोक?"

"महाराजाचे हस्तक खुळ्या भोळ्या शेतकऱ्यांच्या डोक्यांत भरवून देतात; मग पुष्कळांना तें खरेंच वाटतें."

"आणि खरें वाटलें नाहीं तरी खरें मानावें लागत असेल."

"तर! न मानून काय करणार? मानणार नाहींत त्यांचा कांटा काढायला गांव-दादासारखे गांवगुंड आहेत आणि महाराजाचे चेले आहेत. आणि काय वाटेल तें केलें, वाटेल ते सारे अपराध केले, चोऱ्यामाऱ्या केल्या, खूनदरोडे घातले, लोकांच्या बायकापोरी पळवल्या, नको असलेल्या लोकांचीं उभीं पिकें जाळलीं, घरें गोठे जाळले, तरी मंत्री घरचाच असल्यावर दाद कसली लागते!"

"पण काय रे! इतके खुळेवेडे आहेत लोक?"

"लोक खुळेवेडे नाहींत. लोक अगदीं सरळ, साधे, प्रामाणिक आहेत. पण त्यांच्या सरळपणाचा भलताच फायदा महाराजासारख्या धूर्त कावेबाज माणसाला आणि त्याच्या हस्तकांना अचूक घेतां येतो. आतां आणखी हें पाकिस्तानाचें जळतें कोलीत महाराजाच्या हातीं मिळालें आहे. त्या कोलितानें तर तो लटक्या हिंदु धर्माभिमानाची चूड पेटवून त्या चुडीनें तिकडच्या हिंदु-मुसलमानांत तेढीच्या आगी लावीत सुटला आहे. आतां तूं तिकडे जाऊन पाहा! पूर्वी जसे हिंदु-मुसलमान एकमेकांच्या गळ्यांत गळा घालून गुण्यागोविंदानें तिथें वागत असत, तसे आतां वागत नाहींत. आतां एकमेकांना पाण्यांत पाहतात."

"आणि आपल्या भारती स्वामींवर त्यांचा दांत आहे म्हणतात. तें खरें?"

"खरें म्हणजे? आतां त्या टापूंत स्वामींविषयीं पूर्वीसारखा आदर मुळींच राहिला नाहीं रे सोमनाथ!"

"हें मात्र मी खरें नाहीं मानायचा. मला माहीत आहेत त्या लोकांचे सारे गांवगुंडी आडाखे आणि तडाखे. बेचाळीस सालापासून तीन वर्षें एकसारखी रात्रंदिवस पायांना भिंगरी बांधल्यासारखी पायपिटी केली आहे ना आम्हीं पत्री सरकारच्या राज्यांत. तुमची स्वारी तेव्हां यात्रा करीत हिंडत होती. आज काशीला

तर उद्यां रामेश्वरला तर परवां पंढरपूरला. असें आहे, तुम्ही शहाणीं सुरतीं माणसें ना? तुम्हांला चांगलें लिहितां वाचतां बोलतां येतें ना? म्हणून आम्हां अबोल अडाणी लोकांच्या नांवावर तुम्हीं वाटेल तें बोलावें. आणि ठोकून द्यावें कीं साऱ्या रयतेचें हें मत आहे..."

"बाकी, सरकारला हाताशीं धरून या लोकांनीं कम्युनिस्टांचा मात्र चांगलाच कांटा काढला त्या टापूंत."

"अरे, त्या टापूंत कां म्हणतोस? साऱ्या देशांत. तेवढ्यापुरते मात्र हिंदु, मुसलमान, पांढरी टोपीवाले, काळी टोपीवाले, भगवी टोपीवाले, सारे एक."

"चुकतोस तूं. सारे एक नाहींत."

"शेख मिरा सांगतो तसें? जमीनदार कारखानदार शेटसावकार तेवढे एक?"

"तर? कारण हे बेटे कम्युनिस्ट हिंदु ओळखीत नाहींत कीं मुसलमान ओळखीत नाहींत. ते म्हणतात पुंजीपति तेवढे सारे एक."

"म्हणूनच सारे हिंदु-मुसलमान जमीनदार कम्युनिस्टांना चेचून काढण्यापुरते गट्टीनें वागतात. तुला एक गंमत सांगूं यांची? परवां मला कळली.—त्या वनमाळीं-बरोबरच्या पोरगीची. तिची खूप मोठी इस्टेट आहे म्हणे. पुष्कळ जमीनजुमला आहे, लाख पन्नास हजारांचें सोनें नाणें आहे, साखरेच्या गिरणींत भागीदारी आहे, तिला आपल्या पंखांखालीं ओढायची तो जगदाळे जहागीरदार आणि त्याच्याच शेजारचा तो इसुफखान देसाई इनामदार यांची चोरटी चढाओढ लागली आहे. आणि तें प्रकरण इतक्या थराला गेलें आहे म्हणतात—इकडे कान कर म्हणजे सांगतों..."

"...असें? आणि इतकें करून सवरून पुन्हा आमचे दिवाण आपले नामानिराळे. मेहुण्याच्या आणि सासऱ्याच्या पोटांत यांचें पोट असेल का?"

"तें कांहीं विचारूं नकोस."

"बरें येतों आतां.—खरें सोमनाथ! तुला एक गोष्ट शेख मिरानें मुद्दाम सांगितलेली सांगायची राहिली. तुझें तें येरवड्यांतलें कोणचेंसें कॉंग्रेसचें झाड?"

"बरें मग?"

"तें शेवटीं तुझ्या कॉंग्रेस सरकारनेंच तोडवलें, असें तुला मुद्दाम सांगायला शेख मिरानें सांगितलें आहे."

"होय? खरेंच तोडलें?"

" तर रे ! अगदीं पोकळ झालें होतें. किती किती साप विंचू घर करून राहायचे त्यांत. आणि माणसांना डसायचे. त्या दिवशीं ार म्हणे तिथें कुणी काँग्रेस दिवाण तुरुंग पहायला आला होता, त्याच्यावरच एक साप झाडांतून फुसफुसला. तसाच एकदां जेलरचा पाय त्या झाडाखालीं एका सापाच्या शेपटीवर पडला. साप लगेच काँग्रेसच्या झाडाच्या ढोलींत जाऊन गडप झाला. तो साप तरी असला जहरी दावेदार—दोन दिवसांनीं जेलरसाहेब पुन्हा तिन्हीसांजांना त्या झाडाखालून निघाला तेव्हां एकदम झाडातळीं असलेल्या बिळांतून फुत्कारत आला जेलरसाहेबाला डसायला. . ."

" डसला ? "

" डसला नाहीं. थोडें चुकलें. त्याची झेप चुकली. नाहींतर डसायचाच. बरोबर दोन वार्डर होते जेलरसाहेबाच्या. त्यांनीं हातांतल्या दांडक्यांनीं चेंचून ठार मारलें मग त्या सापाला. "

" नाहीं तरी फारच पोकळ झालें होतें झाड. वठूं लागलें होतें अलीकडे तें म्हणे ?"

" होय. म्हणूनच परवां शेख मिरा भेटला तो म्हणाला मला, आतां सोमनाथ भेटला कीं त्याला विचार, आतां तरी तुझें काँग्रेसचें झाड तोडायला हवें होतें कीं नको होतें ? "

" नको होतें कसें ? तोडायला हवेंच होतें. "

" पण शेख मिरा सांगत होता, कीं तूंच तुरुंगांत होतास तेव्हां तें झाड तोडूं द्यायच्या विरुद्ध होतास. गेल्या दहा वर्षांत चार कैदी साप चावून मेले त्या आवारांत. तें पाप सोमाच्या कपाळीं आहे असें शेख मिरा हंसत हंसत म्हणाला. "

तोंच मी बागेंत आलेली पाहून सोमनाथचा दोस्त वाऱ्यासारखा पळाला.

तो मला पाहून इतका भिऊन कां पळाला असेल हें मीं तेव्हांच अंदाजानें ओळखलें. भूमिगत असलेल्या व त्यांना पकडून देण्यासाठीं नुक्तींच आठ दिवसांपूर्वी काँग्रेस सरकारनें बक्षिसें जाहीर केलेल्या भूमिगत चळवळ्यांपैकीं शेख मिरा एक होता. अशा भूमिगत लोकांशीं जानपछान ठेवणारा माणूस त्यांतलाच असणार हें उघड होतें.

आणि हा काँग्रेससरकारच्या एका मंत्र्याचा बंगला होता !

त्या झाडाची कहाणी ऐकून आमचा सदतीस सालचा तुरुंगवास मला आठवला. जयंत जोशीही तेव्हां येरवड्याच्या तुरुंगांत होते. कट्टे गांधीवादी काँग्रेसनिष्ठ तरुण पुढारी म्हणून ते ओळखले जात होते.

आणि सोमनाथही गांधींचा कट्टा अभिमानी होता. आपण ज्या तरुण देश-भक्ताच्या पायांपाशीं तुरुंगांत गांधीजींच्या कॉंग्रेसची शिकवण घेतली, जो देशभक्त उद्यां कॉंग्रेसचें राज्य झाल्यावर आपणां सर्वांचें दैन्य लयाला नेईल असा सोमनाथां-सारख्यांचा ज्याच्या ठायीं अढळ विश्वास, त्याच्याच आवारांत त्यांना आपल्या दुःखांना वाचा फोडायचा धीर होत नव्हता !

इतका काळ बदलला होता.

सत्तालोलुप कॉंग्रेस इतकी जनतेपासून दूर गेली होती.

मी, खरें म्हणजे मनांतून शरमून आपण जणूं त्या गांवचीच नाहीं, आपण कांहीं जणूं ऐकलेंच नाहीं, असें दर्शवीत पुढें गेल्यें.

## ८ : ऋणानुबंधाच्या भेटीगांठी

● ● ●

सोमनाथ पुन्हा बागेंतील शेवंतीचा वाफा साफसूफ करूं लागला.

"सोमनाथ बाबा!" मीं हांक मारली.

"काय बाईसाहेब?" सोमनाथनें हातांतील खुरपें खालीं ठेवीत विचारलें.

"मी जाणार." मी म्हणाल्यें.

तें ऐकून तो माझ्याकडे काम थोपवून टकमक पाहूं लागला.

"खरेंच जाणार मी सोमनाथ! तुला खोटें वाटतें का?"

"जाणार?"

"होय."

"कुठें जाणार?"

"माझ्या घरीं."

"तुमच्या घरीं?"

"होय. माझ्या घरीं."

"म्हणजे कुठें?"

"सावरगांवला! तुला नाहीं सांगितली आमच्या सावरगांवची गोष्ट?"

"खरेंच जाणार?"

"तर! नको जायला का रे? तूंच सांगत होतास ना, तो टापू पार बिघडला आहे आजकाल म्हणून? माणसें माणसांना खायला उठल्यासारखीं वाटतात तिकडे, तूंच तर परवां सांगत होतास!"

"होय सांगत होतों. खरेंच तें. पण माणसें माणसांना खायला आज कुठें उठलेलीं दिसत नाहींत; मला सांगा! बाईसाहेब! इतके दिवस मी बोललों नाहीं तुमच्याशीं इतक्या मोकळेपणानें. म्हटलें, कुणाला आवडेल तर कुणाला आवडणार नाहीं. आमच्या साहेबांचा आहे आमच्या मंडळीवर राग."

"तुमच्या मंडळीवर?"

"होय. बोलणार नाहीं तुम्ही साहेबांपाशीं? तर सांगतों."

"नाहीं बोलणार."

"माझ्या गळ्याची शपथ आहे तुम्हांला."

"तुझ्या गळ्याची शपथ नाहीं बोलणार. सांग मला. कुणावर आहे साहेबांचा राग?"

"साहेबांचा एकट्याचाच नाहीं. सरकार हें यंत्राच्या चाकासारखें असतें ना हो बाई?" सोमनाथ माझ्या मनांतील आशय माझ्या मुद्रेवरून अजमावीत म्हणाला, "साहेबांच्या मनांत असेलही दयामाया आमच्या लोकांविषयीं. पण सरकारच्या मनांत नाहीं ना! हें जरा चमत्कारिकच नाहीं का हो दिसत बाई! पारा सोन्याला खातो, तसा सरकारीपणा माणसांतल्या माणसाला खातो का?"

सोमनाथ अशिक्षित शेतकरी खरा. पण स्वतःला नकळत अतिशय सुजाणपणानें बोले. अशा सुजाण व केल्या सवरल्या पण सामान्यतः क्षुल्लक गणल्या जाणाऱ्या लोकांचीं मनोगतें म्हणजे जनतेच्या अंतःकरणाचे कवडसेच होत.

सोमनाथच्या मनांत काय डांचत होतें त्याचा मला अंदाज होता. तरी देखील एकवार त्याच्या अंतरंगाची खोली अजमावून पाहावी या हेतूनें मी म्हणाल्यें, "कां रे चिडला आहेस सरकारवर एवढा तूं आज सोमनाथ?"

गडी सहसा कुणाशीं अचावचा खुल्या मनानें बोलायचा नाहीं. पण एकदां बोलूं लागला कीं मध्यें कसला म्हणजे कसलाच आडपडदा ठेवायचा नाहीं. मग उगीच कुणाचें भय भीति, मुर्वत—ऊंः हूंः! कांहीं म्हणजे कांहीं नाहीं.

"असल्या कारभारानें आमच्या सरकारचा नाहीं पल्ला येणार बाई! नाहीं पल्ला येणार. लोकांचें सरकार म्हणतां आणि लोकांच्या मुंड्या मुरगळणाऱ्यांना डोकीवर घेऊन नाचतां. आणि आमच्या लोकांनीं एवढी चळवळ पेटवली, एवढें इंग्रजाला सळो कीं पळो करून सोडलें, साताऱ्याच्या टापूंत तर इंग्रजी राज्य होतें कीं नव्हतेंसें करून टाकलें, ते आमचे लोक आज गुन्हेगार चोर दरोडेखोर खुनी झाले काय?"

"अरे पण मंत्रिमंडळांत आहेत ना आपलेच जयवंतराव निर्वाण? कां नाहीं तुम्ही लोक तुमचीं गाऱ्हाणीं त्यांच्या कानांपावेतों नेत?" मी म्हणाल्यें.

साताऱ्यांतील व साताऱ्याबाहेरील भूमिगत असलेल्या प्रबळ चळवळ्या गटांच्या पुढाऱ्यांना प्रसन्न करण्यासाठीं जयवंतरावांना मंत्रिमंडळांत घेण्यांत आलें हें अलिखित सत्य अनेकांना माहित होतें.

"अगदीं नांव काढूं नका त्यांचें माझ्यापाशीं. मी ओळखतों त्यांना चांगला.

तेल ओतून हिलाल पेटवावा तसा फकिराचा हिलाल कुणीं पेटवला ? सांगा बाई ? कुणीं पेटवला ? त्याच्या ऐन चळवळींत शंभर शंभर बैलांच्या गाडींतून खेडोपाडीं मिरवणुका काढायला कुणीं लावल्या ? जाईच्या पायांतळची धूळ देवीचा अंगारा म्हणून खेड्यांतल्या लोकांच्या बैटकींत जाईला चांगभले करणारा माणूस हा ! आणि तोच आतां दिवाण झाल्याबरोबर हत्यारबंद पोलिसांचे लांडगे त्यांची शिकार करायला सोडतो. ”

“ काय ? जाईच्या देखील पाळतीवर आहेत पोलीस ? ”

“ सांगतों काय तर ! हे पोलीस लांडगे जाईला धरायला टपले आहेत, फकिराला धरायला टपले आहेत, शेख मिराला धरायला टपले आहेत, अहिल्याला धरायला टपले आहेत. धुमाकूळ चालवला आहे त्यांनीं सातारा–सांगली–कोल्हापूरच्या भागांत. माझा एक दोस्त सांगत होता, यांची कुणीं नुसती पाळत सांगितली तरी बक्षीस पंचवीस रुपये काय पन्नास काय ! ”

“ अस्सें ! आणि तूंच तेवढा बरा सुटलास रे ? ” मीं विचारलें.

सोमनाथ अगदीं जवळ येऊन वांकून माझ्या कानाशीं तोंड नेऊन म्हणाला, “ तेवढ्यासाठीं तर चोराच्या घरांत बिऱ्हाड केलें आहे. या घरचाच मी नोकर असल्यावर मला पकडायची कुणाची छाती आहे ! पण साहेब कांहीं केल्या जाई-वरचें पकड वारंट मात्र मागें घ्यायला तयार नाहींत. मी म्हणतों, तिला एकदांची गोळ्या घालून ठार करतील तरी बरें. पण तिला कुठें अन्न मिळूं नये, पाणी मिळूं नये, घर दार आसरा मिळूं नये, असली ही काय माणसांची शिकार चालवली आहे कॉंग्रेसच्या पोलिसांनीं ? ”

थोडा वेळ तो तसाच लेकीच्या छळाविषयींच्या दुःखानें आणि संतापानें आंतल्या आंत धुमसत होता.

मी मुकाटपणें जवळच उभी होत्यें. सोमनाथनें सावरगांवकडची जी हकीकत सांगि-तली, ती ऐकून शंभर इंगळ्या डसल्यासारख्या वेदना माझ्या मनाला होत होत्या.

बिचारी गरीब साधीभोळी शेतकरी रयत ! कुणाकडे दाद मागावी तिनें ? आमच्या शब्दांवर विश्वासून शेतकऱ्यांनीं कॉंग्रेसच्या चळवळीसाठीं तोंडचा घांस काढून दिला. पोटचीं मुलें देशासाठीं धारातीर्थीं बळी द्यायला दिलीं. सरकार आम्हां कार्यकर्त्यांच्या नरडीचा घोट घ्यायला टपलें होतें तेव्हां आम्हांला आपल्या झोंपड्यांतून आसरा दिला. अन्नपाणी आच्छादन दिलें. त्या माझ्या शेतकऱ्यांची

शुभ्र खादीचा अभ्रा पांघरून काँग्रेसनिष्ठ देशभक्त म्हणून मिरविणाऱ्या जगदाळे जहागिरदारांसारख्या राक्षसांना साळसूदपणानें ससेहोलपट करूं देऊं मी !

बराच वेळ सोमनाथ त्या एकुलत्या एका लेकीच्या आठवणीनें कष्टी होता. दोन्ही हातांनीं त्यानें आपलें मस्तक घट्ट दाबून धरलें होतें.

" तूं देखील अगदीं वीस सालापासून फार फार यातना भोगल्यास देशासाटीं, नाहीं रे सोमनाथ ? " माझ्या तोंडून ओघासरसे उद्गार निघाले.

" होय. पण अळवावर पाणी पडल्यागत वाया गेल्या त्या साऱ्या यातना. " तो हायसा एक उसासा सोडीत म्हणाला, " बरें; बाई ! तुम्ही खरोखरच जाणार का मग ?"

" खरोखरच जाणार मी सोमनाथ ! हें घरसें मला वाटत नाहीं रे ! त्याला मी तरी काय करूं बरें ! "

" बाई ! "

सोमनाथ ऊर दाटून आल्यासारखा घोगऱ्या स्वरांत मला हाक मारीत उठला. आणि दोन्ही हात जोडल्यासारखें करीत पुढेंपुढें येऊं लागला.

मीं मनांत म्हटलें, कसल्या विचारानें भारावलें आहे मन याचें ?

तोंच—

"तुम्ही कधीं भटाब्राह्मणांच्याशा आम्हांला वाटलां नाहीं बाई! आमच्यांतल्याच एकशा वाटत आलां." माझ्या पायांकडे दुरूनच मस्तक वळवीत तो म्हणाला.

पण मीं त्याला माझ्या पायांना स्पर्श करूं दिला नाहीं. वरच्यावर त्याचे हात पकडून त्याला हळुवार हातांनीं दोन पावलें दूर करीत म्हटलें, "हें काय रे हें असें सोमनाथ! तुझी जाई, तशी मी तुला."

"होय. बाई ! माझी जाई तशा तुम्ही मला. म्हणूनच लेकीजवळ म्हणून काळीज उघडें करून बोलतों. आम्ही गरीब भिकारी माणसें. तुम्हां थोरांमोठ्यांच्या पायींच्या तुटक्या पायतणाखालच्या धुरळ्यांतले कण. तुम्हां लोकांचा पाय पडेल तिथें पायतणाला चिकटायचें. तुम्ही पाय पुसून झटकाल तिथें पडायचें. त्यांतून आम्ही पडलों म्हार मांग. एकल्या गांधींखेरीज कोऽणी आमचा तारणारा नाहीं हो, कोऽऽणी तारणारा नाहीं आमचा. एवढी आशा होती तुमच्या आणि—लोक सांगतात म्हणून पण खरेंच तें—त्या स्वामींच्या पायांपाशीं घोटाळत. पण तुमची ही अशी दैना बघतों आहें. आणि—हें काय हो रान पेटतें आहे जिकडे तिकडे आमच्या

गांधीबाबांविरुद्ध आणि आमच्या स्वामींविरुद्ध? आम्ही अडाणी माणसें. आम्हांला कांहीं कळत नाहीं. पण मी म्हणतों, असें कां? ज्या गाइत्रीच्या दुधावर कॉंग्रेस पोसली, वाढली, देश घट्टाकट्टा झाला,—एवढा मोठा बळी माजलेला इंग्रज, त्याला देखील पाणी पाजलें आम्हीं, त्या गोमातेच्या दुधावर पोसलेल्या आम्ही लोकांनीं, त्याच गोमातेच्या कासेखालून उठून तिच्या मानेवर सुरी ठेवायला लोकांना शिकवावें? काय याचा अर्थ तरी काय बाई?"

म्हातारा बोलूं लागला कीं अगदीं तळमळून बोलायचा, काळीज पिळवटून. अलीकडे बऱ्याच वर्षांत त्याला माझ्याशीं अशी मनमोकळेपणानें बोलायला संधि मिळाली नव्हती. ती आज अचानक मिळाली. तशी मुखांतून पवित्र गंगा अवतरली. अशिक्षित माणसें हीं; आपलीं दुःखें बोलून दाखवायला यांना वाचा नाहीं. यांचीं तोंडें आम्हीं समाजांतील वरच्या थरांतील लोकांनीं पायाखालच्या चिखलांत आमच्या टांचेखालीं मुर्गळून दाबून बंद करून ठेवलीं आहेत.

सोमनाथला उत्तर मी कोणत्या तोंडानें देऊं!

"आणि हें खरें का हो बाई! गांधीबाबा, स्वामी, देशभर आमचे गळे कापणाऱ्या मुसलमानांत धार्जिणे आहेत म्हणतात हें खरें का? बाकी, मुसलमानदेखील अगदीं पिसाळलेल्या लांडग्यांसारखे वागूं लागले आहेत नाहीं आजकाल? फार फार जुलूम चालवला आहे त्यांनीं तिकडे पंजाबांत, बंगालांत, खालीं निजामाच्या राज्यांत, सगळीकडे. मला कांहीं कळत नाहीं कांहीं त्यांत. पण शेख मिरा भेटला कीं असें कांहीं कांहीं सांगतो."

"काय सांगतो?"

"तो मुळीं हिंदु आणि मुसलमान अशी भाषाच बोलूं देत नाहीं. तो सांगूं लागला कीं असें सांगतो,—असें कांहीं अचाट सांगतो, कीं तेवढ्यापुरतें तरी खरेंच वाटूं लागतें तें. तो सांगतो कीं मतलबसाधू मूटभर दुष्ट लोकांचा डाव आहे हा सगळा...ह्या रानच्या लांडग्यांना आयत्या राखींव कुरणांतले गुरां-ढोरां-मेंढरां-बकऱ्यांचे कळप आयते पिळून खायला हवे आहेत...कधीं दूधदुभतें खायला, कधीं मारून सागोती करून खायला.—आणि वर सांगतो कसा, कीं आपल्या देशांतल्या हिंदु लांडग्यांचा, मुसलमान लांडग्यांचा, आणि त्यांना तुमच्यावर सोडणाऱ्या इंग्रज बकासुराचा पोटांतला कावा ओळखायला हवा आपण साऱ्या लोकांनीं....आपण लोकांनीं डोक्यांत राख घालून हे सांगतात तशी दुही लोकांलोकांत मुळींच पडूं

देतां कामा नये. एकजुटीनें वागायला हवें..."

"मग ? नको का रे वागायला असें एकजुटीनें आपण सोमा ? शेजारींशेजारीं राहायचें, आणि हाडवैऱ्यांसारखी भाऊबंदकी माजवायची का आपण ?" मी म्हणाल्यें.

"पण भाऊबंदकी कोण आम्ही माजवतों ? मुसलमानच माजवतात कीं ! तिकडे कलकत्त्याकडे काय-काय वनवास भोगावा लागतो आहे ! आणि पंजाबांत ? निजामांत ? कसें सहन करायचें आम्हीं लोकांनीं हें सगळें जिवंत मुडद्यांसारखें ? कसें राहायचें एकजुटीनें आमच्या डोळ्यांदेखत आमच्या बायकापोरींची, आमच्या मुलांबाळांची, आमच्या देवाधर्माची, आमच्या घरादाराची नासाडी–नासाडी करणाऱ्या ह्या राक्षसांबरोबर? हां! आतां शेख मिरासारखा—आणि मध्यें माझ्या जाईनें त्या सुलेमान शिपायाशीं नव्हती दोस्ती केली?—"

"केव्हां रे?" मीं विचारलें. मला तें माहीत नव्हतें.

"अहो, आपल्या ह्या बेचाळीसच्या लढ्याच्या अगोदर ? आणि तो सुलेमान मग लढ्यांत लोकांच्या बाजूनें लढतां लढतां मेला नाहीं ? मुंबईत केवढी मोठी सभा झाली कॉंग्रेसवाल्यांची ! किती लोक ! किती हारतुरे !—असा एखादा मुसलमान असला तर त्याला दूर कोण लोटील हो ? मी तर आतां जाई भेटली तर तिला देखील सांगणार आहें, कीं फकिरा बाटगा मुसलमान असो नाहींतर त्याहूनहि 'कोणी असो... सगळ्या रयतेसाठीं स्वतःचें मुंडकें तळहातावर घेऊन लढणारा मर्द वीर आहे तो... त्याच्याशीं हेवादावा सारा सोडून दे, आणि मूळच्यासारखी फिरून संसार करूं लाग त्याच्याशीं. शेख मिरापाशीं देखील हेंच सांगितलें आहे मीं. आणि फिरून तुमच्यापाशीं सांगून ठेवतों बाई ! जाई माझी कधीं जिवंत भेटली तुम्हांला, तर तिला सांगा. बाकी, मला कांहीं आशा वाटत नाहीं ती म्हणजे मला या जन्मीं जिवंत भेटेलशी. आमच्यांत देखील मात्रागमनी हरामखोर लोक कांहीं थोडे नाहींत. बक्षिसाच्या लालुचीनें तिला मुसक्या बांधून पकडून द्यायलाही कमी करायचे नाहींत. आणि तिच्याबरोबर फकिरालाही...."

एक दीर्घ उसासा सोडून म्हाताऱ्यानें बाजूला मान वळविली.

मीही मग तिथें थांबल्यें नाहीं. तें भाषण ऐकून गढूळ पण पवित्र गंगाप्रवाहांत स्नान केल्याचें किंचितसें समाधान मला वाटलें.

ह्या पवित्र लोकगंगेंत असें विष ओतलें जात आहे; चिखल कालवून ही गंगा अशी गढूळ केली जाते आहे, हें उघड्या डोळ्यांनीं पाहून मी सहन करूं ? कशी

सहन करूं ? तो प्रवाह निर्मळ केलाच पाहिजे. त्यासाटीं कितीही यातना भोगाव्या लागल्या, कोणत्याही आपत्ति आकाशच्या कुऱ्हाडीसारख्या शिरावर कोसळल्या, तरी चालतील. तो चिखल काढतां काढतां त्या चिखलांतील मगरींनीं फाडून खाल्लें अथवा चिखलांत रुतून मरण आलें तरी चालेल. तें मरण देखील आयुष्याचें सोनें करील. तें मला पत्करेल. पण इथें शेणकिड्यासारखें संसारी सुखोपभोगांत डुंबत अंगच्या माणुसकीला मारून मेलेलें शिळें जगणें नको. . .अशी कांटेऱ्या घनदाट गुलाबबनांतून सर्वांग ओरबाडून निघत असतांना त्या सुगंधाच्या गोड मोहिनींत त्या ओरबाडण्याच्या वेदनांचा विसर पडावा, तशी माझ्या मनाची गत तेव्हां झाली होती.

त्या कांटेऱ्या बनांत मी अशीच आणखी किती वेळ फिरत राहिल्यें असत्यें कोण जाणे ! पण तेवढ्यांत करुणा भरताला घेऊन आई आई करीत आली.

अंमळशानें अशोक हा शाळेंतून आला.

आणि 'आई' त्या लेंकरांच्या निगेंत रंगून गेली. त्यांचें मधल्या वेळचें खाणें-पिणें करायच्या आवडत्या उद्योगाला लागली.

पण मीं त्या आईला त्या अपत्यप्रेमाच्या लोंढ्याबरोबर वाहत जाऊं दिलें नाहीं. ती वाहून जात होती. पण मीं तिला हाताचा आधार देऊन किनाऱ्याकडे चालवलें.

थोड्या वेळानें सोमनाथ मला हांक मारून म्हणाला, "बाई ! तुमच्याकडे कोण आलीं आहेत पाहा जरा."

तोंच आल्यागेल्याची विचारपूस करणारा आमचा पट्टेवाला आंत येऊन म्हणाला, "एक मुलगा आणि एक बाई आली आहे."

'कोण मुलगा ? आणि कोण बाई आली आहे ? . . .' असें स्वतःशींच विचारीत मीं पट्टेवाल्याला म्हटलें, "मग त्यांना आंत घेऊन ये ना !"

● ●

"मी अविनाश. सावरगांवला तुम्हांला मी भेटलों होतों. आम्ही आतां सावरगांवला नसतों. किर्लोस्करवाडीला असतों. आमचें आजोळ आहे तिथें. माझ्या आईचें माहेर. ही माझी मावशी. मुद्दाम तुम्हांला भेटायला आली आहे." तो मुलगा पट्टेवाल्यापाठोपाठ भीत भीत जपून पावलें टाकीत जोडल्या हातांनीं दरवाजांच्या आंत प्रवेश करीत म्हणाला.

त्यानें जर आपली ओळख करून दिली नसती, तर हाच तो अविनाश असें मी कांहीं त्याला ओळखूं शकल्यें नसत्यें. फार म्हणजे फारच दिवसांपूर्वी मीं त्याला एका पहांटेला सावरगांवांत पाहिलें होतें. कॉंग्रेस एम्. एल्. ए. जयवंत निर्वाण यांच्या सत्कारासाठीं कोल्हापूरला होणाऱ्या नागरिकांच्या जाहीर सभेंत गांवकऱ्यांच्या वतीनें मीं त्यांना हार घालावा, असें सुचवायला तिथल्या जयवंतांच्या विश्वासांतील गांवमामाला घेऊन गांवकरी भल्या पहांटेला माझ्या झोंपडीकडे आले होते. त्यांच्याबरोबर हा अविनाशही आला होता. पण त्या पहांटेच्या मिमकाळोख्या रात्रीं तेव्हां मला त्याचा तोंडवळाही नीटसा दिसला नव्हता.

अविनाश आंत आला.

"या बसा." मी त्याला म्हणाल्यें.

पण मावशी बाहेरच, त्या बंगल्याच्या मोठ्या नांवाच्या भाराखालीं वांकून कीं काय, दाराआड उभ्या होत्या.

"मावशींना आंत या म्हणावें ना!" मी अविनाशला सुचवीत स्वतः उठून दारापाशीं गेल्यें. त्यांना हांक मारली, "मावशी! या ना आंत."

"आईचें माहेर. आणि तुझ्या मावशीचें माहेर नव्हे का रे तें?" असें सौम्य स्वरांत अविनाशला विचारीत मावशी आंत आल्या. किती संकोचून वागत होती माउली! त्यांच्या अंगावरचें विरून फाटूं लागलेलें पण खादीचें पातळ मीं पाहिलें, अविनाशच्या अंगावरदेखील विरू लागलेले पण खादीचे कपडे पाहिले, आणि मनाला बरें वाटलें. निसर्गदेवतेनें सुगंध पाजून रानावनांत जन्माला घातलेल्या, गाईम्हशींच्या, गुरांढोरांच्या आणि हत्यारी निर्दय शिकाऱ्यांच्या पायांखालीं तुडवून घेतां घेतां वाढून फुललेल्या ह्या रानवेलीवरील रानफुलांचा आनंददायक सुगंध माझ्या झोंपडींत दरवळूं लागला.

मीं मावशींना कोचावर माझ्या शेजारीं बसवून घेतलें. अविनाशही जवळच खुर्चीवर बसला.

"आपणाला भेटायची फार फार इच्छा होती. आपणही त्या दिवशीं गांवाहून परत आल्यावर मला भेटीला घेऊन यायला या मुलाला सांगितलें होतें." मावशी अविनाशकडे पाहून बोलत होत्या.

"होय. पण मी येऊं शकल्येंच नाहीं तेव्हांपासून गांवीं. आल्यें असत्यें, तर नक्की भेटल्याखेरीज राहिल्यें नसत्यें मी तुम्हांला." मी म्हणाल्यें.

त्या म्हणाल्या, "गांवचा रस्ता आपण सावरगांवकरांनीं करायचा, अशा आणखी बऱ्याच गोष्टी आपल्या आपण करायच्या, प्रत्येक म्हणजे शक्य तितक्या सर्व बाबतींत आपला गांव हें एक स्वयंपूर्ण असें ग्रामराज्य बनवायचें, अशीं आपलीं गोड गोड स्वप्नें माझ्या परिचयाचीं झालीं होतीं. मी देखील आपणासारखीच एक छांदिष्ट स्वप्नाळू स्त्री आहें. मला वाटलें, आपली थोरली बहीण म्हणून मी आपणाबरोबर काम करूं शकेन."

"होय. म्हणूनच मला तेव्हां मोठी आशा वाटूं लागली होती कीं आपणाला गांवांत रामराज्यासाठीं मनापासून राबणारी मनाजोगी जोडीदारीण मिळाली, आतां आपण कितीतरी झपाट्यानें काम करूं. पण तेव्हां योगायोग नव्हता तसा.–असेंच म्हणायला हवें आतां. नाहीं? पण कांहीं हरकत नाहीं. आपण आतां पुन्हा जाऊं—"

"नाहीं." माझ्या तोंडचें वाक्य पुरें होण्यापूर्वीच मावशी म्हणाल्या, "मला त्या गांवांत आतां थारा मिळणार नाहीं बाई! मला तिकडे पुन्हा येतां येणार नाहीं."

बोलतां बोलतां त्यांची चर्या आरक्त झाली. डोळे पाण्यानें भरून आले.

"कां हो!" मीं सहज विचारलें.

कितीतरी भयानक कल्पना तेव्हां माझ्या मनांत आल्या.

रूपानें मावशी दिसायला अगदीं सुंदर जरी नव्हत्या, तरी त्यांच्या रूपांत एक प्रकारचें शब्दांत न सामावणारें आकर्षण आणि मोहकता होती. बरें, वयानेंही त्या तशा झालेल्या दिसत नव्हत्या. माझ्यापेक्षांही दिसायला लहान दिसत होत्या. त्याच बोलून गेल्या, म्हणून मी त्यांना वयानें माझी थोरली बहीण मानायचें. नाहींपेक्षां कुणीं पाहाणारानें मलाच त्यांची थोरली बहीण म्हटलें असतें.

इतकी रूपवान तरुण स्त्री; आणि गांवमामासारखे गांवगुंड गांवांत. शिवाय स्नातकाश्रमाचें मायावी जाळें पसरून रामदास महाराजासारखा भगवी कफनीधारी भगवा राक्षस तिथें आतां पुन्हा उजळ माथ्यानें राजरोस संचार करूं लागलेला.

अमंगळ कल्पना चपळ विषारी नागिणीसारखी माझ्या मनांतून वळवळत गेली–महाराजाचा ब्रह्मराक्षस तर यांना गिळायला टपलेला नव्हता ना?

मावशी पदरानें आपल्या गालावरचे अश्रूंचे ओघळ पुशीत हुंदके गिळीत मला म्हणाल्या, "कां तें मला आपण मला विचारूं नका बाई! आणि आपणही आतां एका थोर मंत्र्याच्या महाराणी आहां म्हणून गोष्ट निराळी. नाहीं तर मीं आपणाला देखील हात जोडून सांगितलें असतें कीं माझे आई! त्या यमपुरींत, त्या

नरकांत पुन्हा पाऊल टाकूं नका. तुमचा पल्ला यापुढें यायचा नाहीं तिथें."

मला मावशींचे ते उद्गार ऐकून मनांतल्या मनांत हंसूं येऊं लागलें. त्यांचा समज झाला तो बरोबर. कारण, जगाला दिसायला मी त्या बंगल्यांत आतां एक महाराणीच शोभत होत्यें. माझ्या जीवनाचें अगदीं मूळपासून कसें भीषण हंसें चाललें आहे, याची त्यांना काय कल्पना!

पण त्या इतक्या तळतळून बोलत होत्या, त्या अर्थी तसाच कांहीं तरी भीषण अनुभव त्या गांवीं यांना आला असला पाहिजे अशी अटकळ मला करतां आली.

तसें जर असलें, तर अशीं कोणतीं संकटें त्या गांवीं येऊन आमच्यावर हल्ला करायला दबा धरून टपून बसलीं आहेत, याची माहिती असायला नको?

अशोक तेवढ्यांत कवाइतीचा पोशाख करून आपली छोटी लाठी घेऊन परस्पर बाहेरच्या बाहेर आपल्या मित्रांबरोबर जाऊं लागला वाटतें. करुणा भरताला घेऊन फिरायला जायच्या तयारीनें बागेंतील झोपाळ्यावर मोटारीची वाट पाहत बसली होती, ती बाहेरून हाक मारून ओरडून सांगूं लागली, "आई ग! अशोकदादा शाखेवर चालला ग आपल्या मित्रांबरोबर."

मी तशीच उठल्यें आणि खिडकींतूनच हाक मारली, "अशोक!"

तेवढ्यांत मीं तिकडे पाहिलें, हाक मारली म्हणून बरें. अशोक करुणाच्या गालावर हाणण्यासाठीं आवेशानें उगारलेला डाव्या हाताचा टोसा माझ्या भयानें मागें घेत मित्रांबरोबर चालला.

"अशोक! मागें फीर." मीं त्याला दटावून हांक मारली.

पण तें लेकरूं कांहीं आईची हांक जुमानायला तयार नव्हतें. माझ्याकडे मागें वळून ढुंकून देखील न पाहतां जातां जातां त्यानें माझ्या सादाच्याच स्वरांत पण दुप्पट जोरानें प्रतिसाद दिला, "मी जाणार!"

"आपले चिरंजीव का?" मावशींनीं विचारलें.

"होय." मी ओशाळून खालीं मान घालून उत्तरल्यें.

मला लाज वाटली. अविनाश खिडकीकडे वळून पाहत होता. कॉंग्रेसच्या एका नामवंत दिवाणाचा मुलगा—आणि गांधीजींच्या शिकवणुकीला निष्ठेनें वाहून घेतलेल्या एका मशहूर कॉंग्रेस कार्यकर्तीचा! आणि तो भगवी टोपी घालतो, शाखेंत जातो, हें कसें काय?...कदाचित् तसें त्याच्या मनांत आलें नसेलही. पण माझ्या मात्र मनांत आलें.

आणि शेख मिरा आवेशांत आला कीं जे वाग्बाण सोडी, त्या वाग्बाणांच्या जखमा माझ्या काळजाला झालेल्या आज एकाएकीं जाणवल्या. दुखूं लागल्या.

शेख मिरा म्हणे, "तुम्ही पांढरपेशे बुद्धिवान मोठे बोलके, हिकमती, आणि फार चमत्कारिक आहां. तुम्ही केव्हां काय कराल याचा नियम नाहीं. एकाच झाडाच्या फांद्या. पण पाहावें तों एकीला गोड वासानें भरलेलीं फुलें फुलतील. दुसरीला विखानें भरलेलीं फळें धरतील. तिसरीला जीव घेणारे कांटे फुटलेले दिसतील. तुमच्या एकाच कुटुंबांतला एक माणूस असेल खादीभक्त काँग्रेसवाला. दुसरा असेल हिंदु महासभेचा पुढारी. तिसरा संघाचा कार्यकर्ता. बाप असेल काळ्या-बाजारवाल्यांना, चोरलुटारूंना कायद्याच्या धर्मकांट्यानें तोलून शिक्षा ठोठावणारा लठ्ठ पगाराचा न्यायाधीश, तर मुलगा अशा गुन्हेगारांना पोतेंभर रुपये घेऊन कायद्याच्या कसरतीवर निर्दोषी ठरवून सोडवणारा. सभेंत आणि वर्तमानपत्रांत तुम्ही हिंदु-मुसल्मान तावातावानें भांडाल. नोआखलीसारखा, पंजाब-काश्मीरसारखा बांका प्रसंग आला कीं कसायांपेक्षां कसाई होऊन एकमेकांचीं नरडीं कापायलाही कमी करायचे नाहीं. पण मोटमोठ्या व्यापारी कंपन्यांत तुम्ही हेच हिंदु-मुसलमान डायरेक्टर लोकांना पिळून चकवून गरगरीत नफा लाटतांना जसे कांहीं राम-लक्ष्मण प्रेमळ भाऊ भाऊ!..."

आमच्याकडे पाहून शेख मिरा जर माझ्या तोंडावर उघड उघड आमचें नांव घेऊन अशीं नांवें ठेवूं लागता, तर कोणत्या तोंडानें त्याला नांव ठेवलें असतें मीं!

"आपणाला आतां बाहेर जायचें असेल!" मुलांना न्यायला मोटार आलेली पाहून मावशींनीं विचारलें.

"नाहीं. मला नाहीं जायचें. मुलें जातील. आपण बसूं ना जरा सुखदुःखाच्या गोष्टी बोलत. मला भरपूर वेळ आहे." मी म्हणाल्यें.

"अविनाश! तुला जरा हिंडून यायचें असलें तर जाऊन ये ना!" त्या अविनाशला म्हणाल्या.

तोंच ड्रायव्हरनें येऊन वर्दी दिली, "साहेब आज तांतडीनें दिल्लीला जात आहेत विमानानें. दोन दिवसांनीं येतील."

"होय? मग त्यांना त्यांची प्रवासाची बॅग हवी असेल?"

"होय."

मीं लगेच सोमनाथला हांक मारून कपाटावरची बॅग काढून द्यायला सांगितलें.

ड्रायव्हर बॅग घेऊन गेला.

" पंधरा ऑगस्ट आली ना आतां तीन दिवसांवर." मावशी म्हणाल्या.

" होय तर ! " मीं बागेपार होऊं लागलेल्या अविनाशला हांक मारून म्हटलें, "बरें का रे अविनाश ! आज मावशी इथेंच राहतील. सकाळीं येतील त्रिन्हाडीं."

मावशींना संकोचल्यासारखें झालें. पण माझा शब्द त्यांना मोडवला नाहीं.

# ९ : चक्रव्यूहांत

● ● ●

मध्यरात्र होईपावेतों आम्ही दोघी एकमेकींचें सुखदुःख बोलत होतों. तेव्हां मला समजून आलें, कीं माझें दुःख जवाएवढें आहे, मावशींचें पर्वताएवढें आहे. ती सारी रात्र मला झोंप आली नाहीं.

चितेंत निखारा झोंपीं जावा ना, तशी मावशींना देखील मध्यरात्र उलटल्यानंतर जरा झोंप लागली. पण मी मात्र आंथरुणावर समुद्रतीराच्या वाळूंत कोळ्याच्या हातून पडलेल्या मासोळीसारखी तळमळत होत्यें.

पुन्हा पुन्हा छातींत धडकी भरल्यासारखी होई, आणि त्या माउलीवर त्या आश्रमांत–त्या राक्षसाच्या गुहेंत ओढवलेल्या प्रसंगांचें चित्र नजरेसमोर तरळूं लागे...

आपला आवडता पट्टशिष्य म्हणून त्याच्या देखत—प्रत्यक्ष नवऱ्यासमोर त्याच्या पत्नीशीं बीभत्स–पशूंनाही लाज वाटावी असल्या बीभत्स शृंगारचेष्टा करणारा, आणि त्या शांतपणें निर्विकार मनानें पाहण्याइतकी स्थितप्रज्ञता आपल्या शिष्याच्या ठायीं आहे कीं नाहीं याची परीक्षा करणारा नराधम मनुष्यकोटींत जन्माला तरी कसा येतो ? कसा वाढतो ? कसा बळी मातती ? देव आणि धर्म त्याचे साह्यकारी कसे होतात ? लोक–चांगले विचारी शहाणे सुरते समंजस लोकही असे कसे असल्या थोतांडी धर्मगुरूंच्या नादीं लागतात ? आणि देशाच्या उद्धारासाठीं त्याच्या थोतांडी उपदेशाची गटारगंगा पिऊन साधना करतात ?

कर्मभूमि, कर्मभूमि म्हणून मी ज्या माझ्या पूर्वीच्या क्षेत्रांत माझें आवडतें जीवनकार्य करायला जाणार, तें क्षेत्र असें पूर्वीच्याहून भयंकर अरण्यमय झालेलें दिसत होतें. जिकडे तिकडे अशा प्रवृत्तीची कांटेरी विषारी जंगलझाडी माजून राहिली होती. त्या जंगलांत कोल्हे, कुत्रे, वाघ, लांडगे, साप असे इतस्ततः आपापलें बस्तान बसवण्यासाठीं पराकोटीच्या सावधपणाच्या स्वार्थानें जागोजागीं दबा धरून बसले होते. माणसांना—सरळ साध्या, कष्ट करून पोट भरणाऱ्या प्रामाणिक निरुपद्रवी माणसांना तिथें राहायची सोय नव्हती.

मावशींना त्यांच्या आणि त्यांच्यासारख्या अनेक भोळ्याभापड्या स्त्रियांच्या अब्रूची देवा-धर्माच्या नांवावर राजरोस लूट करणारा आणि पुन्हा शिरजोर प्रतिष्ठितपणानें समर्थांचा आव आणून देशभर हिंदूंची हिंदवी राजवट स्थापन करण्याचें थोतांड उभारणारा एकच रामदास महाराज दिसला. पण असे रामदास, देवदास, मुल्ला, मौलवी, अवलिया, फकीर कोणत्या ना कोणत्या सोज्वळ रूपानें देशांत आतां धर्मवीर उघडपणें संचारूं लागलेले मी आतांशा पाहत होत्यें. देशासाठीं—देवासाठीं—धर्मासाठीं आक्रंदन करणारे आणि संकटांत सांपडलेल्या देशाला—देवाला—धर्माला प्राणपणानें राखण्यासाठीं संघटनेची हांक देणारे साधुसंत सज्जनही सभोंवारच्या समाजांत मी पाहत होत्यें. माझ्या मनांत ह्या लोकांच्या मतप्रणालीबद्दल नाहीं तरी देशहिताच्या त्यांच्या प्रामाणिक तळमळीविषयीं आदर होता. जो तो आपापल्या परीनें भारतमातेला दास्यमुक्त करायचें कार्य करीत आहे, करूं द्या. भारतमातेच्या दास्यविमोचनाला सर्वांचा हातभार लागूं द्या—मला वाटे. पण मावशींची कर्मकथा ऐकल्यापासून माझें डोकें उघडूं लागलें. वाटूं लागलें, हे सारेच कांहीं देशभक्त नव्हेत, धर्मभक्त नव्हेत, देवभक्तही नव्हेत. भक्तीच्या कळकळीचें हरणाचें कातडें पांघरून समाजांत दबा धरून हिंडणारे, सत्तेला, सुखोपभोगाला, ऐहिक वैभवाला—असल्या शिकारीला लालचावलेले क्रूर, हिंसक, जनतेच्या रक्ताला तहानलेले वाघ-सिंह-कोल्हे-कुत्रे-लांडगे आहेत हे!

विचार करकरून मस्तक अगदीं सुन्न होऊन गेलें होतें. समोर तर मरण वाढून ठेवलेलें दिसत होतें. भयाण जंगलांतून आपणाला वाट काढावी लागणार आहे, मावशींसारखे अन्य विस्मयकारक प्रसंग आपणावरही येणें अगदीं शक्य आहे, असलीं अनेक दिव्यें आपणाला आपल्या संकल्पित कर्मभूमींत करावीं लागणार आहेत, हे सारे धोके माझा मार्ग अडवून टायीं टायीं खाऊं कीं गिळूं करणाऱ्या हिंस्र पशूंसारखे उभे असलेले डोळ्यांपुढें दिसत होते.

तरी देखील माझा विश्वास ढळला नाहीं. तो उलट अधिक बळकट झाला. संकटांची मला म्हणजे आवड होती अशांतली गोष्ट नाहीं. पण संकटें अशीं भेडसावूं लागलीं कीं मला वाटे, दुप्पट—दसपट—शतपट—सहस्रपट वेगानें त्या संकटांना न जुमानतां निर्भयपणें पुढें जावें. अंतरींचा सद्भाव जागा ठेवावा. मग कांहीं का होईना!

पहांटेचा गार वारा सुटूं लागला होता. त्याच्या शीतल लहरी खिडकींतून येऊन माझ्याशीं बागडूं लागल्या. मुलें पलीकडे आपापल्या बिछान्यावर झोंपलीं होतीं. थंडी

वाजूं लागली म्हणून तीं झोंपेंतच अंगावरचीं सरकलेलीं पांघरुणें सावरण्यासाठीं हातापायांचे चाळे करूं लागलीं.

मीं मुलांना नीट पांघरुणें घातलीं. बराच वेळ टक लावून त्या माझ्या ' आई 'च्या वैभवाकडे मी पाहत होत्यें. आई लेकरासाठीं जीव सांडते अशी आईपणाची अलोट थोरवी मी आजवर सतत अवीटपणें गात होत्यें, ऐकत होत्यें.

" पण हें आईचें वैभव असेंच सोडून मला आतां अरण्यवास पत्करायचा आहे. माझ्या मनांत आलें.

पण विषाद मात्र वाटला नाहीं. कारण मी डबकें सोडून सरोवराकडे चालल्यें होत्यें. भारतमातेच्या रंजल्या गांजल्या लेकरांचें आईपण मी पत्करीत होत्यें. कांत टाकून तरुण होत होत्यें. लहान आईची मोठी आई होत होत्यें.

"बस्स! जयंत माघारे येण्यापूर्वीच मला तें घर सोडलें पाहिजे. हे सारे पाश तोडून घराबाहेर पडलें पाहिजे . . . " हा विचार करतां करतां माझा थंडगार वाऱ्याच्या झुळुकांत रमतां रमतां जरा डोळा लागतो न लागतो, तोंच मावशी जाग्या झाल्या.

"बाई!" त्यांनीं हांक मारली.

मी जागी झाल्यें. अगोदर आंत जाऊन महाराजाला मावशींसाठीं चहा ठेवायला सांगितला.

" मी येत्यें." मावशी चहा घेतल्यावर जातांना म्हणाल्या, "माझी एक विनंति तेवढी ध्यानीं ठेवा. स्वामींना सांगून पहा. त्यांच्या शब्दाला मोल आहे. त्यांच्या आशीर्वादानें तरी पोरांना जगांत सुखानें जगायचा मार्ग सांपडला तर सांपडूं दे. आणि हें पाहा..."

बोलता बोलतां त्यांनीं दचकून सभोंवार पाहिलें आणि भीत भीत मला सांगितलें, "मी अहिल्येची आई आहें आणि अविनाश माझा मुलगा आहे, असें कुणाला— स्वामींना देखील सांगूं नका. त्या लेकरांना माझ्या जन्माच्या विटंबनेचे वारस करूं नका. मी मावशीच आहें त्या लेकरांची. हें कृपा करून ध्यानीं ठेवा. आणि आलां कधीं वाडीला तर माझ्या गरिबाच्या झोंपडींत पायधूळ झाडा."

मी होय म्हणाल्यें. साधेल तेव्हां एकदां वाडीला यायचें कबूल केलें. मावशींच्या पायांवर मस्तक ठेवून त्यांचा आशीर्वाद घेतला. त्या निघाल्या. त्यांना चार पावलें पोंचवायला मी त्यांच्याबरोबर बंगल्याबाहेर पडल्यें. तोंच कोंबडा आरवला.

● ●

तो सारा दिवस मला अगदीं खाजल्या आल्यासारखा भकास कंटाळवाणा गेला. मावशींच्या पाषाणालाही पाझर फोडणाऱ्या भीषण करुणकहाणीच्या आठवणींचे पेटत्या निखाऱ्यांसारखे चटके एकसारखे माझ्या मनाला बसत होते. आपलेपणानें बोलायला सोमनाथही घरीं नव्हता. तो एक दिवसाची रजा घेऊन सकाळींच कुणा दोस्तांना भेटायला गेला होता.

असें मन उदास. आणि त्यांत अशोकच्या, माझ्या मनाला न पटणाऱ्या विचित्र वर्तनाची भर.

हा माझा मुलगा, असा दुरभिमान मी बाळगीत नव्हत्यें. पण आईचा अभिमान तरी होताच कीं नाहीं! एवढ्या बाणेदारपणानें मी सारा संसार शिवनिर्माल्य मानून सुखावर, संसारावर, घरादारावर पाणी सोडून जन्माची परागंदा झाल्यें होत्यें, ती त्या लेकराच्या कारणानें. इतर त्यापेक्षांही बलवत्तर कारणें होतीं. पण तें विष मी जयंतांशीं लग्न झाल्या दिवसापासून सेवीत होत्यें आणि पचवीतही होत्यें. तें विषपान न टाळतां येणाऱ्या वहिवाटीनें माझ्या अंगवळणीं पडलें होतें. सोपानासाठीं मी तशीच जन्मभर अंतःकरणांत मुकाटपणें रडत कढत बसल्यें असत्यें, आणि वरून हंसत खेळत संसार केला असता.

नाहीं तरी आम्हां हिंदु बायकांचे संसार हे असेच. त्यांनीं ते मनाला मारून जगावे. मी तशीच जगल्यें असत्यें. पण जयंतांनीं मनांत माझ्या अशोकच्या आईविषयीं अगदीं खोटी—अगदीं खोटी आणि तरी देखील कोणत्याही शब्दांनीं, कोणत्याही प्रमाणांनीं कधींही न निवारण होणारी शंका घेतली; म्हणून मला तें घर नकोसें झालें.

इतका ज्याच्यासाठीं माझा आईचा जीव हळवा, तितकाच तो आशावादी कसा नसेल? माझा अशोक महात्मा गांधींसारखाच जगांतील कोट्यावधी दरिद्रीनारायणांचा सेवक व्हावा, सुविद्य पांढरपेशा ब्राह्मण घराण्यांत जन्माला आल्यासारखा आपल्या कर्तव्याला जागावा, सर्वांचा उद्धारकर्ता व्हावा, केवळ बहुजनसमाजासाठींच त्याग, सेवा आणि श्रम यांनीं समृद्ध जीवन जगून चिरंजीव होऊन राहिलेल्या थोर प्राचीन पूर्वजांचें नांव त्यानें राखावें, चिरंजीव व्हावें, असें मला वाटे.

पण पाहत्यें तों तो अगदींच निराळ्या चुकीच्या अनर्थकारक मार्गानें भूतकालाच्या भयंकर खोल दरींत स्वतःला नकळत मोठ्या वयाच्या तरुणांमागून स्वतःच्या पायांनीं चालला होता. इतकी खोल, इतकी अंधारमय ती दरी मला दिसत होती कीं त्या दरींत नकळत जाऊन पडलेल्या माणसाला वर यायची आशाच नको.

पण विस्मय वाटे तो हाच कीं ह्या अंधारांत च आपल्या अति प्राचीन पूर्वजांपासूनची नीतीची, धर्माची, संस्कृतीची कुबेर संपदा सांचवलेली आहे अशा प्रामाणिक समजुतीनें त्या अंधारांत उड्या घेणारे धीरोदात्त, कर्तव्यक्षम पण अजाण तरुण आमच्या वरच्या पांढरपेशांतच कसे सांपडतात ? अशोक तर काय नेणतें लेकरूं. घरच्या वडील माणसांनीं वाखाणायचें, शिकवायचें, मदनसारख्या सुजाण तरुणांनीं शिकायचें, स्वतः शिकलेलें मग मुलांना शिकवायचें, आणि पुढच्यांसारखे मागचे होत जायचे. ह्या सांखळीला अंतच नाहीं.

तशांत आमच्या घरांत शेख मिरा म्हणे तशा परी. अशोकचे वडील कॉंग्रेसचे तर आजोबा टिळकांच्या वेळचे राष्ट्रीय–जहाल म्हणजे आजचे हिंदुसभावाले. आणि आमच्या तरुण पिढीला तर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचें आकर्षण एवढें दांडगें कीं आई, बाप, बहीण, भाऊ, स्वतःचें जीवन देखील त्यांना संघापुढें तुच्छ !

माझें कोणी ऐकणार नाहीं, अशोकला देखील आपण या चुकीच्या मार्गापासून परावृत्त करूं शकणार नाहीं, अशीं लक्षणें मला स्पष्ट दिसत होतीं.

तरी देखील त्या दिवशीं मला राहवलें नाहीं. मदन एरव्हीं सुजाण होता. आतां एम्. ए. ला बसणारा तरतरीत हुषार, नेहमीं पहिल्या वर्गात उत्तीर्ण होणारा विद्यार्थी तो. स्वतःला काय वाटतें तें एकदां त्याच्यापाशीं बोलून दाखवावेंच असें वाटे.

दुपारच्या वेळीं अशोकची चौकशी करायला म्हणून मल्लापा आणि मदन आले.

मला माहीत होतें, मदन हा रामदास महाराजांच्या स्नातकाश्रमापैकीं एक स्नातक होता. आणि आतां पुण्यांत तो संघाचा एक जबाबदार शाखाप्रमुख होता.

मीं अगदीं मोकळ्या मनानें कांहीं देखील आडपडदा न ठेवतां मावशींना त्या आश्रमांत गेल्यामुळें जन्मभर कसा छळ सोसावा लागत आहे हें अगदीं उघड उघड सांगितलें.

दोघेही अगदीं शांतपणें ऐकून घेत होते. पण अनुकूल अथवा प्रतिकूल एक अक्षरही बोलेनात. मला मोठें नवल वाटलें कीं हे कांहींच कसे बोलत नाहींत!

"आणि तुम्ही कधींपासून संघांत आलांत? सेवादलांत होतां ना?" मीं मल्लाप्पाला विचारलें.

"होय होतों. पण गांधीजींच्या शिकवणुकीवरचा माझा विश्वास आतां पार उडाला आहे. गांधी आमच्या राष्ट्राचा घात करणारे महाभयंकर पुरुष आहेत, आणि कॉंग्रेस ही गांधींची बटीक आहे, अशी माझी खात्री झाली आहे." मल्लाप्पा उत्तरला.

"मग काँग्रेस ही राष्ट्राचा घात करणारी महाभयंकर संस्था आहे असेंच म्हणा कीं सरळ!" मी जरा रागांतच उद्गारल्यें. काल मेले आणि आज पितर झाले अशा एवढ्याशा तरुणांनीं गांधीजींविषयीं आणि काँग्रेसविषयीं असे आदरशून्य बेफाट उद्गार काढलेले मला सहन होत नसत.

"होय. आहे. भारताच्या चिरफाडीला मान्यता देऊन काँग्रेसनें आणि गांधींनीं आपलें राष्ट्रघातकी देशद्रोही धर्मद्रोही हिडीस स्वरूप स्वत: होऊनच उजेडांत आणलें आहे. अशा स्थितींत काँग्रेसवर आणि गांधींवर देशद्रोही, धर्मद्रोही व मूर्ख लोकच विश्वास ठेवूं शकतील." मल्लाप्पा उद्गारला. बोलतां बोलतां त्याची चर्या संतापानें आरक्त होऊं लागलेली मी पाहत होत्यें.

"भारताची फाळणी होणार ही अतिशय दु:खदायक गोष्ट तर खरीच. पण ह्या दुर्दैवी घटनेबद्दल तुम्ही कळून सवरून अजून देखील गांधीजींनाच जबाबदार धरतां?" मी म्हणाल्यें.

मदन पुढें सरसावून म्हणाला, "पुष्कळदां ओटीं एक आणि पोटीं एक असे गांधी दुटप्पी वागतात. ते मुसलमानधार्जिणे आहेत. जेव्हांन् केव्हां मुसलमानांची बाजू घेऊन बोलतात. गांधींना भारताची फाळणी व्हायला नको होती ही नुसती धूळफेंक आहे. नोआखलींत आमची हिंदूंची मुसलमानांनीं इतकी निर्दय लांडगे-तोड केली—"

"आणि बिहारांत आपण हिंदूंनीं नोआखलींतील मुसलमानांपेक्षां काय बरें कमी केलें?" मीं विचारलें.

"जशास तसें वागावें, ठोशाला ठोसा द्यावा, हा महान गुरुमंत्र आम्हांला आमच्या लोकमान्यांनीं शिकवला आहे. कुणीं एका थोबाडींत मारली तर दुसरा गाल पुढें करावा, असला भागूबाई नेभळटपण आम्हांला नको. असली ही अहिंसेची शिकवण राष्ट्राला नपुंसक बनविणारी आहे. भारत हें नपुंसकांचें राष्ट्र नाहीं. हें राम-कृष्णांचें, पांडवांचें, शूर राजपुतांचें, राणा प्रतापाचें, छत्रपति शिवाजी महाराजांच्या शूर मराठ्यांचें—मर्दांचें राष्ट्र आहे...."

जणूं काय आपल्या मित्रानें वस्तुस्थितीवर पाडलेला प्रकाश अपुरा झाला, म्हणून मल्लाप्पा मध्येंच म्हणाला, "बिहारच्या बाबतींत देखील गांधी किती मुसल्मान-धार्जिणेपणानें वागले पाहा! बिहारमधल्या मुसल्मानांची नुकसान-भरपाई करून द्यायला, जळक्या मोडक्या पडक्या घरांतला केरकचरा आणि मातीचे ढिगारे उचलून

साफसफाई करून मुसलमानांना पायां पडून घरीं राहायला बोलवायला गांधी सांगतात ! आणि मुसलमानाळलेले नेहरू बिहारांतल्या मुसलमानांचा कैवार घेऊन आम्हां हिंदूंनाच हवेंतून लष्कराकडून बॉंबगोळे टाकून टार करायची धमकी देतात. सत्य-अहिंसावाले ना कॉंग्रेसवाले तुम्ही? गोळीबार, बॉंबफेक करायची नेहरू म्हणतात तशी, हेच तुमचे सत्य-अहिंसेचे प्रयोग ना ?"

"होय. पण ती मात्र हिंदूंपुरती. बिहारांत किंवा जिथें जिथें आत्मरक्षणासाटीं हिंदु जशास तसें या न्यायानें झगडतील, तिथें तिथें फक्त हा कॉंग्रेसचा सत्य-अहिंसेचा वटहुकूम लागू करायचा. पण गांधींना, नेहरूंना म्हणावें कीं आमचा तरुण भारत असल्या देशद्रोही, मुसलमानधार्जिण्या कॉंग्रेसच्या मागें लागण्याइतका आतां दुबळा आणि नेभळा राहणार नाहीं. हा स्वातंत्र्यवीर सावरकरांचा, धिंग्रा-भगतसिंगांचा, चाफेकर–कान्हेरे–राजगुरूंचा, सुभाषबाबूंचा तरुण भारत आहे."

"हा तुमचा तरुण भारत म्हणजे धनिकांचा, राजेरजवाड्यांचा पाठीराखा पांढरपेशा बुद्धिजीवी वर्गाच्या कोंडींतलाच तरुण भारत ना? मग सभोंवार विराट महासागर पसरला आहे, त्याचें काय?" मी म्हणाल्यें.

"हें पाहा, तुम्ही आपल्या नेहमींच्या पालुपदावर आलां." सापाच्या शेपटीवर पाय पडल्यावर साप चिडून फणा उभारून फुत्कारत डसायला यावा, तसा मदन एकदम माझ्यावर खवळून म्हणाला, "तुमचा श्रमजीवी शेतकरी कामकरी तुम्हांला पुढें करायचा आहे, मी जाणतों. त्या वर्गाच्या बहुसंख्येचा धाक तुम्ही आम्हांला घालणार असाल."

"धाक नाहीं घालायचा मला. पण त्या शेंकडा पंचाण्णव टक्के लोकांचा कांहीं विचार येतो का ध्यानीं तुमच्या कधीं? त्यांनीं कष्ट केले नाहींत, अन्न वस्त्र निर्माण केलें नाहीं, तर तुम्हीं आम्हीं बुद्धिवंतांनीं खायचें काय, नेसायचें काय, आणि राहायचें कुठें? समाजाच्या धारणपोषणाला अवश्य असलेलें अर्थसाधन आणि अर्थनियोजन कसें होईल याचा विचार तुम्हां बुद्धिवंतांच्या ध्यानीं कधीं येतो का?" मीं म्हटलें.

"हें पाहा शकुंतलाबाई! माणसाच्या शरीराला अन्न लागतें तसेंच मनालाहि अन्न लागतें. त्या अन्नाची निपज आणि पुरवठा भारताला ह्या आर्यांच्या बुद्धिजीवी वर्गानेंच आजवर अनादिकालापासून केला आहे. ह्या पूज्य भारतांत आपण आर्य व आपली विश्वव्यापी आर्यसंस्कृति आजवर कोणत्याही परिस्थितींत समाज-

धारणा संरक्षीत आली आहे. गांधी हे कांहीं सबगोलंकार करणारे पहिलेच पाखंडी नाहींत. असे पाखंडवाद्यांचे लोंढे आपल्या आर्यसंस्कृतीवर किती आले. बुद्ध आला आणि गेला. इस्लाम आला, त्यालाहि आम्ही घालवून देऊं. आणि गांधी देखील आला तसा जाईल. हा हिंदुस्थान हिंदूंचा आहे. हें आर्यांचें महान आर्यस्थान आहे. आमच्या मातृभूमीचे मालक आम्ही आहों. आमचें राष्ट्र, आमचा धर्म, आमची संस्कृति यांचें आम्हीं प्राणपणानें रक्षण केलें पाहिजे आणि करूं—"

"आपण आर्य आहों, आणि मुसलमान आर्य नाहींत? सारे मुसलमान अनार्यच आहेत? आणि आर्य आर्य म्हणजे कोण हो?..."

तोंच मध्येंच मल्लाप्पा म्हणाला, "जाऊं द्या! काय करायचें आहे हा वाद घालून? आपण पुन्हा बसूं केव्हां तरी याची चर्चा करायला." मल्लाप्पा मदनचा हात धरून उठवीत म्हणाला, "चल."

मीं ओळखलें, मल्लाप्पाला कुठून तरी चर्चा टाळायची होती. संघांतील पुष्कळ तरुण विद्यार्थ्यांचें पाहिलें आहे मीं. त्यांना चर्चा करायला नको असते. आपलें राष्ट्र, आपला धर्म, आपली संस्कृति, आणि या साऱ्याचें आविष्करण करणारा आपला पूज्य नेता, याबाहेरच्या कशावरच विश्वास ठेवायला, बाहेरच्याचा विचारही करायला ते तयार नसतात.

भविष्यकाळांतील सर्व मंगल उज्ज्वलतेचा जीवाभावानें शोध करणारी, त्यासाठीं वेळ आली तर सर्वस्वाचें बलिदानही करायला हंसतमुखानें पुढें येणारी ही आमची बुद्धिवंत मध्यमवर्गीयांची प्रामाणिक व तेजस्वी तरुण पिढी भूतकाळाचीं अंधारीं गिरिकंदरें धुंडाळीत चालली होती!

आणि माझा अशोक ह्याच मालिकेंत उभा होता. त्या कधींही अंत न लागणाऱ्या अंधाऱ्या भुयारांत खोल खोल जाणार, त्या अंधारांत जात अखेर स्वतःला हरवून बसणार!—हें पाहून त्या साऱ्या दिवस-रात्रभर मला चैन कसें तें पडलें नाहीं. झोंप कशी ती लागली नाहीं.

अशी अंतःकरणाला सर्व बाजूंनीं लागलेली आग विझवीत विझवीत मी मोठ्या पहांटेला शहरांतील रस्त्यांतून भटक भटक भटकत होत्यें.

# १० : चक्रव्यूहाबाहेर

● ● ●

"पाहुण्या गेल्या ?"

मी भटकून भटकून भडकलेलें मस्तक जरा शांत झाल्यावर माघारी आल्यें; तों बागेचें फाटक लावून घेण्यासाठीं कीं काय, आंत फाटकाजवळ उभा असलेल्या सोमनाथनें विचारलें.

"गेल्या. पण तूं रे केव्हां आलास ?" मीं विचारलें.

"मी हा आताच आलों.—पण स्वामींची घरधनीण का हो त्या ?"

एकदम हा विचित्र प्रश्न विचारायचें धाडस सोमनाथनें केलेलें मला आवडलें नाहीं. पण मी कांहीं बोलल्यें नाहीं.

"लोक सांगत होते. आणि तो बरोबर असलेला स्वामींचा मुलगा का ? त्यांच्याच-सारखा दिसतो, नाहीं ?" सोमनाथ जरा थांबून पुन्हा म्हणाला.

"स्वामींचें लग्न तरी झालेलें आहे का रें सोमनाथ ?" मीं म्हटलें, "उगीच पुरी माहिती असल्याखेरीज कुणाविषयीं बोलूं नये असें कांहीं."

"स्वामींचें लग्न झालेलें नाहीं ?"

"मीं तरी कधीं ऐकलें नाहीं."

"मग त्या माणसाचा कांहीं तरी चुकीचा समज झाला असेल त्या दोघांना पाहून. तो तर सांगत होता कीं आपण त्यांना चांगलें ओळखलें. आणि त्यांच्या मुलालाही."

"बरें; आतां स्वामी भेटले म्हणजे आपण त्यांना विचारूं बरें ! कोण माणूस सांगत होता तुला ?"

"सांगत होता एक माणूस. मग सांगेन."

"बरें पण तूं इतक्या पहाटेला थंडीवाऱ्याचा कशाला रे उठलास ? आजारी होतास ना तूं ? तब्बेतीला जप कीं जरा. गार वारा कोण सुटला आहे. थंडी वाजत नाहीं तुला ? चहा तरी घेतलास का ?"

"नाहीं."

"मग चल मी करून द्यायला सांगत्यें."

"नको. थंडीवाऱ्याचें कशाला उठवायचें नोकरचाकरांना ? त्यांचा तरी जीवच कीं नाहीं ?"

"अरे पण !—मग मी करून देत्यें. मग तर कांहीं हरकत नाहीं ना ?"

"पण नकोच. मनाला शांतपणा नाहीं वाटत बाई !"

"कां रे ?"

"आग—आग पेटल्यासारखी झाली आहे डोक्यांत. तुम्ही फार थंड डोक्याच्या. फार शांत. फार सोशीक. मला नाहीं इतकें शांत रहायचें जमत. रात्रीं झोंप लागली तुम्हांला ?"

"नाहीं लागली. कां ?"

"माझें तर डोकें कालपासून असें फिरून गेल्यासारखें झालें आहे.—वाटतें कीं असेंच्या असें जावें, आणि त्या सैतानाला त्याच्या मठांत कोंडून दगडांनीं ठेंचून उभा जाळून टार करावा."

मला विचार पडला, हा कुणावर इतका चिडून बोलतो आहे ? मावशींना बोलताना तर त्यानें ऐकलें नसेल ?

"कुणावर चिडला आहेस तूं इतका ?" मीं विचारलें.

"असाच—असाच तो फत्तराच्या काळजाचा खवीस मावशींसारख्या गरीब देवभोळ्या बायका पाहून त्यांच्या जन्माचें मातेरें करतो." सोमनाथ आपल्याच संतापाच्या तंद्रींत हातवारे करून बोलत होता. मी काय बोलत्यें आहें इकडे त्याचें चित्तच नव्हतें.

"अरे पण असा गारठ्यांत किती वेळ उभा राहणार तूं ? चल. आपण आंत तरी बसूं." मी म्हणाल्यें.

"नको. उगीच नोकरचाकर, मुलेंबाळें जागीं व्हायचीं; त्यांनीं ऐकूं नये तें ऐकायचें."

"अरे, मग बाहेरच्या कमानीखालच्या व्हरांड्यांत तरी बसूं." असें म्हणत मी तिकडे चालल्यें.

"कुठें गेल्या मावशी आतां ? त्या परत गोव्यांत जाणार ?" तो व्हरांड्यांत मी बसल्यें त्या खालच्या पायरीवर बसतां बसतां म्हणाला, "त्यांना सांगायला हवें. फिरून भेटल्या कीं गोव्यांत जातील आणि उगीच फासांत पडतील. तो स्वामी

गोव्यांत नाहीं आतां. कुठं परागंदा झाला आहे म्हणे. कुठच्या तरी परदेशाला गेला असावा म्हणतात लोक. मावशींचा भाऊ नव्हे का तो? मला कोणी सांगत होतें कीं तो स्वामी आतां गोव्यांतून माघारा येऊन कुठं तरी ह्या रामदास महाराजा-सारखाच मट करून राहातो आहे. दिल्लीजवळ अलवार कीं कायसें राज्य आहे ना; तिथें तो असतो म्हणतात."

एकदम माझ्या डोक्यांत थोडा थोडा प्रकाश पडूं लागला. अलवार म्हणतांच मीं ओळखलें कीं हा मावशींचा भाऊ विद्यासागर स्वामी देखील गांधीवादाची कांत टाकून कॉंग्रेसचा तिरंगी झेंडा फेंकून देऊन हिंदुमहासभेचा भगवा झेंडा मिरवूं लागला म्हणायचा! अलवारांत नागपूरचे डॉक्टर खरे राजाचे दिवाण होते. ते एका काळचे गांधीजींचे आवडते शिष्य. नागपूर प्रांतांतील कॉंग्रेसचे पहिले मुख्य मंत्री. कॉंग्रेसचा, गांधीजींचा त्यांच्यावर कोण भरंवसा! डॉ. खरे म्हणजे भारतांत तेव्हांची कॉंग्रेसची एक जागती ज्योत. पण कॉंग्रेसमध्यें पटेनासें होऊन त्यांना बाहेर निघावें लागलें; तेव्हांपासून ते एकदम दुसऱ्या टोंकाला गेले होते. ते दुसऱ्या टोकाला म्हणजे किती! जमिनींतून अस्मानांत! कॉंग्रेसमधून हिंदुमहासभेंत!

अलवारांत तिथले मेओ मुसल्मान शेतकरी बंडें करीत होते. सरकार बंडें मोडीत होतें. कोणी कांहीं सांगत तर कोणी कांहीं सांगत. कम्युनिस्टांनीं सांगावें कीं अलवारचें हिंदु राजाचें सरकार तिथल्या गरीब मेओ शेतकऱ्यांना ते पाकि-स्तानच्या चळवळीचे पाठीराखे आहेत असा आरोप ठेवून भरडून टाकीत आहे, नाहींसे करीत आहे. कारण ते चळवळ करतात. कॉंग्रेसच्या पत्रांनीं बोलावें तर तसेंच कांहीं बोलावें, नाहींतर दुरून मौज पाहत गप्प बसावें. हिंदुमहासभेच्या आणि संघाच्या पत्रांनीं राजाची बाजू उचलून धरावी. देशावर येऊं घातलेलें पाकिस्तानचें संकट भारतांत ठिकठिकाणीं दांतओठ खात पुढें चालून येऊं लागलें आहे, अलवारांतील लक्षावधि मुसलमान शेतकरी पाकिस्तानला सामील असून अलवारांत हिंदु राजाला उखडून टाकून तिथें हिरवी पाकिस्तानी राजवट सुरू करायचे त्यांचे डाव आहेत, असें सांगून तीं हिंदू पत्रें हिंदूंना खडबडून जागें करीत होतीं. आपल्या हिंदु राज्यावर—आपल्या हिंदु धर्मावर—आपल्या हिंदु संस्कृतीवर ओढवणाऱ्या ह्या अक्राळविक्राळ संकटाला तोंड द्यायला कंबरा कसा, अशा 'हर हर महादेव'च्या रणघोषणेच्या भाषेखेरीज दुसरी भाषा त्यांच्या तोंडीं नव्हती. याच्या उलट पाकिस्तानी प्रचार करणारीं मुसल्मानांचीं पत्रें तर याच्या अगदीं दुसऱ्या

टोंकाला जाणारीं. तीं भडकून जळजळीत आगलाव्या चिथावणीखोर भाषेंत इस्लामच्या नांवावर मुसलमानांना जिहाद–धर्मयुद्ध करायला चिथवीत होतीं. असें अलवार पेटत धुमसत होतें. तेंच बंगालांत. तेंच पंजाबांत. तेंच सिंधमध्यें. आणि निजाम हैदराबादेंतही तेंच. युद्धाची–एकमेकांचे गळे कापायची भाषा!

मावशी तर कालच म्हणाल्या होत्या कीं आपले भाऊ कॉंग्रेसचे व गांधीजींचे कट्टे अनुयायी. मोठे चळवळ्ये. सरकारची त्यांच्यावर वक्रदृष्टि. त्यांना पकडून तुरुंगांत डाबून ठेवायचा सरकारचा डाव होता. म्हणून तर ते गोव्याच्या हद्दींत पळून गेले. तिथें त्यांनीं खादीआश्रम चालविला होता.

तेच स्वामी आतां जातीय परस्पर-विद्वेषानें भारलेल्या अलवारांत?

कॉंग्रेस सरकारनें त्यांच्यावरची बंदी उठवताक्षणीं एवढें यांचें मतपरिवर्तन कां व्हावें?

मी सोमनाथशीं हें तेव्हां बोलल्यें नाहीं. त्याच्याशीं बोलून काय करायचें! आम्ही शहाणीं माणसें अशी आपसांत यादवी माजवीत होतों, ह्या यादवींतला तो एक शूर शिपाई होता. पण तो कांहीं सेनापति नव्हता. गांधीजींनीं सांगितलें होतें, करा किंवा मरा. सोमनाथ करणारा किंवा करतां करतां मरणारा देवाचा शूर शिपाई होता. त्याच्या ठायीं वरणाऱ्या निष्ठेच्या पवित्र गंगाजलांत मीं हा चिखल कां कालवावा?

पण मला दुग्धा पडली, याला इतकी अगदीं कांटेकोर खित्रबातमी कशी?

मीं विचारलें, "तुला रे काय माहीत? तूं ऐकलेंस वाटतें आम्हांला बोलतांना रात्रीं?"

"नाहीं बाई!"

"मग तुला कसें माहीत हें सारें?"

पुढें वांकून माझ्या कानापाशीं तोंड नेऊन हळूहळू तो म्हणाला, "आमचे लोक तिकडे होते ना! वनमाळी देखील होता. ते लोक आले इकडे. रात्रीं भेटले मला. स्वामींचा आणि तिकडच्या सरकारी हालचालींचा पत्ता काढायला काल आले होते. खरेंच, स्वामी कुठें आहेत हो आपले बाई? फार दिवसांत दर्शन नाहीं झालें त्यांचें."

मला तें सारेंच अद्‍भुत आणि चमत्कारिक वाटूं लागलें. तें खरेंच वाटेना. मीं विचारलें, "ते लोक आले होते? आणि वनमाळी देखील आले होते त्यांच्याबरोबर?"

"होय." अगदीं माझ्या कानांत तोंड घालून बोलल्यासारखा हळू आवाजांत सोमनाथ बोलत होता, "हें कुठें बोलायचें नाहीं. वनमाळीच स्वतः आले होते. ते काल रात्रीं इथेंच झोंपले होते माझ्या खोलींत. आतां मावशी गेल्या ना; त्यांच्या पुढेंच तर ते गेले मला पोंचवून. बाकी, बाई! आपलेच ओंठ आणि आपलेच दांत, म्हणून बोलायचें नाहीं इतकेंच. पण मी म्हणतों हीं सारीं तडे गेलेलीं कचीं मडकीं. बदबद वाजतात. वनमाळी तरी काय कमी लबाड आणि मतलबी आहे! फकिरा आणि ती त्याच्या नादीं लागलेली पोरगी! काय नांव तिचें—विसरलों मी. ती तर म्हणे फकीराला हाताशीं धरून केव्हांची त्याचा खून करायला टपून बसली आहे! वनमाळीला वाटतें, मी मोटा वाजता गाजता देशभक्त क्रांतिकारक आहें, लोक मला भजतात. पण लोकदेखील असले वस्ताद आणि पाताळयंत्री आहेत कीं ते त्यांचीं मुंडकीं चिरून त्यांचीं हाडें गांवदडीच्या कुत्र्यांपुढें केव्हां कुठें कशीं चघळायला टाकतील याचा कुणाला पत्ता देखील लागायचा नाहीं. वाळवें खोऱ्यांतले लोक आहेत ते. आपसाआपसांत रात्रींच इथें वर्दळीवर आले होते. मनांत म्हटलें, इथेंच एकमेकांचे खून पाडतात कीं काय!..."

सोमनाथ काय बोलतो आहे इकडे माझें नीटसें लक्ष नव्हतें. वनमाळींच्या आणि त्या भूमिगत लोकांच्या वार्तेनें नव्या अनाहूत दारुण चिंता माझ्या मनांत उभ्या केल्या होत्या. त्यानेंच सोमनाथ म्हणाला ती मावशीची आणि महाराजांची माहिती सांगितली तर नसेल? वनमाळी!—काय या लोकांचा विचार तरी काय आहे? वनमाळीला हाताशीं धरून हे देशांत आणखी बखेडे माजवणार काय? यानें त्याला लुबाडावें, त्यानें याला लुबाडावें, यानें त्याचा खून करायला निघावें, त्यानें त्याचा गळा कापायला निघावें, यापेक्षां दुसऱ्या वार्ताच येऊं नयेत कानीं?

"दुर्दशा—सारी वाताहात चालवली आहे या साऱ्या लोकांनीं बाई! आपल्या देशाची. आपण साऱ्या लोकांनीं ताकदीपरी ताकद दिली, पैशापरी पैसा दिला, माणसांपरी माणसें दिलीं, जीवापरी जीव दिला, आणि आमच्या गांधीबाबानें हें किर्र ओसाड रान आमच्याबरोबर राबून, खपून उपजडाला आणलें. त्यांत पहिलें जित्राप उगवतें न उगवतें तों त्या शेतांत आज गुरेंढोरें शेळयामेंढ्या चरूं लागलीं आहेत. आणि वाघ, सिंह, कोल्हे, कुत्रे, लांडगे जिभल्या चाटीत आजूबाजूला फेऱ्या घालूं लागले आहेत."

बोलतां बोलतां सोमनाथ मध्येंच खोळंबला. मीं पाहिलें, त्याचा श्वासोच्छ्वास

भाता फुंकावा तसा जोराजोरानें वाहत होता. कसलें तरी भयंकर दृश्य समोर पाहावें तशी भकास भेदरलेली नजर खिडकींतून बाहेर आकाशाकडे लावून तो सुन्न होऊन बसला होता.

"कां रे सोमनाथ!" मीं हटकलें.

पण माझ्या बोलण्याकडे त्याचें मुळींच लक्ष नव्हतें. तें दूर दूर जणूं कुठच्या तरी अंधाऱ्या अंतरिक्षांत हरवल्यासारखें झालें होतें.

"मला हीं एकंदर लक्षणें कांहीं ठीक नाहींत दिसत बाई! आमचे लोक सांगतात त्यावरून. मला भय वाटतें,—परवां आपण स्वतंत्र होणार ना? पंधरा आगष्टला?" त्यानें मध्येंच एकदम विचारलें.

"होय." मी म्हणाल्यें.

"आणि मुसलमानांना पाकिस्तान मिळणार!"

"होय. मिळणार."

"आमचे आम्ही स्वतंत्र आणि त्यांचे ते स्वतंत्र!"

"होय."

"आणि मग एकमेकांच्या माना कापूं लागणार आम्ही! पाकिस्तानांत मुसलमानांनीं आमची कत्तल करायची, आणि इकडे आम्हीं मुसलमानांची कत्तल करायची. आणि अशी कापाकाप करतां करतां आमच्या देशाचा—आमच्या मोठ्या पांढरीचा जयजयकार करायचा! अशी यादवी माजवायची आम्हीं आपसांत कोण कसे चिथवतील तशी. यांत मरणार कोण आणि तरणार कोण?"

"बिचारी गोरगरीब कष्टकरी रयत फुकट मरायची!" मी म्हणाल्यें.

"नाहीं मरायची! रयत नाहीं मरायची. रयत कधीं मरतां आम्ही! धरतीमातेचीं लेकरें कधीं अशीं फुकट मरतील? मेलीं आहेत कधीं अशीं फुकट? रयत कधीं मरत नाहीं. रयत लढते. लढतां लढतां दमली भागली कीं बसते. हार खावी लागली तर पड खाते. पुन्हा ताजीतवानी होते आणि लढायला उभी राहते. लोक आम्हांला मारतील. आजपावेतों गोऱ्यांनीं आम्हांला मारलें, आतां आमचे लोक आम्हांला मारतील. कारण राजेपणाचा गोऱ्यांचा वारसा त्यांच्याकडे आला आहे ना आतां रयतेला छळायचा, पिळायचा, नाडायचा. पण...पाहूं! ये बी दिन जायेंगे!"

त्या निग्रही शब्दांबरोबर सोमनाथची मान अशा निग्रही पवित्र्यांत डोलली, कीं मी त्याचा तो रुद्रावतार पाहून विस्मयचकित झाल्यें. असली आव्हानाची भाषा

आजवर त्याच्या तोंडून मीं कधींच ऐकली नव्हती.

मनांत म्हटलें, रात्रीं याचे ते कोणी भूमिगत मित्र याला भेटून गेले, वनमाळी भेटून गेले, त्यांनीं हा नवा प्रकाश याच्या डोक्यांत पाडला असेल का?

• •

"बरें तुम्ही जाणार?" मध्येंच एकदम सोमनाथनें अंगांत वारें आल्यासारखा अनपेक्षित प्रश्न केला.

"होय. कां रे?"

"नाहीं; उगाच विचारलें. मी मात्र जाणार."

"कुठें रे?"

"माझ्या लोकांत. स्वामी एकदां भेटतील मला? त्यांना मीं आणभाक दिली आहे. मला मोकळें व्हायचें आहे त्यांच्या आणभाकेंतून आणि त्यांना विचारायचें आहे. ..."

"तुझ्या लोकांची ओळख मला करून देशील का रे तूं?" मीं विचारलें. मला भीति वाटूं लागली. ठिणग्या फुलूं लागल्या होत्या. आमच्याच कालच्या जिव्हाळ्याच्या विश्वासू साथीदारांत दारुण निराशा वाढीला लागली होती. त्या फुलल्या ठिणग्यांचा वणवा केव्हां कसा भडकेल याचा काय नेम! त्यांना जर समजुतीच्या दोन गोष्टी सांगतां आल्या तर सांगून पाहाव्या, माझा प्रभाव त्यांच्यावर पडला नाहीं तर स्वामींचा तरी प्रभाव पडेल, अशी आशा मला होती. बाकी, असल्या आशा पुष्कळदां खुळ्याच ठरतात.

कधीं नव्हत्याच्या करकर आवाजांत तो मला म्हणाला, "आमच्या लोकांची ओळख करून देऊं मी तुम्हांला? पण केंसानें गळा कापायला तयार होणार नाहीं ना तुम्ही आमचा? मोटीं तेवढीं सारीं खोटीं असतात म्हणतात. आमच्या लोकांना तुम्ही पकडून नाहीं ना देणार?"

सोमनाथचे ते शब्द माझें काळीज कापीत आंत घुसले. इतका भयंकर अविश्वास यानें कां बरें दाखवावा माझ्याविषयीं? हा इतका कां पिसाळल्यासारखा व्हावा आज? मला कळेचना.

"तुम्ही तशा नाहीं; मला माहीत आहे. पण—राग नका मानूं बाई! पण फकिराचा, अहिल्यादेवीचा, जाईचा गळा कापायला जे कालचे आपलेच लोक

टपले आहेत, त्या लोकांशीं तुम्ही आमच्याकरितां कडू व्हाल ? त्यांनीं तुम्हांला भीड घातली, किंवा पेंचांत पकडलें, तर—पण या तुम्ही येणार तर माझ्याबरोबर. तेवढा माझा तुमच्यावर विश्वास आहे. आमच्या लोकांचाही आहे. तुम्ही आणि स्वामी. दोनच माणसें तुम्ही आम्हांला अशीं सच्च्या दिलाचीं भेटलां आहां, कीं अजून तरी तुमच्या मांडीवर डोकी टेंकून आम्ही खुशाल झोंपूं. बरें तर. केव्हां निघायचें ? ”

“ तूं सांगशील तेव्हां.”

“ आतां निघायचें. मला आतां इथें राहायचें नाहीं.”

“ मलाही राहायचें नाहीं.”

“ आणि मुलेंबाळें ? ”

“ देव सांभाळील त्यांना. ”

“ मग, चलायचें ? ”

“ हो ! चलायचें. ”

“ अशाच ? ”

“ हो ? अशीच. चार ओळींचें पत्र तेवढें लिहून ठेवल्यें साहेबांना. न सांगतां निघून गेली असें म्हणायला नको त्यांनीं मागाहून. जा तूं तुझी काय करायची ती आवराआवर कर. अर्ध्या तासाच्या आंत निघूं आपण पायांखालीं दिसूं लागायच्या आंत. ”

“ बरें तर. ” असें म्हणून सोमनाथ आपल्या खोलीकडे गेला.

दोन ओळींची निरोपाची चिठी तेवढी लिहून ठेवली. जास्त कांहीं लिहिण्याजोगें नव्हतेंच. मला कांहींच तयारी करायची नव्हती. त्या बंगल्यांत माझें असें कांहींच नव्हतें आणि मला कांहीं बरोबर घ्यायचेंही नव्हतें. रोजचे दोन कपडे तेवढे पिशवींत घेतले. वाटखर्चापुरते पैसे जवळ होते. अन्न–पाणी–आसरा–आजवर लोकांनीं मला कधींच कांहीं कमीं पडूं दिलें नव्हतें. स्वामींसारखी करतां येईल ती लोकांची सेवा करायची आणि गरजेपुरतें अन्नाच्छादन लोकांपासून मागून घ्यायचें, असेंच यापुढें सारें जीवन कंटायचें मीं ठरविलें होतें.

मुलें गाढ झोंपीं गेलीं होतीं. दुरूनच त्यांना मीं डोळाभर पाहून घेतलें. आणि दोन्ही हात जोडून देवाची प्रार्थना केली, “ प्रभु ! या लेकरांचा वाली तूं आहेस.”

तेवढ्यांत अशोक उठला. चटपट स्नानगृहांतून मुखमार्जन आटोपून आला. तसाच कवाइतीचा गणवेष करून आपली छोटी लाठी घेऊन बाहेर निघाला.

त्यानें मला विचारलें नाहीं; मींही त्याला कुठें चाललास म्हणून विचारलें नाहीं.

"अशोक !" तेवढ्यांत बाहेरून हांक ऐकूं आली.

मदन करकऱ्यांची ती हांक होती. मीं ओळखली.

"आलों रे !" असें जरा मोठ्यानें ओरडून सांगत अशोक बाहेर पडला.

मला त्यांत वाईट एवढेंच वाटलें, कीं आमची नवी—आम्हां बुद्धिजीवी गरीब मध्यमवर्गीयांची पिढी आम्हांला सोडून आपला मार्ग चोखाळीत चालली आहे. पण ती चुकीच्या मार्गानें चालली आहे, असें बोलायला बळ आमच्या वाणींत आतां कुठें उरलें होतें ?

आमच्यावरचा आमच्या तरुणांचा विश्वास उडाला होता. आम्ही त्यांना मार्गदर्शन करूं शकत नव्हतों. त्याचा मार्ग ते चोखाळीत होते. आम्ही नको म्हणून आमचं ते थोडेंच ऐकणार होते !

खिडकींतून सहज बाहेर पाहिलें; तों दिशा फांकूं लागल्या होत्या.

कुणाला जाग मिळूं नये आणि उगीच बोभाटा होऊं नये म्हणून मींच माझी पिशवी घेतली, जातां जातां पुन्हा एकवार मुलांकडे पाहिलें, आणि त्यांना ईश्वराच्या स्वाधीन करून बाहेर पडलें.

तों सोमनाथ मलाच हांक मारायला येत होता.

"चला." तो म्हणाला.

"चल." मी म्हणाल्यें. त्याच्याबरोबर चालूं लागल्यें.

"आणखी अंमळशानें चांगलें उजाडेल; नाहीं सोमनाथ ?" मीं पूर्वेकडून तेजाळत येणाऱ्या उगवत्या संधिप्रकाशाकडे पाहून म्हटलें.

सोमनाथ कधीं कधीं मोठें मार्मिक बोले.

माझ्या शब्दांवर मार्मिकपणें तो उत्तरला, "आपण घराबाहेर पडलों ना; आतां उजाडणारच."

"वेळ झाली तर जातांना आपण किर्लोस्करवाडीला उतरूं रे !" मी चालतां चालतां मावशींची आठवण झाली म्हणून सहज म्हटलें.

झटकन सोमनाथ चालायचा थांबला.

"तुम्हांला माहीत आहे तर सारें. आम्हीं रात्रीं बोलतांना ऐकलेंत वाटतें तुम्ही. कुणापाशीं बोललां नाहीं ना ? नाहीं तर पोलिसांना धाड घालायला आयती संधि मिळायची." तो म्हणाला, "आपणाला आतां प्रथम तिकडेच जायचें आहे.

स्वामी देखील तिथेंच आपणाला भेटतील बहुतेक."

मला मोटें नवल वाटलें. नेमकी फुलाबोलाला गांठ पडते ती अशी. मी बोलत होत्यें मावशींविषयीं. आणि सोमनाथ बोलत होता त्याच्या त्या कोणा भूमिगत मित्रांविषयीं.

पण तो जर इतक्या खोल मनाचा, तर मी तरी माझ्या मनांतली गोष्ट इतक्यांतच त्याला कां म्हणून सांगूं !

बोलत चालत आम्ही बोलत होतों.

"चला लौकर चला बाई !" सोमनाथची एकसारखी घाई चालू होती.

प्रथम तो म्हणाला, "आपण मोटारीनें जाऊं."

"बरें; चल." मी म्हणाल्यें.

सदाशिव पेठेंतील पेरूच्या गेटाजवळच्या रस्त्यानें आम्ही चाललों होतों.

"गेटांत पोलीस जागे आहेत !" गेटाच्या अलीकडे पंचवीस पावलांवर मध्येंच रस्त्यांत थबकून तो म्हणाला.

"अरे, गेटावर पोलीस जागे असायचेच. जागता पहारा करायचा नाहीं, तर मग ते पोलीस कशाला म्हणायचे ?" मी म्हणाल्यें.

"कुणालाही वाटेल त्याला पकडतात पोलीस वहिमावरून ? कांहीं मुद्देमाल पुरावा सांपडला नाहीं तरी देखील ?" किंचित् गोंधळल्यासारखा तो इतक्या दुरून कानोसा घेण्याचा प्रयत्न करीत म्हणाला, "काय कुजबुजत आहेत पोलीस ?..."

चार पावलें रेंगाळत चालल्यासारखें करून तो पुन्हा थबकला.

म्हणाला, "आपण गाडीनेंच जाऊं बाई ! थेट मिरजेला. मध्यें वाडीला देखील उतरायचें नाहीं. मोटारींत उगीच कोणी ओळखीचीं माणसें भेटायचीं; आणि मग उगीच बैदा. चला आपण गाडीनेंच जाऊं."

"चल." मी म्हणाल्यें.

मीं ओळखलें कीं पोलिसांना भिऊन याच्या मनांत ही कालवाकालव होत आहे. पण असें कां ? याला आज एकाएकीं इतकें पोलिसांचें भय वाटायचें कारण काय ? हाही भूमिगतच असेल का ? पोलीस याच्या पाठीवर असतील ?

गेटावरच्या तळावर एक टांगा उभा दिसला. मीं त्याला हांक मारून सांगितलें, "स्टेशन."

"बसा बाई !" टांगेवाला म्हणाला.

"मी मागें बसतों. मला जरा कळमळल्यासारखें वाटतें." टांगेवाल्याच्या चेहऱ्याकडे दुरून न्याहाळून पाहिल्यासारखें करीत तो म्हणाला.

माझ्या तें ध्यानीं आलें. मला पुढें बसायला सांगून आपण मागें बसायला धजण्याइतका सोमनाथ उद्धट मुळींच नव्हता. मग असें कां?

"काय रे? आज फार चढली वाटतें!" टांगेवाल्यानें आम्ही टांग्यांत बसायच्या अगोदर आपल्या बैठकीवरून हटकलें, "बाई माणसें बरोबर असतांना तरी इतकी पिऊन बसूं नये रे!"

"अरे! तो पिणारा नाहीं. बरें वाटत नसेल त्याला. मागें बसूं दे त्याला." मी म्हणाल्यें. अगदीं मनांत येऊं नये ती कल्पना माझ्या मनांत आली; आणि ती देखील अगदीं खोडसाळ शब्दांचा काळा बुरखा घेऊन.

"लांडेलगट करतो आहे हा टांगेवाला माझ्याकडे पाहून." मला वाटलें. तो टांगेवाला मुसलमान होता.

आमच्या मागाहून माणसें येत होतीं. सोमनाथाचें आमच्याकडे लक्षच नव्हतें. त्या माणसांकडे लक्ष होतें. तो कावराबावरा होऊन सभोंवार पाहत म्हणाला, "मी मागें जातों बाई! तुम्ही पुढें जा. मला बरें नाहीं वाटत."

बोलतां बोलतां तो रस्त्याच्या अगदीं कडेकडेनें चालूं लागला. मला वाटलें, पोलीस पाळतीवर असल्याचा तर संशय याला आला नाहीं!

"अरे, मी येऊं पोंचवायला तुला सोमनाथ?" मीं टांग्यांत चढतां चढतां थबकून विचारलें.

"नको. काहीं नको. मी जाईन. तुम्ही जा." तो मागें वळून न पाहतां पुटपुटल्यासारखा बोलत जवळच्या बोळांत शिरला. दोन शब्द बोलायचाही अवसर मिळूं दिला नाहीं त्यानें मला.

मी तशीच टांग्यांत बसल्यें. माझा तर्क खरा होता. आमच्या मागाहून येणारे ते पोलीसच होते. पोलिसांना भिऊनच सोमनाथ मला सोडून पसार झाला असें आतां मला खरें वाटूं लागलें.

पण त्यानें तरी पोलिसांना इतकें कां भ्यावें? त्याच्यावर वहीम होता म्हणून का?

मी अधिक विचार करीत थांबल्यें नाहीं. टांगेवाल्याला म्हटलें, "चल स्टेशनवर."

"साला आतां सांपडणार पोलिसांच्या हातीं." असें पोलीसांना त्या बोळांत शिरलेले पाहून स्वतःशींच पुटपुटत टांगेवाल्यानें टांगा हांकलला.

"अहो ! मोठ्यांच्या नांवाखालीं झालीं तरी असलीं कुलंगडीं सदाच साधतात का? मिनिष्टराचा माळी झाला म्हणजे कांहीं अस्मानाची XX फाडून आला नाहीं...च् च् च्..."

मीं ओळखलें, तोंडून निघूं नये तो वाईट शब्द आपल्या तोंडून निघाला म्हणून तो चुटपुटला. मीं तें ऐकलें न ऐकलेंसें केलें. जनाची आणि मनाची इतकी लाज हे खालच्या थरांतील लोक देखील बाळगतात. आणि आम्ही?—आम्ही काय करतों?

"तूं ओळखतोस वाटतें त्याला?" मी टांगेवाल्याला म्हणाल्यें.

"होय तर बाई! ओळखतों मी त्याला. तो नसेल मला ओळखीत कदाचित्. त्याला ओळख असती तर हाक मारायला चुकला नसता." टांगेवाला म्हणाला.

"कुठची रे ओळख तुमची?" मीं उगीचच कुतूहलानें स्टेशनवर जाऊन पोहोंचेपावेतों वेळ काढण्यासाठीं पाल्हाळाची पोथी सोडली.

"एक कमी चाळीस सालापासूनची ओळख आहे आमची जेलांतली. आणि त्यानंतरची आमची ओळख..." आजूबाजूला कोणी ऐकत नाहीं अशी खात्री करून घेण्यासाठीं चौफेर नजर फेकीत तो हळूच म्हणाला, "आमच्या नाना पाटलाच्या पत्री सरकारांतली..."

जरा संथपणें टांगा चालवीत तो गोष्टी सांगूं लागला.

मीही नाना पाटलाचें नांव ऐकतांच कान टवकारून ऐकूं लागल्यें.

• •

पुणें स्टेशन आलें. इतक्या लवकर कां स्टेशन आलें अशी चुटपुट मनाला लागून राहिली. इतकी मी आमच्या गप्पागोष्टींत रंगून गेल्यें होत्यें. तो शिळोप्याचा पाल्हाळ नव्हता. महाराष्ट्रापुरती कां होईना, पण आपल्या लोकांनीं आपल्या अश्रूंनीं आणि रक्तानें लिहिलेली आमच्या चळवळीची उजेडांत न येणारी बखर होती ती.

आणि तो टांगेवालाही देशभक्तांच्या नांवरशींतला होता. बेचाळीसच्या चळवळींत मुंबईत कामगारांवर गोळीबार करण्याचा हुकूम नाकारून नोकरी गमावून तुरुंगांत गेलेला, पत्रीसरकारच्या रांगड्या कल्पकांबरोबर येरवड्यांतून त्या रात्रीं पळालेला, आणि चळवळींत गनिमी काव्यानें लढतां लढतां मुंबईत धारातीर्थी

पडलेला, आणि मुंबईच्या कामगार मैदानावर निष्ठावंत कॅांग्रेस भक्तांनीं आम्हीं सर्वांनीं ज्याची मुक्तकंठानें स्तुति केली, फुलें वाहिलीं, त्या सुलेमान पोलिस जमादाराचा थोरला भाऊ होता तो—बादशहा. मी कोणी चळवळींतली स्त्री आहें असें माझ्या खादी कपड्यांवरून आणि सोमनाथवरून हेरून त्यानें मोठ्या विशुद्ध अभिमानानें आपली ओळख मला करून दिली होती.

मीं मात्र मनातल्या मनात शरमेनें खालीं मान घालून माझी ओळख करून द्यायची टाळली.

"हें घे बादशहा!" असें म्हणून मी त्याचें टांगाभाडें बारा आणे देऊं केलें. पण त्यानें तें घेतलें नाहीं.

"आमच्या गांधींच्या लोकांकडून मी भाडें घेत नसतों बाई! मला आणखी कांहीं मदत आमच्या लोकांना करता येत नाहीं. पण एवढेंही आम्ही करायला नको?" असें बोलत त्यानें ते पैसे परत केले.

"नाना पाटलाला आणि आपल्या साऱ्या लोकांना या सुलेमानाच्या भावाचा सलाम सांगा." असें सांगतां सांगतां तो टांगा जवळच पलीकडे टांगास्टँडवर उभा करण्यासाटीं घेऊन निघून गेला.

मीं मनांत म्हटलें, अशीं उघड्या नागड्या, ओबडधोबड, खडबडीत, रांकट व रांगड्या पण खऱ्या संकल्पित लोकराज्याचीं पाळेंमुळें जनतेच्या मनांत खोल खोल रुजलीं आहेत. तीं निर्मळ सत्य-अहिंसेच्या दहींदुधाच्या चिखलांत रुजलेलीं नसतील. अश्रूंच्या आणि रक्तमांसाच्या चिखलांत रुजलेलीं असतील. म्हणून काय तीं अगदीं अपवित्र ठरवून खणून काढायचीं? कीं तीं जोपासायचीं?

आणि खणून काढायचीं आम्हीं म्हटलें, तरी तीं अगदीं खालच्या थरात जनतेच्या हृदयाला—सप्तपाताळांत शेषाच्या मस्तकाला जाऊन भिडलेलीं पाळेंमुळें आम्हांला खणून काढतां येतील?

मीं तिकिट काढलें. गाडींत जाऊन बसल्यें. गाडींत गर्दी बरीच होती. पण ती आमच्याच लोकांची गर्दी. त्या गर्दीत बसायला मला मुळींच संकोच वाटला नाहीं.

गाडी सुटायची शिटी झाली. माझें सहज प्लॅटफॉर्मवरच्या रेल्वेच्या मोठ्या घड्याळाकडे लक्ष गेलें. जवळ जवळ अर्धा तास मी उभ्या गाडींत बसल्यें होत्यें. पण तो दोन मिनिटांचा वेळ गेलासा मला वाटला. बादशहानें एखाद्या हजारांच्या चलनी नोटेचे कपटे गोळा करून आणावे तशा शेख मिरा, वनमाळी, जाई,

अहिल्या, सोमनाथ वगैरे अनेक भूमिगतांच्या ज्या गनिमी काव्याच्या तुटक तुटक युद्धकथा मला ऐकवल्या, ते कपटे जुळवून त्यांची हजारांची चलनी नोट तयार करण्यांत मी रंगून गेल्यें होत्यें. एक दाढीवाला काळा चष्मावाला तरुण गाडी सुटा-यच्या ऐन वेळेपावेतों प्लॅटफॉर्मवर वर्तमानपत्र वाचीत रेंगाळत होता. तो मधून मधून माझ्याकडे पाहत होता. तरी देखील तिकडे माझें लक्ष नव्हतें.

गाडी सुटली. तो तरुण चटकन चपळाईनें चालत्या गाडींत आमच्याच डब्यांत शिरला. डबा बहुतेक मोकळाच होता. सारीं आणखी पाच सात माणसें होतीं डब्यांत. तरी देखील तो तरुण माझ्या शेजारीं बाकावर रिकाम्या जागीं येऊन बसला.

मनापुढें प्रश्न उभा राहिला, " कोण हा ? "

अंमळशानें तो माणूस सिगारेट ओढायला उठून जरा दूर दाराच्या खिडकींत गेला. जातांना त्यानें आपला वर्तमानपत्राचा घडी केलेला अंक तिथें ठेवला होता. मला अगोदर सोमनाथच्या, आणि नंतर बादशहाच्या गप्पांच्या गर्दीत ताजें वर्तमान-पत्र विकत घ्यायला फावलें नव्हतें. तें आयतें वाचायला मिळालें.

मीं तें हातीं घेऊन त्यावर नजर टाकली. तों प्रथमदर्शनींच टसटशीत ठशांत छापलें होतें—

**' पत्री सरकार 'चा प्रख्यात दरोडेखोर फकिरा याचा खून !**

कऱ्हाड, ता. १२ ऑगस्ट. साताऱ्यांतील ' पत्री सरकार ' या कुप्रसिद्ध चळवळींतील एका काळ्या पड्यामागील एक प्रमुख सूत्रधार व प्रख्यात दरोडेखोर फकिरा बंदसोडे याचा बहेबोरगांवशेजारच्या जंगलांत अमानुषपणें खून झाल्याचें आढळून आलें आहे.

दरोडेखोर फकिरा हा अस्पृश्य होता. तो प्रथम मुंबईला कम्युनिस्टांच्या कच्छपीं लागलेला चळवळ्या कामगार होता. त्यापूर्वी सन १९३४ सालीं पुणें येथें नगरपालिकेचें मानपत्र स्वीकारण्याला महात्मा गांधी गेले असतां त्यानेंच त्यांच्यावर बॉंब टाकून त्यांचा खून करण्याचा प्रयत्न केला होता म्हणतात. त्यानंतर तो मुसलमान झाला होता. त्यावरून त्याचें आणि त्याची बायको जाई इचें पटेनासें झालें होतें.

या खुनाच्या मुळाशीं प्रेमप्रकरण व सवतीमत्सर असावा. एका प्रख्यात भूमिगत ' बेचाळीस ' चळवळ्याची तरुण धनाढ्य भूमिगत प्रेयसी अहिल्या-देवी ही आपल्या प्रियकराशीं भांडून फकिराशीं मैत्री जोडून राहत असे.

त्यामुळें फकिराची बायको जाई या भूमिगत चळवळ्या तरुण स्त्रीनें चिडून फकिराचा खून केला, व स्वतः पोलीस ठाण्यावर जाऊन खुनाची कबुली दिली. जाई सध्या पोलिसांच्या अटकेंत आहे. अधिक तपास चालू आहे.

अहिल्यादेवी फरारी आहे.

या खटल्यांत 'पत्री सरकार'चीं आणखी अनेक काळींबेरीं कुलंगडीं प्रकाशांत येण्याचा संभव आहे.

मुंबईचा एक कम्युनिस्ट कामगार पुढारी शेख मिरा याचा या प्रकरणीं खोलवर हात असावा असा पोलिसांना संशय असून ते त्याच्या तपासात आहेत. शेख मिरा फार दिवसांपासून भूमिगत असून 'पत्री सरकार' गुन्हेगारीच्या बाबतींत तो पोलिसांना हवा आहे.

# ११ : भारतमाता की जय!

• • •

...ती भयंकर बातमी वाचतां वाचतां माझ्या डोळ्यांपुढें अंधारी येऊं लागली. अंतःकरणाला भयंकर धक्का बसला. किती वेळ मी तशी सुन्न होऊन बसल्यें होत्यें न कळे. तो माझा शेजारी प्रवासी तरुण माझ्या शेजारीं केव्हां आपल्या जागेवर येऊन बसला हें देखील माझ्या ध्यानीं आलें नाहीं. आमची बेचाळीसची चळवळ, त्या चळवळींत हिरीरीनें भाग घेणारी ही मंडळी, एकमेकांच्या जिवाला म्हटल्या क्षणीं जीव देण्याइतकी एकी आणि आपुलकी तेव्हां त्यांच्यांत होती. तें सारें कुठें गेलें?

मला एकदम जुनी आठवण झाली, फकिराच्या त्या कळकळीच्या उद्गारांची. "भारतमातेच्या मंदिरासभोंवार आम्ही सर्वांच्या सुखासमाधानाचें, एकीचें, प्रेमाचें, जिव्हाळ्याचें नंदनवन उठवीत आहों, बाई! त्यासाठीं हें तण काढून अगोदर जागा बेणी करीत आहों. जागा बेणी करतां करतां आम्हीच बाग लावणार. आम्हीच मेहनत मशागत करणार. आम्हीच ती बाग उफाड्याला आणणार. आम्ही आमच्या रक्तानें झाली तरी ती बाग शिंपणार; फुलांफळांच्या बाजाला आणणार. आमची बाग, आमचें मंदिर. आपले स्वामीमहाराज तुरुंगांतून सुटून येतील तेव्हां त्यांच्या पायांवर लोटांगण घालून आम्ही सांगणार कीं स्वामीजी! ही आपल्या भारतमातेची बाग आणि हें त्या बागेंतलें भारतमातेचें मंदिर! कांहीं चुकल्यामाकल्याची आम्हाला क्षमा करा. तुमच्या हातानें त्या मंदिरावर 'भले शाबास!'चा सोन्याचा कळस चढवा. आणि आमच्या गांधीबाबांना जाऊन सांगा कीं तुमचा 'करा किंवा मरा' हुकूम आम्हीं अगदीं इमानानें पाळला. आम्हीं तुमच्या हुकुमाबरहुकुम केलें तरी, किंवा करतां करतां मेलों तरी.—आणि मग जेव्हां आमचा देश स्वतंत्र होईल, त्याचा मोठा उत्सव होईल, आमच्या कॉंग्रेसचा तिरंगी झेंडा दिल्ली राजधानीवर डौलानें फडकूं लागेल, आमची फत्ते झाल्याचे चौघडे झडूं लागतील, तेव्हां आम्ही सारे आमच्या भारतमातेचे पस्तीस कोटी बाळगोपाळ आमच्या सात लाख खेड्यांत आनंदीआनंदानें नाचत बागडत ललकारूं, 'भारत माता की जय! महात्मा गांधी की जय!...' जे जगतील वांचतील ते तो सोहळा पाहतील."

हे तेव्हांचे फकीराचे उद्गार होते. पोलिसांच्या पाठपुराव्याचा कहर झाला. गांवेंचीं गांवें वेढून, नाकेबंदी करून, घरोघर धुंडून ते फकिरा आणि वनमाळी यांची शिकार साधण्यासाठीं त्रेचाळीस सालीं पत्रीसरकारच्या ऐन दराऱ्यांत धडपडूं लागले. तेव्हां तो वनमाळींबरोबर जेजुरीच्या रानाकडे जाते वेळीं आमचा निरोप घेतांना गहिंवरून बोलला होता.

मी तेव्हां त्याला म्हणाल्यें होत्यें, " जे जगतील वांचतील ते तो सोहळा पाहतील असें रे कां म्हणतोस ? आपण सारींजणें तो सोहळा पाहायला जगणार आहों. "

" जगलों तर कुणाला नको आहे बाई ! जगलों वांचलों तर भेटूंच आम्ही पुन्हा. पण नाहीं जगलों; पोलीस शिकारी कुत्र्यांसारखे पाठीवर आहेत, त्यांनीं गांठलें एखाद्या जंगलांत, घातली गोळी आणि मेलों. तर ?. . ."

ते त्याचे अखेरचे शब्द आठवणी आठवणीनें माझ्या कानांत घुमूं लागले.

" अखेर भारतमाता स्वतंत्र झालेली पाहायला कांहीं जगला नाहीं बिचारा !" हे दुःखाच्या उमाळ्यासरसे शब्द तें वर्तमानपत्र शेजारच्या माणसाच्या हातीं देतां देतां माझ्या मुखावाटे बाहेर पडले.

" कुणाचा खून झाला ? फकिराचा ?" माझ्या शेजारीं जरा पलीकडे बसलेल्या एका उतारूनें विचारलें.

" होय." मी उत्तरल्यें.

" कुणीं केला ?—त्यानें प्रश्न केला.

" जाईनें." मी जीभ चोरून उत्तरल्यें. त्या दोघांचें नवराबायकोचें नातें बोलून दाखविण्याचें धैर्य मला होईना.

पण त्या माणसाला तें माहीत होतें वाटतें. त्यानें वर्तमानपत्राकडे नजर टाकीत विचारलें, " जाई म्हणजे त्याची ही बायको का ?"

" होय वाटतें." मी उत्तरल्यें.

" बाकी, तोही एक माथेफिरू होता; आणि तीही एक माथेफिरू होती. दोघेंही अगदीं एकसारखीं. आणि हा खून प्रेमाच्या लफड्यांत झाला असेल! तुम्हांला माहीत आहे ती अहिल्यादेवी ? "

" नाहीं." मी खोटेंच उत्तरल्यें.

" आम्हांला तरी काय; लोक बोलतात म्हणून माहीत. तुम्ही ओळखतां त्या फकिराला ?"

मी पुन्हा खोटेंच उत्तरल्यें, "नाहीं."

"आणि भारतीस्वामींना तरी?"

मीं त्याही प्रश्नाला मानेनें नकार दिला. मला त्या ओळखीदेखीच्या जंजाळांत गुरफटून जायचें नव्हतें. जरा पलीकडे एक माणूस मधून मधून लक्ष लावून माझ्याकडे पाहत होता. तिकडे माझें लक्ष असूनही मी लक्ष नाहींसें दाखवीत होत्यें.

"अहो! हा भारतीस्वामी म्हणजे रामदास महाराजाच्या आश्रमांतील भंगलेला देव. माहीत आहे तुम्हांला?"

मला त्या माणसानें भारती स्वामींचा बादरायण संबंध रामदास महाराजाशीं लावलेला ऐकून राग आला. ती स्वामींची बदनामी आहे असें मला वाटलें. मीं जरा रागांतच विचारलें, "तुम्हांला हें कुणीं सांगितलें? मोठ्या माणसाविषयीं आपण असें उचलली जीभ कीं लावली टाळ्याला करून भलतेंच कांहीं बोलूं नये."

"भलतेंच नाहीं बोलत मी हें बाई! मी सांगतों हें खरेंच आहे." तो माणूस माझ्या नापसंतीच्या उद्गारांनीं जरादेखील हिरमुष्टी न होतां उलट वाढत्या आत्मविश्वासानें बोलत होता.

"स्वामी काय अगदीं नवे आले आपल्या प्रांतांत?" मी म्हणाल्यें, "इतकीं वर्षे झालीं स्वामींना येऊन—"

"पण स्वामी आले तरी रामदास महाराज तेव्हां नव्हता ना आपल्या आश्रमांत! आश्रम बरींच वर्षे सरकारजमा होता. आणि महाराज उत्तर हिंदुस्थानांत कुठेंतरी संचार करीत होता."

"तुम्हांला हें कुणीं सांगितलें?"

"माझीच नव्हे, स्वामींच्या कुटुंबाचीदेखील तशीच खात्री पटली आहे कीं!"

"कुटुंब? स्वामींचें कुटुंब?"

"होय. स्वामींना कुटुंब आहे, मुलगा आहे, मोठी मुलगी आहे. बाई! तुम्ही सावरगांवांत दोन वर्षांपूर्वीं आश्रम घालून होतां ना? खरें सांगा."

आतां खोटें सांगायची सोयच नव्हती. मी म्हणाल्यें, "होय. मग पुढें?"

"तेव्हां एक विधवा बाई येऊन गांवांत एका बाजूला एका झोंपडींत राहिली होती. बरोबर एक दहा अकरा वर्षांचा मुलगा होता. मायलेकरें आम्हांला पुष्कळ चांगल्या चांगल्या गोष्टी शिकवायचीं. चरख्यावर सूत काढायला, टकळीवर सूत काढायला, हातमाग चालवायला, असें कितीतरी चांगलें चांगलें शिकवायचीं तीं

आम्हांला. तीच स्वामींची मंडळी. मावशी आणि अविनाश."

पहाटेला सोमनाथ बोलला, आणि आतां पुन्हा हा माणूस बोलत होता. तीच गोष्ट. अगदीं तीच. पण अधिक खात्रीनें बोलत होता. त्यावर विश्वास ठेवावा तरी कसा, व न ठेवावा तरी कसा ?

" तुम्ही सावरगांवचे का ? " मीं त्या गृहस्थाला विचारलें.

" होय. तुम्हीं मला ओळखलें नाहीं बाई ! पण मीं तुम्हांला ओळखलें. "

तरी देखील मला ओळख पटेना. आठवण होईना. मधल्या दीर्घकालीन आजारांत जुन्या आठवणींची वाळवीनें खाल्लेल्या अडगळींतल्या पेटींतील वस्त्रांसारखी माझ्या आठवणींची अवस्था झाली होती. पूर्वीच्या पुष्कळशा गोष्टी आठवतच नसत.

मला अजून आठवण पटत नाहीं असें पाहून तो माणूस म्हणाला, " बाई ! त्या दिवशीं तुम्ही कोल्हापूरला गेलां होतां सभेला. आमच्या जयवंतराव निर्वाणांना हार घालायला. आम्हीं गावानें तुम्हांला पाठवलें होतें. तेव्हां पहाटेला तुम्हांला आम्हीं येऊन नाहीं उठवलें ? मीं आणि गांवमामानें ? "

" तुम्हीं भगवान चौगुले ? "

" होय. आतां कशी ओळख पटली ? तरी मी केव्हांचा तुम्ही गाडींत चढल्या वेळेपासून वाट बघत होतों. म्हटलें, पाहूं बाई मला ओळखतात का. मीच होतों तुम्हांला सांगितलें तेव्हां. आणि आमचा गांवमामाही होता. आठवतें ? "

" आठवतें. " मला बोलतां बोलतां हसूं येऊं लागलें. अशासाठीं कीं, इतक्या घरोब्यानें माझ्याशीं सावरगांवांत वागणाऱ्या माणसालाही मी कशी अशी विसरल्यें ! मला आतां तेव्हांच्या एकेक गोष्टी आठवूं लागल्या. भगवान चौगुले माझ्या सावलीसारखा नेहमीं माझ्याबरोबर हरएक कामांत असायचा. अगदीं जन्मदात्या वडिलांसारखा माझ्यावर वडीलकीच्या मायेची पाखरछाया धरून. गांवात असें आहे, असें नाहीं, सारें मला नीट समजावून सांगायचा. मीं कोणतेंही काम हातीं घेतलें कीं हा आपला पुढें आहेच.

" माझ्याच शेजारीं झोंपडींत राहात होत्या त्या बाई तेव्हां. माउली इतकी थोर, इतकी सज्जन, कीं रोज उठावें आणि तिच्या पायांचें तीनत्रिकाळ तीर्थ घेऊन पावन व्हावें. " भगवान मावशींविषयीं सांगूं लागला.

" पण मावशी ना रे त्या त्या मुलाच्या भगवान ? " मीं विचारलें.

" होय. मला देखील त्या बाईनीं तसेंच सांगितलें होतें. मला वाटे, मीं स्वामींच्या आश्रमांत त्यांना पाहिलें आहे केव्हां तरी. सदानंदबुवा म्हणजे आमचे फार फार आवडते. फार फार देवमाणूस. हें नवराबायकोचें जोडपें गांवांत आपल्या लोकांच्या झोंपड्यांपुढें, गोठ्यांत, आम्हांला शिकवण्यासाठीं स्वतः आमच्या घरची घाण उपशीत राबूं लागलें ना, कीं आम्हांला वाटायचें, हें साक्षात् लक्ष्मी-नारायणाचें जोडपें आमचा उद्धार करायला अवतार घेऊन आलें आहे. तेव्हां आम्हांला कल्पनाही आली नाहीं कीं स्वामींचा आणि या मावशींचा असा संबंध असेल म्हणून. स्वामीही तेव्हां दुसऱ्या प्रांतांत संचार करीत होते. "

" आणि त्या सदानंदबुवांचें काय झालें ? "

" बुवा जे ह्या गलेलठ्ठ बोक्याच्या खुनशी बदफैली बुवाबाजीला विटून आश्रम सोडून गेले, ते तिकडेच वारले. कोणी म्हणत, त्यांनीं ह्या सैतानाच्या सैतानी चाळ्यांना विटून जीव दिला. कोणी म्हणत, ह्या बुवाच्या कोणा गुरुभोळ्या मारे-करी चेल्यांनीं त्यांना ठार मारलें. मावशींपाशीं गोष्ट काढली, तर त्या बोलायचें टाळीत त्या मुद्द्यावर. तोंच एके दिवशीं स्वामी त्या टापूंत संचार करूं लागले, आणि मावशी एकाएकीं निघाल्या गांव सोडून. आम्हीं विचारलें त्यांना. तुम्ही इतक्या आमच्या गांवावर रुसलांत कां ? तर त्याला उत्तर म्हणजे डोळ्यांतून घळघळ पसाभर पाणी!—तुम्ही तेव्हां आजारी होतां. कोल्हापूरला गेलां त्या आमच्या कम-नशिबानें माघाऱ्या आमच्या गांवीं आलांच नाहीं—आणि मावशींचें तें कोडें काल उलगडलें, मावशी अचानक मला लकडी पुलापलीकडे पुण्यांत भेटल्या तेव्हां. "

मी एकेक ऐकत होत्यें तें नवलच ! मला कांहीं सुचेना. मन अगदीं सैरभैर होऊं लागलें. डब्यांतली मंडळी देखील चमकल्यासारखी करून आमच्याकडे पाहत होती.

"आणि तें उलगडलें देखील अशा चमत्कारिक रीतीनें कीं—" बोलतां बोलतां भगवान एकदम थांबला.

"कसें उलगडलें ?" मीं विचारलें. मला तें रहस्य जाणण्याची आतां विलक्षण उत्सुकता लागून राहिली होती.

"आम्ही आपल्या आमच्या जिल्ह्यांतल्या गोष्टी बोलत चाललों होतों आमच्या लोकांच्या नेहमींच्या भानगडीच्या! त्यांत विषय निघतां निघतां अहिल्यादेवीचा निघाला."

माझ्या ब्रिन्हाडून कोल्हापुरांत अहिल्या जी लाल पथकाचे पोवाडे ऐकायला म्हणून,गेली, ती पुन्हा कांहीं आजवर मला दिसली नव्हती. तिचा ठावठिकाणाही नव्हता. आणि आतांच वर्तमानपत्रांत बातमी वाचली ती कांहींतरीच. डोळ्यांनीं वाचूं नये आणि कानांनीं ऐकूं नये अशी. मनांत मी म्हणत होत्यें, भलेपणाच्या शिखरावर असलेलीं माणसेंदेखील एकदां पाऊल चुकून शिखरावरून घसरलीं कीं थेट अगदीं सप्तपाताळांत घरंगळत जातात तीं अशीं.

• •

मीं भगवानला विचारलें, "अहिल्यादेवी कुठें आहे तुम्हांला माहीत आहे?"

"माहीत आहे. पण ती बेपत्ता काळोखांत कुठेंतरी आहे एवढें माहीत आहे." भगवान म्हणाला.

"म्हणजे काय?" मी म्हणाल्यें. मला तो काय म्हणाला त्याचा अर्थच कळेना.

"ती गेले चार आठ दिवस बेपत्ता आहे म्हणतात. कोणी कुठचा कुठचा पत्ता सांगतात. पण तो काळोखांतला."

मला काळोखाचा अर्थच कळेना. मीं विचारलें, "अगदीं स्पष्ट सांगा ना मला! काळोख म्हणजे कुठचा काळोख?"

"तुम्ही आमच्या धनीसाहेबांना ओळखतां ना?"

"जहागिरदारसाहेबांना?"

"होय."

"ओळखत्यें."

"आणि त्यांच्या कारभाऱ्याला ओळखतां?"

"कोण जयवंत निर्वाण?"

"ते कसे आतां कारभारी? आतां फार थोर माणूस झाले आहेत ना ते? आपले मंत्री आहेत ते. ते कसे आतां कारभार पाहतील? आतां त्यांचा कारभारी, तो जहागीरदारांचा कारभारी झाला आहे. गांवमामा. तुम्ही त्याला ओळखतां?"

"हो! चांगली ओळखत्यें."

"त्या गांवमामाचा दरारा फार वाढला आहे आतां. तो आतां साधा माणूस राहिला नाहीं. मोठा पुढारी झाला आहे तो आतां. आणि जहागीरदार तर काय,

मोठे देशभक्त बनले आहेत. आतां पाहाल तुम्ही त्यांना, तर पांढरे शुभ्र खादीचे कपडे. मोटार खादीची मिळत नाहीं तिथें इलाज नाहीं. नाहींपेक्षां आवडत्या कुत्र्याच्या अंगावरची झूल देखील खादीच्या रेशमाची आहे."

मला भगवानची खोंचक मर्मभेदी वाक्चतुरता माहीत होती. दुसऱ्याला शब्दांचा मुका मार कसा द्यावा, अस्वलासारख्या शब्दांनीं गुदगुल्या करून एखाद्याला अगदीं हंसवून हंसवून हैराण करून ठार कसें करावें, या बाबतींत त्याचा हात धरणारा कोणी नव्हता. तो उपराधानें काय काय मर्मभेदक शब्द बोलतो ते मी लक्षपूर्वक ऐकत होत्यें.

सावकारीचे, जमीनजुमल्याच्या गहाण-खरेदी-विक्रीचे, दरखास्ती-हुकुमनामे-कैफियती असे दरोबस्त कागद आतां आमच्या जहागीरदारांच्या कचेरींत तुम्हांला खादीच्या रुमालांत बांधलेले आढळतील..."

"पण रयतांवरचा जुलूम पूर्वीसारखाच चालला आहे ?"

"पूर्वीपेक्षां वाढला आहे. पूर्वी तुम्ही आमच्या भागांत काम करीत होतां ना, आणि स्वामी काम करीत होते ? तेव्हां एकट्या तिरंगी झेंड्याला मान होता आमच्या गांवांत. पण आतां तिरंगी झेंड्याइतकें अथवा त्याहूनही अधिक महत्त्व भगव्या झेंड्याला आहे."

"भगवा झेंडा म्हणजे कुणाचा ? शिवाजीचा कीं सावरकरांचा ?"

"दोघांचाही म्हणा ना ? दोघांनींही त्याला आपला म्हणावें. पण हा झेंडा थोडक्यांत सांगायचें तर सावरकरांचाही नव्हे आणि शिवाजीमहाराजाचाही नव्हे. शिवाजी महाराजांचा काय आणि सावरकरांचा काय, भगवा झेंडा त्यागाचा होता. आमचा हा भगवा झेंडा भोगाचा आहे. कुलीन अब्रूदार स्त्रियांच्या अब्रूवर देवाच्या, देशाच्या आणि धर्माच्या नांवावर दरोडे घालणारा आहे हा आमच्याकडचा भगवा झेंडा बाई ! ध्यानीं आलें तुमच्या मी काय म्हणतों तें ?"

मी तें ऐकून आश्चर्यांत बुडून गेल्यें. मला त्या बोलण्याचा अर्थच कळेना. कोणी मोठा विद्वान नव्हे, वक्ता नव्हे, गाजलेला देशभक्तही नव्हे, असा हा सामान्य माणूस इतकें जहरी पण अंतःकरणाच्या तळमळीनें बोलत होता. तें खोटें नसणार असें तर वाटे; आणि तें खरें नसावें असेंही वाटे.

भगवान बोलतां बोलतां जरा थांबला. त्याची चर्या पाहिली तों ती रागानें लाल होत होती. त्याच्या अंतःकरणांतील दाह त्याच्या चर्येवर स्पष्ट उमटलेला दिसूं लागला होता.

"आज रामदास महाराजाचें राज्य पुन्हा सुरू झालें आहे आमच्यावर बाई ! आणि आतां आमच्याकडे लहान मोठे किती तरी शिवाजी पावसाळ्यांतल्या कुत्र्यांच्या छत्र्यांसारखे उमटूं लागले आहेत. आमचे जहागीरदार मोठे शिवाजी. आमचा गांवमामा गांवठी शिवाजी. रामदास आणि हे शिवाजी यांची एकी होऊन तिरंगी झेंड्याच्या आड्याखालीं अशी त्या रामदास महाराजाच्या भगव्या झेंड्याची आमदानी आमच्याकडे पुन्हा सुरू होऊं लागली आहे. आतां तुम्हांला कुणी विचारणार नाहीं. स्वामींना कुणी विचारणार नाहीं. तुमचा आमचा तो जुना जमाना झाला आतां. मागें पडला. आतां आमचे मोठे शिवाजी मोठे काँग्रेसवाले झाले आहेत. जितकी इंग्रजांवर त्यांची निष्ठा होती, तितकीच आतां—"

"गांधींवर आहे ?"

"नाहीं. चुकतां. निष्ठा गांधींवर नाहीं; काँग्रेसवर आहे. राज्य करायला पुढें सरसावलेल्या थोर लोकांच्या बऱ्यावाईट कृत्याचा वेळीं अवेळीं पाठपुरावा करणाऱ्या, बटकीप्रमाणें राबणाऱ्या गांधीध्वजा काँग्रेसवर त्यांची निष्ठा आहे. आरंभीं 'महात्मा गांधी की जय' म्हणायचें, शेवटीं 'महात्मा गांधी की जय' म्हणायचें, आणि गांधीजींना असे साक्ष ठेवून सारें करायचें. काळ्या बाजारांत, तसेंच कुळांच्या, कामगारांच्या, कारकुन, मास्तर अशा तुमच्या आमच्यासारख्या गरीब बुद्धिवान लोकांच्या पिळणुकीनें देश संकटांत आहे म्हणून त्याच्या पोटावर पाय आणायचे; नांव गांधीजींचें घ्यायचें आणि रान पुंजीवाल्यांना पोळांना चरायला मोकाट मोकळें सोडायचें. असला मामला चालला आहे आजकाल. तुम्ही आता येणार आहां आमच्या गांवीं पुन्हा ?"

"होय." मी उतरल्यें.

"या तर. आणि पाहा आम्हीं तुमचें, स्वामींचें, ग्रामराज्य कसें मूळपासून नांगरीत आहों तें. उद्यांच या. उद्यां तुमची पंधरा आगस्ट ना ? उद्यां आपला भारत स्वतंत्र होणार ना ? तो गांवचा सोहळा पाहायला या. म्हणजे तुम्हांला तिथें नवा नवा घटोत्कचाचा बाजार दिसून येईल. तुमच्या आणि स्वामींच्या आश्रमांत आतां ओसाडी उगवूं लागली आहे. तुमच्या चरख्यांना आतां सरपणाच्या महागाई-मुळें बरा भाव येतो. रामदास महाराजाचा आश्रम पूर्वीसारखा कां, पण पूर्वीपेक्षांही अधिक फोफावला आहे. उद्यांचें गांवचें मुहूर्ताचें झेंडावंदन आमच्या खादी पांघरणाऱ्या शिवाजीच्या हातून मोठ्या थाटामाटांत होणार आहे. आणि त्याला

महाराज शिवाजीच्या डोक्यावर आपल्या हातच्या भगव्या झेंड्याची सावली धरून आशीर्वाद देणार आहे.”

बोलतां बोलतां भगवान एकदम मनस्तापाच्या अतिरेकाचा एक उसासा टाकून उठला. स्टेशन आलें होतें. तो खालीं उतरतां उतरतां म्हणाला, “असें कांहीं आहे बाई ! आतां मी जातों. माझे दोस्त गाडींत कुठें बसले आहेत तें पाहातों. राजकारण ह्या आतां झाल्या आहेत अशा शिळोप्याच्या गप्पा. धंदेवाले लोक आम्ही. आमचा व्यापारधंदा अगोदर पाहिला पाहिजे. पाहातों इतका आल्यासारखा कुणीं काय व्यापार केला तो. येतों मी. ”

भगवान मला नमस्कार करून खालीं उतरला.

भगवानमागोमाग डब्यांतील बाकीचे चार लोकही खालीं उतरले. आतां डब्यांत फक्त मी, तो काळा चष्मावाला नवा प्रवासी, व पलीकडच्या बांकावर दोन बाया झोंपलेल्या होत्या.

गाडी सुटली. आमच्या डब्यांत कोणी नवे उतारू शिरले नाहींत. मी खिन्न मनानें स्वतःशींच भगवाननें माहिती सांगितली त्या प्रकाशांत भूतकाळाकडे न्याहाळून पाहत विचार करीत होत्यें. आम्ही आमच्या ग्रामराज्यांत रामराज्याचें नंदनवन फुलवूं पाहत होतों, मी आणि स्वामी ! त्या आमच्या अर्ध्यामुर्ध्या रामराज्यांत अशी रावणशाही माजली आहे एकूण ! जहागीरदारांसारखे लोक कॉंग्रेसपुढारी म्हणून पुढें येऊं लागले, कीं लांडगेच शेळ्यामेंढ्यांचे कळप राखणारे रखवालदार झाले म्हणायचे ! आणि स्वामींविषयीं इतकें भगवान बोलला—खरें असेल तें ? ...मनाला कांहींच उमज पडेना. ते सदानंदबुवा म्हणजे—

• •

“ तुमच्या माहितीचा होता हा फकीरा ? ” तेवढ्यांत त्या शेजारच्या तरुणानें वर्तमानपत्र कोटाच्या खिशांत ठेवीत मला विचारलें.

“ होय. होता माहितीचा. कां ? ” मी त्याच्या चेहऱ्यावर आणि आवाजांत माझ्या कांहीं आठवणी सांपडतात का न्याहाळीत विचारलें.

“ नाहीं; उगीच मला तसें वाटलें. तुम्हांला कुठें जायचें आहे ? ” त्या तरुणानें प्रश्न केला.

मला अधिक ओळख पटूं लागली. पण डोळे कांहीं त्याचे त्या काळ्या चष्म्यांतून दिसेनात.

" मी चालल्यें किर्लोस्करवाडीला. कां ? " मी म्हणाल्यें.

तेवढ्यांत त्यानें आजूबाजूला पाहत हातरुमाल खिशांतून काढला. चष्मा काढून तो हातरुमालानें तोंड पुसूं लागला.

तेव्हां मात्र मला त्याची ओळख पटली. तो शेख मिरा होता. पण मीं त्याला हांक मात्र मारली नाहीं. कारण पोलिसांच्या पकड वारंटाची, बक्षिसाच्या लालुचीचें विषाचें पाणी पाजलेली मृत्यूची तरवार त्याच्या मानेवर लटकतांना मला दिसत होती. मीं बोलावें आणि कोणीं चोरून ऐकावें. तो गुप्तपोलीस असला तर ?

" तुम्हांला कुठें जायचें बाई ? " मीं पलीकडच्या बांकावरील दोघी बायांना विचारलें.

त्या दोघीही माझ्या तोंडाकडे पाहूं लागल्या.

" तुम्हांला जायचें कुठें ? " मीं पुन्हा विचारलें.

त्या बाया कांहीं तरी मला न कळणाऱ्या भाषेंत पुटपुटल्या. मला त्यांची भाषाही कळेना आणि त्या काय म्हणतात तेंही कळेना.

पण शेख मिराला त्यांची भाषा कळली. तो एकदोन वाक्यें त्यांच्याशीं त्या भाषेंत बोलला. मी आपली शुंभासारखी ऐकत होत्यें.

" तेलगू बाया आहेत त्या. भिकारणी आहेत. फार दूर जायचें आहे त्यांना निजाम हैद्राबादेकडे. त्यांना मराठी येत नाहीं. "

" नाहीं ? "

" नाहीं. मुळींच येत नाहीं. आपणाला निर्धास्तपणें बोलतां येईल. बरें कुठें चाललां तुम्ही आतां ? "

" मला जायचें आहे माझ्या सावरगांवाला. मध्यें उतरल्यें तर किर्लोस्कर-वाडीला उतरणार आहें. "

" नका. उतरूं नका. धोका आहे. आतां वर्तमानपत्रांत वाचलेंत ना ? रान पेटलें आहे. आपले शेलके भूमिगत चळवळे तिथल्या जगलांत जमणार आहेत असा पोलिसांना सुगावा लागला आहे. पोलीस धाड घालायला चुकायचे नाहींत. आणि तुम्ही मात्र हकनाहक त्यांत सांपडाल. आज सोमनाथ आतांच पकडला गेला. "

" सोमनाथ पकडला गेला ? "

" होय. तुमच्याबरोबर येणार होता वाटतें तो ? "

" होय. पण तो कां बरें पकडला जावा ? "

" कां म्हणजे ? आजकाल आमच्या लाग्याबांध्याचा माणूस म्हटला कीं पोलीस त्याच्या सावलीलाही बिचकतात. इतके दिवस पोलिसांना माहीत नव्हतें तो आमचा माणूस आहे असें. पण फकिराच्या खुनानें त्याला उघडकीला आणलें. पोलिसांना संशय आहे कीं ती खुनी जाई याची लेक. असल्या कारस्थानांचे आणखी धागेदोरे शोधून पाहतां आले तर पाहण्यासाठीं पकडलें असेल त्याला. या गोष्टींना कांहीं इलाज नाहीं आतां. वाळल्या गवतावर आगीच्या ठिणग्या पडल्या, कीं आग अशीच भडकत जायची. "

" पण शेख मिरा ! लोकांत ही अपप्रवृत्ति वाढीला लागणें चांगलें का ? "

" चांगलें कोण म्हणेल याला ? "

" मग लोकांनीं ही अपप्रवृत्ति टाकून सद्भावानें, स्वतंत्र भारताचे खरे नागरिक कां शोभूं नये ? भारत हा आपणां सर्वांचा मायदेश आहे. आपण सारीं एकाच भारतमातेचीं लेकरें आहों. सख्या प्रेमळ बहीणभावंडांसारखीं आपण सर्वांनीं प्रेमानें, गुण्यागोविंदानें कां नांदूं नये ? आपले स्वामी तरी आपणाला दुसरें काय सांगतात ? गांधीजी तरी हेंच सांगतात ना ? "

" पण गांधीजींचें सांगणें कधीं कुणीं प्रामाणिकपणें मानलें का ? आज गांधीजींना खऱ्या अर्थानें कोणी मानतात तरी का ? आजचीं आमचीं कॉंग्रेस सरकारें पाहा. काय बूज राखली आहे आम्हीं आमच्या सरकारी कारभारांत गांधीजींच्या शिकवणुकीची. गांधीजींना भारताची चिरफाड व्हायला नको होती. आमच्या सरकारांनीं आणि कॉंग्रेसनें भारताचा शब्द मानला का ? पंजाब आणि बंगाल यांचीं खांडोळीं करायच्या गांधीजी विरुद्ध होते. पण दोघां भांडखोर भावांनीं दुष्टबुद्धीनें गोठ्यांतली कामधेनु आपापल्या वांट्याची कापून घ्यावी, तशीं त्या दोन प्रांतांचीं खांडोळीं केलींच ना ? गांधीजींची सत्य-अहिंसा तरी आपण व्यवहारांत कितीशी पाळली ? आणि आज कितीशी पाळीत आहों ? गांधीजींना बळवंतांकडून दुबळांची मिळकत व्हायला नको आहे. आपण आपल्या कॉंग्रेसच्या राज्यांत ही पिळणूक थांबवली आहे का ? जमीनदारी जुलमापासून शेतकरी सुटला आहे ? कारखानदारी पिळणुकींतून कामगार सुटला आहे ? सावकारी पिळणुकींतून गरीब ऋणको सुटला आहे ?... "

तोंच घोरपडी स्टेशन आलें. आमच्या गोष्टी थांबल्या. मध्येंच सांखळी तुटली. शेख मिरा चटकन् उठून काळा चष्मा लावून दरवाजांत जाऊन उभा राहिला. तोंडानें शीळ घालीत तो इकडे तिकडे न्याहाळीत होता. सुदैवानें कोणीं कांहीं हटकलें नाहीं.

गाडी सुटली. तसा तो पुन्हा येऊन माझ्या शेजारीं बसला. आणखी कोणी नवें माणूस आमच्या डब्यांत चढलें नाहीं.

"नाहीं; आमची पांखरें कुणी जाळ्यांत अडकून फसायला जातात कीं काय पाहात होतों. बरें झालें. कोणी आले नाहींत गाडींत चढायला." तो म्हणाला.

"बेचाळीसचा चळवळीचा काळ आजच्यापेक्षां चांगला होता, नाहीं रे? आजच्यापेक्षां अधिक उजळ माथ्यानें, अधिक निर्भयपणानें वागतां येत होतें आपणा मंडळीला. तसें आज नाहीं. लोकमत हें खळाळून वाहत्या पाण्यासारखें चंचल आहे. त्यावेळीं गरीब, श्रीमंत, जमीनदार, व्यापारी, शेटसावकार, पोलिसां-पासून अगदीं कांहीं कांहीं वरचे पोलिस अधिकारीदेखील चळवळीच्या एकाच मंत्रानें भारलेले होते. आम्ही सत्कार्य करीत आहों असा त्यांचा आमच्या चळ-वळीवर भरंवसा होता. तसा आतां नाहीं."

"होय. असें कांहींसें दिसतें खरें. पण—"

"याला कारण काय असावें बरें? लोकांचा काय, कुणाचा काय, विश्वास धड कुणावरच उरलेला दिसत नाहीं. कॉंग्रेसवर नाहीं, गाधीजींवर नाहीं, तुमच्यासार-ख्यांच्या चळवळीवर नाहीं, कम्युनिस्टांवर नाहीं—वाटतें कीं आपल्या पाया-खालची—सर्वांच्या पायाखालची वाळू झपाट्यानें सरकते आहे. ज्याची खोली माहीत नाहीं, ज्याचा आदि अंत माहीत नाहीं, अशा जगबुडीच्या उसळत्या प्रवाहाच्या किनाऱ्यावर उजाड वाळवंटांत येऊन पडल्यासारखें वाटतें मला तरी."

"नाहीं. तसें नाहीं ताई! तसें नाहीं."

"नाहीं काय? आज राष्ट्राला कोणी नेता उरला आहे का सारें राष्ट्र—भारताची काटेमाप रयत ज्याचा शब्द विश्वासानें मानील असा? गांधीजींचा देखील शब्द मानायला आज राष्ट्र तयार नाहीं."

"तसें नाहीं. गाधीजींच्या मागें आज मागच्यासारखें सारें राष्ट्र उभें नाहीं हें मला तुमचें तितकेंसें पटत नाहीं."

"पटत नाहीं कसें? आज राष्ट्र गांधीजींच्या मागें आहे? जनमताचा वारा आज कोणत्या दिशेनें वाहतो आहे आपण पाहतों ना? हिंदुमहासभेची चळवळ, संघाची

चळवळ या चळवळी किती जोरानें फोफावत आहेत पाहा बरें ! लोकमताचा लोंटा महापुरासारखा वाढत विस्तारत त्या चळवळींमागें धो धो वाहत खळाळत चाललेला दिसत नाहीं आपणाला ? आणि अशा स्थितींत तुमचें म्हणणें काय, कीं लोकांच्या गाऱ्हाण्यांचे प्रश्न एकदम मिटवावे. म्हणजे लोकमत पालटूं लागेल. पण आजच्या स्थितींत कोणत्या तरी सरकारला शक्य आहे हें ?"

"सरकारनें शक्य करायचें मनांत आणलें तरच सारें शक्य आहे."

"मग तुला काय वाटतें, असें लोकांचें कल्याण करायला आमच्या कॉंग्रेस सरकारलाच मनापासून नको आहे का ?"

"ज्या लोकांचें सरकार आहे, त्या लोकांचें कल्याण कॉंग्रेस करील."

"कॉंग्रेस सरकार साऱ्या जनतेचें आहे."

"हें पाहा, मी पूर्वीही स्पष्ट बोलें आणि आजही बोलतों. पूर्वी सिद्धांतानें बोलत होतों, आज प्रत्यक्ष प्रमाणांनीं बोलतों. गोष्ट कबूल. कॉंग्रेस सरकार जनतेचें आहे. कारण आम्हीं जनतेनेंच मतें देऊन अथवा जनतेचीं मतें मिळवून हें सरकार अस्तित्वांत आलें आहे. आधीं मुळीं जनतेंत मतदानाचा हक्क किती थोड्या लोकांना आहे पाहा बरें ! इतका कोता मताधिकार. ज्यांना मत आहे, मन आहे, माणुसकी आहे, पण तरीदेखील तुमच्या आमच्या सरकारच्या कायद्याप्रमाणें ज्यांना मताधिकार नाहीं—"

"म्हणून काय त्या उणीवेबद्दल चोराला सोडून संन्याशाला सुळीं देणार तुम्ही ? सध्याचे कायदे वाईट असतील—"

"नुसते वाईटच नाहींत; जुलमी आहेत. माणसांना माणसांसारखें जगूं देणारे कायदे नव्हेत हे."

"कबूल ! अगदीं कबूल ! पुढें ?"

"जनतेच्या पिळणुकीवर आधारलेलें सैतानी जुलमी सरकार टिकवून धरण्यासाठीं 'सरकार' पदावर आरूढ झालेल्या पिळणूकदारांच्या हितरक्षकांनीं सत्तेच्या जोरावर केलेले हे कायदे; जनतेच्या पिळणुकीला नीतिनियमांचें सोज्वळ फसवें स्वरूप देऊन तयार केलेले. त्या जुन्या कायद्यांवर प्रस्थापित झालेलें आमचें कॉंग्रेसचें सरकार. त्या जुन्या कायद्यांनींच चालणारें. त्या कायद्यांनींच बळकट स्वरूपांत दंडेलीनें अस्तित्वांत आलेलें—"

"कॉंग्रेस सरकार काय दंडेलीनें अस्तित्वांत आलें आहे ?"

" नाहीं. पण पूर्वीचें दंडेलीवर, दंडपशाहीवर आधारलेलें इंग्रज सरकार आणि आजचें कॉंग्रेस सरकार यांच्या राज्यांत तत्त्वतः असा काय मोठासा फरक आहे मला सांगा ! फरक असला तर एवढाच कीं पूर्वी आम्हांला गोरे धनकुबेर पिळीत होते; त्यांऐवजीं आतां तो आम्हांला पिळायचा अधिकार काळ्या—देशी धनकुबेरांना मिळाला आहे. आमचें सरकार कायद्यांनीं परदेशी व्यापाराला देशांत आळा घालील. घालतें. पण त्यांत फायदा कारखानदार–जमीनदारांचा. गोरगरिबांचा नव्हे."

" स्वदेशांत स्वदेशी व्यापारधंदा वाढला, उद्योग वाढले, मोठमोठे कारखाने उभे राहिले, भारताचा माल देशाला पुरून दूर देशीं जाऊं लागला, जगांतील बाजारपेठा आम्हांला मिळाल्या, आमची राष्ट्रीय संपदा अशी राष्ट्रांतच राहिली, आणि भारत ही प्राचीन काळासारखी पुन्हा वैभवसंपन्न सुवर्णभूमि शोभूं लागली, तर ती तुम्हां आम्हांला अभिमान वाटण्याजोगी गोष्ट नाहीं का ? "

शेख मिरा माझें ऐकून गालांतल्या गालांत हंसत माझ्याकडे पाहूं लागला. त्याच्या त्या हास्यांत विषाद होता. तिरस्कार होता. निराशा होती. आणि काळ्या ढगांनीं व्यापलेल्या आकाशांत एखाद्या काळ्या ढगाला रुपेरी किनार शोभावी तशी काळें खडक फोडून खळखळ वाहणाऱ्या निर्झरासारखी हिंमतही होती.

तो गप्प राहिलेला पाहून मी त्याला म्हणाल्यें, " का रे ? " तरीदेखील तो कांहीं बोलेना. अंमळशानें तो म्हणाला, " तो अभिमान तुम्हांला नाहीं वाटणार. "

" अजूनही तुम्ही आणि आम्ही दोन आहों ? " मी म्हणाल्यें.

" तुम्ही आमच्यापासून दूर चाललां आहां. "

" तीं कशीं ? "

" तुम्ही कॉंग्रेसचे कैवारी आहां. आणि कॉंग्रेस आतां देशांतील जमीनदार–भांडवलदार अशा जनतेची पिळणूक करून जनतेचें रक्त शोषण करणाऱ्या वर्गाची कैवारी झाली आहे. तिचे तुम्ही कैवारी. "

" ही कॉंग्रेसची बदनामी आहे. कॉंग्रेस रक्तशोषकांची कैवारी नाहीं."

" काळाबाजार करून जनतेला जिवंत राहायला अवश्य असलेल्या अन्नवस्त्रांसारख्या वस्तूंचीदेखील दुर्मिळता—कृत्रिम दुर्मिळता स्वतःच्या नफेबाजीसाठीं निर्माण करणाऱ्या सामाजिक गुन्हेगार व्यापाऱ्यांना फांशीची शिक्षा द्यायला हवी अशी गर्जना आमचा एक मोठ्यांत मोठा कॉंग्रेस पुढारी करतो, तर दुसरा तसलाच मोठा पुढारी ह्या काळाबाजारवाल्या गुन्हेगारांवर नुसताच रागावतो. आई

लेकरावर रागावते तसा. हेच पुढारी मग काँग्रेस सरकार बनतात. राजांचेही राजे होतात. काँग्रेसचें एकच राज्य चालवितात. राज्यही चालतें; काळाबाजारही चालतो. असें राज्य आम्ही करतों! कुणासाठीं हें राज्य करतों आम्ही? मला सांगा! हेंच ना आमचें गांधीजींचें रामराज्य? हें राज्य पुंजीपतींसाठीं चाललें आहे. जगांतील पुंजीशाही राजवटींशीं हातमिळवणी करीत आम्ही राज्य करीत आहों. आणि वर आम्ही लोकांना सांगतों, कीं आम्ही रामराज्य स्थापन करीत आहों. पण जनता तुमचें पुंजीपतीधार्जिणें सरकार समजतें तशी भोळी नाहीं. जनतेची निष्ठा गांधींवर होती. सत्यअहिंसेची शपथ गांधींनीं घातली म्हणून जनतेनें ती आजवर पाळली. निष्ठेनें पाळली. पण जनतेची ही आम्ही फसवणूक करीत आहों. जनता आतां ओळखून चुकली आहे कीं गांधीजींची सत्य-अहिंसा आमचें सरकार पुराणांतलीं वांगीं मानतें. शब्दांनीं नाहीं पण कृतीनें. तुम्हां गांधीवाद्यांचे दिवस आतां संपत आले आहेत. शकुंतलाताई! तुम्ही म्हणतां ना, कीं गांधीवाद हा शुद्ध स्वरूपाचा कम्युनिझम आहे म्हणून? त्या गांधीवादाचा काळ आता संपला आहे—"

गांधीवादाविषयीं कोणी कटु अथवा तीव्र बोललेलें मला सहन होत नसे. शेख मिरा जें बोलत होता, तें पुष्कळसें कटुसत्य आहेसें मनाला वाटे. पटे. पण तें तसें मान्य करण्याइतकें मनोधैर्य माझ्या ठायीं नव्हतें. माझ्या डोळ्यापुढें नजर न ठरण्याइतक्या वेगानें उत्पातांवर उत्पात होत असल्याचा भास मला होत होता.

"फार तर असें म्हणूं आपण, कीं गांधीवादाचा गांधीसमाजाचा काळ अजून यायचा आहे." मीं म्हटलें.

"तसें म्हणा. तुमच्या शब्दांत काय आहे? आज आम्ही पांढऱ्या शुभ्र खादी अभ्र्याखालीं आणि सत्य-अहिंसेच्या नांवाखाली झांकून आणलेल्या कोणत्याही मालाला आणि माणसाला गांधींच्या थोर नांवावरून नाहीं ओळखीत? तसेंच आणखी ओळखूं. 'महात्मा गांधी की जय!' म्हणून आम्हीं आजवर गेल्या पाव शतकाहून अधिक काळात काळोखाच्या तोंडावरती काळोखी फसगारीं काय थोडीं थोडकीं कृत्यें केलीं? तशीं आणखी करूं. ही गांधींची शेळी म्हणून शिकारी चित्ते तुम्ही आमच्यावर सोडूं लागलां तर आम्ही त्याला तुमच्या समाधानासाठीं, तुमच्या राजवटींत रहायचें म्हणून फार तर गांधींची शेळी म्हणूं. पण प्रत्यक्ष वागतांना त्याला चित्ता म्हणूनच वागवूं."

"खरेंच का रे शेख ! तुला असें वाटतें ? गांधीवादाचा काळ संपला का ?"

"होय. संपला."

"आणि आतां—ही आज सगळीकडे माजते आहे, अशीच अंदाधुंदी माजणार का ? जगाचा प्रळयकाळ इतका जवळ आला का ?"

"नाहीं. जगाचा प्रळयकाळ जवळ आला नाहीं, आणि तुम्ही भितां तसा प्रळय जगांत कधीं व्हायचाही नाहीं. जगाचा जीवनक्रम नागमोड्या सरळ वाटेनें चालतो ताई ! माघार, मागें पाऊल आम्हां जगांतील जनतेला माहीत नाहीं. जग नेहमीं झगडत, ठेंचाळत, मरत, मारीत पुढेंच जात आहे व जाईल."

"पण आपणाला पुढें मार्गच मोकळा कुठें आहे आतां ? आमच्या वाटा बंद होत आहेत. जनता आमच्यापासून दूर दूर चालली आहे. गांधीजींच्या शिकवणुकीला दिवसेंदिवस विचारवंतांत खरा थाराच नाहींसा होत आहे..."

शेख मिरा कांहीं क्षण विचार करून उजव्या हाताची मूठ आवळून लाल सलामाच्या पवित्र्यांत कांहीं बोलणार, तेवढ्यांत निरा स्टेशन आल्याची चाहूल लागली. शेख मिरा सावधपणानें सरसावूं लागला.

हा आतां उतरणारसें मला वाटूं लागलें.

"बरें पण आमच्या अहिल्येची कांहीं खबर ? लोक तिच्याविषयीं कोणी कांहीं बोलतात तर कोणी कांहीं बोलतात. त्याचा अर्थ काय ?" मी त्याला म्हणाल्यें.

"त्याचा अर्थ ? ताई ! इतक्या खोलांत तुम्हीं शिरूं नये. रावणाची आणि मंदोदरीची गोष्ट सांगतात ती तुम्हांला माहीत आहे ना ? लग्नानंतर मंदोदरीनें कौतुकानें रावणाचा जामदारखाना उघडून पाहिला; आणि त्यांतलें जें दालन उघडून पाहूं नको असें रावणानें तिला सांगितलें होतें तें अधिक उत्सुकतेनें पहिल्याप्रथम उघडून पाहिलें. त्या दालनांत निरपराधी लोकांना कंटस्नान घालून रावणानें त्यांचीं हाडें आणि कवट्या भरून ठेवलेल्या सापडल्या. म्हणून तुम्हांला माझी विनंति आहे कीं तें दालन तुम्ही उघडून पाहूं नका. अहिल्यादेवी ताळ्यावर आली, आणि जिवंत सांपडली, तर आपली."

"असें कां म्हणतां ? तिच्याही जिवाला धोका आहे ?"

"राखतां न येण्याजोगी अफाट संपत्ति अहिल्यादेवीच्या वारशाची आहे. मला ऐकून माहीत आहे कीं ती सारी दौलत सदानंदांची होती."

"होय ?"

" होय. सदानंदांच्या जन्माचे आणि संसाराचे तीन तेरा नऊ अठरा कसे झाले, त्याची वाताहात कशी उडाली, हें तुम्हीं मघाशींच नाहीं का ऐकलें ? मलादेखील तें पूर्वी माहीत नव्हतें. सर्वांचाच समज होता कीं सदानंदांनीं रामदास महाराजाच्या पाशवी वृत्तीला विटून देह ठेवला. आणि त्यांची पत्नीही जी महाराजाच्या कचाटींतून सुटली, ती तिनेंही कुठें तरी जाऊन आत्महत्या केली असावी, असेंच सारेजण मानीत होते. अहिल्यादेवी ही सदानंदांच्या दौलतीची कायदेशीर वारस आहे; म्हणून तिची ती सर्व दौलत कागदोपत्रीं आपल्या घशांत घालायच्या कारवाया शेट साखरगांवकर आणि जगदाळे जहागीरदार यांच्या एकमेकाच्या संगनमतानें चालल्या आहेत. आणि—त्याचा काय नेम सांगावा ? अहिल्यादेवी जर या पडद्यामागच्या भानगडींपुढें नमल्या नाहींत तर त्यांचें नखदेखील पुन्हा तुम्हांआम्हांला दिसायची पंचाईत आहे..."

गाडी थांबली. तसा आमचा वादविवादही थांबला. शेख मिरा पुन्हा आपला काळा चष्मा डोळ्यांवर चढवून दरवाजांत जाऊन उभा राहिला.

तेवढ्यांत त्याचा कोण साथीदार त्याला भेटला नकळे. काय त्यांना एवढीं महत्त्वाचीं खलबतें करायचीं होतीं कोण जाणे. तो एकाएकीं आपली पिशवी घेऊन घाईघाईनें खालीं उतरला.

" बरें ताई ! नमस्ते ! मी इथेंच उतरतों. " असें वाऱ्यावर शब्द फेकल्यासारखें बोलत तो त्या गर्दींत दिसेनासा झाला. आमच्या डब्यापुढेंही हवेंत ढग तरंगावे तशी लोकांची गर्दी रेंगाळत होती. कांहीं उतारू गाडींत चढले. कांहीं गाडीच्या दारांत उभे राहून डोकावून पाहत होते. कांहीं दारापाशीं घोळका करून इकडे तिकडे पाहत होते. पण मी शेख मिरानें रंगविलेल्या भडक भयंकर परिस्थितीचें शब्दचित्र पाहून मनांत उसळणाऱ्या विचारांत इतकी गुरफटलेली होत्यें कीं, माझें तिकडे मुळींच लक्ष गेलें नाहीं.

तेवढ्यांत गाडीची शिटी झाली. डब्याच्या दरवाजांतली मंडळी भराभर पांगली. कांहीं आमच्या डब्यांत घुसले; कांहीं आजूबाजूच्या डब्यांत घुसायला पळत गेले.

गाडी चालली. त्यासरसा सारा प्लॅटफॉर्म एकदम गरजला, "महात्मा गांधी की जय !"

मी एकदम भानावर येऊन उठून दरवाजांत जाऊन पाहूं लागल्यें. तों गर्दींत कांहींच नीट दिसेना. कांहीं पोलिसांना वेढल्यासारखा लोकांचा घोळका स्टेशनच्या फाटकाकडे चाललेला मात्र आढळला.

गाडी वाढत्या वेगानें चालूं लागली.

" पकडला वाटतें त्याला. " एक जण म्हणाला.

त्यासरशी एकदम अमंगळ शंका मनांत आली; शेख मिरा तर पकडला गेला नाहीं ?

मीं त्या माणसाला विचारलें, " कुणाला पकडलें. ?"

" तो आतां या डब्यांतून उतरला तो; काळा चष्मेवाला. तो कोणी पत्रीसरकारचा माणूस आहे म्हणतात. " तो माणूस उत्तरला.

" त्याचा हात होता त्या फकिराच्या खुनांत ?" दुसऱ्यानें विचारलें.

त्या खुनांत नसला तर दुसऱ्या एखाद्या खुनांत किंवा दरोड्यांत हात असेल याचा काय नेम ? " पहिला म्हणाला.

" बाकी ही तरी एक अजबच गोष्ट आहे नाहीं कारे ? एकच गोष्ट. पण परवां परवां ती या लोकांनीं केली तर त्यांना कुणीं त्याबद्दल नांवें ठेवलीं नाहींत. पत्री सरकारनें चळवळींत काय थोडे खून केले असतील ? "

" मग ? केले असतील. पत्र्या ठोकल्या असतील; खूनही केले असतील. पण हें खुनी दरोडेखोरांचें पत्रीसरकार किती परोपकारी होतें, गोरगरीब रयतेची किती काळजी वाहणारें होतें, माहीत आहे ? पत्रीसरकारच्या लोकांनीं शिक्षा कुणाला केल्या ? जे लोकांचे खरेखरे गुन्हेगार होते, पण माजलेले होते; ज्यांचे गुन्हे लांचखाऊ पोलीस आणि वरचे अधिकारी उजेडांत येऊं देत नव्हते, इंग्रजाचा कायदा देखील ज्यांच्या अरेरावीपुढें नांगी टाकीत होता, अशांचें पत्रीसरकार कर्दनकाळ होतें. त्यानें रंजल्या गांजल्या कैक गोरगरीबांना न्याय दिला. ज्यांची गुन्हेगारी अशी पत्रीसरकारांत उजेडांत येते, आणि त्या गुन्हेगारीबद्दल शासन होतें, त्यांनीं पत्रीसरकारविषयीं ओरड करावी..."

हा कोणीतरी पत्रीसरकारचा कैवारी बोलत होता. पण माझें चित्त त्यांत नव्हतें. शेख मिरा जें बोलला, त्यामुळें दुःखी झालेल्या मनावर शेख मिराच्या कैदेच्या बातमीनें पेटते निखारे ओतल्यासारखें झालें होतें.

● ●

स्टेशन आलें केव्हां याची मला कांहीं दाद न्व्हती. विचारांनीं भयंकर शीण आला होता. तशांत गार वारा आपल्या झुळुकांच्या प्रेमळ हलक्या हातांनीं मला थोपटूं लागला. त्यांतच केव्हां नकळे, माझा अंमळ डोळा लागला होता.

गाडी हलली. त्या हादऱ्यासरशी मी दचकून जागी होत सभोंवार पाहत विचारलें, "कोणतें स्टेशन ?..."

आणि ते शब्द ओठांतल्या ओठांत घुटमळले.

मावशी माझ्या शेजारीं बसल्या होत्या.

अविनाश आणि स्वामी समोरच्या बांकावर बसले होते.

"जागी झालीस तूं शकू ! हें किर्लोस्करवाडी स्टेशन." स्वामी म्हणाले.

"आपण इकडे कुठें ?" मावशींनीं विचारलें.

मला कांहींच बोलायला सुचेना. इतकी बावरून गेल्यें. मावशींच्या, स्वामींच्या अविनाशच्याही कपाळावर कुंकवाचे मंगल टिळे होते. ताज्या फुलांचे हार अविनाश कवटाळून बसला होता. त्या फुलांच्या वासानें सारा डबा दरवळत होता.

हळदकुंकु माखलेला खण-नारळ मावशींच्या हातीं होता.

"आई ! त्यांना माहीत नसेल. त्यांना सांग ना !" अविनाश चौदा वर्षांच्या प्रौढ मुलाला सहसा न शोभणाऱ्या भाबडेपणानें म्हणाला.

कमलांत झांकलेल्या लक्ष्मीसारखी मावशींची प्रसन्न चर्या पाहून मीं ओळखलें. सोमनाथ पहांटेला जें ऐकींव माहितीवरून बोलला, तें खरेंच होतें. सदानंद म्हणजेच स्वामी !

"याला म्हणतात ऋणानुबंधाच्या भेटीगांठी शकुंतला !" स्वामी शांत सागराच्या प्रसन्न गंभीरतेनें उद्गारले.

मीं लगेच उठून त्या दोघांनाही नमस्कार केला.

"देशाच्या सेवेसाटीं चिरायु हो !" स्वामींनीं माझ्या मस्तकावर वरदहस्त ठेवून मला आशीर्वाद दिला. मग कितीतरी वेळ आम्ही आमच्या आणि देशाच्या सुखदुःखाच्या वार्तांचें मंथन करीत होतों.

"पण आतां आपणाला कुठें जायचें ?" मीं स्वामींना विचारलें.

"तुला कुठें जायचें ?" त्यांनीं मला विचारलें.

"तुम्ही न्याल तिकडे." मी उत्तरल्यें.

"होय ना; तर चल. आपण आपल्या कर्मभूमींत जाऊं. आपणाला आतां

हे दोन हक्काचे मदतनीस मिळाले आहेत. आपण आतां पुन्हा कामाला लागूं."

"आपणाला तिथें स्थान आहे आतां?"

"तूं भितेस?"

"भीत नाहीं मी. नाहीं तरी मी देखील तुम्ही म्हणतां तेंच मनांत योजून आज मनाचा निर्धार करून बाहेर पाऊल टाकलें आहे. पण मनाला राहून राहून उगीचच वाटतें, कीं त्या आपल्या आत्मयज्ञांतून कांहीं मंगल निष्पन्न होणार आहे का?"

"मंगलांतून नेहमीं मंगलच अवतरतें शकु! सोन्याच्या मातींतून सोनेंच निघतें. आपण जीवन जगतों तें सत्य, मंगल असेल, तर त्यांतून असत्य, अमंगल कसें निर्माण होईल?"

"मग काय, आतांपावेतों महात्मा गांधींच्या सत्यअहिंसेवर निष्ठा ठेवून आपण साऱ्यांनीं चळवळ केली, ती असत्य अमंगल होती?"

"मुळींच नव्हती. अशा संशयानें आणि निराशेनें मलिन झालेल्या दृष्टीनें भूतकालाकडे आपण पाहतां कामा नये शकु!"

"मग भगव्या झेंड्याकडे तरी आम्हीं कोणत्या आशावादानें पाहावें? आपला तेजस्वी तरुण वर्ग आपल्या राष्ट्राच्या तिरंगी झेंड्याला सोडून भगव्या झेंड्याखालीं गोळा होऊं लागला आहे. गांधीजींच्या सत्य–अहिंसेकडे तो तिरस्कारानें, आवेशानें मुठी आवळून पाहत आहे. ज्या तरुणांच्या कार्यक्षमतेवर आपल्या राष्ट्राची सारी मदार, ते तरुणच असे रोज रोज अधिकाधिक संख्येनें बिथरतांना दिसत आहेत. जातीयता सहस्र फणांच्या नागिणीसारखी जिकडे तिकडे द्वेषाचे महाविषारी फूत्कार सोडून सारें वातावरण दूषित करीत आहे. आपल्या भारतमातेच्या कोणत्या मंगल आशा सांठवलेल्या आहेत यांत?"

"आहेत. त्यांतही मंगल आशा सांठवलेल्या आहेत शकु! मंगल अंतःकरणानें, विशाल आशावादी मंगल दृष्टीनें आपण आपल्या तरुण पिढीकडे पाहायला हवें. आपण आजवर त्यांना योग्य मार्गदर्शन करूं शकलों नाहीं, आपली काँग्रेस राष्ट्राच्या भवितव्याचे अष्टवसूंसारखे आधारस्तंभ ह्या आपल्या तेजस्वी तरुणांच्या चळवळीं-कडे विशाल सर्वगामी दृष्टीनें पाहूं शकत नाहीं; अशा स्थितींत स्वतःचें व भारतमातेचें भवितव्य उज्ज्वल करण्यासाठीं तरुण वर्ग नवे मार्ग चोखाळूं लागला,

तर त्याबद्दल आपण त्याला कोणत्या तोंडानें दोष द्यावा बरें? आपण त्यांचें मार्गदर्शन करूं शकत नाहीं. गांधीजींची शिकवण आपण आचरणांत आणून तरुण वर्गापुढें आपला आदर्श ठेवूं शकत नाहीं. राष्ट्राच्या तीव्रतर जीवनकलहांतील जीवनमरणाच्या मोलाच्या गंभीर समस्या सोडवून तरुण वर्गाच्या अंतःकरणांत विश्वास व आदर निर्माण करायला आपण असमर्थ ठरत आहों."

"म्हणून काय राष्ट्राला त्यांनीं आपणामागून विनाशाच्या गर्तेत ओढून न्यावें!"

"हीच–हीच भयंकर चूक आपण करीत आहों शक्र! राष्ट्राच्या उद्धाराचा ताम्रपट केवळ आम्हांलाच मिळाला आहे अशा अहंकारानें वागून आम्ही राष्ट्रांतील इतर प्रभावी सुप्त शक्तींची उपेक्षा व अवहेलना करीत आलों ही चूक आपण आजवर करीत आलों; आणि आजही हीच चूक पुन्हा पुन्हा करीत आहों. आपला तरुणवर्ग असा उपमर्द सहन करायला तयार नाहीं; यांतच मी म्हणतों त्याच्या वर्धिष्णु पुरुषार्थाचीं बीजें आहेत. ती बीजें वाढूं द्या. ऊन, पाऊस, आघात सहन करीत, जीवनाची जमीन तुडवीत व जीवनार्थकलहांतील आघात सहन करीत त्यांच्या वृक्षवेली बहरूं द्या. उद्यांचा भारत त्यांचा आहे. त्यांना त्याची स्वतःला मानवेल तशी घडण करूं द्या. आपण त्यांच्यावर एवढा विश्वास बाळगूं कीं ते भारताचे तेजस्वी सुपुत्र आहेत. भारतमातेच्या उद्धारासाठीं सर्वस्व पणाला लावून अखेरपावेतों झगडणारे तेच आहेत. ते राष्ट्राचा नाश कधींच करणार नाहींत–चिंतिणारही नाहींत."

"तर मग गांधीजींनीं आपल्या राष्ट्राला दिलेली सत्य अहिंसेची शिकवण व्यर्थच होणार काय?"

"नाहीं. ती शिकवण कशी व कां व्यर्थ होईल? सत्य कधीं तरी नाश पावेल? आकाशांत अभ्रें आलीं कीं सूर्य-चंद्र झाकले जातील. म्हणून काय ते आकाशांतून नष्ट होतील? गांधीजींची शिकवणच शेवटीं विजयी होईल."

"पण कधीं? या जन्मीं?" मीं कांहींसें चिडून स्वतःला विचारलें.

काय असेल तें असो, मला कांहीं खात्रीनें स्वामींचा उपदेश आकलन झाला नाहीं. परोपरीनें ते मला समजावून सांगत होते. पण त्यांच्या उपदेशांत मला प्रकाश दिसेना. अंतरंगांत आकाश अगदीं ढगांनीं आणि धुक्यानें भरून गेलें होतें.

ते ढग आणि धुकें दूर होणार होतें का?

ती ढग-धुक्याची सावट उगवत्या सकाळची होती, कीं मावळत्या सायंकाळची

होती ? त्यांतून माध्यान्हीचा सूर्य उगवणार होता कीं रात्रीच्या काळोखाचा पडदा दिसूं लागणार होता ?

आणि रात्र असली तरी देखील ती उगवत्या चंद्राची चांदणी रात्र होती कीं मावळत्या चंद्राची काळोखी रात्र होती ?

त्या अंधारांतच आमची गाडी ठरल्या वेळीं दिवसाउजेडीं मिरजेला आली. आम्ही खालीं उतरून जवळच पलीकडे उभ्या असलेल्या कोल्हांपूरच्या गाडींत जाऊन बसलों. जयसिंगपूरला उतरून आम्हांला मोटारीनें सावरगांवला जायचें होतें.

• •

आम्ही सावरगांवला जाऊन पोहोंचलों आणि सूर्य मावळला.

गांवांत प्रवेश करतांना मला स्वामी उपदेश करीत होते, "शकू! आपण या रात्रीच्या वेळीं ज्योत मालवलेली पणती हातीं घेऊन या कर्मभूमींत आलों आहों. आपणाला लोक विसरले असतील. ते आपणाला ओळखणार नाहींत. पण लोकांनीं ओळखलें नाहीं म्हणून चिडूं नकोस. निराश होऊं नकोस. आपल्या सेवाव्रतापासून ढळूं नकोस. दिवा लाव. प्रकाश कर. त्या प्रकाशांत तूंही चाल आणि लोकांनाही त्या प्रकाशाच्या आधारानें चालूं दे."

मध्यरात्रीला लक्षणेनें संकल्पित तारीख पंधरा ऑगस्ट एकोणीसशें सत्तेचाळीस उद्याला येतांच आमच्या स्वतंत्र भारताचा शुभावतार व्हायचा. त्या समारंभासाठीं सारें गाव ध्वजपताकांनीं, दीपमालांनीं चांगलें शृंगारलेलें होतें.

त्या सुशृंगारित मार्गांतून जरी आम्ही गुढ्यातोरणांखालून दीपज्योतींच्या लखलखाटांतून चाललों होतों, तरी माझ्या अंतरंगांतील अंधारी रात्र अजून संपली नव्हती. स्वामींच्या उपदेशानें मला आशावादी बनविलें होतें. हा अंधार उजाडण्यापूर्वीच्या काळोख्या रात्रीचा आहे अशी माझ्या मनाची मी समजूत घालीत होत्यें.

पण भगवान आणि शेख मिरा यानीं सांगितलें, त्यावरून तर तो अंधार आणखी घनदाट काळाकुट्ट झाला होता.

आणि त्या रात्रींतच आम्ही संकल्पित वेळीं आमचा देश स्वतंत्र झाल्याचें मंगल वाद्यांच्या जयघोषांत घोषित करून 'भारतमाता की जय' म्हणून भारतमातेचा जयजयकार केला.

जहागीरदार त्या समारंभाच्या अध्यक्षस्थानीं होते; व रामदास महाराज ह्या स्वतंत्र भारताला आशीर्वाद द्यायला सभास्थानीं सर्वोच्च आसनावर अधिष्ठित होते.

व्यासपीठावर तिरंगी झेंडा व भगवा झेंडा असे दोन झेंडे फडकत होते. वारा त्या दिशेनें वाहत होता, त्यामुळें कीं काय, भगवा झेंडा हवेंत जोरांत फडकत होता.

# लोभ असावा ही विनंति

"ग. पा. परचुरे प्रकाशन मन्दिर" या प्रकाशन संस्थेची स्थापना झाली तेव्हां सुरवातीलाच ही "कादंबरीमय आंग्लशाही" माला प्रसिद्ध करावी अशी माझी इच्छा होती. परंतु इच्छा आणि पूर्ति यांमध्यें नेहमींच अन्तर असतें, आणि तें तुटून इच्छापूर्ति होण्याला कांहीं काळ जावा लागतो. त्याप्रमाणें या कामींही तो गेला. उशिरानें कां होईना पण संकल्पिलेलें एक कार्य आज तडीस गेलें. ही संकल्पसिद्धि साधण्याची संधि सुप्रसिद्ध कादंबरीकार श्री. वि. वा. हडप यांनीं मला दिली याबद्दल मी त्यांचा फार आभारी आहें.

तसेंच "कादंबरीमय आंग्लशाही" या मालेला—प्रकृति अंथरुणावर पडून राहण्याइतकी बिघडलेली असतांही प्रस्तावना लिहून माझ्या "ग. पां. परचुरे प्रकाशन मन्दिर" या संस्थेला सुप्रसिद्ध साहित्यिक **श्री. वि. स. खांडेकर** यानीं जो आशीर्वाद दिला त्याबद्दल मी स्वतःला धन्य समजतों.

"कादंबरीमय आंग्लशाही" संपूर्ण प्रसिद्ध करण्याची माझी इच्छा मीं व्यक्त करतांच—मुंबईच्या पुस्तकविक्रेत्यांतील अग्रणी **पॉप्युलर बुक डेपोचे** धनी माननीय **श्री. गणपतराव भटकळ** यांनीं मला आवश्यक तें सहकार्य देण्याचें आश्वासन दिलें नि त्यांच्या सहकार्यामुळेंच एवढें मोठें काम मी पार पाडूं शकलों. प्रस्तुत गोष्टीचा येथें उल्लेख करणें श्री. गणपतराव भटकळ यांचे नम्र स्वभावाला आवडणार नाहीं हें माहीत असूनही—असा सादर उल्लेख करणें माझें कर्तव्य आहे असें मी समजतों.

कोल्हापूरला असूनही मुंबईपुण्याइतकी उत्कृष्ट छपाई करण्यांत ख्यातनाम असलेले कोल्हापूरच्या "**श्री ज्ञानेश्वर प्रिंटिंग प्रेस**"चे धनी श्री. भाऊसाहेब सहस्रबुद्धे या वर्षी त्यांची माझी गांठ पडेपर्यंत एकमेकांना पाहिलें नसतांही "ग. पां. परचुरे प्रकाशन मन्दिर" या संस्थेकडे संस्थेच्या स्थापनेपासूनच आपुलकीनें पाहात आले आहेत. या मालेंतील पांच कादंबऱ्या त्यांचेच मुद्रणालयांत छापल्या गेल्या आहेत. श्री. भाऊसाहेब माझ्याविषयीं जी आपुलकी दाखवितात तीबद्दल मी त्यांचा सदैव ऋणी राहीन. अगदीं ऐनवेळीं सांगून ही शेवटची कादंबरी वेळेवर छापून देण्यांत "मौज प्रिंटिंग ब्यूरो"नें जी तत्परता नि कार्यक्षमता दाखविली ती भागवतबंधू नि त्यांचा कामगार वर्ग यांचे पूर्वकर्तृत्वाला साजेशीच आहे.

पुस्तक छापून सिद्ध झाल्यावर तें ग्राहकांपर्यंत पोंहोंचविण्यासाठीं ग्रंथविक्रेत्यांच्या

मदतीची आवश्यकता असते. ही मदत महाराष्ट्रांतील ग्रंथविक्रेते आजपावेतों मला मोठ्या आपुलकीनें देत आले आहेत, नि यापुढेंही देतील असा मला विश्वास वाटतो.

" कादंबरीमय आंग्लशाही " या मालेचे विक्रीचें काम " **बॉम्बे बुक डेपो** " या आपल्या संस्थेकडे घेऊन **श्री. सदानंदशेठ भटकळ, श्री. पांडुरंगशेठ कुमठा** नि **श्री. भट** यांनीं मला उपकृत केलें आहे. त्यांचे सहकार्यानें अशींच आणखीं मोटीं कामें मी पार पाडूं शकेन अशी उमेद मला वाटते.

लेखक, प्रकाशक नि विक्रेते यांप्रमाणेंच वृत्तपत्रांचें सहकार्यही ग्रंथप्रसाराचे दृष्टीनें अत्यावश्यक आहे. मला लिहिण्याला आनंद नि अभिमान वाटतो कीं मराठी वृत्तपत्रांनीं माझे प्रकाशनांना वेळोवेळीं निरनिराळ्या प्रकारांनीं प्रसिद्धि देऊन " ग. पां. परचुरे प्रकाशन मन्दिर " ही संस्था ख्यातनाम करण्याला मोठें साहाय्य केलें आहे. मराठी वृत्तपत्रकारांनीं अशीच कृपादृष्टि निरंतर ठेवावी अशी नम्र प्रार्थना.

कागदाची दुर्मिळता नि महर्गता, छपाईचे वाढलेले दर, सार्वजनिक आर्थिक अडचण यांमुळें नि पुस्तक ही वस्तु जीवनांत नडीव नसल्यामुळें पुस्तकांचे खपाला मोटा पायबंद बसला असून पुस्तकविक्रीची परिस्थिति युद्धपूर्व काळाअितकी कठीण होऊन बसली आहे. असें असतांही सवलतीची योजना प्रसिद्ध करतांच ज्या संस्थांनीं नि सज्जनांनीं आगाऊ पैसे पाठवून " ग. पां. परचुरे प्रकाशन मन्दिर " या संस्थेबद्दल विश्वास प्रकट केला नि मी अंगिकारिलेल्या कामाला सक्रिय पाठबळ दिलें त्यांचा मी अत्यंत आभारी आहें.

कादंबऱ्यांचें लेखन चालू असतांनाच कादंबरीकार हडप रेल्वेच्या तारेंत पाय अडकून पडले नि त्यांचा उजवा हात मोडला. टरल्या अवधींत कादंबऱ्या पुऱ्या होतात कीं नाहीं अशी चिंता उत्पन्न झाली. परंतु हाताला होत असलेले क्लेश तसेच सहन करतां करतां तोंडानें दुसऱ्याला मजकूर सांगून त्यांनीं माला पुरी लिहून दिली. परंतु स्वतः लिहिणें व दुसऱ्याकडून लिहून घेणें यांत संवयीनुसार अंतर पडतें. या आपत्तीमुळें पहिल्या दोन कादंबऱ्यापेक्षां पुढील कादंबऱ्या कांहींशा लहान झाल्या तरी त्याबद्दल वाचकांनीं लेखक-प्रकाशकांना क्षमा करावी.

आहे अशीच कृपादृष्टि सर्वांनीं कायम ठेविली तर यापुढें मोठमोठ्या योजना हातीं घेण्याची माझी इच्छा आहे.

गोरेगांवकरांची चाळ क्र. २<br>
गिरगांव, मुंबई ४

सर्वांचा नम्र<br>
**ग. पां. परचुरे**